मराठी संशोधन

- २ -

(मराठी संशोधन पत्रिकेतील, ऑक्टोबर १९६२ ते जानेवारी १९६५ या कालावधीतील निबंध, कविता वगैरे.)

१९६६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. २१२९

संपादक

अ. का. प्रियोळकर

REFBK-0015157

मराठी संशोधनमंडळ
मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई १४
१९६६

मूल्य २॥ रुपये

१७ब१५
७५८६६
२१।३।७१
२७२८

मराठी संशोधन

- २ -

(मराठी संशोधन पत्रिकेतील, ऑक्टोबर १९६२ ते जानेवारी १९६५ या कालावधींतील निबंध, कविता वगैरे.)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
क्रमांक ७५८६६ दिः दिनांक
तारीख २।१२९ नोंदः दिः २२।३।७१.

संपादक

अ. का. प्रियोळकर



मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय



मराठी संशोधनमंडळ
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर, मुंबई १४
१९६६

मूल्य २॥ रुपये

संपादक-मुद्रक-प्रकाशक : **अ. का. प्रियोळकर,** मराठी संशोधनमंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर मुंबई १४, मुद्रणस्थळ-मुंबई वैभव प्रेस, ४१७/४२१ सरदार वल्लभभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई नं. ४.

विषयानुक्रमणिका

		पृ.
१. मोरोपंतांच्या अप्रसिद्ध कविता		१
२. अमृतकवीचें उद्योगपर्व	(म. अ. करंदीकर)	१०
३. शंभर वर्षांमागची वऱ्हाडी बोली		२३
४. रघुनाथपंडितविरचित दमयंतीस्वयंवराच्या भाषेवर रामकवीनें पाडलेला 'प्रकाश'	(अ. का. प्रियोळकर)	२५
५. मराठी भाषेंतील इंग्रजी अपभ्रष्ट शब्द	(म. अ. करंदीकर)	३७
६. पीएच्. डी. चें मराठी संशोधन		५५
७. मुंबई नगरसंशोधन	(अ. का. प्रियोळकर)	६५
८. कानारी, कोंकणी : भाषावाचक शब्द	(,,)	६९
९. पीएच्. डी. चें मराठी संशोधन		८४
१०. राघवाचें 'संदेहहरण'	(अ. का. प्रियोळकर)	८५
११. पारडा शिलालेख	(वि. भि. कोलते)	८९
१२. क्रिस्तपुराण आणि कै. वि. का. राजवडे	(स. गं. मालशे)	९३
१३. तुकारामबावाच्या अभंगांची गाथा	(पत्रव्यवहार)	१०७
१४. जनीजनार्दनांचें काव्य	(ज. शां. देशपांडे)	१२२
१५. मोरोपंताच्या केकावलींतील "जळमळें"	(अ. का. प्रि.)	१२८
१६. पीएच्. डी. चें मराठी संशोधन		१३०
१७. श्रीगंगानदीवरील आणखी एक काव्य	(अ. का. प्रि.)	१३२
१८. सूचिकार शंकर गणेश दाते	(अ. का. प्रियोळकर)	१३३

मराठा ग्रंथ संग्रहालय
क्रमांक ७५८६६ दि: निबंध
अंक 2929 नं. के. २२३१६१
मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १५१५

मोरोपंतांच्या अप्रसिद्ध कविता

(त्यांच्याच हातच्या लिखाणावरून घेतलेल्या)

(१) रामप्रभुप्रार्थनार्या

श्रीरामा कल्प म्हणे, " हितवस्तु मनीं पहा, वदा 'न्या' तें ॥
लोकीं उदार म्हणतां तो लाजे तुज महावदान्यातें ॥ १ ॥
माज्या येवूं द्यावें नित्य मनीं आत्मपद रमागेहें ॥
हा दास दासवरदा ! तुजला पसरूनि पदर मागे हें ॥ २ ॥
रामा ! परमोदारा ! न रमौदारादि विषय लाहून ॥
मन्मन जन्म न बुडवू अभिमानें सदनभार वाहून ॥ ३ ॥
श्रीरामा ! दीन जना होय तुज्या हर्ष नित्य नवनमनें ॥
साधूंचीं, रंजवि तव यशचि सदा, नंदनाख्य न वन, मनें ॥ ४ ॥
मातेला वत्स तसा घडिघडि तुजलाचि आठवे दास ॥
नाम तुझें विसरे जो, जन जड तो, करुनि पाठ वेदास ॥ ५ ॥
श्रीरामा ! बाळकृत स्तुति तुज बहु वत्सळासि आवडती ॥
दीनजनें वाहिलि जी जैसी रामेश्वरासि कावड ती ॥ ६ ॥
जें भक्तकार्य लघुगुरु करिसी तूं सर्वभक्तवशगा ! तें ॥
श्रीरामा ! हेंचि तुझें विश्व सदा परम पुण्य-यश गातें ॥ ७ ॥
श्रीरामा ! शरणागत तुज पुत्राहूनि फार आवडतो ॥
ताप हरिसि तूंचि, न जो मरुमार्ग-ह्रद नवा, न वा वड तो ॥ ८ ॥
श्रीरामा ! त्वां केली सगुणाबाई[1] स्वभक्तिनें धन्या ॥
वाटसि तूं माय इची, हे साध्वी बहु तुझी प्रिया कन्या ॥ ९ ॥
श्रीरामा ! न अहल्या तरती तव रजचि उद्धरी तिस ती ॥
गति-कीर्ति मिळे सगुणाबाई तों परम शुद्धरीति सती ॥ १० ॥
श्रीरामा ! श्रीसगुणाबाई त्वत्पदवियोगभीरु सती ॥
त्वां भेटविली नसती गंगासरयूहि सर्वथा रुसती ॥ ११ ॥
श्रीरामा ! स्वाराध्य श्रीरामेश्वरहि ईस दाखविला ॥
राखविला यात्राविधि, नामयशोरस जगासि चाखविला ॥ १२ ॥
श्रीरामा ! वाढविसी आत्मयश तसेंच भक्तयश गाया ॥
रुचलें भक्त मयूरा जेंवि तुझें हेंहि कीर्तिवशगा ! या ॥ १३ ॥

---

१. ही सगुणाबाई कोण, तें कळत नाहीं.

श्रीरामा ! चालिवसी उत्सव याहूनि अधिक चालीव ॥
म्हण, 'वत्से ! सगुणे ! तूं कलिस दिगंतीं पिटोनि घालीव' ॥१४॥
सुज्ञजनाहि न ये सुख बोलाया प्राकृता न यो ध्यात्या ॥
श्रीरामा ! पावे जो प्रेमळ तव जन पुरी अयोध्या त्या" ॥ १५ ॥
श्रीरामचरणयुग्मीं केल्या तुळसीच पंधरा आर्या ॥
वाढेल, भूषवावी या मुक्तांहीं स्वकंधरा आर्या ॥ १६ ॥

(२) ओवीमय आर्या[1]

ओवी—वाणीदेवी चित्तीं भावें । ध्यावी, सदैव वानावी नांवें ॥
हरी अघ, इचें गावें । यश, हेचि माय मानावी ॥ १ ॥
आर्या—वाणीदेवी चित्तीं भावें ध्यावी, सदैव वानावी ॥
नांवें हरी अघ, इचें गावें यश, हेचि माय मानावी ॥ १ ॥
ओवी—सीताकांता ! मेघश्यामा ! । हा दीन दास लक्षावा रामा ! ॥
अनुदिन वदनीं नामा । वसवूनि नित्य रक्षावा ॥ २ ॥
आर्या—सीताकांता ! मेघश्यामा ! हा दीन दास लक्षावा ॥
रामा ! अनुदिन वदनीं नामा वसवूनि नित्य रक्षावा ॥ १ ॥
ओवी—हरिली त्वां गाधिजमखपीडा । रामा ! दिली खळजनातें व्रीडा ॥
सन्मुनिमानसखगनीडा । सुख दिलें सुरमनातें ॥ ३ ॥
आर्या—हरिली त्वां गाधिजमखपीडा, रामा ! दिली खळजनातें ॥
व्रीडा, सन्मुनिमानसखगनीडा सुख दिलें सुरमनातें ॥ ३ ॥
ओवी—उद्धरिली श्रीगौतमभार्या । छळिली तपस्विवक्त्रानें जी आर्या ॥
सर्वसतीजनसत्कार्या । जपोनि शक्रानें ॥ ४ ॥
आर्या—उद्धरिली श्रीगौतमभार्या छळिली तपस्विवक्त्रानें ॥
जी आर्या सर्वसतीजनसत्कार्या जपोनि शक्रानें ॥ ४ ॥
ओवी—हरिलें, खंडुनि ईश्वरचाप । श्रीजनकनंदिनीचित्त, ताप ॥
हरुनि जग केलें निष्पाप । सुहृष्ट, सत्तपोवित्त ॥ ५ ॥

---

१. येथें पंतांनीं काव्यरचनेची कमालच केली आहे. सबंध आर्या ठराविक यमकांचे ठिकाणीं तोडून ओवीसारखी म्हणतां येते; हेंच याचें वैशिष्ट्य. वाचकांस सुगम व्हावें म्हणून चरणांतील शब्द जसेच्या तसे ठेवून ओवी व आर्या वेगवेगळ्या दाखविल्या आहेत. यांत श्रीरामचरित्र सुसंगत रीतीनें सांगितलें आहे.

आर्या—हरिलें, खंडुनि ईश्वरचाप, श्रीजनकनंदिनीचित्त ॥
ताप हरुनि जग केलें निष्पाप, सुहृष्ट, सत्तपोवित्त ॥ ५ ॥

ओवी—क्षोभे भृगुराम महाशूर । सदोद्दाम अस्त्रशस्त्रबळें क्रूर ॥
तयाचा केला त्वां दूर । क्रोधसह अधर्म पळे ॥ ६ ॥

आर्या—क्षोभे भृगुराम महाशूर सदोद्दाम अस्त्रशस्त्रबळें ॥
क्रूर, तयाचा केला त्वां दूर क्रोधसह अधर्म पळे ॥ ६ ॥

ओवी—ताताचा सत्यव्रतधर्म । तुवां रक्षिला, त्यजुनि राज्य, शर्म ॥
सुदुष्कर केलें, कर्म । स्वीकारुनि श्रम प्राज्य ॥ ७ ॥

आर्या—ताताचा सत्यव्रतधर्म तुवां रक्षिला, त्यजुनि राज्य ॥
शर्म सुदुष्कर केलें, कर्म स्वीकारुनि श्रम प्राज्य ॥ ७ ॥

ओवी—पाखंडजनें जैसी गीता । रात्रिंचरेश्वरें हरितां सीता ॥
तव मति विरहज्वरभीता । जनविडंबनाकरितां ॥ ८ ॥

आर्या—पाखंडजनें जैसी गीता, रात्रिंचरेश्वरें हरितां ॥
सीता, तव मति विरहज्वरभीता, जनविडंबनाकरितां ॥ ८ ॥

ओवी—त्वां सख्य सुकंठासीं केलें । सिद्धीस जडहि तत्कार्य नेलें ॥
सुयश दिगंतीं तें गेलें । जें त्रिलोकसत्कार्य ॥ ९ ॥

आर्या—त्वां सख्य सुकंठासीं केलें, सिद्धीस जडहि तत्कार्य ॥
नेलें, सुयश दिगंतीं तें गेलें जें त्रिलोकसत्कार्य ॥ ९ ॥

ओवी—रचिला सेतु समुद्रीं मोटा । संग्राम करुनि बळसहित, पोटा ॥
काळाच्या, अतितर खोटा । ओपिला तुवां अहित ॥ १० ॥

आर्या—रचिला सेतु समुद्रीं मोटा, संग्राम करुनि बळसहित ॥
पोटा काळाच्या अतितर खोटा ओपिला तुवां अहित ॥ १० ॥

ओवी—दिधली बिभीषणाला लंका । मग दिव्य करुनि ती देवी, अंका ॥
क्षालुनि, नुरवुनि शंका । लोकांत शुद्ध यश ठेवी ॥ ११ ॥

आर्या—दिधली बिभीषणाला लंका, मग दिव्य करुनि ती देवी ॥
अंका क्षालुनि, नुरवुनि शंका, लोकांत शुद्ध यश ठेवी ॥ ११ ॥

ओवी—भक्त भरत हर्षविला, राज्य । करुनियां दिलें प्रजांसि सुख प्राज्य ॥
यशा या कविचें साज्य-। सिता पायसाहि घेत मुख ॥ १२ ॥

आर्या—भक्त भरत हर्षविला, राज्य करुनियां दिलें प्रजांसि सुख ॥
प्राज्य यशा या कविचें साज्य-सिता पायसाहि घेत मुख ॥ १२ ॥

श्रीरामा ! चालिवसी उत्सव याहूनि अधिक चालीव ॥
म्हण, 'वत्से ! सगुणे ! तूं कलिस दिगंतीं पिटोनि घालीव' ॥१४॥
सुज्ञजनाहि न ये सुख बोलाया प्राकृता न यो ध्यात्या ॥
श्रीरामा ! पावे जो प्रेमळ तव जन पुरी अयोध्या त्या" ॥ १५ ॥
श्रीरामचरणयुग्मीं केल्या तुळसीच पंधरा आर्या ॥
वाढेल, भूषवावी या मुक्तांहीं स्वकंधरा आर्या ॥ १६ ॥

(२) ओवीमय आर्या[1]

ओवी—वाणीदेवी चित्तीं भावें । ध्यावी, सदैव वानावी नांवें ॥
हरी अघ, इचें गावें । यश, हेचि माय मानावी ॥ १ ॥
आर्या—वाणीदेवी चित्तीं भावें ध्यावी, सदैव वानावी ॥
नांवें हरी अघ, इचें गावें यश, हेचि माय मानावी ॥ १ ॥
ओवी—सीताकांता ! मेघश्यामा ! । हा दीन दास लक्षावा रामा ! ॥
अनुदिन वदनीं नामा । वसवूनि नित्य रक्षावा ॥ २ ॥
आर्या—सीताकांता ! मेघश्यामा ! हा दीन दास लक्षावा ॥
रामा ! अनुदिन वदनीं नामा वसवूनि नित्य रक्षावा ॥ ३ ॥
ओवी—हरिली त्वां गाधिजमखपीडा । रामा ! दिली खळजनातें व्रीडा ॥
सन्मुनिमानसखगनीडा । सुख दिलें सुरमनातें ॥ ३ ॥
आर्या—हरिली त्वां गाधिजमखपीडा, रामा ! दिली खळजनातें ॥
व्रीडा, सन्मुनिमानसखगनीडा सुख दिलें सुरमनातें ॥ ३ ॥
ओवी—उद्धरिली श्रीगौतमभार्या । छळिली तपस्विवक्त्रानें जी आर्या ॥
सर्वसतीजनसत्कार्या । जपोनि शक्रानें ॥ ४ ॥
आर्या—उद्धरिली श्रीगौतमभार्या छळिली तपस्विवक्त्रानें ॥
जी आर्या सर्वसतीजनसत्कार्या जपोनि शक्रानें ॥ ४ ॥
ओवी—हरिलें, खंडुनि ईश्वरचाप । श्रीजनकनंदिनीचित्त, ताप ॥
हरुनि जग केलें निष्पाप । सुहृद्, सत्तपोवित्त ॥ ५ ॥

---

१. येथें पंतांनीं काव्यरचनेची कमालच केली आहे. सबंध आर्या ठराविक यमकांचे ठिकाणीं तोडून ओवीसारखी म्हणतां येते; हेंच याचें वैशिष्ट्य. वाचकांस सुगम व्हावें म्हणून चरणांतील शब्द जसेच्या तसे ठेवून ओवी व आर्या वेगवेगळ्या दाखविल्या आहेत. यांत श्रीरामचरित्र सुसंगत रीतीनें सांगितलें आहे.

आर्या—हरिलें, खंडुनि ईश्वरचाप, श्रीजनकनंदिनीचित्त ॥
ताप हरुनि जग केलें निष्पाप, सुहृष्ट, सत्तपोवित्त ॥ ५ ॥
ओवी—क्षोभे भृगुराम महाशूर । सदोद्दाम अस्त्रशस्त्रबळें क्रूर ॥
तयाचा केला त्वां दूर । क्रोधसह अधर्म पळे ॥ ६ ॥
आर्या—क्षोभे भृगुराम महाशूर सदोद्दाम अस्त्रशस्त्रबळें ॥
क्रूर, तयाचा केला त्वां दूर क्रोधसह अधर्म पळे ॥ ६ ॥
ओवी—ताताचा सत्यव्रतधर्म । तुवां रक्षिला, त्यजुनि राज्य, शर्म ॥
सुदुष्कर केलें, कर्म । स्वीकारुनि श्रम प्राज्य ॥ ७ ॥
आर्या—ताताचा सत्यव्रतधर्म तुवां रक्षिला, त्यजुनि राज्य ॥
शर्म सुदुष्कर केलें, कर्म स्वीकारुनि श्रम प्राज्य ॥ ७ ॥
ओवी—पाखंडजनें जैसी गीता । रात्रिंचरेश्वरें हरितां सीता ॥
तव मति विरहज्वरभीता । जनविडंबनाकरितां ॥ ८ ॥
आर्या—पाखंडजनें जैसी गीता, रात्रिंचरेश्वरें हरितां ॥
सीता, तव मति विरहज्वरभीता, जनविडंबनाकरितां ॥ ८ ॥
ओवी—त्वां सख्य सुकंठासीं केलें । सिद्धीस जडहि तत्कार्य नेलें ॥
सुयश दिगंतीं तें गेलें । जें त्रिलोकसत्कार्य ॥ ९ ॥
आर्या—त्वां सख्य सुकंठासीं केलें, सिद्धीस जडहि तत्कार्य ॥
नेलें, सुयश दिगंतीं तें गेलें जें त्रिलोकसत्कार्य ॥ ९ ॥
ओवी—रचिला सेतु समुद्रीं मोटा । संग्राम करुनि बळसहित, पोटा ॥
काळाच्या, अतितर खोटा । ओपिला तुवां अहित ॥ १० ॥
आर्या—रचिला सेतु समुद्रीं मोटा, संग्राम करुनि बळसहित ॥
पोटा काळाच्या अतितर खोटा ओपिला तुवां अहित ॥ १० ॥
ओवी—दिधली बिभीषणाला लंका । मग दिव्य करुनि ती देवी, अंका ॥
क्षाळुनि, नुरवुनि शंका । लोकांत शुद्ध यश ठेवी ॥ ११ ॥
आर्या—दिधली बिभीषणाला लंका, मग दिव्य करुनि ती देवी ॥
अंका क्षाळुनि, नुरवुनि शंका, लोकांत शुद्ध यश ठेवी ॥ ११ ॥
ओवी—भक्त भरत हर्षविला, राज्य । करुनियां दिलें प्रजांसि सुख प्राज्य ॥
यशा या कविचें साज्य-। सिता पायसाहि घेत मुख ॥ १२ ॥
आर्या—भक्त भरत हर्षविला, राज्य करुनियां दिलें प्रजांसि सुख ॥
प्राज्य यशा या कविचें साज्य-सिता पायसाहि घेत मुख ॥ १२ ॥

ओवी—नेली प्रजा निजोत्तमलोका । रामा ! हरूनि मोहभवा शोका ॥
तूं जपसि नता, तोका । जसि माय करुनि लोभ नवा ॥ १३ ॥
आर्या—नेली प्रजा निजोत्तमलोका रामा ! हरूनि मोहभवा ॥
शोका, तूं जपसि नता, तोका जसि माय करुनि लोभ नवा ॥१३॥

उपसंहार

आर्या ओवींत दिसे, ओवी आर्यंत पाहतां नीट ॥
हरिहरगुण-से सद्रस हे रसिका सेवितां न ये वीट ॥ १४ ॥

(३) रामस्तव

वृत्त—गीति

सदया ! नत हा दीन, प्रभु तूं सुख दे सदा शिवायाला ॥
निरसीं भवबाधेतें, क्षण दाखिव बा ! पदा निवायाला ॥ १ ॥
रामा ! दयासमुद्रा ! मी आलों शरण, पाव ना, माजी ॥
भ्याली, न धैर्य पावे धी, जें संसरण या वनामाजी ॥ २ ॥
तुजवांचुनि कोणातें विनवूं ? व्रजपालका ! हरीं बाधा ॥
जननीच बहु स्नेहें जपती, निजबाळका म्हणे ' बा ! धा ' ॥ ३ ॥
करिसी करुणा दीनीं म्हणुनि स्तवितों तुला अगा ! रामा ! ॥
चुकतांहि उपेक्षीना पळही जननी मुला दयाधामा ॥ ४ ॥
धरिसी नतदीनाच्या अवनीं नच आळसा रमाकांता ! ॥
गज सोडविला व्याळें गिळिला प्रियबाळसा स्वशोकांता ॥ ५ ॥
' नमिती तुझिया पायां, स्तवती, वर मागती, षडरि मथिती ॥
बहु पावति बा ! रामा ! भजनें परमा-गती ' सुकवि कथिती ॥ ६ ॥
मज दर्शन दे तापप्रशमार्थ अनामया ! महादेवा ! ॥
' शिव ' हें पळही सोडू वदनास न नाम, या महा दे वा ॥ ७ ॥
सकृपा ! जसि ती नेली सुगतिप्रति पूतना महापापा ॥
त्रिजगीं भरली कीर्तिस्तुति संतत नूतना तुझी बापा ! ॥ ८ ॥
मुनिदार तुवां केले पदपद्मरजें शुचि स्तुतिस पात्र ॥
मजला स्वपदीं रामा ! स्थिति दे अथवा रुचि स्तवीं मात्र ॥ ९ ॥
प्रियभक्त मयूराचा घन तूं रघुनायका ! सुसन्मित्र ॥
स्रवसी अमृत प्राज्य स्वजनीं सुखदायका ! न हें चित्र ॥ १० ॥

(४) तेजःस्तव

(वृत्त–सारंग)

भीमातटीं एक आहे उभें तेज । सन्मानसाब्जीं तयाची असे सेज ॥
नाशी गुहाध्वांत, वर्णें तरी नीळ । संताप तत्काळ वारी असें शीळ ॥१॥

रात्रौ दिवा तुल्यवृद्धिक्षयत्यक्त । उद्दामही लोचनांला दिसे व्यक्त
आलिंगिती जे पतंग स्वयें यास । त्यांला नसे मृत्युजन्मादि आयास ॥२॥

हें भानुकोटीहुनी फार अत्यंत । यामाजि तेजोंतराचा स्ववृत्यंत ॥
सूर्येंदुवह्न्यादिकींही प्रभालोप । येणें असा हा न आलाचि आरोप ॥ ३ ॥

ब्रह्मांड नेत्राग्निनें जाळितो उग्र[1] । त्यालाहि हें तेज वाटे महा उग्र ॥
ते तापती त्यांत होती न जे लग्न । ते जीवती जीव यामाजि जे मग्न ॥४॥

हें श्वेत हें रक्त हें पीत हें नीळ । भासे कृतादिकमें सक्रियाशीळ ॥
आंधार नाशी प्रकाशी असें चित्र । आहे उभें तुल्य–शीतोष्ण–सन्मित्र ॥५॥

—*—

(५) पंचायतनाची आरति

जय जय कारुण्यनिधे ! नतकांक्षितपूर्ते ! ॥
श्रीहरि–हर–गणपति–रवि–जगदंबामूर्ते ! ॥ ध्रु०

श्रीकांता ! श्रीकृष्णा ! वांच्छितवरदाता
माता–तात प्रभु तूं, दीनांचा भ्राता ।
धाता तूंचि विधाता, दानवघनवाता !
बा ! तारीं, तुजवांचुनि अन्य नसे त्राता ॥ १ ॥ ध्रु०

श्रीकंठा ! जगदीशा ! त्रिपुरांच्या काळा !
व्याळाधीश्वरहारा ! शंभो ! शशिभाळा ! ।
पाळा देवर्षींचा तुजचि म्हणे, ' पाळा ! '
हाळाहळशमना ! तूं विश्वाचा आळा ॥ २ ॥ ध्रु०

गजवदना ! देवा ! तूं विश्वाचा कर्ता
विद्यांचा सिद्धीचा सिद्धांचा भर्ता ।
प्रणतांच्या सर्वांही विघ्नांचा हर्ता
लंघिति तव भक्त सुखें मोहमहागर्ता ॥ ३ ॥ ध्रु०

---

१. शंकर.

सूर्या ! सूर्याराध्या ![1] त्वद्भजनें शमतें
दुःखदुरितदारिद्र्य क्षिप्र जसें तम तें ।
विकसित पद्म तसें तव उदयीं जग गमतें
भ्रमतें तुजवांचुनि बहु, तुज पाहुनि रमतें ॥ ४ ॥ ध्रु०
त्वां असुर वधुनि केली मुदिता महि माते !
जे बहुमुख न शकति तव गाया महिमा ते ।
भगवति ! कीर्तिरपि हिमा कुधियामहिमा ते[2]
तरि अरि तरला लंघुनि जो सामहि माते[3] ॥ ५ ॥ ध्रु०

(६) कलिगौरव ![4]

म्हणतसे जन, ' काकरभाजन[5] ।
प्रकट हा कळि पातकभाजन[6] ' ॥
परि गुणज्ञ रसज्ञ सभा-जन ।
करिति या कळिचेंचि सभाजन[7] ॥ १ ॥

---

१. सूर्या + आराध्या ! = सूर्याची पत्नी जी सूर्या तिनें आराधना करण्यास योग्य अशा हे सूर्या !. दुसरा अर्थ — सूरि + आराध्या ! = ज्ञानी लोकांनीं आराधना करण्यास योग्य अशा हे सूर्या ! (येथें दुसरा अर्थ जास्त ग्राह्य).

२. या संस्कृत चरणाचा अर्थ :—हे ! भगवति ! ते (= तुझी) कीर्ति जरी हिम (शुभ्र) आहे तरी कुधियाम् + अहिमा = दुष्टबुद्धि लोकांच्या ठिकाणीं (= मनांत) ती अहिमा (= काळी) वाटते.

३. या चरणाचा अर्थ :—जो सामहि लंघुनि म्हणजे सामोपचाराचे उपाय उल्लंघून माते म्हणजे माजला तरी तुझा अरि तरला. (तूं त्याच्यावर ही केवढी कृपा केलीस !)

४. पूर्वीच्या सर्व संतांनीं व कवींनीं आपापल्या ग्रंथांत कलियुगाची निंदाच केलेली आढळते. परंतु खुद्द भागवतांत कलिस्तुतिपर काव्यहि पहावयास मिळतें. कृत, त्रेता व द्वापर या युगांपेक्षां कलियुगाची महती अतिशय आहे. कारण या युगांत हरिकीर्तनानें सर्वजण सहज तरतात; त्याचेंच विवरण पंतांनीं या काव्यांत केलें आहे.

५. लहान खड्यांचें पात्र. ६. पातकांचा सांठा. ७. पूजन, स्तवन.

कळीमाजि या पाहती याचि सारा।
घडे विष्णुच्या कीर्तनें स्वार्थ सारा॥
भवाब्धी तराया न लागे प्रयास।
स्वयें शांति दे दर्शन क्षिप्र यास॥ २॥
तेचि या कलियुगांत कृतार्थ।
स्तुत्य ते नर सभाग्य यथार्थ॥
रामनाम सतत स्मरणारे।
येथ सादर जना करणारे॥ ३॥
स्वयें स्मरति सर्वदा हरिसि आणिखालाहि[1] जे।
'स्मरा' म्हणति, 'साधनें कलिंत या सुखा लाहिजे'॥
मुकुंदगुणकीर्तनीं रुचि जनास हे लाविती।
सभाग्य किति ते म्हणों? सुख तदीय हेलाविती॥ ४॥
कळी हा दोषांचा निधि परि गुणज्ञीं निवडिला।
असे येथें मोटा गुण, विगुण जेणें दवडिला॥
सुखें तारी सर्वां त्वरित हरिचें कीर्तन खरें।
तुटेना वज्रें तो सहज तुटतो बंध नखरें॥ ५॥
कृती विष्णुध्यानें करुनि दुसऱ्यामाजि यजनें।
तिज्यामध्यें[2] साधे उचित परिचर्याख्य भजनें॥
अनायासें लाभे स्वपद हरिसंकीर्तनरता।
कळीमध्यें ज्ञाते सकळ म्हणती 'धन्य नरता'॥ ६॥

(७) स्फुट पदें व प्रासंगिक रचना

१

जे भजती तुज कंसाराते!। येती न पुन्हां संसारा ते।
लावियलें मन बाळकथानीं। जेंवि जननिनीं बाळक थानीं॥ १॥
भय दे त्यासि स-दानवशमन। स्मृतिस तुझ्या ज्याचें न वश मन।
न करिति बहु मान सखे दाते। देती बहु मानसखेदा ते॥ २॥
जे विषयांची धरती तृष्णा। न तुझ्या पदभजनाची कृष्णा!।
त्यांला तेचि गिळी जसि कृत्या। होय हिडंबा तसि तव भृत्या॥ ३॥
जो साधुजनांत वसे वेची। वय, कास धरी तव सेवेची।
भवसागरमज्जनकातर तो। सत्वरचि जगज्जनका! तरतो॥ ४॥

१. आणिकालासुद्धां; आणली दुसऱ्यालाहि. २. दुसरा पाठ-'तिज्याठायीं'—पंत.

२

धरि रुचि अन्य-कथा-कथनींच। स्वीकारी संसृतिपथ नीच।
पी ना तव यश जो नर कानीं। देवा! गिळिला तो नरकांनीं॥ १॥

३

रामा! तुजला गावें हो! पदभजना लागावें हो! ध्रु०
सत्संगीं वागावें हो! चिंतित तुज सांगावें हो!॥ १॥
दास्य तुजें मागावें हो! कीर्तनसुख भोगावें हो!॥ २॥
स्वहितीं मन जागावें हो! विषयविष त्यागावें हो!॥ ३॥
किंकरमोर जगावें हो! स्वसुखघनें नुबगावें हो!॥ ४॥

४

जों काम चित्तांत तों काय मेटेल तो कालकंठात लोकास या!।
ओकापरी या न ओका गणा, कष्ट हो, कां म्हणे देव 'ओ' कासया?॥
तोकावरि प्रेम होकारितां, स्थान शोका मिळे, हे अहो! कामना।
ठोका बरी, लेश धोका नसे, नाम धोका, भवीं द्या बुडों कां मना?॥१

५

वाळी लसत्स्वर्ण-माळी शरार्ग्नींत जाळी तया युद्धकाळीं करें।
आळीस घालूनि वाळी यमाचा मुराळी सुकंठास गाळी पळें॥
ताळीमधें सप्ततालीं विभेदूनि आलींगुनी राम पाळी बळें।
टाळील पीडा, पिटाळील मृत्यू, न फाळी यशातें, विटाळी खरें॥१॥

६

चतुर्विधभूतग्राम-। आखु[1] खासी यथाकाम।
हा महा खरस्वभाव तुझा अगा! कालाहे![2]॥
तूं प्रचंड दावानळ-। सा-च साच आचरसी।
तुझ्या तेजापुढें सर्व लोक शुष्क पाला हे॥
त्वत्प्रताप अव्याहत। गति ख्यात। एकरूप ऐसा
विधिच्या घटांत या चालत आला हे॥
तरी रामनामकृपामेघाश्रित हा मयूर तुजपासुनि
एकलेशही न भीतिला लाहे॥ १॥

७

सुखकरा! मुकुंदा! रामा! कृष्णा! गोपाला!॥ ध्रु०॥
केशवा! माधवा! हरे! नुरवि विभो! या लोभा-कामा-कोपाला॥१॥
जगदाकारा! तुला भ्यालों जैवि भुजग मानुनि कनकाच्या गोपाला[3]॥२॥
भक्तमयूरसुखघना! हा नत तुझ्या पदीं तुळसीचा हो पाला॥ ३॥

---

१. उंदीर. २. कालरूपी सर्प! ३. गोफाला; वीण घातलेल्या दोऱ्याला.

८

ज्ञाते जे ते म्हणति विषयीं स्त्र्यादिकीं जो प्रसंग ।
तो तों साक्षात् शमनकरिंचा पाश कंठीं अभंग ॥
तो साधूंच्या चरणकमळीं योजितां शुद्ध भावें ।
कैवल्याचें प्रकट उघडें द्वार होय स्वभावें ॥

९

बांधिलासि उदरावर दामीं । त्या तुला स्मरतसें वरदा ! मीं ॥
संसृतींत बुडत्या करदास । प्रार्थितों मज विभो ! कर दास ॥ १ ॥

१०

गाधिजमखसंत्राण ! । प्रौढपराक्रमबाण ! ॥ १ ॥ श्रीराघव ! रघुनंदन ! जय साकेतपते ! ॥ ध्रु० ॥ गौतमजायादुरित-। क्षयपटु ! पावनचरित ! ॥ २ ॥ त्रिपुरप्रमथनचाप ! । प्रशमाद्भुतप्रताप ! ॥ ३ ॥ सज्जनसद्रवप्रशांत ! । प्रौढजनकजाकांत ! ॥ ४ ॥ गुर्वाज्ञापरतंत्र ! । स्वीकृतजननीमंत्र ! ॥ ५ ॥ तापसजनपुण्यफळ ! । क्षपितत्रिदशारिबळ ! ॥ ६ ॥ वालिप्राणांतकर ! । स्वजनाभयदानकर ! ॥ ७ ॥ शरणागतसत्कार ! । स्वादरपरमोदार ! ॥ ८ ॥ दशतुंडतिमिरसूर ! । त्रिभुवननुतगुणशूर ! ॥ ९ ॥ सेवकमयूरमोद-। प्रद ! करुणैकपयोद ! ॥ १० ॥

(८) अभंग

१

भक्तपराधीन नित्य । अस्वतंत्र तैसा सत्य ॥ १ ॥ भक्तीं हरीलें हृदय । मींही भक्तजनप्रिय ॥ २ ॥ साधूविणें अर्ध घडी । नाहीं मज माजी आवडी ॥ ३ ॥ ज्यांची गती मी परमा । त्यांविण आवडे ना रमा ॥ ४ ॥ आले मजला जे शरण । टाकुनि दारा-पुत्र-धन ॥ ५ ॥ माजाठायीं ज्यांचें मन । सर्वभूतीं समदर्शन ॥ ६ ॥ मज भक्तीं केलें वश । जैसी साध्वी सत्पतीस ॥ ७ ॥ भक्त माजें हृदय साचें ॥ ८ ॥ मींही हृदय तयांचें । मजहूनी दुजें कांहीं । माज्या दासां ठावें नाहीं ॥ ९ ॥ नेणें मीहि दयाघन । भक्तमयूरावांचून ॥ १० ॥

२

तुज्या चरणकमळीं । होवू अळी । हें मन ॥ १ ॥
मग सुखें नरकवास । घडो यास । निजदोषें ॥ २ ॥
तुजे पायीं तुळसीवाणी । माजी वाणी । शोभावी ॥ ३ ॥
भक्तमयूरकरुणाघना ! । भरीं कानां । निजगुणें ॥ ४ ॥

३

कृष्णचरणांबुजीं वसती । मनोवृत्ति । करूत ॥ १ ॥
हेंचि आमुचें मागणें । नारायणें । पुरवावें ॥ २ ॥
वाचा घेवू कृष्णनामें । सुखधामें । सर्वांचीं ॥ ३ ॥
पाहो, वंदू भक्तमोर । यदुवीर । सुखरवघना ॥ ४ ॥

अमृतकवीचें उद्योगपर्व

लेखक—डॉ. महेश्वर अनंत करंदीकर

एकनाथ-संशोधनमंदिर, औरंगाबाद, यांच्याकडील पं. ज्यो. का. भू. विष्णु बाळकृष्ण जोशी कन्नडकर यांनीं लिहिलेलें श्रीसंतअमृतरायचरित्र वाचीत असतांना त्यांत (पृ. १५० वर) "उज्जयिनी येथील सिंदिया ओरिएंटल इन्स्टिटयूट हस्तलिखित ग्रंथसंग्रहांत हें उद्योगपर्व आहे," असा अमृतराय यांनीं उद्योगपर्व लिहिल्याचा उल्लेख आला आहे. मी नुकताच उज्जैन येथें गेलों असतांना या उद्योगपर्वाचें हस्तलिखित पाहिलें. याविषयींचा कोणताहि उल्लेख महाराष्ट्र-सारस्वत किंवा त्याला जोडलेल्या प्रो. तुळपुळे यांच्या पुरवणींत आढळला नाहीं. म्हणून हें हस्तलिखित प्रत्यक्ष डोळयांखालीं घालून पाहिलें. याविषयीं डॉ. कात्रे यांचा लेख चित्रमयजगत् मासिकाच्या मे १९४७ च्या अंकांत आला आहे तो वाचून पाहिल्यावर तर, या अप्रसिद्ध हस्तलिखिताचें अवलोकन करणें फारच आवश्यक वाटलें. डॉ. कात्रे यांच्या मताप्रमाणें हें उद्योगपर्व कवि अमृतराय म्हणून कटावादि काव्यें करणारे जे मराठवाड्यांतील प्रसिद्ध कवि त्यांचेंच ठरावें.

सामान्यपणें एखाद्या ग्रंथाचें कर्तृत्व ठरवितांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रमाणें अगदीं भरपूर मिळाल्यावांचून तें ग्रंथकर्तृत्व निश्चित समजणें अशक्य ठरतें. तसाच कांहींसा प्रकार या उद्योगपर्वाविषयीं झाल्यानें व प्रत्यक्ष हस्तलिखित वाचून पाहूनहि कटावकर्त्या अमृतरायांचें हें काव्य होय असें निश्चित मत बनवणें प्रस्तुत लेखकाला शक्य झालें नाहीं. म्हणूनच पुढील कांहीं ओळी लिहीत आहें.

'महाराष्ट्रकवि अमृतरायकृत कवितासंग्रह' म्हणून काव्यसंग्रहांत प्रसिद्ध झालेल्या, वामन दाजी ओक यांनीं संपादित केलेल्या, व भालचंद्र शंकर देवस्थळी यांनीं तपासून शुद्ध केलेल्या दुसऱ्या आवृत्तींत (१९१०) छापलेलें काव्य ज्या अमृतराय कवीचें आहे, त्या कवीचेंच हें उद्योगपर्व आहे काय, हें येथें आपणांस पाहावयाचें आहे. अमृतरायाचीं हीं जीं प्रकरणें प्रसिद्ध झालेलीं आहेत व त्यांतील ज्या रीतिविशेषांमुळें तीं सर्व एकाच अमृतराय या कवीचीं वाटतात ती शैलीची कसोटी लावून पाहाणें हा एक मार्ग, व दुसरा इतर बाह्य ऐतिहासिक प्रमाणांचा. त्यांतील बाह्य प्रमाणें पाहून नंतर शैलीविषयक कसोटी लाविली म्हणजे निष्कर्ष सध्यांच्या परिस्थितींत त्रिनचूक निघण्यास हरकत नाहीं. उद्योगपर्वाच्या या मूळ पोथींत 'अमृत' हें नांव व त्या नांवाचे पर्यायहि येतात. प्रथम अध्यायाच्या अंतीं,

सहजबोधपदसरोजीं । भ्रमरांमृतें घालितां रुंजी ।
विद्वज्जनाच्या समाजीं । परमानंद वर्द्धला ॥ ७३ ॥

व

व्यासकविता श्रीभगवती । आर्तजनाची पुरवी आर्ति ।
तत्परिचयें **अमृत**मती । सहजबोधें योजिली ॥ ७५ ॥

'अमृत' हें कविनाम आणि सहजबोध हें गुरूचें नांव स्पष्टपणेंच आलेलें आहे. दुसऱ्या अध्यायांत पुढील ओंवी आहे :—

व्यासवाणी भागीरथी । सर्वोत्कर्षें मिरवे जगतीं ।
सहजबोधें **अमृत**मती । तत्संगती योजिली ॥ २०९ ॥

तिसऱ्या अध्यायांत

सहजबोध कल्पद्रुम । पुरवी निजभक्तांचें काम ।
भावें स्मरतां त्यांचें नाम । **अमृत**धाम पावती ॥ १०६ ॥

असा शेवटीं उल्लेख आहे. अध्यायांत पुन्हा—

तुझी वाणी **अमृत**मय । ऐकोनि सर्वांग शीतल होय ।
यथाशास्त्र यथान्याय । निर्दोष होय सर्वार्थ ॥

असा दुसरा उल्लेख आहे.

अध्याय ४ मध्यें

भारतकथा **अमृत**सरिता । श्रवणस्नानें संसारव्यथा ।
हारती साम्राज्य ये हाता । सद्भावार्थें अनुसरल्या ॥ १३० ॥
सहजबोधसुधाधार । हृदयाकाशीं मनोहर ।
अमृतकिरणें संतचकोर । प्रसन्नता पावती ॥ १३३ ॥

अध्याय पांचमध्यें

वाच्य अर्थ जो कां गहन । तोहि तोचि स्वयें आपण ।
श्रवणा**मृतें** दयाघन । श्रोतेजन तो निववी ॥ १०० ॥

अध्याय सातमध्यें

अमृतरूप त्याची वाणी । भवदुःखासी समूल खाणी ।
भाविकांतें **अमृत**सदनीं । प्रेमामृत प्राशवी ॥ १७५ ॥

अध्याय आठमध्यें

माझी **अमृत**रूप वाणी । पिवोनि द्वेष त्यागावा ॥ ४२ ॥

व

तें सुरम्य हरिचरित्र । श्रवण करोत भावीक श्रोत्र ।
सहजबोधाचें पवित्र । नामा**मृत** उच्चारी ॥

अध्याय नऊमध्यें

सहजबोधसुधाकर । सेवोत भावीक जनचकोर ।
अमृतरूपी त्याचे कर । सदा सुखकर संतांतें ॥ १७२ ॥

अध्याय १० मध्यें

अमृतेश्वर सहजबोध । जो परमात्मा सच्चिदानंद ।
त्याचे लीलेचा प्रबंध । प्राकृत भाषें तोचि वदे ॥ १७० ॥

अध्याय ११ मध्यें

सहजबोध ब्रह्मगिरी । **अमृत**सरिता गोदावरी ।
तेथूनि प्रगटे श्रोतद्वारीं । ते सज्जनी सांटविजे ॥ १७४ ॥

अध्याय १२ मध्यें

सहजबोध सहस्रकिरण । **अमृत**कमळें प्रफुल्ल मान ।
करी तेथें सज्जनजन । निजानंदें क्रीडति ॥ १९१ ॥

अध्याय १३ मध्यें

सहजबोध श्रीगुरुमूर्ति । जो सकलांच्या मनोरथीं ।
त्यातें भजतां अभेदभक्ती । **अमृत**त्वें सुख लाधे ॥ १७८ ॥

अध्याय १४ मध्यें

ज्याचा विश्वास सद्गुरुचरणीं । विजय आंदणा त्याचे सदनीं ।
बोधामृताची मीळणी । प्रेमें लाधे सभाग्या ॥ १८४ ॥

व अध्याय पंधराव्यांत

हें व्यासाचें महद्वचन । संशयपंथीं न लवा मन ।
सहजबोधचरणीं शरण । **बालांमृत** लाडकें ॥ १७५ ॥

अशा तऱ्हेचे उघड व श्लेषात्मक असे उल्लेख उद्योगपर्वांत ग्रंथकर्त्याच्या नांवाचे येतात. येथेंच वाचकांच्या लक्षांत वाचतां वाचतां सहज आलें असेल कीं, उद्योगपर्वांत कवीनें आपल्या गुरूचें नांव '**सहजबोध**' असें दिलेलें आहे. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे **ग्रंथकर्त्याच्या स्वतःच्या** ग्रंथसमाप्तिविषयक **स्थलाचा किंवा कालाचा** उल्लेख या पोथींत कोठेंहि आम्हांस आढळला नाहीं. हें जरा चिंतनीय आहे नव्हे काय ?

पोथी लिहिणाराची शेवटीं जी मखलाशी आहे त्यावरून पोथी नकलणाऱ्याचा व त्या नकलेचा काळ मात्र कळतो. ती मखलाशी अशी :

"शुभं भवतु पुस्तक राजश्री बालाजी रावजी यांचें असे । आक्षर ऊंकाभट दसोरे जोशी संवत् १८४९ शके १७१४ चैत्र शु. १५ मंदवासरे रेवातीरे माहीष्मतीनगरे मासः । श्रीकृष्णार्पणमस्तु."

यावरून या पोथीची नकल शके १७१४ म्हणजे इ. स. १७९२ मध्यें केलेली आहे, हें उघड दिसतें. संवत् वर्षावरूनहि हाच काल निर्विवाद ठरतो. डॉ. कात्रे यांनीं यावरूनच अमृतराय (निर्णयसागरच्या काव्यसंग्रहांतील कवि) यांचा निधनशक जो १६७५ (इ. स. १७५३) त्यानंतर ३९ वर्षांनीं ही उद्योगपर्वाची नकल लिहिली गेली असें म्हटलें आहे. डॉ. कात्रे यांच्या मताप्रमाणें म्हणूनच या उद्योग-पर्वाची रचना (त्या पोथीचा प्रसार त्या कालांत माळव्यासारख्या दूरच्या प्रदेशांत होऊन त्याची नकल झाली त्या काळावरून) अंदाजें १७३८ (शके १६६०) च्या जवळपास झाली असावी. ती 'अमृतरायांच्या प्रतिभेच्या ऐन भराच्या काळांत झाली असणें अगदीं शक्य आहे', असेंहि त्यांचें मत आहे. पोथींत ग्रंथकर्त्यानें रचनाकाल दिलेला नाहीं व म्हणूनच कांहींशी तर्कानें अशी संगति डॉ. कात्रे यांना लावणें भाग पडलें, हें स्पष्ट आहे. आतां ग्रंथकर्त्यानें स्वतःच आपणांस 'बालामृत' म्हणजे नुकताच लिहूं लागलेला, वयानें व कदाचित प्रतिभेनें नवीनपणें लिहूं लागलेला असें म्हणवून घेतलें आहे, हें विसरणें योग्य होणार नाहीं. प्रतिभेच्या ऐन भरांत ही रचना झाली असल्यास हें तर विरुद्ध प्रमाण (त्यांतील ग्रंथकाराचा विनय ध्यानांत घेऊनहि) ठरतें ! ती अमृतरायांच्या प्रतिभेच्या ऐन भराच्या काळांत झाली असेल काय, हा प्रश्न शिल्लक राहातोच.

अमृतरायांच्या प्रतिभेच्या ऐन भराच्या काळांत त्यांच्या कवितेंतील सर्व वैशिष्ट्यें बऱ्याच प्रमाणांत उद्योगपर्वांत उतरल्यावांचून डॉ. कात्रे यांचें हें विधान सार्थ ठरणार नाहीं. '**अमृतकवी**' चें उद्योगपर्व असें जें पोथीचें वर्णन उज्जैनच्या हस्तलिखित ग्रंथसूचींत आहे तें पोथीच्या वर जें वर्णन केलेलें आहे त्यावरून केलेलें दिसतें. पोथीच्या आरंभीं 'अथ श्री उद्योगपर्व **अमृतकवि**कृत प्रारंभाः । आध्याय येकत्र पंचदश' असें म्हटलेलें आहे. अमृतराय यांच्या निर्णयसागरी प्रतींत 'अमृतकवि' असा उल्लेख केवळ चार वेळांच आलेला आहे. दहाव्या अध्यायाच्या अंतीं येणाऱ्या '**अमृतेश्वर**' या नांवाचा उल्लेख कवितासंग्रहांत ३२ वेळां येतो; पण इतर उल्लेख तसे आलेले कवितासंग्रहांत आढळत नाहींत. अमृतकवि असा उल्लेख हस्तलिखित ग्रंथभागांत नाहीं.

अमृतरायांच्या (शाहीर अमृतराय यांच्या) कवितेच्या ज्या ठळक खुणा आजपर्यंत माहीत आहेत, त्यांत (१) स्फुट रचना, (२) कटाव, दोहा, कटिबंध, चूर्णिका व पदांत येणारे जातिविशेष, (३) अनुप्रास व यमकें, (४) वर्णनें व (५) सर्वांत मोठा अविस्मरणीय विशेष अलंकार, वस्त्रें, फुलें, पक्वान्नें इत्यादिकांच्या याद्या, या होत. यांपैकीं उद्योगपर्व ही रचना सलग असल्यानें त्यांत स्फुट रचनाविशेष अर्थातच नाहीं. उद्योगपर्वांत सर्वत्र ओंवी छंद वापरलेला आहे. अमृतरायांच्या प्रसिद्ध काव्यांत ओंवीचा वापर ध्रुवाख्यानाच्या शेवटीं केलेला आहे आणि पुन्हां 'अविनाशसंदेहहरण' यांतच ओव्या आलेल्या आहेत; इतर गेय रचना ओंवींत असणें शक्य वाटत नाहीं. 'अविनाश-

संदेहहरण' हें अमृतरायांचेंच आहे काय हाच प्रश्न विचारणें शक्य आहे. त्याच्या शेवटीं कविनाम अमृत हें ८१ व्या ओंवींत आहे; पण येथील गुरुपरंपरा शंकराचार्यांची आहे. त्याचप्रमाणें 'त्यांची भाषा रायजींच्या सालंकार भाषेशीं जुळत नाहीं', असें पंडित कन्नडकर यांचेंहि मत आहे (श्रीसंत अमृतरायचरित्र, पृ. ९३). येथील गुरुपरंपरा विचित्र तऱ्हेनें आलेली आहे, तींत तीनच पिढ्या दिलेल्या आहेत, मध्वनाथ हे अमृतरायांचे (प्रसिद्ध काव्यविशेष ज्यांचे आपण मानतों त्यांचे) गुरु होते, असा स्पष्ट उल्लेख अमृतरायांच्या पदांतून येतो. त्यामुळें 'अविनाशसंदेहहरणं' हें प्रकरण संशयातीत मानतां येत नाहीं. या उद्योगपर्वांत इतर जातिविशेष येणें अर्थातच कठिण आहे. अनुप्रास व यमकें यांची अमृतरायांच्या काव्याच्या मानानें उद्योगपर्वांत उणीव भासते. गेय रचनेंत येणारी अमृतरायाचीं यमकें व तेथेंच आढळणारे नाना प्रकारचे अनुप्रास यांना उद्योगपर्वांत फारसें स्थान मिळालेलें नाहीं, हें सर्वांत अधिक लक्षांत घेण्यासारखें आहे. डॉ. कात्रे यांनीं आपल्या लेखांत 'अनुप्रासादि शब्दालंकारांचीहि सर्वत्र रेलचेल दिसते,' असें म्हटलें आहे. पण उद्योगपर्व हस्तलिखिताच्या प्रत्यक्ष परीक्षणानें लेखकाचें मत असें बनलेलें नाहीं. 'रेलचेल' जशी प्रसिद्ध कवितेंत आहे त्याच्या निम्यानें किंवा कांहीं अशीं जरी तशी आढळती, तरी डॉ. कात्रे यांचें मत मान्य करणें कठिण न जातें. डॉ. कात्रे स्वतः अलंकारशास्त्राचे एक पंडित आहेत व त्यांनीं एक अलंकारग्रंथहि फारच कसोशीनें संपादित केलेला असल्यानें तर त्यांच्या या मताचें प्रत्याख्यान करतांना आम्हांस जास्त काळजी घेणें महत्त्वाचें वाटलें; पण अशी 'रेलचेल' आम्हांस आढळली नाहीं, असें म्हणणें भाग आहे. उद्योगपर्वाची रचना सरळ, सोपी, सहज व **पुष्कळच निरलंकृत** आहे असें कोणाहि वाचकास आढळेल. गणितदृष्ट्या याचा विचार करणेंहि शक्य आहे; परंतु त्याचें उत्तर आमच्याचसारखें येईल याविषयीं शंका वाटत नाहीं. ओंवीमध्यें सामान्यतः येणारें अंतींचें यमक हें यमक प्राचुर्याचें अनुमान बांधण्यास पुरेसें होत नाहीं. ही रचना जमेत हवी तर धरावी; परंतु अमृतरायांच्या (निर्णयसागरी) काव्यपंक्तींत येणाऱ्या यमकांची सरच काय पण त्या यमकांचें प्राचुर्य तेथें जसें दिसतें तितक्या प्रमाणांत तें उद्योगपर्वाच्या या हस्तलिखितांत दिसत नाहीं. कदाचित 'बालामृत' या शब्दांत नवकवित्वाची नांदी आहे, असें समजल्यास त्याचा निर्णय किंचितसा करितां येईल. उपमा, रूपकें व दृष्टान्त हे ओंवीवाङ्मयांत इतक्या वैपुल्यानें बहुतेक येतात कीं, हे अलंकारविशेष निर्णायक रीतीनें ग्रंथकर्तृत्व-निश्चिति करतील असें मुळींच नव्हे. त्यामुळें उद्योगपर्व हें कटाव व कटिबंध रचणाऱ्या अमृतरायाचेंच आहे किंवा कसें हा निर्णय होऊं शकत नाहीं.

वर्णनांच्या बाबतींत सुद्धां अमृतरायांच्या प्रसिद्धींत त्यांच्या निर्णयसागरी काव्यांतले विशेष या उद्योगपर्वांत दिसत नाहींत, असें म्हणणें प्राप्त आहे. उद्योगपर्वाच्या आरंभीं असलेल्या ओंव्यांत म्हटलें आहे :—

वेदव्यास जगन्नाथ । त्यातें साष्टांग प्रणिपात ।
श्रोतयांचा मनोरथ । भारतकथा ऐकावी ॥ ६ ॥
लीलाविश्वंभर ईश्वर । त्याचा दास मुक्तेश्वर ।
तेणें वर्णिलीं पर्वें च्यार । प्राकृत भाषाप्रबंधें ॥ ७ ॥
आदिसभावनविराट । नवरसरसें अतिउत्कृष्ट ।
संतोषती साधुश्रेष्ठ । ज्या ऽ ची कविता परिसोनी ॥ ८ ॥

परंतु मुक्तेश्वराची ती चमक किंवा तद्विषयक अस्फुट असें निदर्शनसुद्धां या उद्योगपर्वांत कोठें आढळत नाहीं. तेव्हां कटावकर्त्या अमृतरायांच्या या काव्यशैलीच्या ज्या ठळक खुणा त्या येथें मुळींच दिसत नसल्यानें उद्योगपर्व कोणाचें, कोणत्या अमृतकवीचें हा प्रश्न यावरून अनिर्णीतच राहातो. हा अमृतकवि कोण याचा निर्णय या लेखाच्या शेवटीं देण्याचा प्रयत्न केला आहे.

संस्कृत व्यासंगाचें जें गमक पुन्हां उद्योगपर्वांत मिळतें तें अमृतरायांच्या प्रसिद्ध काव्यांत कांहींसें कमी दिसतें. उद्योगपर्वांत संस्कृत श्लोक उद्धृत केलेले आढळतात. उदाहरणार्थ-धर्मलक्षण सांगण्याकरितां सहाव्या अध्यायांत (पृ. २ वर, हस्तलिखित)—

यत्राधर्मो धर्मरूपाणि धत्ते
धर्मः कृत्स्नो ह्रस्यते धर्मरूपः ।
विभ्रद्धर्मे धर्मरूपं तथा च
विद्वांसस्तं प्रपश्यंति बुद्धया ॥

किंवा

स्तेनो हरेद्यत्र धनं ह्यदृष्टः
प्रसह्य वा यत्र हरेत दृष्टः ।
उभौ गर्ह्यौ भवतः संजयैतौ
किं वै पृथक्त्वं धृतराष्ट्रस्य पुत्रे ॥

हे श्लोक येतात.

अकराव्या अध्यायांत व्यासांचा म्हणून एक संस्कृत श्लोक असाच उद्धृत केलेला आहे :—

रथायुतानि चत्वारि हयाः पंचगुणास्तथा ।
पत्तिसैन्यं दशगुणं गजानामयुतानि षट् ॥

याव्यतिरिक्त पुढील व्याख्याहि संस्कृतमध्यें दिल्या आहेत :—

एको रथो गजश्चैको नराः पंच पदातयः ।
त्रयश्च तुरगास्तज्ज्ञैः पत्तिरित्यभिधीयते ॥

सेनापंचशतं नागा रथास्तावंत एव च ।
दशसेना च पृतना, पृतना दशवाहिनी ।
सेना च वाहिनी चैव पृतना ध्वजिनी चमूः ।
अक्षौहिणी च पर्यायैस्त्रिरुक्ता च वरूथिनी ॥

अध्याय तेरामध्यें गुरुत्यागाविषयीं श्लोक दिला आहे :—

गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।
उत्पथप्रतिपन्नस्य परित्यागो विधीयते ॥

या तऱ्हेच्या उद्धरणपद्धतीचें निदर्शन कटावकर्त्या अमृतरायांच्या थोड्या मोठ्या आख्यानांच्या बाबतींतहि आढळत नाहीं.

कीर्तनासाठीं अशा तऱ्हेचीं हीं संस्कृत पद्यें उपकारक ठरलीं नसतीं काय ? कित्येक लेखकांचा हा उदाहरणें देण्याचा विशेष ग्रंथकर्तृत्व ठरवितांना लक्षांत घेणें आवश्यक आहे.

उद्योगपर्वाच्या या पोथींत पांडुरंगनमन व पांडुरंगस्तवन पुष्कळ वेळां आलेलें आहे. पंढरीश पांडुरंगाची ही भक्ति या उद्योगपर्वांतहि ठिकठिकाणीं दृष्टीस पडते. अमृतरायांच्या प्रसिद्ध कवितांमधून पांडुरंगविषयक दोन पदें येतात. (पद ३७, पृ. १२५ व पद१४७, पृ. १६३) परंतु प्रसिद्ध काव्यांमध्यें पांडुरंगाची उद्योगपर्वांत दिसते ती, पांडुरंगभक्तिविषयक उत्कटता तेथें दिसत नसून केवळ प्रासंगिक अशींच तीं पद्यें आहेत., हें मत मान्य होण्यास अडचण नसावी.

उद्योगपर्वाच्या तेराव्या अध्यायांत शाक्तपंथाचें जें विस्तृत वर्णन (सामान्यपणानें अनवश्यक वाटणारें व अवलिप्त गुरूचें म्हणून) बुद्धया देण्यांत आलें आहे, तसल्या वर्णनाचा उल्लेख व दूरतः संदर्भसुद्धां अमृतरायांच्या प्रसिद्ध असलेल्या काव्यांत आढळत नाहीं. नाहीं म्हणावयास इतर पंथाच्या यादींत म्हणून व त्याकडे विशेष लक्ष जाईलच अशा रीतीनें वर्णन न करितां शाक्तांचा एक उल्लेख अमृतरायांच्या कविता-संग्रहांत पृ. ८३ वर आढळतो. बुद्धयाच येथें ग्रथित केलेली ही माहिती कटावकार अमृतरायांच्या प्रसिद्ध काव्यांत संदर्भानेंहि येत नाहीं, हें कांहींसें चिंत्य वाटतें. सामान्यतः ही माहिती लक्षांत यावी म्हणून पुढील ओळी उद्धृत करीत आहें—

चौक आसन भूपूजन । नामी करिती मद्यपान ।
तैसेचि लोकां कथिती ज्ञान । ते सद्गुरु न म्हणावे ॥ १५५ ॥
वनिता कंचुकी बहु येकट । करोनि तेणें भरिती घट ।
नेत्र झांकोनि कर्मभ्रष्ट । करें घेती उचलोनी ॥ १५६ ॥
ज्या स्त्रियेची कंचुकी जया । सांपडे ते त्याची भार्या ।
न म्हणे भगिनी अथवा माया । रतिसंयोगें क्रीडती ॥ १५७ ॥

स्वेच्छानंदें नारीनर । भ्रष्ट झाले येकाकार ।
ऐसे गुरु नरक अघोर । शिष्यांसहित भोगिती ॥ १५८ ॥
(अध्याय १३)

इतका अधिक्षेप केला असतांना कटावकर्त्या अमृतरायकृत कवितासंग्रहांत एतद्विषयक गर्भित सूचनासुद्धां न येणें कांहींसें अस्वाभाविक वाटतें, आणि म्हणून उद्योगपर्वाचें कटावकर्त्या अमृतरायकृत कर्तृत्व संशयित वाटतें. आणखी एका विषयाकडे लक्ष देऊंया :—

एका रुक्मिणीस्वयंवराचा उल्लेख या उद्योगपर्वांत अकराव्या अध्यायांत आलेला आढळतोः—

क्षोणीसंख्या ऋषेश्वरीं । वर्णिली सेना नानापरी ।
बहुमतें ग्रंथांतरीं । येक होती कैसेनी ॥ ४८ ॥
दोनलक्ष सहस्र **अठरा** । सातशतें अधिक चतुरा ।
ऐसी रुक्मिणीस्वयंवरा—। माजि संख्या क्षोणीची ॥ ४९ ॥

हा उल्लेख एकनाथी रुक्मिणीस्वयंवरांतीलच असल्यास तो तेथें **द्वादश प्रसंगांतला** असून ही ओवी ७४ वी दिसते (न. ग. जोशी संपादित श्रीएकनाथकृत रुक्मिणीस्वयंवर १९३३, पृ. ६१–६२); पण त्या ओंवींत अपपाठ घुसलेले दिसतात, ते उपरिनिर्दिष्ट संपादकांनीं दुरुस्त करण्याचेहि कष्ट घेतले नाहींत किंवा आपल्या टिप्पण्यांतून तसें दाखविण्याचा प्रयत्न केलेला नाहीं. तो पाठ असाः—

दोन लक्ष **अकरा** सहस्र । सातशें अधिक वीर ।
संख्या अक्षौहिणी प्रकार । केला निर्धार मनाचा ॥ ७४ ॥

(स्थूलाक्षर आमचें) येथें **अठरा** ऐवजीं **अकरा** ही चुकीची संख्या येत आहे. पुढें ७६ व्या ओंवींत—

एकवीस सहस्र **अठरा** शत । सत्तरी संख्या जी रथ ।
तितुकेचि गजभार उन्नत । सैन्याआंत चालती ॥

येथें ही दिलेली संख्या २१००० + १८०० + ७० = २२८७० अशी होते. येथेंहि ती चूकच आहे. खरी संख्या (२१,८७०, एकवीस हजार आठशें सत्तर) रथ, **तितकेच** हत्ती, ६५,६१० घोडे (म्हणजे रथ–हत्तींच्या तिप्पट) आणि १०९,३५० पदाति (म्हणजे रथहत्तींच्या पांचपट). एकनाथ रुक्मिणीस्वयंवराच्या वरील प्रतींत या दोन्ही संख्या पुन्हां चुकल्याच आहेत. पहा :—

" एक लक्ष सहस्र नव । तीन शतें पन्नास अश्व " (७७ अब)

आणि ७८ मध्यें " पांसष्ट सहस्र सात शतें । एक दशक अधिक तेथें ।
वीर पायांचे भिडते । युद्धीं पुरते निजगडे ॥

या सर्व संख्या कशा चुकत आहेत हें स्पष्ट होतें.

मूळच्या उद्योगपर्वकारानें जर एकनाथी रुक्मिणीस्वयंवरावरूनच ही संख्या घेतली असें मानलें, तर त्यांत असलेल्या संख्येच्या चुकीचा संस्कृत ज्ञानाच्या दृष्टीनें तर खोल विचार होणें प्राप्तच आहे; परंतु एकनाथाच्या रुक्मिणी स्वयंवरांच्या पोथ्यांची नीट शुद्ध प्रत छापण्याची आवश्यकताहि यामुळें दिसून येत आहे. आतां मुळांतच, जर एकनाथांच्या या ओंव्या नसल्या तर मात्र फार तर तें क्षम्य मानितां येईल. एकनाथ हें संस्कृतचे बऱ्यापैकीं जाणकार होते ही गोष्ट नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. उघडउघड एका अधिक शून्याचा म्हणजे **एक लक्ष संख्या गुणकाचा** (प्रत्यक्ष वजाबाकी करीत नाहीं) फरक येथें लक्षांत घेतलेला दिसत नाहीं! एकनाथांच्या रुक्मिणीस्वयंवराच्या पोथींत या उद्योगपर्वांच्या लेखनकालीं (हवें तर, नकलकाराच्या काळांतहि) हा पाठ तेथें असावा हें स्पष्ट होतें. (वास्तविक रुक्मिणीस्वयंवरांतच या संख्येला मुळातच स्थान नाहीं व या ओंव्यांची जोड कोणातरी दुसऱ्यानें दिली असली पाहिजे, हें त्यावरून उघड होतें). या उल्लेखानेंहि हा अमृतकवि किमानपक्षीं रुक्मिणीस्वयंवरांच्या **वर उल्लेखिलेल्या चुकीच्या संख्या दिलेल्या हस्तलिखितांच्या अस्तित्वानंतरचा ठरेल** ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. अशी चूक केव्हां झाली असेल तें शोधून काढणें मनोरंजक ठरेल. हरिवरदा या कृष्णदयार्णवांच्या टीकेंत रुक्मिणीस्वयंवर जसेंच्या तसेंच उतरून घेतलेलें आहे. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या या हरिवरदा ग्रंथाच्या सहाव्या खंडांत रुक्मिणीस्वयंवर येतें. तेथें अध्याय ५४ मध्यें (पृ. १२५०, सं. रा. चिं. ढेरे, शके १८८२) पुढील पाठ आढळतो :—

दोन लक्ष **अठरा** सहस्र। अधिक सात शतें वीर।
संख्या अक्षौहिणी प्रकार। केला निर्धार श्रीव्यासें॥ ९२॥
एकवीस सहस्र आठ शत। सत्तरी संख्या जी रथ।
तितुकेचि गजभार उन्मत्त। सैन्याआंत चालती॥ ९४॥
एक लक्ष सहस्र नव। तीन शत पन्नास अश्व॥ ९५ (अ ब)॥

व

एक लक्ष नव सहस्र। तीनशें पन्नास पदातिभार।
अश्वसादी रथ कुंजर। संख्या समग्र अक्षौहिणी॥ ९६॥
पांसष्टि सहस्र सा शतें। एक दशक अधिक तेथें॥
वीर पायांचे भिडते। युद्धीं पुरते निजगडे॥ ९७॥

येथें ९२ व्या ओंवींतील पाठ न. ग. जोशी यांच्या पाठापेक्षां निराळा आहे (जाड खिळा आमचा), परंतु चूक तीच आहे. पुढील ओव्यांत तर खूपच गोंधळ दिसतो; पाठ पण जुळत नाहींत; परंतु त्यांच्या चर्चेंत येथेंच शिरण्याचें

कारण नाहीं. यावरून हरिवरदेची जी प्रत आज आपल्यासमोर आहे, त्या प्रतीच्या हस्तलेखाच्या व मुळाच्या काळाविषयींहि बऱ्याच शंका उपस्थित होतात. हरिवरदा प्रतीच्या संपादकांना, त्यापैकीं कोणालाहि, हस्तलिखित प्रती, त्यांचा काळ, त्यांत येणारे पाठ व अपपाठ आणि त्यावरून निघणारे कांहीं निर्णय यांचें महत्त्व वाटलें नाहीं, हें उघड आहे. कारण हस्तलिखितांची कालविषयक व इतर माहिती या खंडांतून दिलेली नाहीं. आतां हें हरिवरदेचें हस्तलिखितहि बरेंच नंतरचें असावें, अशी शंका घेण्यास जागा निर्माण होत आहे. हरिवरदेच्या हस्तलिखिताचा इतिहास प्रसिद्ध होणें आवश्यक आहे. त्यावरून या आमच्या अमृतकवीचा छडा लावावयास थोडेसें साहाय्यहि मिळेल; पण तेथील अपपाठहि स्पष्टपणें दिसत आहेत.

आतां ही ओंवी एकनाथांच्या रुक्मिणीस्वयंवरांतून घेतली नाहीं, असें धरलें तर काय निघतें तें पाहूं या : एकनाथाचा स्पष्ट उल्लेख उद्योगपर्वकारानें केलेला नाहीं, हें येथें लक्षांत घेण्यास प्रत्यवाय नाहीं. "ओंवी" उद्धृत केली आहे असें धरलें तरच तसें समाजावें. परंतु तसें निश्चितपणें न म्हणणेंहि शक्य आहे. मराठींत पुढील कवींनीं रुक्मिणीस्वयंवरावर आख्यानें लिहिलेलीं आढळतात :—नरेन्द्र महानुभाव कवि, नारो व्यास, नृसिंहकवि, जयरामस्वामी वडगांवकर, महदायिसा, विठ्ठल, नागेश, एकनाथ, नवलंड, (रुक्मिणीहरण–सामराज) इत्यादि. यापैकीं नरेंद्राच्या काव्यांत 'अक्षौणी' शब्द निराळ्या अर्थानें येतो, व तेथें सैन्यविषयक संख्यागणना येत नाहीं. धवळ्यांत किंवा मातृकी रुक्मिणीस्वयंवरांत संख्येचें परिगणन नाहीं. एकनाथांच्या स्वयंवरांतल्या ओव्या वर दिलेल्या आहेत. विठ्ठलाच्या रुक्मिणीस्वयंवरांत पांचव्या सर्गांत–

लक्षैक वीर, दशलक्ष तुरंग भारी, छत्तीसलक्ष पदभृत्य पुढें त्रिचारी ।
दाहासहस्र गज उन्मत भार चाले, क्षोणीगणा त्रिगुणिनें रथ ते निघाले ॥

असें ढोबळ परिगणन आहे; त्यांतील 'उन्मत' शब्द मात्र लक्षणीय आहे. इतरत्र याच अर्थाचे शब्द येतात, व केवळ पादपूरणार्थक नाहीं हें उघड होतें. संस्कृतमध्यें असलेले श्लोक असे आहेत :—

अक्षौहिण्यामित्यधिकैः सप्तत्या ह्यष्टभिः शतैः ।
संख्या युक्ता सहस्राणि गजानामेकविंशतिः ॥
एवमेव रथानां तु संख्यानं कीर्तितं बुधैः ।
पञ्चषष्टिः सहस्राणि षट् शतानि दशैव तु ॥
संख्यातास्तुरगास्तज्ज्ञैर्विना रथतुरंगमैः ।
नृणां शतसहस्रं तु सहस्राणि नवैव तु ॥
शतानि त्रीणि चान्यानि पञ्चाशच्च पदातयः ॥'

(पृ. १०१, विठ्ठलकृत कवितासंग्रह, निर्णयसागर, आवृत्ति दुसरी १९२४)

पांडवप्रताप या श्रीधराच्या ग्रंथांत 'अक्षौहिणी' हा शब्द येतो (अध्याय ४०, पृ. ७७२, प्रकाशक–श्री. ग. जोशी, सन नाहीं) व तेथें टीपेंत २१८७०० एकंदर सैन्य अशी टीप आहे! यांतील चूक स्पष्टच आहे. या सर्व चुका कोणत्या तरी एका विशेष मुळावरून आल्या असल्या पाहिजेत हें उघड आहे!

ह्या चुकांतील मूळ चूक करणाराच्या काळानंतरचा काळ उद्योगपर्व रचणाऱ्या अमृतकवीचा ठरेल हें उघड आहे.

आतां आणखी एका अंगाचा म्हणजे गुरूच्या नांवाचा विचार करणें योग्य होईल. कन्नडकर जोशी यांनीं आपल्या श्रीसंत अमृतरायचरित्र या (शके १८७५) पुस्तिकेंत (पृ. १५०) अमृतरायांच्या गुरूसंबंधीं पुढीलप्रमाणें लिहिलें आहेः "वास्तविक सहजबोध, नाथमाधव, उद्धव, श्रीधर त्र्यंबक हीं त्यांच्या एकाच मध्वमुनीश्वर गुरूंचीं नांवें होत." या विधानाला कांहींच आधार दिसत नाहीं. मध्वमुनीश्वरांची कविता (संपादक, प्र. व्यं. गुब्बी १९३३) या संग्रहांत कटावकार अमृतराय हा मध्वनाथांचा शिष्य असावा असें अनुमान (पृ. १६९, ५६३ संवाद) करतां येतें. त्यांतहि मध्वनाथांची मुद्रा नाहींच. पण त्याचा विचार सध्यां येथें करीत नाहीं, कारण मध्वनाथांच्या या संग्रहांत मुद्रा नसलेलीं जीं कांहीं पदें छापलेलीं आहेत त्यांचा विचारच मला येथें करावयाचा नाहीं.

त्रिंबक, त्रिंबककवि, त्र्यंबक हा या मध्वनाथांचा शिष्य दिसतो. (पहाः मध्वमुनीश्वरांची कविता, सं. गुब्बी. पृ. ६ व ७).

(१) श्रीमध्वनाथाभिधदीनबंधो...हेरंब लंबोदर मां प्रसीद ॥ १ ॥
श्रीमध्वनाथा करुणासमुद्रा। शोभे तुझी मंगलरूपमुद्रा ॥ २ ॥
तपोवनीं नांदत रेणुका हे। जे भक्तवत्साप्रति धेनुका हे।
ते शारदा शांभवि अंबिका हे। प्रसन्न झाली **कवि त्रिंबका हे** ॥ ७ ॥

(२) मध्वमुनीश्वरदीनदयाळा राखे बिरुदें आज।
त्रिंबक विनवी भावें मजला बोधसुधारस पाज ॥ २ ॥ (पृष्ठ ४१).

(३) स्वहितीं अंधक अंधक। मध्वनाथीं निंदक।
अद्‌भुत चुंबक चुंबक। फजीत करितो त्रिंबक ॥ ३ ॥ (पृ. ९९).

या वरील उल्लेखांवरून त्रिंबक हा मध्वनाथाचा शिष्य आहे; त्रिंबक म्हणजे मध्वनाथ नव्हे, हें उघड आहे. तेव्हां मध्वनाथांच्या संग्रहांत त्रिंबक वा त्र्यंबक हें मध्वनाथांचें नांव म्हणून येत नाहीं, हें उघड आहे. महाराष्ट्र-सारस्वतकार भावे यांनीं अशी शंका प्रकट केली होती. (महाराष्ट्रसारस्वत, पृ. ६०५, आवृत्ति चौथी, शके १८७६.)

मध्वनाथांच्या पदांत त्यांनीं आपला स्वतःचा उल्लेख 'सहज,' 'सहजबोध' असा कुठेंच केलेला नाहीं. त्यामुळें (श्रीसंत अमृतरायचरित्र, जोशी कन्नडकर, पृ. ७६)

"नाथमाधव–माधवनाथ–मध्वनाथ––त्र्यंबक––नाथश्रीधर–उधो––उद्धव––**सहजबोध-समाधि**–मुनी हीं त्यांचींच नांवें आहेत," या विधानाचें सत्यत्व मानणें पुराव्याच्या अभावीं कोणासहि अशक्य वाटेल.

आतां सहजबोध हे या उद्योगपर्वकर्त्या अमृतकवीचे गुरु होते. कटावकर्त्या अमृतरायाचे गुरु म्हणून सहजबोध प्रसिद्ध नाहींत. डॉ. कात्रे यांनीं रामदासी संशोधनांतला उतारा देऊन म्हटलें आहेः—

"'श्रीसमर्थ, तुका, सहजबोध, अमृतराय, केशव, रंगनाथ, मध्वमुनेश्वर यांचीं पदपदान्तरें'–या वर्णनांत सहजबोध आणि अमृतराय यांचीं नांवें अगदीं लागोपाठीनें आलीं आहेत, ही गोष्ट विशिष्टपणानें लक्षांत घेण्यासारखी आहे. तिजवरून उद्योगपर्वांत निर्देशिल्या गेलेल्या सहजबोध गुरुंचें येथील सहजबोधांशीं ऐक्य स्पष्ट होतें. इतकेंच नव्हे तर आपला अमृतकवि हा प्रख्यात अमृतरायच होय, असेंहि प्रायः सिद्ध होतें." या अनुमानांपैकीं शेवटचा दुवा कच्चाच वाटतो. एकतर मग मध्वमुनेश्वराचें नांव अमृतरायाच्या पुढें येण्याचें कारण नव्हतें; आणि पुन्हां हीं सर्व नांवें अगदीं कालानुक्रमानें वा गुरुशिष्यपरंपरेनें दिलेलीं आहेत असेंही नाहीं. जोपर्यंत **कटावकार अमृतरायाचे** गुरु सहजबोध होते असें निर्विवाद ठरत नाहीं, तोंपर्यंत हें अनुमानि शक्य असलें तरी निश्चित नाहीं.सहजबोध, सहजबोधसिंह, सहजानंद या कविनामानें उपलब्ध असलेलें काव्य प्रसिद्ध झालें नाहीं किंवा कटावकार अमृतरायाच्या उपलब्ध असलेल्या काव्यांवरून, हस्तलिखित काव्यावरून जोंपर्यंत हें निश्चित ठरत नाहीं, तोंपर्यंत हा वाद कायम राहाणार हें उघड आहे.

अविनाशसंदेहहरणांतील शंकराचार्यापासून आलेल्या परंपरेंत आणि श्री रामदासी संशोधन, द्वितीय खंड, अंक १०७१ (पृ. २३२–२३३) येथें दिलेल्या परंपरेंत साम्य आहे. तेव्हां अविनाशसंदेहहरणकर्ता अमृत हा तोच अमृतेश्वर कवि होय, (गोदातीर-नाभीतीर्थीं वस्ती करणाऱ्या माधवसरस्वती इ. वरूनहि) हें उघड होत आहे. या 'अमृता'चा एक स्वरूपनिर्णय ग्रंथ हस्तलिखित स्वरूपांत दासविश्रामधामकारांच्या संग्रहांत असावा, असें श्री. देव यांनीं दिलेल्या या माहितीवरून ठरतें. हा 'अमृत' कवि व उद्योगपर्वकर्ता 'अमृत' कवि एक नव्हे. उद्योगपर्वकर्त्यानें अमृतेश्वर असेंहि आपलें नांव दिलेलें आहे. आतां असा अमृतेश्वर असणारा एक कवि माळव्यांत माहीत होता ही गोष्ट या अमृतेश्वराचे जें संस्कृतमध्यें श्लोकबद्धचरित्र आहे, त्यावरून उघड होईल. कारण या चरित्राचा शेवटला भाग असा आहे :—

"इति श्रीमद्भक्तप्रवर अमृतेशस्य कथा समाप्ता ॥ शके १७५१ श्रावण शुद्ध

५ बुधवासरे माध्याह्नसमये संपूर्णा॥ **मालवदेशे** आष्ठाग्रामनिवासिना **ओंकाराख्येन** ज्योतिर्विदा **सीहोराख्ये** ग्रामे कृतमेतत्कथानकं लिखितमपि। "

हाच 'ओंकार' भट बहुधा वरील उद्योगपर्वाच्या हस्तलिखिताचा लेखक होय. त्याचें हस्तलिखित "**रेवातीरे** माहिष्मती नगरे" या ठिकाणचें आहे. दसोरे **जोशी** या नांवाचा व ज्योतिर्विद या वरील उल्लेखाचाहि मेळ बसतो, हें उघड आहे. तेव्हां ओंकारभट दसोरे जोशी व अमृतेश्वराचें चरित्र लिहिणारा ओंकार ज्योतिर्विद हे एकच होत.

हें जर खरें असेल तर हें उद्योगपर्व कटावकार अमृतराय यांचें नसून तें या अमृतेश्वरांचें ठरेल. हे अमृतेश्वर मर्ढे मठाचे अधिपति व संस्थापक होते. या अमृतेश्वरांना (श्रीसमर्थांचे शिष्य जे वासुदेव व त्यांचें शिष्य जे) विदेहस्वामी यांचा अनुग्रह झालेला होता. अमृतेश्वरांचें म्हणून जें पीयूषरामायण (श्रीरामदासी संशोधन, द्वितीय खंड, अंक ७२०, पृष्ठ ५३) आहे तें या मर्ढेमठसंस्थापकांचें आहे. त्यांतील अयोध्याकांडाच्या हस्तलिखिताच्या शेवटीं हस्तलिखिताचा लेखनकाल "शके १७०७ विश्वावसु संवत्सर" असा दिलेला आहे. म्हणजे इ. स. साधारणपणें १७८५ येतो. उद्योगपर्वाच्या लेखकानें त्याच्या हस्तलिखिताचा समाप्तिकाल "शाके १७१४" म्हणजे इ. स. १७९२ हा दिला आहे. तेव्हां हें उद्योगपर्व कटावकर्त्या अमृतरायांचें नसून मर्ढे मठसंस्थापक अमृतेश्वराचें ठरलें पाहिजे.

शंभर वर्षांमागची वऱ्हाडी बोली

(नागपूर–वऱ्हाडकडे जरी ग्रांथिक भाषा इतर महाराष्ट्रासारखीच असली, तरी त्यांची नित्याच्या खासगी व्यवहारांतील बोली निराळी आहे. निरनिराळ्या जातींप्रमाणें किंवा गांवांप्रमाणें तिच्यामध्यें पुनः फरक पडतो. या बोलीमध्यें कांहीं वाङ्मय दीडशें वर्षांमागें प्रसिद्ध झालें आहे. डॉ. विल्यम कॅरे यानें जें मराठीचें व्याकरण, कोश आणि बायबलचें भाषांतर वगैरे कांहीं मराठी ग्रंथ प्रसिद्ध केले, ते याच बोलीमध्यें होते. याचें कारण, त्या काळीं ग्रांथिक मराठी गद्याला प्रमाणत्व प्राप्त झालें नव्हतें. डॉ. कॅरेला मराठी शिकविणारा पंडित वैजनाथ हा नागपूरकडचा होता. त्यामुळें साहाजिकच नागपूरकडील मराठी बोलीमध्यें हे सगळे ग्रंथ लिहिले गेले. मुंबई येथें प्रसिद्ध होणाऱ्या जानेवारी १८६९ च्या 'मराठी ज्ञानप्रसारका'च्या अंकांत (वर्ष १६, अं. १) रामचंद्र आनंदराव उदास यांनीं 'वऱ्हाडप्रांताचें वर्णन' प्रसिद्ध केलें आहे. त्यांत दिलेला वऱ्हाडी बोलीचा नमुना खालीं उद्धृत करतों. त्यावरून सुमारें शंभर वर्षांमागें आमचे विदर्भांतील बांधव कसे बोलत तें कळून येईल.—**सं.**)

रामराव :—आपले आगमण कोठून झाले ?
कृष्णराव :—शेहेराहून आलो.
रामराव :—आपले मक्कान कोठे ?
कृष्णराव :—आमचे मक्कान अळचपुरास आहे.
रामराव :—शेहेरास आपन कोनाच्या इलाक्यात असता ?
कृष्णराव :—लश्कर जंगाच्या इलाक्यात.
रामराव :—आपन सदरात आहे का तपसीलात आहे ?
कृष्णराव :—मी सदरात आहो.
रामराव :—नारायनराव पुनतांबेकरास आपन जानता ?
कृष्णराव :—त्याहाची माझी फार दोस्ती आहे.
रामराव :—ते आजून बेकार आहेत ?
कृष्णराव :—नाही त्याहाची दिवानीत भरती झालीना.
रामराव :—त्याहाची काय माहावार आहे ?

कृष्णराव :—त्याहाची माहावार नव्यानव रुपये कलदार आहे.
रामराव :—आपनास मांदगी जाहाली होती ?
कृष्णराव :—मला चार महिणे ताप येत होती.
रामराव :—आपले शरीर बहुत कृष झाले आहे.
कृष्णराव :—आज पानी तर फार पडला.
रामराव :—पानी पडला तरी गरमी होती–थोड पानी पिन्याला बलावात.

(घरांतून शब्द होतो)

सासू :—सुनबाई व–अ–अ—
सून :—वत ह्मनतु
सासू :—पानी दे पानी.
कृष्णराव :—पानी मोहोजूद आहे.

आपाराव :—(बाहेरून येतो) आपल्या आपाची बदली झाली.
कृष्णराव :—आपाची ?
आपाराव :—आपाची—
कृष्णराव :—आपल्या ?
आपाराव :—अपल्या—
कृष्णराव :—बदली ?
आपाराव :—बदली झाली.
कृष्णराव :—आपा इकडे येनार होते ना.
आपाराव :—ते एक दोन घटकेच्या अरशांत येतील. त्याहाला उदईक उमरावतीस जाने लागते.
कृष्णराव :—कश्याला जाने लागते,-खाचर घेऊन जाणार ?–आणखीन लवकर येईल ?
आपाराव :—येईल तर त्याहाला काय करन लागत तेथ.
कृष्णराव :—ही पागोटी वापस करा तुमची. तीला दाम फार बसते.
रामराव :—ही पागोटी कीती लंबी आहे ?
कृष्णराव :—पन्नास हात लंबी आनि एक हात चवडी आहे.

*

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ७५८६६ वि: निंबध
दान ... 2.12.88 बो: क्र: 23131(7)

रघुनाथपंडितविरचित दमयंतीस्वयंवराच्या भाषेवर रामकवीनें पाडलेला 'प्रकाश'

ले.-अ. का. प्रियोळकर

पुणें विद्यापीठाच्या प्राचीन मराठी गद्य-पद्य-मालेच्या संपादकमंडळापुढें, 'भाषाप्रकाश' नांवाचा संस्कृत अमरकोशाच्या पद्धतीवर रामकवि नांवाच्या पंडितानें रचिलेला हस्तलिखित ग्रंथ, छापावा कीं नाहीं याबद्दल विचाराकरितां आला. हा ग्रंथ तंजावरहून प्रो. शं. गो. तुळपुळे यांनीं नकल करून आणला होता. ग्रंथ मधून मधून मीं चाळून पाहिला आणि शेवटीं हा ग्रंथ प्रसिद्ध करावा, असें आम्हीं ठरविलें.

'भाषाप्रकाश' हा ग्रंथ तंजावराला उपलब्ध झाला. इतकेंच नव्हे तर त्याचा कर्तादेखील त्याच बाजूचा आहे. स्वतःची माहिती देतांना रामकवि 'भाषाप्रकाशा'च्या आरंभींच म्हणतो,

म्हणोनि ग्रंथ हा ऐका विलासें कणवे करीं।
कर्नाटकीं निवसलों नेणताही असो परी ॥ ११ ॥
ज्ञानेश्वर्यादिकाधारें वदतों स्वल्पही बहु।
कोळे नृसिंह देवाचा दास राम कवी म्हणे ॥ १२ ॥

जुन्याकाळीं तामीळ देशालादेखील कर्नाटक म्हणत. ग्रंथकारानें 'ज्ञानेश्वरी'चाच तेवढा उल्लेख केला आहे. परंतु सुप्रसिद्ध 'दमयंतीस्वयंवर' या मराठी काव्याचा कर्ता रघुनाथपंडित तंजावरकडील असल्यामुळें त्याच्या काव्यांतील शब्द या कोशांत येणें स्वाभाविक आहे, असें मला त्यावेळीं वाटलें. हा कोश डॉ. शं. गो. तुळपुळे यांनीं संपादून नुकताच प्रसिद्ध झाला आहे. तो वाचून पाहातां माझा अंदाज खरा होता, असें दिसून आलें.

'दमयंतीस्वयंवर' हें रघुनाथपंडिताचें काव्य पांडुरंग बापू जोशी पावसकर यांनीं इ. स. १८४३ सालीं आपल्या 'श्री ज्ञानचंद्रोदय' या मासिकांत प्रथम प्रसिद्ध केलें. पुढें १८५४ सालीं हा 'नवनीत-भेला' परशुरामतात्या गोडबोले यांनीं वाचकांना उपलब्ध करून दिला. आपल्या ग्रंथाला 'नवनीत' हें नांव देण्याची मूळ कल्पना दमयंतीस्वयंवरांतील **'आधींच नैषधकथा नवनीतभेला'** या चरणावरून तात्यांना सुचली असावी; कारण आपल्या काव्याच्या शेवटीं ते रसिकास उद्देशून लिहितात,

काव्यामृताचा नवनीतमेला । हा गोड लागो तुमच्या जिभेला ॥
याची तुम्ही चाखुनि घ्याल गोडी । तेव्हां सुखाची मिळवाल जोडी ॥

"या कवीचें वृत्त कांहींच माहीत नाहीं," असें नवनीतांत तात्यांनीं म्हटलें आह. १८८३ सालीं कै. ज. बा. मोडक यांनीं काव्येतिहाससंग्रहांत अरणीकर आनंदतनयाचें ताटकावध हें काव्य प्रसिद्ध केलें, त्यावेळीं "आनंदतनय व रघुनाथपंडित हे परस्पर व्याही होते," अशी माहिती त्यांनीं पुढें आणली, तर १९०० मध्यें वि. का. राजवाडे तंजावरास गेले असतां तेथें रघुनाथपंडितासंबंधीं अनेक आख्यायिका प्रसिद्ध असल्याचें त्यांना आढळून आलें. इतकेंच नव्हे, तर रामदासवर्णन व गजेंद्रमोक्ष अशीं दोन रघुनाथपंडिताचीं काव्यें ही त्यांना तंजावरांत उपलब्ध झालीं.

१९०३ च्या सुमारास मळकर्णेकर नांवाच्या गृहस्थांस कारवारकडे या काव्याची एक प्रत मिळाली. तिच्या शेवटीं 'कथा ऐसी चंद्रावरकर रघूनाथचि करी' असा चरण होता. त्यावरून हा कवि चंदावरकर उपनामक कारवारकडील सारस्वत ब्राह्मण असावा, असें मत ज. र. आजगांवकर व वा. र. वालावलिकर यांनीं मांडलें. समर्थभक्त शंकरराव देव यांनीं त्याला नवहस्त ठरविलें (कऱ्हाडे ब्राह्मणांत हें आडनांव आढळतें). १९३० सालच्या सुमारास चंदावर म्हणजेच तंजावर असून हा कवि शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकीं पंडितराव असावा, असा तर्क मी पुढें मांडला. अलिकडे य. ग. फफे व स. ल. कात्रे यांनीं त्याला कोंकणांतील 'मनोहर' (म्हणजे चित्पावन ब्राह्मण) ठरविण्याचा प्रयत्न केला आहे. या कोकणांतील रघुनाथपंडित मनोहराच्या 'गंगालहरी' नांवाच्या मराठी काव्यांतील जे उतारे व अशुद्धें स्वतः काव्यांनींच दाखविलीं आहेत ('चिकित्सामंजरी' व 'नाडीज्ञानविधि' या संस्कृत ग्रंथांची त्यांची प्रस्तावना पहा) त्यांवरून तो, शुद्धलेखनाबद्दल प्रसिद्ध असलेला दमयंती-स्वयंवराचा कर्ता बिलकूल वाटत नाहीं.

'गंगालहरी' हा ग्रंथ छापून प्रसिद्ध झालेला नाहीं. त्याच्या भाषेचा नमुना पहा :—

शिशूशब्द ते बोबडेही रसाचे । सुधेतुल्य कल्पी मनीं तात साचे ॥
तसें काव्य माझे बुधीं आदरावें । हिताहीतपंथीं न चित्ता भरावें ॥

मदोन्मत्ताचेही स्वमनिं बहु जे निंद्य ठसलीं ।
पतीतव्रातांनीं सभय बहु जे दूर धरिलीं ॥
महाव्रात्यांनींही कलुषवदनी ना वसविली ।
जयाला कंटाळें विशुन जन ठेवी न जवळीं ॥
निघालीस स्वर्गीहुनि महि अशोकास्पद करूं ॥

वरील उताऱ्यांत जसे कांहीं अशुद्ध शब्द आहेत, तसेच सुरवेष्टीत, अरीषड्-वर्गांचा, ०पिशुकादीक, तिलकाङ्कीत वगैरे आणखीही अशुद्धें या काव्यांत आहेत, असें स्वतः रा. कात्रेच लिहितात, व "This liberty is profusely enjoyed by other standard poets like Muketeshwara, Vamana Pandita, Samaraja etc" असेंही म्हणतात. परंतु स्वतः रघुनाथपंडित आपल्या काव्यांत संस्कृत वृत्तांत अशा चुका करण्याचें स्वातंत्र्य घेत नाहीं. ओवी, दिंडी, पदें वगैरे मराठी पद्यांत ऱ्हस्वाचें दीर्घ व दीर्घाचें ऱ्हस्व म्हणण्यास जुन्या काळीं हरकत नव्हती. परंतु संस्कृत वृत्तांत वरीलप्रमाणें चुका आढळत नाहींत. रा. कात्रे यांनीं 'गंगालहरी' हें समग्र काव्य प्रसिद्ध करावें, म्हणजे 'दमयंती-स्वयंवरा'चा व 'गंगालहरी'चा कर्ता एकच कीं काय, हें स्वतःच ठरविण्यांस वाचकांना मदत होईल. असो.

अशाप्रकारें सारस्वत, कऱ्हाडे, देशस्थ व चित्पावन अशा ब्राह्मणांच्या चार जाती रघुनाथपंडित फिरला. तो कोणीही असो. मला आज रामकवीचा 'भाषा-प्रकाश' व रघुनाथपंडिताचें 'दमयंतीस्वयंवर' यांमधील शब्दांची तुलना करून रामकवीच्या भाषाप्रकाशानें रघुनाथपंडिताच्या भाषेवर कसा प्रकाश पडतो तें दाखवावयाचें आहे :

(आरंभींचा आंकडा रघुनाथपंडितविरचित **दमयंतीस्वयंवरां**तील (प्रियोळकर प्रत) श्लोकाचा अनुक्रमांक असून पुढें त्या श्लोकांतील चरण दिला आहे. त्याच्याखालील कंसांतील आंकडा रामकविकृत **भाषाप्रकाशां**तील वर्गांचा अनुक्रमांक असून अर्थविवरणात्मक मजकुराच्या शेवटीं त्यांतील श्लोकाचा अनुक्रमांक आहे.)

१. **पुण्यश्लोक**नृपावळींत पहिला होवोनि जो राहिला।
जो नामें **नळ** तत्कथौघ लिहिला तो पाहिजे पाहिला ॥ १ ॥
(९) **नळ पुण्यश्लोक** कोण्ही ॥ २०२ ॥

४–५. नळाऐसा तरि **कळानिधी** मानूं ॥ ४ ॥ चंद्रासि लागति **कळा** ॥
(८) चंद्र चंदरही चांद मयंकू चंद चंद्रमा।
कळानिधी ह्मणउनी बोलिज सम संस्कृतीं ॥ ९२ ॥
येथें कळा ह्मणितल्या अमृताचेच भाग ते।
चडत्याही उतरत्या **कळा** सोळा शशींत त्या ॥ ९३ ॥

६. गाजी तो नळभूप **हूप** धरुनी गा जी गुणांच्या गणीं ॥

२११. इंद्रादिक तेही **हूप** । धरूनि आले नळरूप ॥
(१६) अवांका तो धीरही तो धैर्य तें तेंच घाडस ।
स्त्रीलिंगी **हुप** आणीक अवहावहि बोलिजे ॥ ५७ ॥

१२. द्वारीं झुलोत गजसंघ **हिंसोत** तेजी ॥ १२ ॥
(४) हत्तीचा शब्द किंकाट घोड्यांचा **हेषहीस** तो ॥ २ ॥

१६. सोपा जो सकळां द्विजां सुमतिचा **सोपा** सदा लाभतो ॥
(९) ह्मणतल्यां परिवर **सोपा**ही मधिलें घर ॥ २२४ ॥
(१८) **सोपा**ही बत्थ चौकोनी ॥ ६ ॥

१९. परिसुनि दमयंती रंजली **रंजयंती** ॥
१३९. जसी **रंजलीस** तूं निषधभूपीं । तसा तोही **रंजला** तुझ्या रूपीं ॥
(१६) संतोषला हरिखला **रंजला** खुल्ला तथा ।
आनंदला हरुषला तोच संभ्रमला तसा ॥ १०७ ॥

'रंजली' या शब्दाचा अर्थ सरवटे हरिखला, असा वरील कोशाप्रमाणें देतात. पण मला तो रंजीस आला या फारसी अर्थाप्रमाणें वाटतो. 'रंजयती' याचा अथ मात्र वरील कोशाप्रमाणें आहे. जास्त माहितीकरितां माझ्या पुस्तकांतील टीप पहा.

२०. **मिळणी** उभयांसि होय जेथें ॥
(६) येकठ्ठा येक **मिळणी** येकत्र म्हणिजेतसे ॥ २ ॥

२१. धनें वसनें त्यां दीधलीं **अमूपें** ॥
(६) अनेक आणि उद्दंड **अमूप** अमापहि ॥ ४७ ॥

२८. **छायानायकसा** निदाघसमयीं **छाया** धरी तो विधू ॥
(८) सूर्याची अंतुरी **छाया** ॥ ६७ ॥
,, स्त्रीलिंगी सावली **छाया** साइ आणिक साउली ॥ ९८ ॥

२९. **पाथर**ही दिसतांच हा रघुनाथ म्हणे नवसी पहा ॥
(१८) धोंडा तोचि दगड तोची पाखाण **पाथर** ॥ ८२ ॥

३०. रजनीदिवस **गमेना** नृपास संगीतही सुख **गमेना** ॥
(९) **गमिजे** पाविजे आणि भाविजे कर्मिजे तथा ॥ १०३ ॥
(१६) भासलें **गमलें** आणि वाटलें म्हणिजेतसे ॥ ३९ ॥

३१. जंघाल जो पवनसंगतिची **सवे** घे ॥
(१६) **सवे** ते तोचि अभ्यासु खोडि जे चट तेच ते ॥ ७७ ॥

३२. जो अंबरीं **उफळतां** खुर लागलाहे ॥
(१३) उफाळलें **उफळलें** तैं उचंबळलें तसें ॥ ८ ॥
,, शृंगारिला हय तयावरि भूप **वेंधे** ॥
(१८) चढे तो वळघे **वेधे** ॥ ११७ ॥

३३. **सीम** लंघी उद्यान येक पाहे ॥ (पाठभेदः सिमा–सर्वसंग्रह, सींव–नवनीत)
(१८) **सीमा** ते तेचि सरद **सीव** ते आणि हद्द ते ॥ १२४ ॥

३५. लतेतळीं रुंद **निरुंद कालवे** ॥
(१३) **निरुंद** तेच चिरटी ऐन विस्तार पसरट ॥ १ ॥
(१३) थोडक्यापासुनी पाणी उदंडहि जयामध्यें ।
कर्नाटकीं **कालवा** तो पाट देशीय जाणिजे ॥ २ ॥
,, परागही **सांद्र** तयांत रंगती ॥
(९) दाट शब्दें टोंचणेंही **सांद्र** आणि दबावणें ॥ १८० ॥

३७. तया वनीं एक **तटाक** तोयें । **तुडुंबलें** तामरसानपायें ॥
(१३) **तटाक** भरलें ठाईं तुंबलेंहि **तुडुंबलें** ॥ ७ ॥

४०. तयासाठीं हे वापिकाच **पोहे** । नळें केली हें कोण म्हणे नोहे ॥
(१८) **पोहे** ते पानछत्र तें ॥ ३७ ॥

४२. तेथील येक कलहंस तटीं **निजेला** ।
(१८) **निजेला** निदेला तो झोंपी गेला म्हणूनि घे ॥ ११३ ॥
,, जो **भागला** जलविहार विशेष केला ॥
(१६) थकला **भागला** ॥ ९३ ॥

४३. केली विजार वरि **डौर**हि मौन सेवी ॥
(१७) माजाखालील घेरा तो झग्याचा **डौर** बोलिजे ॥ ११ ॥

४४. **फडफड** निजपक्षीं दाविलीही उडाया ॥
„ **फडफड** ध्वनिही उदेला ॥
(४) निशानाच्या फटकर्णी उठे ते **फडफड** द्वयी ॥ १४१ ॥

४४. नृपतिस **मणिबंधीं** टोंचिता होय चंचू ॥
(१०) तेंचि नामें मनगट मणीरूपास्थि ज्या स्थळीं ।
मणिबंधापासुनियां पावेतों कोंपराप्रती ॥ ५४ ॥

„ धरिल दृढ जया ल्या काय सोडील **पंचू** ॥
(२०) अत्याशा तेच लालूची भोगीं चित्तासी लालनें ।
पंचू चंची बाद चंद पक्का सुगड जाणिजे ॥ ८ ॥

दमयंतीस्वयंवरांतील 'पंचू' ह्या शब्दाचा नीट अर्थ लागत नाहीं. भाषाप्रकाशांतील **वरील अर्थानें** त्यावर प्रकाश पडेल काय? कोशांतील अर्थही दुर्बोध वाटतो.

४५. **सजण** गवसला जो याचपासीं वसे तो ॥
(१६) तो तें **सजण** जाणावें आतां त्रीत्वीं यथास्वरीं ॥ २८ ॥

४७. **पाखिरूं** हें मारणें बुद्धि खोटी ॥
(१२) पाखरूं तें **पाखिरूं** तें पुल्लिंगी पक्षि पक्षिया ॥ १४ ॥

५०. इतर नदी जल-**टाकीं** । टाकुनि आलों याच तटाकीं ॥
(१३) विहीर डोंगरीची ते तें **टांके** ह्मणिजेतसे ॥ ३२ ॥
'टांकें' याचा विशिष्ट अर्थ येथें लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

„ कापुनि घ्याया आलों **शेली** ॥
(९) सेवटोर समग्रार्थ वरार्थ बहु यापरि ।
शेल श्रेष्ट आणि भाक शंख संख्याहि संखही ॥ ३९ ॥
'शेली' याचा नीट अर्थ लागलेला नाहीं. भाषाप्रकाशांतील वरील उताऱ्यानें त्यावर प्रकाश पडतो काय?

५१. तुवां **सजणे** हा समाचार घेतां ॥
(१६) **सजणी** साजणीही ते सयी तेच सखी तथा ॥ २७ ॥

५२. मला **आळवितां** हृदय तिचें **पोळे** ॥
(५) म्हणीतल्या **आळवणें** प्रीतीचें तें बलावणें ॥ ४६ ॥
(१६) म्हणीतल्यां तळमळ क्लेशैंकडु(रु ?)नि **पोळणें** ॥ ७१ ॥

५६. दयेचाही **केवा** तुजजवळि देवा बहु वसे ॥
१५६. मज मिळाला हा दर्शनाख्य **केवा** ॥
(१८) **केवा** तो आणि केणें तें अपार धन बोलिजे ॥ ६० ॥

५७. **निखंदूनी** बोलिलों नको मंदूं ॥
(५७) टाकुनी बोलणें तेंचि म्हणीजेत **निखंदणें** ॥ ५७ ॥

५८. करिति हिंसा जे ते बरीच **साजे** ॥
(९) **साजणें** शोभणें ॥ ३९४ ॥
„ तुवां दिधली मज **मोकळीक** गा जे ॥
(८) ते **मोकळीक** सुटिका जाणिजे सुटका द्वयीं ॥ ११९ ॥
(९) **मोकळीक** मुक्तदशा ॥ ३० ॥
„ दया केली हे कीर्ति तुझी **गाजे** ॥
(५) गजणें **गाजणें** आणि गर्जणें घोषणें तसें ॥ ५० ॥

६१. किती **रावे** असतील तुझ्या धामीं ।
१४५. केला मतिपंजर **रावा** ॥
(१२) **रावां** पुंसा आणि राघू तोताही म्हणिजेतसे ॥ ११ ॥

६६. नाहींच **वेगळिक** हें गमतें मनाला ॥
(९) मोकळीक मुक्तदशा **वेगळीक** पस्टता ॥ ३० ॥

६७. भासे मनांत मज **बिंबफलभ्रमानें** ॥
(९) म्हणीतल्यां तोंडवळें **बिंबीफलहि** ओष्ठही ॥ १६८ ॥

७१. **अपरूप** तसी दुसरी वनिता ॥
(७) सुरेखही त्रिकीं चांग **अपरूप** अपूर्वही ॥ २ ॥

७१. पुरहूत वधूसि नखीं **निरखी** ॥
(१६) पाहणें तें **निरखणें** देखणें म्हणिजेतसे ॥ १०० ॥

७२. ईतें करूं तरि मनोमय **मूस** वोती ॥
(२२) **मूस** तें जंत्र जाणावे ॥ १ ॥

८१. **येळील** नको करुं ॥
(८) स्त्रीत्वीं **येळील** हलकेपण होय नपूंसकीं ॥ १२१ ॥
(११) गरीब दुबळा दीन तोच **येळील** बापुडा ॥ ४ ॥
,, **गाथा** हे असो ॥
(५) कथा पुराणिंच्या गोष्टी **गाथा** त्या येर कांहण्या ॥ ५१ ॥

८८. तेथ कुंडिननगरास **दिठी** पावे ॥
(९) **दिठी** डोळाहि दृष्टिही ॥ १८१ ॥

९३. तेणें तसें नगर ते धरितां **निडारीं** ॥
(९) **निडार** समता पक्कदशा **दृग्पथही** कळो ॥ २१४ ॥
(१६) **निडारीं** तें दिठीपुढें ॥ ११३ ॥
,, जेथें सुशीतल महीतल सांद्र **साई** ॥
(१४) छाया ते साउली **साई** ॥ १७ ॥

१०३. कांहीं पुढें **फटकला** अवलोकिजेला ॥
१०५. पुनरपि **फटके** हा फारसा दूर नाहीं ॥
(१६) फडके **फटके** निघे ॥ ११७ ॥

१११. कसा **पातेजूं** बाळबुद्धि तूझी ॥
(८) वोटंगणें लागणें तें आणि **पातेजणें** तथा ॥ ३५० ॥

११९. आलों महीवरि **फिरादि** असी कराया ॥
(५) जाचणीचा सूड घेवों सांगणें जे **फिरादि** ते ॥ ९ ॥

१२३. हंसोदयें **विघरतां** अधरीं धरी ते ॥
(१६) विरालें तें पघळलें **विघरलें** विरलें तथा ॥ २३ ॥

१३१. **गांठ्याळ** जो हृदय सांद्र न होय ज्याचें ॥
(८) **गाठ्याळ** खजाना शाहणा तथा ॥ ६६ ॥

१३२. आतां वरूं नळवरासि तुला **नवाजूं** ॥
(५) **नवाजणें** वानणें तें ॥ १७ ॥
„ **वाजूं** तुझी स्तुति करोनी; कशास लाजूं ॥
(५) गाजावाजा आणि **वाजू** प्रवादु ह्मणिजेतसे ॥ ५६ ॥

१३३. युगसम होय विभावरी । घर **वोवरी** ॥
(१८) **वोवरी** तें उबऱ्याचें अंतर्गृह गुहेपरी ॥ ९ ॥

१४५. विरहिण ते सिणते **सिण** ते जाणेल कवण तियेचे ॥
(१६) **सीण** तो बहुवा वाक्यें नित्यहि कष्ट बोलिजे ॥ ७५ ॥
„ मधु तो इजला **सळितो** ॥
(९) **सळ** क्षोभु छलनही ॥ ४१७ ॥

१४६. होतां तयास **कथलें जथले** अहो ते ॥

१८८. तेणें तयास मजसीं **कथलाच** पेटे ॥ १८८ ॥
(१९) भांडणें जंग भांणेंही **कथला** कलहो कल्हो ॥ १ ॥
(१६) मिळाले तेच **जथले** जमा जाले जमावले ॥ १११ ॥

१४९. **गजबज** बहु जाली माय धांवोनि आली ॥
(१६) म्हणितल्यां **गजबज** घाबरेपण जाणिजे ॥ ८२ ॥

१५०. औषध **नलगे** मजला ॥
(९) **न लगे** नावडे ऐसें ॥ २०६ ॥

१५१. **मूलि** उपवर हे जाहली यियेला ॥
(१५) लेंकि ते कुमरी क्वांरी कन्याही म्हणवीतसे ।
अस्त्रीत्वीं मूल ते **मूली** नांवें बाळपणीं असीं ॥ ४७ ॥

१५७. म्हणुनि सुरमुनींद्रा **फावलें** यावयाला ॥
(१६) पावलें तें अवगलें **फावलें** लाभलें तथा ॥ ७३ ॥

१५९. जेणें मदीय मन हें **हरिखें** विकासे ॥
(१६) **हरिखा**नंद संतोष खुशाली तेच जाणिजे ॥ १०२ ॥

१६०. **वेंघलों** मग महीवर गा मी ॥
(१८) चंदे तो वळघे **वेघे** ॥ ११७ ॥

१६२. मग सुरेंद्रा ऋषि बोलतो **गिरा** हे ॥
(२१) शारदा सारजा देवी **गिरा बोली** सरस्वती ॥ ८ ॥

१७०. नळातें **पाचारी** सुरपति विचारी कुशल तो ॥
(५) बोलावणें बाहणेंही आणि **पाचारणें** तथा ॥ ४५ ॥

१८१. कोरुनि देह **टोरल** केला ॥
(१६) पोखारही टोकरही फोस **टोरल पोकळ** ॥ ९० ॥

१८२. गंहिवरत गळाही **चावळे** जीभ वाळे ॥
(५) नीट जिव्हा न वळतां स्वरेची गोष्टि **चावळी** ॥ ३३ ॥

१८४. ज्या दीन मीन धरितां **वळसा**च पावे ॥
(१६) आकांत हलकालोळ अनर्थ **वळसा** तथा ॥ ८७ ॥

१८६. बाळ **सानें** उचलील काय जातें ॥
(७) धाकुटें धाकुलें **सानें** धाकुटें आणि थेकुटें ॥ १७ ॥

१८८. होतां असा मज **निरोध** नृपावरोधीं ॥
(९) शाहा गुन्हाहि आणीक सतरंज **निरोध**ही ॥ ३९३ ॥

१९८. **कोण्हीयेक** दोघी दूती ॥
(१६) **कोण्हीयेक** येकाघेंही येखादेंही विपाइलें ॥ १ ॥

२०६. **खालें** असोनि सकळांवरि होय तो कीं ॥
(१६) तळीं तळवटीं **खालें** तळौतें आणि खालतें ॥ ९८ ॥

२१६. यावीण सांगा **तटलीं** तुझिं काय कामें ॥
(१६) राहिलें **तटलें** तैंचि थिरलें आणि थारलें ॥ १६ ॥

२२९. अथवा जो तुज **मोहला** ।
(९) **मोहला** भुल्ला ॥ ३० ॥

२३४. **वरचेल** नृपांस करोनि कृपा, वरचेल दिलें फिरुनी ॥
(१६) येर वर्कड वचेंल **वरिचेल**हि अन्य ते ॥ १२० ॥

२३९. जेथें **वळी** धरुनि पंचनळी बसे ते ॥
(१६) हरी **वळी** पंगतीही पंक्ति वोळीहि माळिका ॥ ४० ॥

२५०. मायेसही विसरली; न पुसेच **बा**-ला ॥
(१६) बाप तो तातही तोचि **बा** तो वडिलही तथा ॥ ४३ ॥

२५१. पिता तीचा **पांटी**भर धनहि वांटी बहु विडे ॥
(१८) हरा तो थोरली **पांटी** सान तें होय टोपलें ॥ ४४ ॥

२५२. भालीं रंगीत **टिकलें** चंदनाची **उटी** उरीं ॥
होतां संगीत टिकलें करिती **चाउटी** बरी ॥
(९) **टिकला** तिलका नाम ॥ १५१ ॥
(९) **उटी** बाकी गंधलेपू ॥ ६० ॥
(५) **चाउटी** चौंपरी चर्चा ॥ ३५ ॥

रघुनाथपंडित व रामकवि यांच्या ग्रंथांत कांहीं बाबतींत साम्य दाखवितां येण्यासारखें आहे. उदाहरणार्थ, रघुनाथपंडित समुदाय दाखविण्याकरितां 'गजसंघ' (१२), सुकृतसंघ (६), नामाक्षरसंघ (१३६) असे शब्द योजतो, तसे रामकवीही पुण्यसंघ (१४–२६), मेघसंघ (१३–२३) अशी शब्दयोजना करतो.

जुनीं कर्मणि रूपेंही दोघांच्या काव्यांत विपुल आढळतात. रघुनाथपंडित, देखिजेले (१०), बोलिजेले (१३, १७२), म्हणीजेले (१३), बोलिजेली (७२, १२५), धरिजेत (८५), सांगिजेतें (१८६), मानिजेलें (१९२), निवेदिजेले (२३९), अशीं रूपें वापरतो; तर रामकवीच्या काव्यांत, आणीजत (२–११), जाणिजेतसे (६–५), म्हणिजेतसे, बोलिजेतसे (८–११), बोलिजेल (८–१७), धालिजेलें, पाहिजेलें (९–४०३) अशीं रूपें आढळतात. यावरून रामकवीच्या दृष्टीपुढें रघुनाथपंडितांचें ग्रंथ होते व दोघेही एकाच भागांतील राहाणारे असल्यामुळें अशी भाषा वापरली गेली असावी असें सहज वाटूं लागतें.

रघुनाथपंडिताचीं 'रामदासवर्णन' व 'गजेंद्रमोक्ष' अशीं आणखी दोन काव्यें आहेत. रघुनाथपंडिताचे कांहीं विशिष्ट शब्द याही काव्यांत आढळतात. फार काय, 'दमयंतीस्वयंवरां'त आलेलीं कांहीं पद्यें जशांचीं तशीं 'गजेंद्रमोक्षां'त योजिलेलीं आहेत. या काव्यांतील कांहीं विशिष्ट शब्दांवर रामकवि कसा 'प्रकाश' पाडतो पहाः–

रामदासवर्णन

७. चिद्बोधसेज **अरुवार** नव्या फुलांची ॥
(१५) खर्बूज तें खुस्खुशीत खर्पूस **अरुवार**ही ॥ ४३ ॥

९. शोभे जयास लघुसें निटळीं **अवाळें** ॥
(१०) **अवाळू** ह्मणिजे त्यास वादीही ज्याप्रति नसे ॥ ७६ ॥

गजेंद्र-मोक्ष

८. **चिगुरले** फुलले फळले तसे ।
(१४) ... इत्यादि नांवें पुष्पांच्या पत्रांचीं जाणिजेत हें ।
आंगोरे ते अगरडे शेंडे ह्मणजेत ते ॥ २८ ॥
डीरी स्त्रीत्वीं **चिगुर** तो नित्येकवचनी असे ॥ २९ ॥
चिगुरले म्हणजे अंकुरले. गोमंतकांत 'चिगुर'ला 'फागूर' असें म्हणतात. जुन्या मराठींत 'पागोरा' असा याअर्थीं शब्द आहे.

१०. रुचति मधुर जैसीं चांगली तूप केलें ।
सुरुचिर रुचितेसी लागलीं **तूपकेळें** ॥
(९) **तूपकेळें** सुचे पेरू तूपही आणि केळही ॥ १६३ ॥
(१५) तें **तूपकेळ** तो पेरू जांबही ह्मणवोनि घे ॥ २५ ॥

१७. मधुपांचीं खिल्लारें सरोवरामाजि कुमुदकल्हारें ॥
(२३) गोऱ्हें गुरें गोधनेंही **खिल्लारें** सामुदाइकीं ॥ १ ॥

२२. धुंडीतसे तृषित **चिल्लर** थिल्लरातें ॥
(१८) गौताचीं **चिल्लरें** सांनीं घरें तें बोलिजेत हें ॥ ३७ ॥
(१८) सामान सामा सामोग्री स्त्रीत्वीं **चिल्लर** ते वरो ॥ ७० ॥

३७. तो तसा गिळि तसा न **उभारे** ॥
(१८) **उभारलें** वोरचलें आणि पंन्नासलें तसें ।
आकारलें विरचलें घडलें तसें ॥ १८ ॥

४४. पोहे **पसा**भर करीं तुज दे सुदामा ।
(१०) कुडता तो **पसा**ही तो पचा तो तेच खोंकही ।
मिळालीया दोनी **पसे** तेचि बोंझळ बोलिजे ॥ ३० ॥

४८. न दिसे **तांतडी** मोठी ।
(८) तीव्रता **तातडी** आणी जलदी ह्मणिजे त्वरा ॥ ४२ ॥

५३. माझें आतिथ्य कैसें न करुनि धरिलें ध्यान हें काय **मस्ती** ।
(१६) मद माद्व आणि **मस्ती** माजही रगही तथा ॥ १२० ॥

५८. जो गातां **अवधारितां** सुखकरी ते मुक्ति नांदे करीं ।
(१६) ऐकिलें तें परिसिलें तैसेंचि **अवधारिलें** ॥ ८ ॥

मराठी भाषेंतील इंग्रजी अपभ्रष्ट शब्द

(डॉ. महेश्वर अनंत करंदीकर)

इंग्रजी व मराठी लोकांचा पहिला संपर्क अंदाजें इ. स. १६२५ च्या जवळपास आला असावा. त्यापूर्वीचा इतिहास आज तरी ज्ञात नाहीं. मुक्तेश्वराच्या महाभारतांत सभापर्वांत 'जावी जंगी फिरंगी। **इंग्रेज** बहुधा रक्तरंगी। मलेबार नौकामार्गी। विघ्नकर्ते दंडिले' ॥ ८·१२७ ॥, हा आलेला उल्लेख सर्व मराठी वाचकांच्या परिचयाचा आहे. आदिपर्वांत 'जावी जंगी फिरंगी क्रूर। नाइते **इंगरेज** मलेबार। कांबे काठे कंकमखर। जळतस्कर मांसाशी' ॥ १५·९ ॥ हा उल्लेख आहे. हे वाङ्मयीन उल्लेख पाहिले म्हणजे असें वाटतें कीं, मुक्तेश्वरांसारख्या प्रवृत्तिपर मंडळीचें लक्ष या परदेशीय मंडळींकडे गेलेलें होतें. मुक्तेश्वरी भारताची रचना राजवाडे यांनीं ऐतिहासिक दृष्ट्या केलेल्या अनुमानाप्रमाणें इ. स. १६५० मध्यें झाली असें धरल्यास वाङ्मयीन उल्लेख याच सुमाराचे धरणें आवश्यक ठरतें. **'इंगरेज'** हा शब्द प्रत्यक्ष पोर्तुगीज भाषेंतून आलेला आहे. 'इंग्रज' हा शब्द पोलाद या अर्थीं वापरलेला आढळतो; पण तो मराठींत केव्हां प्रथम आला हें कळावयास मार्ग नाहीं. सुरत येथें इंग्रजांनीं इ. स. १६२५ मध्यें पक्का पाय रोंवला असावा, हें स्पष्ट आहे. ('शिवराज्य व शिवकाल,' वा. कृ. भावे, १९५७, पृ. १८); १६२१ व १६२३ मध्यें पोर्तुगीजांना शह देण्याचा इंग्रजांचा प्रयत्न फसला होता. १६६४ मध्यें शिवाजीनें सुरत लुटली व १६६१ मध्यें राजापुर येथें हल्ला केला होता. तेव्हां सामान्यपणें इंग्रज व मराठे यांचा मोठा संबंध १६२५ नंतर व १६५० पूर्वी प्रथम आला असावा, असें ठरविणें शक्य होतें. या वेळेपासून पुढें इंग्रजी शब्द मराठींत आले असले पाहिजेत.

(हें सर्व जरी खरें असलें तरी फादर स्टीफन्सनें इ. स. १६१६ मध्यें मुद्रित केलेल्या [फादर स्टीफन्सचें क्रिस्त-पुराण, निवेदन, पृ. ३, सं. शांताराम बंडेलू, पुणें, १९५६] 'क्रिस्त-पुराणांत' कांहीं इंग्रजी विशेषनामांचे अपभ्रष्ट मराठी पर्याय आढळतात. ते मराठींत ज्या वेळीं उतरले, त्या वेळेला महत्त्व देतां येत नाहीं, कारण तें पुराण मराठी लोकांत प्रचलित नसून फार तर बाटलेल्या मंडळींत प्रचलित होतें.)

१८१८ नंतर इंग्रजांचें राज्य महाराष्ट्रीय वर्चस्वाखालीं असलेल्या प्रदेशांतून स्थिर होण्याच्या पूर्वीच इंग्रजी पदार्थ महाराष्ट्रांत आले असले पाहिजेत हें उघड आहे. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळीं (इ. स. १६७४) मुंबईचा इंग्रज वकील हजर होता. त्याचें नांव ऑक्झेन्डेन होतें. त्यानें महाराजांना कांहीं पदार्थांचा नजराणा केल्याची नोंद आहे. राजापूर व सुरत येथील लुटींत पुष्कळच इंग्रजी पदार्थ होते. तत्पूर्वी चौल बंदरांतून मोठा व्यापार चालत असे. चौलचा एक भाग पोर्तुगिजांकडे होता व दुसरा

वरचा भाग महाराजांकडे होता. त्या बंदरांतून पुष्कळ पदार्थ कोंकणांत व वरघाटीं येत असत. तीच गोष्ट वेंगुर्ल्याची होती. १६६१ मध्यें मुंबई चार्लस राजाला मिळाली व १६६८ मध्यें त्यानें ती ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाराला दिली. तेथून पुढें व्यापार व हालचाली चालू झाल्या.

मराठींत आलेले इंग्रजी शब्द हे सामान्यतः न्यायालयें व कार्यालयें, सैन्य व रक्षापुरुष, शिक्षण, वाहतूक आणि दळणवळण, वैद्यक, यंत्रें, खाद्यपेयें आणि करमणुकीचीं साधनें या विभागांत पडतात. येथें केलेला शब्दांचा विचार हा आज मराठींत पूर्णपणें प्रचलित असलेल्या किंवा १९४७ मध्यें प्रचलित असलेल्या शब्दांचा नसून केवळ उच्चारांत अपभ्रष्ट असलेल्या शब्दांचाच आहे, हें ध्यानांत घेतलें पाहिजे. इंग्रजी उच्चारांतहि अपभ्रष्ट स्वरूपाचा आज मराठींत आढळणारा उच्चार आणि त्याच शब्दांचा **आजचा** इंग्रजी भाषेंतील उच्चार यांत फरक पडणें केवळ संभवनीयच नव्हे तर खरेंहि आहे. कारण प्रत्यक्ष इंग्रजीमध्येंच इ.स. १७०० पर्यंतचे उच्चार आणि आजचे उच्चार यांत फरक आहे. म्हणून आज अपभ्रष्ट उच्चार म्हणून आपण जे मानतों ते मूळ शब्द मराठींत आले तेव्हांहि अपभ्रष्ट होते, असें समजणें कांहींसें प्रमादकारक आहे. इतकेंच नव्हे तर, प्रत्यक्ष मराठी उच्चारांतहि फरक झाल्याचें अनुमान ढळढळीतपणें सत्याचें आहे. तेव्हां आज जो शब्द अपभ्रष्ट उच्चाराचा म्हणून आपण मानूं तो ऐतिहासिक दृष्ट्या तसा अपभ्रष्ट पूर्वी होता असें समजणें न्याय्य होणार नाहीं. खरें म्हटलें म्हणजे हस्तलिखित ग्रंथांतून आढळणाऱ्या रूपांची नोंद मूळ स्वरूपांत शब्दकोशांतून ऐतिहासिक रीत्या झाल्यावांचून या अपभ्रंशांचा पूर्ण छडा लागणें शक्य नाहीं.

मराठींतील या अपभ्रष्ट इंग्रजी शब्दांचे उच्चार इतर भारतीय भाषांतून काय होते व होतात हें तौलनिक दृष्ट्या (त्या त्या भाषेचें उच्चारणविशेष ध्यानांत घेऊन) अभ्यासून त्यावरूनहि पुष्कळच बोध होण्यासारखा आहे, परंतु अशा तऱ्हेची सामग्री बंगाली व पंजाबी या भाषा वगळल्यास इतर भाषांमध्यें फारशी आढळली नाहीं. आजचे सुशिक्षित स्त्रीपुरुष शुद्ध उच्चार करण्यासंबंधांत अधिक दक्ष आहेत, व आज दिसणारे अपभ्रष्ट उच्चार कमी शिक्षित मंडळींत किंवा रूढीनें उतरून प्रचलित राहिलेले दिसतात.

पुढील विवेचन मुख्यतः मराठीमध्यें ज्या इंग्रजी शब्दांचा उच्चार मूळ इंग्रजी उच्चारापेक्षां स्वर व व्यंजनें यांपैकीं कोणत्याहि एका किंवा दोन्ही अंगांनीं अपभ्रष्ट झाला आहे, त्या शब्दांसंबंधींच आहे. येथें मराठींत आलेल्या सर्व इंग्रजी ऋणशब्दांचा विचार केलेला नाहीं. १९४१ मध्यें मराठी शब्दसंग्रहमीमांसा हा माझा प्रबंध लिहीत असतांना या विषयाची सिद्धता झाली होती; परंतु त्या वेळीं व पुढें अनेक कारणांनीं हें विवेचन प्रसिद्ध करणें शक्य झालें नाहीं.

पंजाबी भाषेत आलेलें इंग्रजी अपभ्रष्ट शब्द निवडून रे. ग्रॅहॅम बेली यांनीं 'Studies in North Indian Languages' या आपल्या निबंधांत

पंजाबींतील शब्दांची चर्चा केलेली आहे. डॉ. सुनीतिकुमार चाटर्जी यांनीं Origin and Development of the Bengali Language या आपल्या ग्रंथांत बंगालींत इंग्रजीमधून आलेल्या अपभ्रष्ट शब्दांची चर्चा ग्रंथाच्या शेवटीं घातलेली आहे. मराठींत या विषयींचा पूर्वीचा प्रयत्न कोठें पाहाण्यांत आलेला नाहीं. मी पंजाब सरकारच्या गॅझेटियर्ससाठीं या विषयावर काम करीत असतांना माझ्या निरीक्षणांत असे शब्द बंगाली भाषेंत २८०, गुजराती भाषेंत २१२, कन्नड भाषेंत २१६, पंजाबींत ३६०, तमिळमध्यें ३३ व तेलुगूमध्यें १४५ आढळले. मराठींत ते ४५६ आहेत. आश्चर्याची गोष्ट अशी दिसते कीं, मराठींत आज हे शब्द सर्वांत अधिक दिसत आहेत व तमिळ भाषेंत अत्यंत कमी आढळतात. याचें स्पष्टीकरण होणें फार अवश्य आहे; कारण त्यामुळें आम्ही इंग्रजी प्रभावाखालीं किती आलों, हें बरेंच उघड होईल. तें काम या लेखांत करण्याचा विचार नाहीं.

या शब्दांचे अपभ्रंश सिद्ध होण्यामागील नियम अजून पूर्णपणें समजलेले आहेत असें वाटत नाहीं. रे. ग्रेहॅम बेली यांच्या मतें तर येथें संपूर्ण गोंधळाचेंच साम्राज्य आढळतें; तर डॉ. सुनीतिकुमार यांच्या मतें मूलभूत अशीं थोडीं तत्त्वें उघड दिसतात तीं अशीं :—१. उच्चार करणाऱ्या लोकांची उच्चारणपद्धति. उदाहरणार्थ 'अ' काराचा बंगाली 'ओ' कारांतील उच्चार; किंवा गुजराती भाषेंत इंग्रजी a चा 'ए' (Acid एसिड इ.) उच्चार; २. Not किंवा Law या शब्दांतील ध्वनींमधील सूक्ष्म फरक डावलण्याची प्रवृत्ति. चाटर्जी यांनीं बंगालीविषयीं हें म्हटलें आहे; ३. Neutral स्वरांतील उच्चारांतील केलेला फरक; ४. आद्यस्वरलोप—Agreement चें–गिरिमेंटा, अटर्नीचें ट्रर्नी इ.; ५. मुळांतील द्वित्त (Dipthong) स्वरांच्या उच्चारणाचा अधिक्षेप; ६. लोक-व्युत्पत्तींतील उच्चार लक्षांत घेऊन केलेला अपभ्रंश; ७. संस्कृत उच्चारांशीं जुळवलेलें साम्य. यांतील कांहीं भाग सर्व भाषांतील इंग्रजी अपभ्रष्ट शब्दांच्या विवेचनास उपयोगी पडला तरी मराठी शब्दांत यांतील कांहीं नियमांचें बंधन पाळलेलें दिसत नाहीं. मराठींतील शब्दांवरून विचार करतां या नियमांच्या जोडीला पुढील नियम दाखवावे लागतील. उदाहरणार्थ १. आद्यस्वरागम–इस्पिट, इष्टापुरी, इष्टुर इ. येथें हा स्वरागम सनें किंवा शनें साधलेल्या जोडाक्षरांत दिसतो; परंतु हे व असे शब्द आजं मराठी भाषेंत दिसत असले तरी मराठी मंडळींची (विशेषतः नागर मंडळींची) ती संवय नाहीं. स्त्रीची अस्तुरी खेडेगांवांत होते; शहरांत कमी. तेव्हां हे आद्यस्वरागमी शब्द मुळांतच दुसऱ्या भाषेंतून मराठींत आले असणें अधिक संभवतें; कारण इंग्रजी शब्द शहरांतून खेडेगांवाकडे गेले हें स्पष्ट आहे. मराठींत 'इस्कूल' किंवा 'इस्टेशन' साधारणपणें फारसें होणार नाहीं. २. मूळस्वरोच्चारणलोप, उदाहरणार्थ 'दिपोटी' हा Deputy शब्दाचा अपभ्रंश, किंवा 'सुप्रिंटेण' हा सुपरिंटेंडेंट शब्दाचा अपभ्रंश पहा. ३. मूळ स्वराचा लोप होऊन अन्यस्वरागमहि होतो–

'लेन,' 'फेर,' 'मैल,' 'वेंडर,' 'रपोट,' इत्यादि. ४. व्यंजनस्थानविपर्यय–'कांब्लेट' (ब्लँकेट). मराठी कांबळें या शब्दाच्या व्यंजनविपर्ययाच्या जवळ मूळ इंग्रजी व्यंजनांचें उच्चारण होत असल्यानें हा अपभ्रंश झाला हे उघड आहे. ५. महाप्राणागम व महाप्राणलोप. 'भिस्कुट' येथें मूळ 'ब' मध्यें महाप्राणाची भर पडली आहे; लेधर मधील 'ध', लसूणघास मधील 'घ', पान्हा मधील ह. इंग्रजीचा मराठी उच्चार असाच आम्ही महाप्राणागम करून करतों. Hospital या शब्दाच्या अपभ्रंशांत आद्य महाप्राणलोप दिसतो तर 'पाप्लेट' मधल्या दुसऱ्या 'प' मध्येंहि असाच मध्यमहाप्राणलोप आहे (इंग्रजी Pomphret). व्यंजनांतील फरक तर अमूप आहेत. स, श, ष मधील मराठी अपभ्रष्ट उच्चार यांचीं स्पष्ट उदाहरणें आहेत. र विषयींल; लब्बर (रब्बर), ड चा ट (लाट), र चा ड (लाडीस). व्यंजनलोप झाल्याचीं उदाहरणें पण 'रपोट,' 'शेकण' (Second), 'रूळ' (Ruler) मध्यें दिसतात लिंगनिश्चिती कांहीं शब्दांत–उदाहरणार्थ 'नर्स' हा शब्द. अगदीं पहिला इंग्रजी शब्द मराठी भाषेंत केव्हां आला आणि अपभ्रष्ट झाला, हें सांगणें अशक्य आहे. जुनें ऐतिहासिक वाङ्मय वाचीत असतां त्यांत कांहीं इंग्रजी शब्द येतात हें खरें; परंतु बहुधा सर्व व्यवहारांत इंग्रजी कल्पना मराठी रीतीनें मराठी शब्दांतच शक्य तोंवर व्यक्त केलेल्या आढळतात. पंजाब किंवा बंगाल अथवा मद्रास येथें इंग्रजांचा सहवास, महाराष्ट्राच्या लोकांच्या सहवासांत इंग्रज येण्यापूर्वी, घडून आला असला पाहिजे, हें उघड आहे. पुढील शब्दच फार तर जुन्या मराठींत येतात, असें ऐतिहासिक वाङ्मयावरून दिसतें:–१. इस्पडताल, Hospital, पे. दे. ३३, पृ.१०७ ("इस्पडतालच्या डाक्तरास हुकूम केला कीं यादीप्रमाणें जीं औषधें मोदी मागेल ती देणें."). २. इंग्रज हा शब्द पोलाद या अर्थी (पेशवाईच्या सावलींत, पृ. २३७ वर–"इंगरज कुऱ्हाडीस..इंगरज भरले") येतो. इंग्रजी लोखंड व इंग्रजी शिसें ("इंग्रजी लोखंडहि सध्यां नाहीं इंग्रजी शिसें दरमणी रुपये १३ प्रमाणें दर आहे.") याचा उल्लेख ऐ. ले. सं. ३६४७ येथें येतो. ३. गुराब (grab) व ४. गलबत (gallivat) यांचा उल्लेख (पे. द. ३३, पृ. ७, "गुराब गलबतें धड्यावरी घेणें") येथें आहे. मोरोपंतांनीं गुराब शब्द उद्योगपर्व ३·११७३ येथें वापरला आहे– "स्वर्वल्लिमंडपींच्या भवसिंधूंतील बा गुराबा ज्या." "आज्ञापत्रांत "हि हा शब्द येतो. (मराआ ३४). ५. छीट हा शब्द (Chintz) (मूळ संस्कृत चित्र) वरून येतो. ("हिला नेसावयास अगदी नाहीं. एक छिट अगर दुसरें कांहीं तरी दिलें पाहिजे–" ऐ. ले. सं. ३७५६). इंग्रजींतील पहिलें अवतरण (Hobson Jobson १·२०२) १६१४ मधलें आहे. अइन–इ–अकबरींत (१·९५) हा शब्द 'चींट' या स्वरूपांत आहे. ६. 'छोलदार' हा (Soldier) या शब्दावरून आला असावा (ऐ. ले. सं. ४४०८, "इंग्रजांच्या पलटणापैकीं दस्तारबंद व छोलदार व तुरुपस्वार वगैरे यांच्या तपशिलाची याद पाठविली

आहे."). ७. तुरूप (Troop) हा शब्द इतरत्र पण (ऐ. ले. सं. ३९१२–"टिपूबरोबर ५०० तुरुपस्वार व बार ५००० व तोफा १० येणेंप्रमाणें सामान आहे ") येतो. ८. ढोणा व ढोणे हे शब्द इंग्रजी (Don) वरून येतात [ऐ. ले. सं. ८१५–" मागती ढोणा (दंगा) करावा हाच त्यांचा मनसबा," " मोंगलांचे मनांत राज्यांत डोहणा करावा असा आहे "–पे. द.२०·१२८. " मागें मार्गशीर्षमासीं नवा कपितान पाठविला. त्याजबरोबर पांचसे ढोणे आहेत." पे.द. ३४. पृ. ५२]. हा शब्द दोणे असाहि आढळतो. ९. धोत्री हा डॉक्टर शब्दाचा अपभ्रंश शस्त्रवैद्य या अर्थी येतो. ("रात्रीं एकाणें सांगितलें कीं. दुलेखान यास गोळी लागली.तेव्हां धोत्रीकडे घेऊन चालले. तेव्हां वाटेंतच काळ झाला."पे.द, ४१, पत्र क्रमांक २१०.). १०. ' नाट ' हा शब्द इंग्रजी Knot वरून आला असला पाहिजे. त्याचा अर्थ ' आंत, समुद्रांत दूर ' असा आहे (पे.द. १६, पृ. ७४ –" मानाजी आंग्रे यांचीं गलबतें माहीमाचे नस्तावर येऊन नाट गेली"). परंतु हें मत निश्चित मानावें किंवा कसें याविषयीं शंका येते. १०. ' पाकट ', ' पाक्ट ' याचा अर्थ पाकीट Packet असा दिसतो. ('नागपूरकर भोंसले यांचीं पत्रें,' खंड २, पृ. ४– " प्रस्तुत इलायतेचा पाक्ट आला त्यात नवाब इमाजुद्दवला यास खातरजमेस्तव चकती आली. विलायतेच्या पाकटची रवानगी आहे...उदईक पाकट रवाना होईल "). ११. ' पास '–पसंत या अर्थी इंग्रजी Pass आहे. (" सरकारचे सिकामानी सरदार वगैरे कोणास आसरा देऊं नये. पास करणार नाहीं—महादजी शिंदे यांची कागदपत्रें, पृ. ३५५). १२. पिंजनेरी (पेन्शनरी–पेन्शनरची व्यवस्था) हा शब्द अव्वल इंग्रजींत येतो. " तुमचा बंदोबस्त पिंजनेरींत करून देऊं–" पे.द. ४१, पत्र क्रमांक २५०). १३. 'पिस्ताल–पिस्थाल, (Pistol) असा शब्द य. न. केळकर ऐसिहासिक शब्दकोशांत नोंदतात. १४. पेनसेन पेटिया (Petty pension) लहान पेन्शन या अर्थी पुष्कळ पुढें येतो. (" साहेबांनीं फक्त तीन हजार पेनसेन पेटिया करून दिल्हे. त्यांत गुजारा होत नाहीं–" पे. द. ४४, पृ. ६२). १५. 'फर्मा' म्हणजे (Form) माप, सांचा ("गर्नाळेचे गोळे त्या गर्नाळेचे फर्म्यास येणार नाहींत–" ऐ. ले. सं. ३५०९). " दुबारी गोळे वोतावयाचा पंचरसी फर्मा वगैरे सरंजाम रवाना करणें–" राजवाडे, खंड १२, पृ. १४१. पे. द. २६, पृ. १४१). १६. ' फोडती ' (Fort) (" बारदेशांतील स्थलें मातबरसीं नाहींत. फोडती दाहा आकरा आहेत त्या घेतल्या–" पे. द. १६, पृ. ११५). १७. ' फ्लतिया ' (Flotilla) जहाजांचा संघ–" जाहाजाची खबर आली आहे. दाहा फ्लतीयांत तीन जहाजें आपलीं येतात–" पे. द. २८, पृ. १२३). १८. बकमार, बांक व बोकमार हे शब्द Buckshot चे वाचक आहेत. (" एक पिस्तुल, एक बांक, तीन सुऱ्या, दोन कुराड व दोन खुरपीं–" ऐ. ले. सं. ४१६३; " ' बोकमार ' आम्हांस इंग्रजांच्या वकिलाच्या घरीं मिळाल्या–" ऐ. ले. सं. ४३३०). १९. ' बातेऱ्या ' (Battery) (" शत्रूनें आमचा शह नजीक आल्यामुळें धारवाड सोडून हुबळीवर

वातेऱ्या खणून राहिला आहे–" ऐ. ले. सं. २८६०). २०. 'बोडद–बोरज' Board जहाजाची बाजू ("शोभे वरी बोरदा सरिखा अचंबर दान); भरभरून. भांडी मारि दोहि बोरजा"–ऐ पोवाडे, खंड २, पृ. २१०, केळकर) २१. 'मनोवार–मनेवार' = बंडखोर ("आपण हरामखोर मनेवार चंजाउरकरास गोशमाल देऊनी सोडवुनु घेउनु–" इतिहासमंजिरी, आपटे, पृ. ६६) याचा Man of war या शब्दांशीं संबंध आहे. २२. 'रजमण' Regiment होय. य. न. केळकरांनीं ऐतिहासिक शब्दकोशांत त्यास संदर्भ दिला आहे तो स्पष्ट समजत नाहीं. २३. 'रपेट' Report ("अगोदरच हा बेत करून ठेवला होता. तो बदलीहि आली. त्यास रपेट दिली"–पे. द. ४१, पत्र क्रमांक २३८). २४. 'रेवणी' Ravelin, किल्ल्याच्या बाहेरील जागा ("पठाण किल्ल्याचे रेवणीवर सतरंज्या हातरून वर बसून तिरंदाजी करीत"—हरिवंशाची बखर, पृ. ९; ऐ. ले. सं. ६०९ 'सभोंता खंदक मग रेवणी'–अनंदफंदी, लावण्या ४९) मुंबईंत 'रावळी' आहे. २५. 'लेण' इंग्रजी line चा अपभ्रंश आहे ("इंग्रजांच्या लेणींमध्यें १–२ गोळे वसले–" ऐ. ले. सं. ४३६४;). २६. 'गभर' म्हणजे (Gabardine) (२७८।≠ गभर गज ४५।।।४ एकूण—पेशवेदप्तर सनंदापत्रांतील माहिती, इतिहाससंग्रह, पृ. १४३). २७. 'गर्भछाट' म्हणजे (Grabshot). "भांडि पेटविता सांडि गर्भ–छाटाचे गोळे"—ऐ. पोवाडे, केळकर, खं. २, पृ. २३८). ३८. 'गलप' म्हणजे (Gallop). ("दर मजल सावनुरास जाऊन फुरद्यावर छप्पा घालून गलप ठोकला–मराठी दप्तर, रुमाल २, पृ. ५). २९. 'बोट' Boat (ऐ. ले. सं. ४१९८). ३०. 'कुंपीण' (Company) (ऐ. ले. सं. ६६२०). ३१. 'कौसल,' 'कोशल' (Council) ["बक्षी इतके दिवसांत बायांपाशीं दाखल जाले असतील, ते येऊन कौसल काय झालें?"—ऐ. ले. सं. ५९४६, ७८८१; "तेव्हां अलीबहादर यांनीं मुत्सद्यांस बलावून कौसल केलें"–होळकर कैफियत, पृ. ९९. हा शब्द रामसुतात्मजाच्या द्रौपदीवस्त्रहरणांत (१९२) येतो. "म्हणे काय कौसाल केलें सतीनें." "तुकयाबंधू स्वामि कानड्या कौसाल्यारे"–तु. गा. १४०]. ३२. "पटालंबर" (Battalion) (राजवाडे १०·३५१). ३३. आलमारी (Almirah) हा शब्द परशुरामाच्या लावण्यांत 'विषयसुखाच्या आलमाऱ्या माझ्या तीवर तपे रुद्रा'–९३) येतो. ३४. 'फैर (Fire) बंदुकांचा मारा या अर्थी ऐतिहासिक पोवाडे (१२०) येथें 'बाण बंदुकीचे फैर झडती तोफेचे गोळे पडे जसे गार', आलेला आहे. ३५. 'ग्याट' (Gate) (?) हा शब्द ऐतिहासिक पोवाड्यांत 'गेला कोळ्याचे ग्याटाला (४६) येथें येतो. ३६. जज्य (Judge) हा शब्द परशुरामाच्या लावण्यांत (८३) 'चुकेना लग्नाचा जोडा पाई खोडा जज्य बोले,' आढळतो. ३७. 'पल्टन–ण' हा शब्द दिल्ली येथील मराठ्यांचीं राजकारणें (१·४०) येथें नोंदलेला आढळतो.

३८. 'बालंट' शब्द बराच जुना असून तो 'वारंट'चा अपभ्रंश आहे. आनंदतनयाच्या म्हणून प्रसिद्धिलेल्या काव्यांत 'कसें घेतलें हेंचि बालंट मोठें' (३०) येथें दिसत आहे; तसाच तो दासविश्रामधामांत 'मतिमंद व्यापारी पोर मी चालंट,' येथें आहे. ३९. 'रेजिमे' म्हणजे कागदाचीं रिमें (Ream) (कागदाचीं रेजिमें आणावयास काल महालिंगपुरास पाठविला आहे.' ऐ. ले. सं. ८२९८).

हे सर्व शब्द ऐतिहासिक कागदपत्रांतील आहेत. पुढें मराठींत आढळणारे शब्द कांहीं ग्रंथनिविष्ट दिसतात, तर कांहीं दिसत नाहींत. यंत्र किंवा यंत्राचे भाग, कापडचोपड, सैन्य यांतील कांहीं शब्द तद्विषयक पुस्तकांतून आढळतात.

मराठींत म्युनिसिपालिटी या जोशांच्या नाटकांत अशा अपभ्रष्ट शब्दाची एक खाणच आढळेल; त्यांतील सर्व उच्चार हे प्रचारांतले नसून कांहीं बुद्ध्याच तसे केलेले आहेत. उदाहरणार्थ 'व्होट' चा 'ओठ' असा उच्चार. त्यामुळें त्या नाटकांतील उल्लेखांचा आधार तसा घेऊन दाखविलेला नाहीं.

इतर दुसरे शब्द कांहीं अशिक्षितांच्या इंग्रजीच्या अपभ्रंशांतील आहेत. उदा. 'शिलीपाट' (Sleeper), 'किंनर' (Cleaner) इत्यादि. साधार विवेचन करण्यास लागणारे आवश्यक तितकें स्थळ या लेखांत उपलब्ध होत नसल्यानें निरुपायानें पुढील शब्दाचें विवेचन केवळ संग्रहात्मक आहे. Searjeantson यांच्या इंग्रजी ग्रंथांत इंग्रजींतील परदेशी शब्दांचें ज्या तऱ्हेनें विवेचन केलेलें आहे तसा प्रयत्न ऐतिहासिक दृष्ट्या करणें उत्तम ठरेल. त्यांना इंग्रजी शब्दकोशांतील लेखननिविष्ट अपभ्रंशांचा आणि ऋणांचा शतकानुसार विचार करतां आलेला आहे. तशा तऱ्हेचें विवेचन पुन्हां केव्हांतरी देतां येईल.

आतां अकारवर्गानें आज दिसणाऱ्या अपभ्रंशाची चर्चा करतों :— १. अकाउंट (Account) 'हिशेब; २. अडली-अडदली (Orderly) म्हणजे नोकर; ३. अजिटन-अजिटंट म्हणजे (Adjutant) सैन्यांतील एक अधिकारी; ४. अडमिशन (Admission) प्रवेश; ५. अडव्हान्स (Advance) अगाऊ दिलेला विसार किंवा पैसे; ६. अलौन्स (Allowance) म्हणजे वेतनाच्यापेक्षां अधिक असा दिलला नियमित असा पैसा; ७. अडर (Order) अज्ञा, हुकूम; ८. असिस्टंट —अशिष्टंट (Assistant) साहाय्यक (शिक्षक इ.); ९. अटेंडन्स (उपस्थिति) (Attendance); १०. आसिट-ड (Acid) आम्ल; ११. आक्ट-आक्त (Act) कायदा, विधि; १२. आडमिरल (Admiral) नौकादलांतील श्रेष्ठ अधिकारी; १३. आलबेल (All well) सर्व ठीक; १४. आंग्ल (Anglo-) इंग्लंडचा; १५. आर्टिकल (Article) वर्तमानपत्रांतील अग्रलेख; १६. आरामखुर्ची, (Arm-chair) हाताची खुर्ची; १७. आराम पोलीस (Armed police) हत्यारी

शिपाई; १८. आरारूट; १९. आगस्ट. (August) इंग्रजी वर्षाचा आठवा महिना; २०. इलेक्शन (Election) निवडणूक; २१. इंजन (Engine) गाडी चालवणारें यंत्र, चालक; २२. इंज-जि-निय-अ-र (Engineer) स्थापत्यविशारद, यंत्रविशारद इ. (पर्याय-इंजनेर, इंजिनेर); २३. इनाक्युलेशन (Inoculation) लसिकाभरण; २४. इष्टेट (Estate) पैतृक संपत्ति, घर, भूमि, इ. अर्थी; २५. इस्पितळ (Hospital) रुग्णगृह, आतुरालय; २६. इस्त्राव (Strap) पट्टा; २७. इंच (Inch) फुटाचा बारावा भाग; २८. इन्फंटी (Infant class) बालवर्ग; २९. इनसपेक्टर (Inspector) तपासनीस; ३०. इनशुअरन्स (Insurance) विमा उतरणें; ३१. इंटर (Intermediate) मधला वर्ग (आगगाडीचा, विद्यापीठांतील); ३२. इष्टाकण्या (Stockings) पायमोजे; ३३ इस्पिट-क (Spade) पत्ते, पत्त्यांतील 'इस्पिक 'वर्ग; ३४. इष्टापुरी (Strawberry) तृणवदरीफळ; ३५. एकर (Acre) भूमिमापनाचें एक परिमाण, ४३५६० चौरस फूट; ३६. एजंट (Agent) हस्तक, (Agency) एजंटी (पण हें एजंट करून साधलेलें व्यवसायवाचक नामहि समजावें); ३७. एरिंग (Ear-ring) इयरिंग, कर्णभूषण, कुंडल; ३८. एसप्रेस (Express) वेगानें धावणारी आगगाडी, वा त्वरित पोचणारें पत्र इ; ३९. एसफ्येस (Yes द्विरुक्त) इंग्रजी भाषादर्शक शब्द; ४०. एप्रिल (April) इंग्रजी चवथा महिना इतके शब्द स्वरादि दिसतात.आतां व्यंजनादि शब्दांकडे ककारवर्गवारीनें पाहूं या. ४१. क्याट (Card) पत्त्यांचा डाव; ४२. कारट (Card) (पोष्टकार्ड); ४३. क्यारट (Carat) सोन्याचा क्रमांक; ४४. क्याशर (Cashier) रोकड देणारा; ४५. क्यारम (Carrom) चपट्या सोंगट्यांचा खेळ; ४६. क्याटलाग (Catalogue) नामपट, नामसूचि; ४७. काळीज (College) विद्यालय (मुख्यतः खेडेगांवी अपभ्रंश); ४८. कलेक्टर, कलक्टर (Collector) जिल्ह्याचा अधिकारी; ४९. कालर (Collar) ग्रीवाबंध; ग्रैवेय; ५०. कालरा (Cholera) महामारीचा रोग; ५१. काक (Cock) नळाची तोटी; ५२. कांपी (Coffee) कापेय पेय; ५३. कोचिनील (Cochineal) याच नांवाचा रंगाचा किडा; ५४. कोचवान (Coachman) गाडीवान, इंग्रजी तऱ्हेची गाडी हांकणारा; ५५. कोच (Couch) सुखासन; ५६. कलप-ब (Club) (कळप, हीनार्थक) क्रीडामंडळ; ५७. कलाक (Clock) वेलादर्शक यंत्र मूलतः, पण किती वाजले हें सांगणारा तासाचा आंकडा; ५८. क्लार्क (Clerk) लेखक, अधिलेखक; ५९. कपितान (Captain) जहाजाचा, खेळांतील, सैन्यांतील अधिकारी (कप्तान; क्यापटन); ६०. कबूस (Cabin-house) कुटीरगृह; ६१. केबिण-न (Cabin) कुटी; ६२. केक (Cake) इंग्रेजी तऱ्हेचा एक गोड अपूप; ६३. कालिपास (Callipers) गोल वस्तु व्यासमापक कंपास; ६४. क्यालेंडर (Calendar) दिनदर्शक पंचांग, किंवा कपड्यांत भरली जाणारी

पांढरी माती, (यानें कपडा साफ दिसतो व पौंडीं त्याचें वजन वाढतें); ६५. कल्किा (Calico) छिट, चीट, कालिको; ६६. क्यामेरा (Camera) छायाचित्रयंत्र, प्रकाशलेखनपेटिका; ६७. केम, क्याम (Cam) मार्गेपुढें किंवा इतर दिशांत इच्छित गति साध्य करणारें भ्रमणयंत्र, दुमणें; ६८. कंपू (Camp) शिबिर (याचे कांप, कँप व क्यांप असेहि अपभ्रंश आहेत; ६९. कोवी (Couve) कोवीगड्डा; ७०. क्यानव्हास-वास-वस (Canvas) किंतानाचें कापड, प्रचार; ७१. केप (Cap) बंदुकींत वर लावलेली टोपी, शेंबी; ७२. कप (Cuff) मुहळी. मनगटपट्टी; ७३. क्याप (Cap) टोपी, शिरोवस्त्र; ७४. कट (Cut) मिशांची कापून राखलेली ठेवण; ७५. कटाप (Cut off) पत्र्यांतील डावांत हातांतून काढून टाकलेला किंवा मुळांत नसलेला एखादा, सबंध पत्र्यांचा, चारापैकीं एक रंग; ७६. कंपार्ट (Compartment) आगगाडीच्या डब्याचा एक विभाग; ७७. कांग्रेस (Congress) राजकीय वा इतर समानव्यवसायी संघ; ७८. कंपौंडर, कंपाउंडर (Compounder) औषधें मिसळणारा आंग्लरीतीच्या वैद्याचा मिश्रक; ७९. कंत्राट (Contract) एकाद्या कामाचा मक्ता देणें, करार करणें यावरून; ८०. ८१. कंत्राटदार (Contractor) मक्त्यानें काम करणारा, खंडभरी, ठेकेदार; ८२. कोरट,–र्ट, कोडत (Court) न्यायमंदिर, न्यायाधीश; ८३. कौपीन (Coupon) धान्य इत्यादि पदार्थ नियमित दरानें सरकारी दुकानांतून मिळवून देणारें शिधापत्रक; ८४. कारनीस (Cornice) गळथा, कंगोरा, कंगणी; ८५. कारबेल (Corbel) अश्वमुख, भिंतींत बसविलेले लांकडी, दगडी घोडे; ८६. क्राप (Crop) केसांची कापून केलेली रचना; ८७. क्रूझर (Cruizer) लढाऊ जहाज; ८८. कल्चर (Cultured) (Pearl) कृत्रिम, संटर्धित मौक्तिक, वाढविलेलें मोतीं; ८९.क्रूड (Crude oil) पेट्रोल सिद्ध होण्यापूर्वीचा एक जळणतेलाचा प्रकार, अशोधित तैल; ९०. क्रेप (Crepe) बारीक कपडा. ९१. क्राऊन (Crown) छापण्याचा कागद; ९२. कप (Cup चहा, कापेय पिण्याचें चिनी मातीचें भांडें; प्याला; ९३. कोल्न (वाटर) (Cologne) (Water), वासवसलिल. ९४. कोरणेल (Colonel) कर्नल या प्रतीचा एक सैन्यांतील अधिकारी; ९५. कमान (Command) सैन्याधिकार; ९६. कमानीन (Commander) सेनाधिकारी; ९७. काल्म (Column) वर्तमानपत्रांतील एक रकाना, खानास्तंभ; ९८. कलास, क्लास (Class) वर्ग; ९९. किन्नर, किल्नर (Cleaner) मोटारीचें वाहन पुसून स्वच्छ करणारा, मार्जक, शोधक; १००. क्रूम (Chrome) रंगीत चामडें; १०१. कोट (Coat) इंग्रजी तऱ्हेचा अंगरखा; १०२. कोपरबरास; (?) १०३. कमिशनर (Commissioner) विभागाधिकारी; १०४. कंपावन, कंपौंड, कम्पाउंड (Compound) कुंपण; १०५. कंपनी, कुंपनी, कुंपणी (Company)

इंग्रजांनीं स्थापिलेलें व्यापाऱ्यांचें मंडळ, यांनीं पुढें हिंदुस्थानचें राज्य घेतलें; १०६. कंपाझिटर (Compositor) मुद्रणाक्षरें जुळवणारा, जुळारी; १०७. कष्टम (Custom) इंग्रजी अंमलांत सुरू झालेलें जकातखातें; १०८. किटली (Kettle) चहाधानी; १०९. केरोसीन-पेट्रोलच्या मूलद्रव्यापासून निघणारें दिव्यांत जळणारें तेल; ११०. कांगारू (Kangaroo) या नांवाचें एक ऑस्ट्रेलियाखंडांतील जनावर; १११. क्वारंटी (Quarantine) संगरोध, संसर्गनिषेध व्यवस्था; ११२. क्विनीन, क्विनाईन, कोयनेल (Quinine) सिंकोनापासून काढण्यांत येणारें हिंवतापावरील एक औषध, ११३. ख्रिस्त, ख्रिस्ती, ख्रिश्चन (Christ, Christian) ख्रिस्त हा धर्मसंस्थापक, ख्रिस्तधर्मानुयायी; ११४. गरनाळ (Grenade) प्राणनाशक गोळा; ११५. ग्यालन (Gallon) द्रवमापनांतील एक परिमाण; ११५ अ. गिरमीट (Gimlet) छिद्रक; ११६. ग्यालरी (Gallery) सज्जा, नाट्यगृहांतील प्रेक्षागाराचा पहिल्या माळ्यावरील एक विभाग; ११७. ग्याली (Galley) मुद्रणव्यवसायांत मुद्रित केलेला व मुद्रणशुद्धीसाठीं पाठविलेला पुऱ्या सांच्याइतका एक कागद; ११८. ग्यारिसन (Garrison) फौजबंद ठाण्याची शिबंदी; ११९. ग्लोब (Globe) विद्युद्दीपाचा काचगोलक, किंवा पृथ्वीचा नकाशा असलेला मातीचा, पत्र्याचा वाटोळा गोळा; १२०. गेट-ग्याट (Gate) किल्ल्याचें द्वार; १२१. गलान (Gland) (प्याकिन व गलान) ब्रिनब्रुडाचें पंचपात्रीचें झांकण; १२२. ग्याझिट (Gazete) (सरकारी) वृत्तपत्र; १२३. गिलीट Guild (Guilt) मुलामा; १२४. गरडर (Girder) लोहतुला, तुळई; १२५. गार्टर (Garter) पायमोजाबंधनपट्टिका; १२६. गिलास, गलास, गल्लास (Glass) कांचेचा प्याला; १२७. गवंडर-डूर (Governor) पूर्वीच्या इलाख्यांच्या इंग्रजी अंमलांतील किंवा आधुनिक राज्यविभागांचा अधिकारी; १२८. गरानट (Grant) 'ग्रांट' रोडचें अपभ्रष्ट रूप; १२९. ग्यारंटी (Guarantee) सुरक्षाविस्तार, प्रतिभाव्यनिस्तार, हमी; १३०. गारदी (Guard) रक्षक सैनिक; १३१. गाडद, गारड, गार्ड (Guard) आगगाडीचा, जंगलाचा रक्षक अधिकारी; १३२. गटर, गटार (Gutter) पाण्याची बंद किंवा उघडी नाली; १३३. घांदयाल, घासलेट, घासतेल (Gas oil). राकेल (Rockoil; Earth oil, खालीं Hobson-Jobson पाहा); १३४. घमसाण (Gumption) व्यावहारिक बुद्धि. येथें अर्थभ्रंश पण आहे; १३५. चेन (Chain) गळ्यांतील सांखळीचा दागिना; आगगाडींतील, किंवा संडासांतील टांकीची सांखळी; १३६. चाक (Chalk) खडू; १३७. चान्स (Chance) संधि (अन्यांच्या एका चित्रपटांत हा शब्द कृष्णाच्या तोंडीं घातल्यासंबंधांत उठलेल्या वादळाचें येथें स्मरण होईल); १३८. चेक (Check) चौकटीचें कापड; १३८. चेक (Cheque) हुंडी (इंग्रेजी बँकेतील); धनलेखनपत्र, साक्षाद्धनलेख; १३९. चार्ज (Charge)

आरोप; अधिकार; हंशील; १४०. चिमणी (Chimney) धुरांडें; धूर वर नेणारी दिव्याची काच; १४१. चाकोलेट (Chocolate) क्याकाव फळाची पूड, धुपेली रंगाचा; १४२. चर्च (Church) खिस्ती प्रार्थनामंदिर; १४३. जन्रल (General) (सर्वसाधारणपणें) साधारणः सेनाविभागाधिकारी; १४४. जर्नल, जर्नेल (Journal) पेटींत फिरणारा यंत्राचा भाग; १४४. जर्मन (Geranium); १४५. जंटल्मन (Gentleman) सभ्य गृहस्थ; १४६. ज्याकिट, जाकीट (के) (Jacket) कोटाच्या आंतील लांडा अंगरखा, कुडती, कबजा; १४७ जाम (Jam) पक्कें, घट्ट, गच; १४८. जाली (क्लब) (Jolly) आनंदी (संघ), एक विशेषनाम; १४९. जुबिली (Jubilee) (ज्युबिलीसुद्धां) महोत्सव; १५०. जंक्शन (Junction) लोहमार्गाचे फांटा फुटण्याचें ठिकाण; १५१. जून-ज्यून (June) इंग्रजी सहावा महिना; १५२. जूरी-ज्यूरी- (Jury) न्यायालयांतील पंच; १५३. टेबल (Table) लेखनाधारफलक; १५४. टेलर (Tailor) शिंपी; १५५. टमटम (Tumtum); १५६. टांकी-के (Tank) तळें, पुष्करिणी (हा शब्द खरोखरीच इंग्रजींतून आला कीं काय हें ठरविणें कठीण आहे); १५५. टीथआरी (?); १५८. टेलीग्राम, टेलीफोन (फों) (Telegram, Telephone) दूरध्वनिलेख, दूरध्वनिश्रावक; १५९. टेनीस (Tennis) चेंडूचा एक खेळ; १६०. टिकस (तिकीट) (Ticket) प्रवासाचें किंवा इतर ठिकाणीं प्रवेश देणारें मूल्यपत्र; १६१. टाईम (Time) वेळ, काळ, अवधि; १६२. टिनपाट (Tinpot) कुचकामाचा, क्षुद्रमुखाचा; १६३. टमाटू-टा, टोमा- म्या-टो (Tomato) या नांवाचें एक आंबट वा गोड रसपूर्ण फळ; १६३अ. टुवाल, टावेल (Towel); १६४. ट्राम (Tram), टमरेल-ळ (Tram-rail) ट्रामगाडी १६५. टमरेल (Tumbler) (टंबलर, टमलर, टंबरेल) प्याला; १६६. टब (Tub) लांकडाचें पिंप, टीप; १६७. टरपेन, टरपेंट, टरपेंटाईल, टरपेंटाइन, टरपेण; (Turpentine) सरलतैल, कर्पूरतैल, तारपीन; १६८. टाईप (Type) मुद्रणाक्षर; १६९. टायर (Tyre) मोटारीची रबरी धाव; १७०. टेशन, टेसन (Station) आगगाडी थांबण्याचा अड्डा; १७१. डामर-डांबर (Dammar) डांबर; १७२. डि-डीसेंबर (December) इंग्रजी बारावा महिना; १७३. डिक्री-डिगरी (Decree) न्यायालयानें दिलेला हुकुमनामा वा आज्ञापत्र; १७४. डेपो, डीपो (Depot) भांडार, जंगलखात्याची गांवांतील कचेरी; १७५. डेरी, डेअरी (Dairy) दुग्धगृह; १७६. डेंगू (Dengue) या नांवाचा एक दोषिक ताप; १७७. डेपुटी-प्युटि, दिपोटी (Deputy) (Educational inspector) शिक्षणाधिकारी, शिक्षणावेक्षक; १७८. डेमरें, डमरा, डेमरें (Demurrage) विलंबनदेय; १७९. डिटेक्टिव्ह-व (Detective) अपराधशोधक; १८०. डेक्स

(Desk) लेखनाधारपेटी; १८१. डांब्रीस, डॅंब्रीस (Damned beast) (एक शिवी); १८१. डिंगी–डंगी (Dinghy) एक प्रकारची लहान नाव; १८२. डायरी (Diary) कोरी वा लेखनात्मक दैनंदिनी; १८३. डायपंच (Die punch) सांच्याचा खिळा; १८४. डिक्षनरी–डिक्शनरी (Dictionary) शब्दकोश; १८५. डायरेक्टर, दायरेक्तर (Director) नियंत्रक, मार्गोपदेशक; १८६. डिसपीस (Dis; patch) (?), (Displace) दंतनिःसारक, छेदक; १८७. डिसमीस (Dismiss) पदभ्रंश, पदभ्रष्ट करणें; १८८. डाक्तर, डागदर, डाक्टर (Doctor) इंग्रजी शारीरक शिकलेला वैद्य; १८९. डंकीण (Donkey Pump) जलाकर्षक बाष्पयंत्र; १९०. डज्जन, डझन, (दर्जन) (Dozen) बारा; १९१. डौर, डवूर (Drawers) इजार, पायजमा, चोळणा; १९२. डरेस (Dress) कपडे; १९३. ड्रील (Drill) कवायत, भोंक पाडण्याचें हत्यार; १९४. ड्रायव्हर-वर (Driver) चालक, गतिचक्र; १९५. डंबेल(–स) (Dumbells) हस्तव्यायामाचे लोखंडी दंड; १९६. ताडपत्री (Tarpaulin) जलरोधक वस्त्र; १९७. तिकीट (Ticket) प्रवेशाकरितां मूल्यपत्र; १९८. तांबेद्दू (Tomato) (वर १६३ पहा); १९९. तबेला (Stable) घोडशाळा, मोटर वा टांगा ठेवण्याची खोली; २००. थर्मामीटर (Thermometer) ज्वरमापक; २०१. थर्मास (Thermos) ऊष्मधानी; २०२. थिये–ए–टर, थेटर, (Theatre) नाट्यगृह; २०३. थड (कलास), थड्ड (Third class) तिसरा वर्ग, गदळ, रद्दी; २०४. नेटिव–व्ह (Native) देशांतील, मूळचें; २०५. नाटपेट–ड (Not–paid) पैसे न भरलेलें, मूल्य न लावलेलें; २०६. नोट (Note) पैशांत मूल्य देणारा कागद; २०७. नोटीस (Notice) पूर्वसूचना; २०८. नावल (Novel) कादंबरी; २०९. नंबर–री (Number) अंक, क्रमांक (शं. गो. तुळपुळे यांनीं संपादित केलेल्या तंजावर येथील रामकवीच्या भाषाप्रकाशांत 'बावण्णवंणी' असा शब्द हवा. तेथें नंबर या शब्दाचा संबंध नाहीं, वर्ण म्हणजे रंग, पिवळा रंग, सोनें; कानडीमध्यें वा तेलुगूमध्यें 'बण्ण' हा 'वर्ण'चा अपभ्रंश होतो, व त्या अनुरोधानें या तंजावरी कवीनें 'बण' हा शब्द वापरलेला आहे. तेथें 'नंबर' शब्दाचा संभव दिसत नाहीं); २१०. नर्स (Nurse) (नरसो–पंत असा गमतीदार वाक्यप्रयोग कधीं कधीं करितात) परिचारिका, रुग्णपरिचारिक–का (Male Nurses असतात); २११. नट (Nut) (नट बोल्ट यांपैकीं) खिळा, चाकी,फिरकीचा खिळा; २१२ पेक, पॅक, प्याक (Pack) गठ्ठा बांधणें, वस्ते बांधणें; २१३. प्याकीन(Packing) तैलशोषक; २१४. पँट, प्यांट: पाटलोण, पाटलूण (Pantaloon) (Pant) अर्धी विजार, वा सबंध विजार; २१५. पपा, पापा (Papa) वडील; पोपचें संबोधन; २१६. पेपर (Paper) कागद, वर्तमानपत्र; २१७. परड (परवड) (Parade) कवायत; २१८. पान्हा, पान, पाना (Spanner) कीलकर्षक, स्क्रू घट्ट पिळण्याची गावी

२१९. पार्सेल (Parcel) बंगी, पुट्टल; २२०. पार्ल्यमेंट (Parliament) इंग्लंडची याच नांवाची विधानसभा; २२१. प्यारा (Para) व २२२. प्यारा-रीग्राफ (Paragraph) परिच्छेद, छेदक; २२३. पार्ट (Part) नाटकांतील भूमिका; २२४. पार्टी (Party) अशी नाटकांतील भूमिका करणारा असामी; २२५. पास (व ना-पास) (Pass) परीक्षेंत उत्तीर्ण; २२६. प्यासिंजर, पासिंजर, पांसदार, पासंदर (Passenger) लोहमार्गाचा किंवा मोटर, टांगा इ. नें प्रवास करणारा; २२७. पिअर (Pier) धक्का. (Pear) एक फळ (खरें म्हणजे पेअर); २२८. पेन (Pen) लेखणी, लोहाग्रयुक्त लेखणी; २२९. पेन्सिल, पेन्सल, पेणसल (Pencil); दगडी किंवा शिशाची लेखणी; २३०. पेनसल-न-शन, पेणसल (Pension) निवृत्तिवेतन; २३१. पिपरमीठ, पेपरमिंट (Peppermint); २३२. पियानो (Piano) इंग्रजी मोठें बाजाच्या पेटीसारखें वाद्य; २३३. पिकाव (Pickaxe); २३४. पिकंदर–कांदर–कांदोर, (Pickaxe); २३५. पीन (Pin) टांचणी; २६६. पिंट, पाइंट (Pint) द्रव मोजण्याचें एक माप, २३७. पिकर–स (?); २३८. पिकेटिंग (Picketing) निरोधन; २३९. पिलहाऊस (Play house) मुंबईतील एक नाटकगृह; २४०. पिष्टिन (Piston) दांडा, प्रेषक; २४१. पीट (Pit) नाटकगृहांतील जमिनीवर प्रेक्षक बसत तो विभाग; भूतल; २४२. पीच (Pitch) क्रिकेटच्या खेळांतील क्रीडांगण; २४३. पिलेग–प्लेग (Plague) ग्रांथिक संनिपात; २४४. प्लांचेट (Planchette) परलोकविद्येच्या प्रयोगांत वापरण्यांत येणारें एक हस्तयंत्र, परलोकसंदेशक; २४५. पलि–ली–स्तर, प्लास्तर (Plaster) लेप, शुभ्र गिलावा; २४६. प्लास्टिक (Plastic) नम्य; २४७. पलेट–प्लेट (Plate) उथळ थाळी, २४८. पोलें (Pole) चुंबक ध्रुव; २४९. पालिसी–शी (Policy) विमारोखा; व्यवहारनीति; २५०. प्लाट (Plot) भूमीचा तुकडा, कट; २५१. पालीस, –स्-स् (Polish) जोड्यांवर तकाकी आणणारा तैलकल्क, दीप्तिकल्क; २५२. पापलेट–पांपलेट–पापलीट (Pomphret) सरगामत्स्य, मासा; २५३. पोष्ट (–मास्तर,–कारट,–कार्ड) (Post) डांक, पत्रें, बंग्या इत्यादींची नेआण व बटवडा करणारी वैध संस्था; २५४. पाकीट (Pocket) पोष्टांतील बंद पत्र; २५५. पाकीट (Pocket) खिसा; २५६. पौन (Pound) कोंडवाडा; २५७. पउंड, पाउंड (Pound) २० शिलिंग किंमतीचें इंग्रजी नाणें, किंवा १२,१६ औंस वजन; २५८. पावडर (Powder) चूर्ण (फेसपावडर इ.); २५९. प्रायमर (Primer) विनयत्तेचें पुस्तक; २६०. प्रायमरी (Primary) विद्नीचा वर्ग; २६१. प्रायवे-व्हेट (Private) खासगी, व्यक्तिगत; २६१. पुरशीस (Process) (कायद्यांत) कोर्टांत हजर राहण्याचें निमंत्रण; २६२. परमेश्वरी (Promissory) (note) वचनविशिष्ट; २६३. पंप (Pump) द्रवोच्चालक, वायुकर्षक; २६४. पटी (Putty) लुकण;

२६५. फैटन–ण (Phaeton) घोड्यानें ओढलें जाणारें एक बंद वाहन; २६६. फिनाईल–फिनेल (Phenyle) दुर्गंधिनाशक फेनल, **फेनिल** तैल; २६७. फोटो–ड्ड (Photo–graph) छायाचित्र; २६८. फलाट, पलाटफारम (Platform) उंच कट्टा, आगगाड्या जेथें थांबतात तो दगडांनीं बांधलेला उंच बांध; २६९. **फेल** (Fail) अनुतीर्ण; २७०. फैल, फाईल (File) रांग, आडवी घरांची रांग; २७१. फार्स (Farce) प्रहसन; २७२. फ्याशन, फेसन (Fashion) कपडे इत्यादींची नवी ढब; २७३. फेन्सी, फॅन्सी, फ्यान्सी (Fancy) चित्रविचित्र, मौजेचे, नकशीचे; २७४. फर्न, पर्ण, पेरण (Fern) हंसराज–पाद, नेचा, (दर्शनीय) केस; २७५. फिडील—फिडल (Fiddle); २७६. फुलिसकेप (Foolscap) एक कागद ज्यामध्यें इंग्रजी 'फूल' ची (जलचिन्हित) आकृति केलेली असते, लांबी रुंदी; २७७. फोनो (Phono–graph); २७८. फस्ट (क्लास), फस् (क्लास) (First) (Class) पंहिल्या प्रतीचा, वर्गाचा, वर्ग; ३७९. फलाटिण, फलानेल, फलाणी–नी (Flannel); २८०. फौंड्री (Foundry) ओतकामशाळा, कुप्यशाळा; २८१. फूट (Foot) बारा इंचांचें लांबीचें इंग्रजी परिणाम; २८२. फूटबाल (Foot ball) पायचेंडू, तो खेळ; २८३. फरसबी (French Beans) वृक्षशेंग; २८४. फ्राक (Frock) मुलीचा वा स्त्रियांचा लांडा झगा; २८५. फंड (– गुंड) (Fund) वर्गणीनें पैसा जमविणें; २८६. फर्लांग (Furlong) लांबीचें २२० यार्डांचें इंग्रजी परिमाण; २८७. फर्लो (Furlough) (नोकरी सोडतांता वा दुसऱ्या अशा वेळीं घेतलेली) लांब रजा, सुट्टी, २८८. फ्याक्टरी–फॅक्टरी (Factory) उद्योगगृह; २८९. बबी, बाबी (Baby) लहान मुलीचें संबोधन; २९०. ब्याग (Bag) चामड्याची, कापडाची पेटी अथवा पिशवी; २९१. बालबोल (Ball) चेंडू; (म्हणून बालर–चेंडू फेंकणारा); २९२. बाम्बू, बंबू (Bamboo) बांस, कळक; २९३. ब्यांडेज (Bandage) जखमेवरील बांधावयाची लांब पट्टी; २९४. ब्यांड, (Band) बेंड (–बाजा), बेण (–बाजा) बाजा; २९५. ब्यांक (Bank) पेढी; २९६. बाप्तिस्मा (Baptism) खिस्ती धर्मांतील विधी; २९७. बार (Bar) लाट; २९८. बराक (Barrack) शिबिर; २९९. ब्यारिष्टर–स्टर, बालिष्टर (Barrister) पहिल्या वर्गाचा सनदी वकील; ३००. बशी (Basin) (कपबशींतील उथळ खालचें पात्र); ३०१. बेरा (बेअरर) (Bearer) निरोप्या, बरदार; ३०२. बीच (Beach) समुद्रकिनारा; ३०३. बायबल, बैबल (Bible) खिस्ती धर्मपुस्तक; ३०४. बायसिकल (Bicycle) दुचक्री, द्विचक्री; ३०५. बाबिण, बाबीन (Bobbin) पोकाळ कांडी; ३०६. बील (Bill) पत्रक, याद; ३०७. बिल्टी (बिलेट) (Billet) लष्करी शिपायास दिलेली जागा; ३०८. (बुक) बायंडर, बाइंडर (Binder) (पुस्तकें) बांधणारा

...ग्रंथ संग्रहालय, पुणे. स्वरूप...
क्रमांक ७५८६६ दि: दिनांक...
कार्ड क्र. 2129 दि: 22/3/52

३०९. बिस्कूट–स्कीट, भिस्कूट (Biscuit) भाजलेल्या कणकेच्या खायाच्या गोड चकत्या; ३१०. ब्लांकीट, कांब्लेट, कँब्लेट (Blanket) घोंगडी, लोंकरी पांघरूण; ३११. ब्लाऊज (Blouse) लांब सदऱ्यासारखें एक पुरुषांचें, किंवा आंखूड पोलक्यासारखें स्त्रियांचें, वस्त्र; ३१२. ब्लाक (Black) इमारतींतील राहण्याचा स्वयंपूर्ण स्वतंत्र विभाग; ३१३. बोर्डिंग (Boarding) वसतिगृह, खाणावळ; ३१४. बाडी, बॉडी (Bodice) चोळी, कांचोळी, कंचुकी; ३१५. बायलर, बाइलर (Boiler) जलतापक, जलतापनी; ३१६. बालिस्त, बालीस (Bolster) मांडगादी, लोड, तक्क्या; ३१७. बोलट (Bolt) खीळ, कील; ३१८. बांड (Bond) रोखा, दोरा, सूत; ३१९. बोनस (Bonus) पुरस्कार, वेतनाव्यतिरिक्त कामकऱ्यांना दिलेला फायद्याच्या विभागणीचा अंश; ३२०. बूक (Book) पुस्तक (यावरून बुकिश नाटकें); ३२१. बाटली, बोतल (B ttle) काचेचा शिसा, कुपी; ३२२. बाक्स (Box) पेटी; ३२३. बायकाट (Boycott) बहिष्कार; ३२४. ब्राकेट (Bracket) नागदंत, माकडी, कुण्डलीकर्ण; ३२५. ब्रेक (ब्रेक) (Brake) स्तंभक; ३२६. ब्रांच (Branch) विभाग; ३२७. ब्रांडी (Brandy) दारू; ३२८. बेष्ट (Best) उत्तम, सर्वोत्तम; ३२९. ब्रूस, बरास (Brush) कूर्च, कुंचा, कुंचला-ली; ३३०. बकीट (Bucket) डोल-ची; ३३१. बकल (Buckle) विजारसंधारक; ३३२. बगी, बग्गी (Buggy) घोड्याचें वाहन; ३३३. बिगूल (Bugle) तुतारी; ३३४. बिल्डिंग (Building) इमारत, वाडा; ३३५. बुलडाग (Bull Dog) मोठा कुत्रा; ३३६. बंडल, बिंदली, बिंडा (Bundle) धागा सूत इत्यादींचा गुंडाळा किंवा पुट्टल, थाप; ३३७ बंपर (Bumper) पाणी पिण्याचें उभेंटें भांडें; ३३८. बुटणेर, बुटलेर, **बटलर** (Butler) कोठवळा, वाकनीस; ३३९. बटण–न (Button) गुंडी; ३४०. मिष्टर–मिस्तर (Mister, Mr.) राजश्री; ३४१. मेम (Ma'am) बाईसाहेब; ३४२. माकारोनी (Maccaroni) शेव; गुलाबछडी; ३४३. माकरून (Macaroon) बदाम, साखर, खवा यांचा केक; ३४४. मिशीन, मशीन (Machine) यंत्र (शिवण्याचें इ.) ;३४५. म्याकिंटाश (Mackintosh) पावसाळी कोट; ३४६. मड-डु-मं (Madam) बाईसाहेब इंग्रजी स्त्रीकरितां संबोधन; ३४७. ममी-मम्मी (Mummy) आई; ३४८. म्याड (व म्याडक्याप) (Mad) (Madcap) वेडा; ३४९. माजिस्ट्रेट, म्याजिष्ट्रेट, माजिस्त्रेट (Magistrate) फौजदारी न्यायाधीश; ३५०. मेल (Mail) डाकगाडी; ३५१. मलेरिया (Malaria) हिंवताप; ३५२. म्यानेजर (Manager) व्यवस्थापक; ३५३. मनीब्याग (Money bag) पैशाची पिशवी; ३५४. मार्च (March) इंग्रजी वर्षाचा तिसरा महिना; ३५५. मार्क (Mark) गुण; ३५६. मार्कीट (Market) बाजार; ३५७. मास्तर (मेस्तरी-रानडे कोश इंग्रजी मराठी)

७५९५८

(Master) शिक्षक, प्रमुख; ३५८. माचिस (Matches) आगकाड्या; ३५९. मार्मालेड-मामलेट (Marmalade) नारिंगांचा मुरंबा; ३६०. मेजर-मेझर (Measure) माप, प्रमाण; ३६१. लेंबर (मेंबर) (Member) सभासद; ३६२. मीटर (Metre) या नांवाचें एक लांबीचें परिमाण; ३६३. मिडल (Middle) मध्यम, माध्यमिक; ३६४. मैल (Mile) ५२८० फुटांचें अंतरदर्शक प्रमाण; ३६५. मील (Mill) गिरणी; ३६६. मिनीट (Minute) तासाचा ६० वा भाग; ३६७. मिसस [मिसी–बाबा) (Miss) अविवाहित किंवा लहान मुलगी; ३६८. मिशन (Mission) खिस्ती धर्मप्रसारसंघ; ३६९. मिक्स्चर, मिक्श्चर (Mixture) मिश्रण; मिश्रित पदार्थ; ३७०. मोटार (Motor) चालक, मोटारगाडी; ३७१. म्यालेट (Mallet) हातोडा, घण, मोगरी; ३७२. मिनिष्टर (Minister) मंत्री; ३७३. यार्ड (Yard) इंग्रजी बारा फूट लांबीचें एक परिमाण; ३७३. युनीट (Unit) आधारप्रमाण; ३७४. युरोपियन युरपिन (European) यूरपचा रहिवाशी; ३७५. रेसीस (Races) शर्यती; ३७६. रूळ (Rail) आगगाडीच्या लोहमार्गाचा एक लोहवंश; ३७७. रूळ (Ruler) आंखणी; ३७८. रूळ (Roller) खडी दाबणारें यंत्र; ३७९. रेलवे (Railway) लोहमार्ग; ३८० रासबेरी, राझबेरी (Raspberry) या नांवाचें एक फळ; ३८१. रासन, राशन (Ration) शिधा; ३८२. रीम (Ream) (रेजमी पहा) [४८० कागदांचे एक परिमाण]; ३८३. रायमर (Reamer) भोंक मोठें करण्याचें हत्यार; ३८४. रिसीट, रसीट, रसीद (Receipt) पावती (रसीद हा उर्दू पण आहे); ३८५. रेडी (Ready) सिद्ध, सज्ज, तयार; ३८६. रंगरूट (Recruit) सैन्यांत भरती झालेला शिपाई; ३८७. रील (Reel) सुताचा गुंडा; ३८८. रजिष्टरी (Registery) नोंदडाक; (३८९. रजिष्टर); ३९०. रिपेर-री (Repair) दुरुस्ती; ३९१. रिप्लाय् (Reply) उत्तरार्थ; ३९२. रपोट, रपोर्ट, रिपोट (Report) निवेदन; ३९३. रिवीट, रवीट (Rivet) दोन्ही शेवटांनीं बोळवलेला खिळा; ३९४. रोंद, रावंद (Round) रक्षकाचा फेरा; ३९५. रब्बर, लब्बर (Rubber) उद्घर्षक; ३९६. रम (Rum) या नांवाची दारू; ३९७. रिकशा (Rickshaw) एक वाहन; ३९८. लेबल (Label) पत्रिका, नामपत्र; ३९९. लेस (Lace) गोट, फीत; ४००. लेन (Lane) गल्ली; ४०१. लालटेन (lantern) दिवा, हस्तदीप; ४०२. लेट (Late) उशीरां; ४०३. लेडीसहंवर Ladies hammer); ४०४. लेधर (Leather) चामडें; ४०५. लिमलेट (lemonade) लिंबमिश्रित पेय, शर्कराखंड; ४०६. लेटीस (Lettuce); ४०७. लैसन, लेसन (License) अनुज्ञा; ४०८. लैट, लाइट (Light) दीप, दीपप्रकाश; ४०९. लैन, लाईन, लईण-न (Line) ओळ; ४१०. लिष्ट (List)

यादी, नामावलि; ४११. लार्ट-ड (Lord) गव्हर्नरला किंवा व्हाईसरॉयला वापरण्याचा शब्द; ४१२. लार्ट (Lot) समुदाय, वस्तुसमुदाय; ४१३. लार्ट-टरी (Lottery) सोडत; ४१४. लाडीस (Lorry) मोटारचा किंवा वाहनाचा प्रकार; ४१५. लसूण (घास) (Lucerne Grass) या नांवाचें घोड्याकरितां लावलेलें हिरव्या छोट्या झाडांचें खाद्य; ४१६. लगेज (Luggage) सामान; ४१७. व्हार्निश-व्हा-वारनीस (Varnish) रोगण; ४१८. वेंडर, वैंडर (Vendor) (Stamp-Vendor) (तिकिटें) विकणारा; ४१९. वे-व्हेटर्नरी (Veterinary) पशुवैद्यकीय; ४२०. वायोलीन (Violin) एक तंतुवाद्य; ४२१. व्होट, ओठ; (Vote) मत; ४२२. वास्कू-स्की-ट (Waistcoat) जाकीट; ४२३. वालशीट (Wallshade) भित्तिदीप; ४२४. वेटर (Waiter) वाढपी; नोकर; ४२५. वायसर (Washer) धातुची किंवा चामड्याची चकती; ४२६. व्हिस्की (Whisky) या नांवाची दारू; ४२७. शेर (Share) भाग; ४२८. शाप-फ (shop) दुकान; ४२९. शिंगल, शिग्नल (Signal) धोकादर्शक पट्टीची खूण; भयदर्शक पट्टिका; ४३०. शिली-(सिली–) पट (Sleeper) रुळाखालचा लांकडी किंवा लोखंडी खांचा असलेला ओंडका; ४३१. शेकण (कलास) (Second) दुसरा (वर्ग); ४३२. शीड (Sheet) वायुग्राहक; ४३३. शेल्फ (Shelf) मांडण; ४३४. ष्टांप (Stamp) तिकिट, शिक्का, छाप; ४३५. ष्टूल (stool) घडवंची; ४३६. ष्ट्रीट (Street) रस्ता; ४३७. सेंटर, संटर (Centre) केंद्र; ४३८. संत्री (Sentry) रक्षक; ४३९. साबू-गू-दाणा (Sago); ४४०. साटीन-ण (Satin) एक तकतकीत कापड; ४४१. सीन (सीनरी) (Scene) देखावा; ४४२. स्काऊट (Scout) बालवीर; ४४३. सुनीत (Sonnet) चतुर्दशक; ४४४. सील (शील) (Seal) (सील मासा), मुद्रा; ४४५. सेकण, सेकंद (शेकण) (Second) मिनिटाचा $\frac{१}{६०}$ भाग; ४४६. सुखंट (Servant) नोकर; ४४७. सट (Set) संचांतील एक; एक चीनी मातीचें न कळकवणारें भांडें; ४४८. स्प्रिट (Spirit) मद्यार्क, ४४९. सूट (Suit) कोटविजार; ४५०. सुप्रिटेण, सुप्रिटेंड (Superintendent) विभागप्रमुख; ४५१. समन, समान (Summons) कोर्टाचें बोलावणें; ४५२. हाल (Hall) दिवाणखाना; ४५३. हुकूमडर (Who comes there) लष्करांतला शब्द; ४५४. हाय-ई (स्कूल कोर्ट इ.) (High) उच्च; ४५५. हाटेल (Hotel) उपाहारगृह; ४५६. हंडरवेट (Hundredweight) या नांवाचें वजन; ४५७. गरादज (Grate) लोहजाल; ४५८. गलान (Gland) नळी.

वरील शब्द अगदीं १०।१२ वगळले तर नेहमीच्या प्रचारांतले आहेत. मराठी

भाषेंत हे शब्द असेच नित्य राहावेत किंवा राहतील काय याविषयीं मत देणें फार कठिण आहे. मराठी भाषेवर ज्या राज्यभाषेची म्हणजे हिंदीची छाप यापुढें पडेल (त्यांत Tragedy ला त्रासदी हा शब्द दिला जातो व असे कांहीं शब्द किंचित् संस्कृतीकरण करून त्या भाषेंत घेतलेले आहेत) त्या भाषेच्या वळणावर हे शब्द राहाणें न राहाणें याविषयींचें भविष्य ठरेल. चिपळूणकरांना महत्त्वाकांक्षा इत्यादि भाषांतरित शब्दसुद्धां फार अभिप्रेत नव्हते; आणि जुन्या मराठींत वर दर्शविल्याप्रमाणें मराठी शब्दांत अर्थ सांगण्याची जी पद्धति होती [याचें एक गमतीदार उदाहरण इ. स. १७६५ मधलें पेशवे दफ्तर ३२ मध्यें आहे. "विनंति मीर अनवर यांस **सावली पाहून तसबीर काढायची पेटी** इंग्रजाकडील आणिली होती, ती आपण सरकारांत मागितली त्याप्रमाणें शोध करून आपणाकडे नवलोजी चव्हाण याज समागमे पाठविली आहे. घ्यावी आणि पावती द्यावी. जमा सरकारांत घरली आहे. इंग्रजाचें नांवें खर्च लिंहिली आहे." (हें वर्णन **कॅमेरा**संबंधी आहे.)] ती जर पुनश्च आली तर हे शब्द लुप्तहि होतील. सावरकरांनीं भाषाशुद्धीची चळवळ चालू केल्यावर ज्याप्रमाणें कित्येक नवीन शब्द निर्माण झाले व जुने परकी शब्द लुप्त झाले, दुर्मिळ होत गेले व नष्ट झाले, त्याप्रमाणें हे इंग्रजी अपभ्रष्ट शब्द भाषाशुद्धि करणारा कोणी प्रभावी लेखक निर्माण झाला तर जातीलहि. पण अजून कांहीं लेखकांना इंग्रजी शब्द वापरण्याचा मोह सुटलेला नाहीं. अशा लोकांचीच खरी भीति आहे हें निश्चित.

(* ज्यांना इंग्रजी म्हणून आम्हीं समजतों ते शब्द मूळ पोर्तुगीज भाषेंतून आले असणें शक्य आहे. वरील लेखांत असे जे कांहीं शब्द सहज लक्षांत आले ते पुढें देतों :—

पृ० ४०, क्रमांक ६—छोलदार (soldado), सोल्दाद.
पृ० ४२, क्र० २०—बोडद (borda), बॉर्द.
पृ० ४२, क्र० ३३—आलमारी (armario), आर्मारियु.
पृ० ४३, क्र० ३९—रेजिम (resma), रेझ्म.
पृ० ४९, क्र० २३३—पिकाव (picao), पिकांव.
पृ० ४९, क्र० २३४—पिकंदर (picadeira), पिकादैर.
पृ० ५०, क्र० ३००—बशी (bacia), बासीय.
पृ० ५१, क्र० ३२१—बोतल (botelha), बोतेल्य.
पृ० ५१, क्र० ३५७—मेस्तरी (mestre), मॅस्त्रि.

— संपादक)

पीएच्. डी. चें मराठी संशोधन

(सुमारें चाळीस वर्षांमागें पीएच्. डी. पदवी मिळविण्याकरितां आपल्या लोकांना हिंदुस्थानाबाहेर जावें लागे. परंतु अलीकडे आपल्या विद्यापीठांत प्रबंध लिहून पीएच्. डी. पदवी मिळण्याची सोय झाली आहे. मराठी या विषयांत मुंबई विद्यापीठानें १९३९ सालीं प्रथमच पीएच्. डी. ही पदवी दिली. पुढें नागपूर, पुणें, ओस्मानिया, मराठवाडा वगैरे विद्यापीठांतही ही पदवी देण्याची व्यवस्था झाली आहे. पीएच्. डी. या पदवीकरितां निरनिराळ्या विद्यापीठांमध्यें काय संशोधन झालें किंवा होत आहे हें कळण्याकरितां, उपलब्ध झाली ती माहिती पुढें प्रसिद्ध करण्यांत येत आहे. संशोधकाचें नांव, प्रबंधाचा विषय व मार्गदर्शकाचें नांव या क्रमानें ही यादी दिली आहे. आपल्या विद्यापीठांमध्यें काय संशोधन चाललें आहे त्याची या यादीवरून कल्पना होईलच; शिवाय मागें कोणते विषय घेतले गेले आहेत, हें एकदा कळलें म्हणजे नवीन विषय निवडतांना पुढील संशोधकांना या माहितीचा उपयोग होईल व एकाच विषयावर अनेकांनीं संशोधन करण्याचा प्रसंग टळेल.)

१ मुंबई विद्यापिठ

(स्वीकारलेले प्रबंध)

1. P. G. Sahasrabuddhe :—The Development of the Art of Characterization in Marathi Literature from 1865 to 1938. (स्वभावलेखन) — Prof. N. C. Kelkar.

2. S. G. Tulpule — A Philological Study of Old Marathi in the Yadava Period (यादवकालीन मराठी भाषेचा भाषाशास्त्रीय अभ्यास). — Prof. N. C. Kelkar.

3. M. A. Karandikar :—The Elements of Marathi Vocabulary (मराठी शब्दसंग्रहमीमांसा) — Prof. N. C. Kelkar.

4. G. B. Gramopadhye :—Marathi Language in the 18th Century (as represented in the published part of the Peshwa Daftars) – Philosophical, Grammatical and Dialectical Study. — Prof. N. C. Kelkar.

5. K. N. Watve :—Psychological examination of the Rasa System with a view to lay down the foundation of the Principles of Literary Criticism for Modern Marathi (रसविमर्श) — Prof. N. C. Kelkar.

6. V. B. Pathak :—Critic and Criticism :—(Researchful Scientific Criticism of the Principles of Literary Criticism in general and of those found in the Ancient and Modern Marathi Language, along with the comparison of the same with the Principles of Literary Criticism in Sanskrit and English Literature). — Prof. N. C. Kelkar.

7. M. M. Altekar :—Tragic Element and its Experience in Marathi Drama. — Prof. K. P. Kulkarni.

8. Miss S. K. Babar :—The Contribution of Women Writers to Marathi Literature — Prof. K. N. Watve.

9. L. M. Bhingare :—Hari Narayan Apte and his Literary Tradition — Prof. R. S. Joag.

10. N. G. Joshi :—Marathi Prosody reconsidered with a view to determine the essential rythmatical musical element common to all its main varieties — Prof. R. S. Joag.

11. S. D. Parchure :—The Origin and Development of Marathi Prose Style — Prof. N. G. Chaphekar.

12. S. V. Sahasrabuddhe :—A comparative Study of the Original Mahabharat in Sanskrit and the Aryabharat in Marathi by the Poet Moropant — Prof. N. G. Chaphekar.

13. K. B. Kulkarni :—Text-books in Marathi in the Ninenteenth Century, their authors and their effects on the structure of the Marathi Language — Prof. A. K. Priolkar.

14. V. M. Kulkarni :—K. P. Khadilkar as a dramatist (A critical study of Khadilkar's place in relation with his personality and the spirit of his personality and the spirit of his times) — Prof. K. N. Watve.

15. S. M. Pinge :—A Study of the contribution to Marathi Language and Literature by Europeans — Prof. A. K. Priolkar.

16. D. K. Sant :—Women in Marathi Literature of the British Period (1818-1947) — Prof. K. N. Watve.

17. R. W. Datar :—Laughter and Humour in Marathi Drama (1843-1942) — Prof. K. P. Kulkarni.

18. R. V. Herwadkar :—Marathi Bakhar-Vangmaya

(Literature called Marathi Bakhars) — Prof. M. A. Karandikar.

19. D. V. Patwardhan :—A critical study of Tukarama's Abhangas — Prof. K. P. Kulkarni.

20. Smt. C. B. Gupte :—Comic Element and Comedy in Marathi Literature — Prof. M. A. Karandikar.

21. Vithal Babu Prabhudesai :—A critical study of the seventeenth century Jesuit Literature in the Goan dialect of Marathi — Prof. A. K. Priolkar.

22. Smt. S. M. Karandikar :—Metrical versions of the Valmiki Ramayana in Marathi (upto 1818 A. D.) — Prof. M. A. Karandikar.

23. Smt. S. N. Shende :—The Mahabharata of Vishnudasanama (A critical study) — Prof. A. K. Priolkar.

24. S. G. Malshe :—A Linguistic and Literary Study of Christa-Purana of Father Stephens — Prof. A. K. Priolkar.

25. Smt. L. M. Rane :—A Literary Study of the Plays of V. B. Warerkar — Prof. K. P. Kulkarni.

26. Smt. M. B. Joshi :—A Philological study of the North Konkan Dialect (mainly based on Jesuit Works and Resources) — Prof. A. K. Priolkar.

27. V. V. Parkhe :—Mahabharata and its Marath Poetic Versions (from the beginning to 1818 A.D. excluding the Bhagvadgita) — Prof. M. A. Karandikar.

Smt. S. P. Jajodia :—A study of Marathi Folk-Songs as compared with Rajasthani Folk-Songs — Prof. M. A. Karandikar. (निकाल लागला नाहीं)

(लिहिले जात असलेले प्रबंध)

1. Shri K. R. Sawant :—Influences that shaped the Marathi Drama (1851-1961) — Prof. R. S. Walimbe.

2. Shri G. V. Nerlekar :—A critical study of Swayamvar type of poetry in Marathi with special reference to Literary and Social aspects — Prof. R. S. Walimbe.

3. Kum. Indu M. Limaye :—Ramdas (A critical study) — Prof. G. B. Gramopadhye.

4. Shri U. A. Tendulkar :—Lyrical poetry in Marathi-Its rise and development 1885 to 1935 — Prof. R. S. Walimbe.

5. Shri K. P. Khandalekar :—The Principles of Novel technique and its application to the novels of H. N. Apte — Prof. K. P. Kulkarni.

6. Kum. Sadhana J. Upadhye :—Development of the form of the Novel in Marathi — Prof. G. B. Gramopadhye.

7. Kum. Pushpa A. Bhave :—Sixty-eight years of Vividhadnyanavistar — Prof. A. K. Priolkar.

8. Kum. Saraswati M. Rege :—Linguistic study of the dialects of Savantwadi, Vengurla and Malvan. — Prof. G. B. Gramopadhye.

9. Shri S. A. Gavaskar :—Marathi Incunabula, (being a literary assessment and all round survey of Marathi books printed upto 31st December 1867). — Prof. A. K. Priolkar.

10. Smt. Gargi Sardesai :—A study of the works of Shri V. S. Khandekar — Prof. G. B. Gramopadhye.

11. Shri S. V. Joglekar :—Effects of the English language on Marathi — Prof. M. A. Karandikar.

12. Kum. Leela N. Govilkar :—Beginning & Development of Marathi Grammar — Prof. A. K. Priolkar.

२ पुणें विद्यापीठ

(नांवापुढें * ही खूण असलेल्या विद्यार्थ्यांचें प्रबंध मान्य किंवा सादर झालेले आहेत. इतर विद्यार्थ्यांचें काम चालू आहे.)

क्र.	विद्यार्थ्यांचें नांव	विषय	मार्गदर्शक
१.	श्रीमती सरस्वती पुरंदरे * :	मराठी सामाजिक कादंबऱ्यांतील स्त्री-जीवन—	डॉ. शं. गो. तुळपुळे
२.	श्री. रा. शं. वाळिंबे * :	ज्ञानेश्वरींतील विदग्ध रसवृत्ति—	,, के. ना. वाटवे

३. श्री. प्र. न. जोशी * : मराठी साहित्यांतील मधुराभक्ति —डॉ. के. ना. वाटवे

४. ,, वि. रा. करंदीकर * : वामनपंडितांची यथार्थदीपिका —,, शं. गो. तुळपुळे

५. ,, नरेश कवडी * : Folk-Songs from Dang-Linguistic Study —,, शं. गो. तुळपुळे

६. ,, कृ. शे. मार्डीकर * : शिवकालीन मराठीचा भाषाशास्त्रीय अभ्यास—,, शं. गो. तुळपुळे

७. ,, के. गो. गुजराती : ज्ञानेश्वरींतील शब्दघटना —,, शं. गो. तुळपुळे

८. ,, ज. के. रानडे * : वारली बोलीचा अभ्यास —प्रा. रा. श्री. जोग

९. श्रीमती अनुराधा पोतदार * : मराठीचें अर्थविज्ञान —डॉ. शं. गो. तुळपुळे

१०. श्री. य. वा. परांजपे * : योगवासिष्ठ व संतवाङ्मय —,, के. ना. वाटवे

११. श्रीमती कुसुम मांडके : मराठी कादंबरींतील मनोविश्लेषण—,, के. ना. वाटवे

१२. श्री. ह. बा. कुलकर्णी * : श्री. कृ. कोल्हटकर —प्रा. रा. श्री. जोग

१३. ,, यू. म. पठाण * : मराठी बखरींतील फारसीचें स्वरूप —डॉ शं. गो. तुळपुळे

१४. ,, वि. वि. पटवर्धन * : वाङ्मयीन संकेत जुने व नवे—प्रा. रा. श्री. जोग

१५. ,, ह. कि. तोडमल * : मराठी खंडकाव्यें —,, रा. श्री जोग

१६. ,, अ. दे. टिळक * : रे. टिळक : व्यक्ति व वाङ्मय—,, रा. श्री. जोग

१७. ,, हे. वि. इनामदार : नामदेव : सर्वांगीण अभ्यास—डॉ. शं. गो. तुळपुळे

१८. ,, रा. ति. आवकोळे * : जैन मराठी वाङ्मय —,, शं. गो. तुळपुळे

१९. ,, म. प. पेठे : ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाचा इतिहास—,, शं. गो. तुळपुळे

२०. ,, प्र. ल. गावडे : वि. दा. सावरकर : अभ्यास—,, पु. ग. सहस्रबुद्धे

२१. ,, म. वि. गोखले : मराठी आरती —,, शं. गो. तुळपुळे

२२. ,, मु. श्री. कानडे * : दासबोधाचा भाषाशास्त्रीय अभ्यास —,, शं. गो. तुळपुळे

२३. श्री. द. न. गोखले * : डॉ. केतकर : एक अभ्यास
—प्रा. रा. श्री. जोग

२४. ,, स. शि. भावे : मराठी वाङ्मयाभिरुचि
(१९ वें शतक व नंतर)—,, रा. श्री. जोग

२५. ,, ए. व्ही. कुलकर्णी : मराठी नाट्यतंत्राचा विकास—,, रा. श्री. जोग

२६. श्रीमती शारदा देशमुख : महिपति —डॉ. शं. गो. तुळपुळे

२७. श्री. एस. आर. चुनेकर* : माधव ज्यूलियन् —प्रा. रा. श्री. जोग

२८. ,, श्रीमती नलिनी वापट : मराठी लघुकथा —डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

२९. ,, भी. अ. कुळकर्णी : साहित्य : जीवन-भाष्य —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३०. ,, निर्मलकुमार फडकुले : सामाजिक आंदोलनें व
साहित्य—,, पु. ग. सहस्रबुद्धे

३१. ,, व्ही. एन. कुलकर्णी : मराठी काव्यांतील निसर्ग —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३२. ,, मो. द. ब्रह्मे : आधुनिक सामाजिक मराठी
नाटक —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३३. ,, चं. शं. बर्वे : मराठींतील निबंधवाङ्मय —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३४. ,, एस. व्ही. मुळे : मराठींतील रुक्मिणी-
स्वयंवराख्यानें —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३५. ग. वि. अकोलकर : रामदासांचे शिक्षण व
संस्कृतिविषयक विचार—,, शं. गो. तुळपुळे

३६. श्रीमती कुमुदिनी धारपुरे : प्राचीन मराठी कोरीव लेखांचा
भाषाशास्त्रीय अभ्यास —,, शं. गो. तुळपुळे

३७. श्री. म. ग. सातारकर : ऐतिहासिक मराठी नाटकें —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३८. ,, वा. के. लेले : संस्कृत-साहित्यशास्त्राचा
मराठी अवतार —,, शं. गो. तुळपुळे

३९. श्रीमती विजया भुसारी : मराठी साहित्यांतील
आत्माविष्कार —,, पु. ग. सहस्रबुद्धे

४०. ,, नीला खेर : इंग्रजी काव्याचा आधुनिक
मराठी काव्यांवर झालेला
परिणाम—प्रा. रा. श्री. जोग

४१. ,, श्री. एस. के. भोसले : शि. म. परांजपे —,, रा. श्री. जोग

४२. श्रीमती कल्पिका देशपांडे : मराठी सामाजिक कादंबरी-
मधील विचारप्रवाह आणि
प्रेरणा —,, रा. श्री. जोग

३ नागपूर विद्यापीठ

(स्वीकारलेले प्रबंध)

1. Shri S. D. Pendse :—The Philosophy of Dnaneshwar—Shri G. K. Garde.

2. Shri M. G. Deshmukh :—An Investigation of the Principles of Poetics underlying the Works of the Chief Saint Poets in Maharashtra from Dnaneshwar to Ramdas—Shri S. N. Banhatti.

3. Shri N. G. Nandapurkar :—A Comparative Study of Mukteshwar and Moropant—Dr. S. D. Pendse.

4. Shri V. B. Kolte :—Mahanubhava Tatwadnyana, together with four publications.

5. Miss Tara G. Kelkar :—Women in Marathi Literature (from the Mahanubhavas to Ramdas)—Shri S. N. Banhatti.

6. Shri R. H. Attarde :—Historical Survey and Investigation into Marathi Prosody—Shri B. S. Pandit.

7. Shri D. H. Agnihotri :—Marathi Varnochchar Vikas.—Dr. V. B. Kolte.

8. Shri A. N. Despande :—आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग १ व २.

(लिहिले जात असलेले प्रबंध)

1. Shri D. B. Pandit :—मराठी वाङ्मयांतील हास्यरसाचा विकास—Shri S. L. Pandhripande.

2. Shrimati Indumati Deshmukh :—Critical Investigation of the movement of Social reform as reflected in Marathi Literature during the period from 1818 to 1918—Shri S. N. Banhatti.

3. Kum. Indu M. Limaye :—Ramdas (A critical study) — Prof. G. B. Gramopadhye.

4. Shri U. A. Tendulkar :—Lyrical poetry in Marathi-Its rise and development 1885 to 1935 — Prof. R. S. Walimbe.

5. Shri K. P. Khandalekar :—The Principles of Novel technique and its application to the novels of H. N. Apte — Prof. K. P. Kulkarni.

6. Kum. Sadhana J. Upadhye :—Development of the form of the Novel in Marathi — Prof. G. B. Gramopadhye.

7. Kum. Pushpa A. Bhave :—Sixty-eight years of Vividhadnyanavistar — Prof. A. K. Priolkar.

8. Kum. Saraswati M. Rege :—Linguistic study of the dialects of Savantwadi, Vengurla and Malvan. — Prof. G. B. Gramopadhye.

9. Shri S. A. Gavaskar :—Marathi Incunabula, (being a literary assessment and all round survey of Marathi books printed upto 31st December 1867). — Prof. A. K. Priolkar.

10. Smt. Gargi Sardesai :—A study of the works of Shri V. S. Khandekar — Prof. G. B. Gramopadhye.

11. Shri S. V. Joglekar :—Effects of the English language on Marathi — Prof. M. A. Karandikar.

12. Kum. Leela N. Govilkar :—Beginning & Development of Marathi Grammar — Prof. A. K. Priolkar.

२ पुणें विद्यापीठ

(नांवापुढें * ही खूण असलेल्या विद्यार्थ्यांचें प्रबंध मान्य किंवा सादर झालेले आहेत. इतर विद्यार्थ्यांचें काम चालू आहे.)

क्र.	विद्यार्थ्यांचें नांव	विषय	मार्गदर्शक
१.	श्रीमती सरस्वती पुरंदरे * :	मराठी सामाजिक कादंबऱ्यांतील स्त्री-जीवन—	डॉ. शं. गो. तुळपुळे
२.	श्री. रा. शं. वाळिंबे * :	ज्ञानेश्वरींतील विदग्ध रसवृत्ति—	,, के. ना. वाटवे

३. श्री. प्र. न. जोशी * : मराठी साहित्यांतील मधुराभक्ति —डॉ. के. ना. वाटवे

४. ,, वि. रा. करंदीकर * : वामनपंडितांची यथार्थदीपिका —,, शं. गो. तुळपुळे

५. ,, नरेश कवडी * : Folk-Songs from Dang-Linguistic Study —,, शं. गो. तुळपुळे

६. ,, कृ. शे. मार्डीकर * : शिवकालीन मराठीचा भाषाशास्त्रीय अभ्यास—,, शं. गो. तुळपुळे

७. ,, के. गो. गुजराती : ज्ञानेश्वरींतील शब्दघटना —,, शं. गो. तुळपुळे

८. ,, ज. के. रानडे * : वारली बोलीचा अभ्यास —प्रा. रा. श्री. जोग

९. श्रीमती अनुराधा पोतदार * : मराठीचें अर्थविज्ञान —डॉ. शं. गो. तुळपुळे

१०. श्री. य. वा. परांजपे * : योगवासिष्ठ व संतवाङ्मय —,, के. ना. वाटवे

११. श्रीमती कुसुम मांडके : मराठी कादंबरींतील मनोविश्लेषण—,, के. ना. वाटवे

१२. श्री. ह. बा. कुलकर्णी * : श्री. कृ. कोल्हटकर —प्रा. रा. श्री. जोग

१३. ,, यू. म. पठाण * : मराठी बखरींतील फारसीचें स्वरूप —डॉ शं. गो. तुळपुळे

१४. ,, वि. वि. पटवर्धन * : वाङ्मयीन संकेत जुने व नवे—प्रा. रा. श्री. जोग

१५. ,, ह. कि. तोडमल * : मराठी खंडकाव्यें —,, रा. श्री जोग

१६. ,, अ. दे. टिळक * : रे. टिळक : व्यक्ति व वाङ्मय—,, रा. श्री. जोग

१७. ,, हे. वि. इनामदार : नामदेव : सर्वांगीण अभ्यास—डॉ. शं. गो. तुळपुळे

१८. ,, रा. ति. आवक्कोळे * : जैन मराठी वाङ्मय —,, शं. गो. तुळपुळे

१९. ,, म. प. पेठे : ज्ञानेश्वरीच्या अभ्यासाचा इतिहास—,, शं. गो. तुळपुळे

२०. ,, प्र. ल. गावंडे : वि. दा. सावरकर : अभ्यास—,, पु. ग. सहस्रबुद्धे

२१. ,, म. वि. गोखले : मराठी आरती —,, शं. गो. तुळपुळे

२२. ,, मु. श्री. कानडे * : दासबोधाचा भाषाशास्त्रीय अभ्यास —,, शं. गो. तुळपुळे

२३. श्री. द. न. गोखले * : डॉ. केतकर : एक अभ्यास
—प्रा. रा. श्री. जोग

२४. ,, स. शि. भावे : मराठी वाङ्मयाभिरुचि
(१९ वें शतक व नंतर)—,, रा. श्री. जोग

२५. ,, ए. व्ही. कुलकर्णी : मराठी नाट्यतंत्राचा विकास—,, रा. श्री. जोग

२६. श्रीमती शारदा देशमुख : महिपति —डॉ. शं. गो. तुळपुळे

२७. श्री. एस. आर. चुनेकर* : माधव ज्यूलियन् —प्रा. रा. श्री. जोग

२८. ,, श्रीमती नलिनी बापट : मराठी लघुकथा —डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे

२९. ,, भी. अ. कुळकर्णी : साहित्य : जीवन-भाष्य —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३०. ,, निर्मलकुमार फडकुले : सामाजिक आंदोलनें व
साहित्य—,, पु. ग. सहस्रबुद्धे

३१. ,, व्ही. एन. कुलकर्णी : मराठी काव्यांतील निसर्ग —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३२. ,, मो. द. ब्रह्मे : आधुनिक सामाजिक मराठी
नाटक —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३३. ,, चं. शं. बर्वे : मराठींतील निबंधवाङ्मय —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३४. ,, एस. व्ही. मुळे : मराठींतील रुक्मिणी-
स्वयंवराख्यानें —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३५. ग. वि. अकोलकर : रामदासांचे शिक्षण व
संस्कृतिविषयक विचार—,, शं. गो. तुळपुळे

३६. श्रीमती कुमुदिनी घारपुरे : प्राचीन मराठी कोरीव लेखांचा
भाषाशास्त्रीय अभ्यास —,, शं. गो. तुळपुळे

३७. श्री. म. ग. सातारकर : ऐतिहासिक मराठी नाटकें —,, पु. ग. सहस्रबुद्धे

३८. ,, वा. के. लेले : संस्कृत-साहित्यशास्त्राचा
मराठी अवतार —,, शं. गो. तुळपुळे

३९. श्रीमती विजया भुसारी : मराठी साहित्यांतील
आत्माविष्कार —,, पु. ग. सहस्रबुद्धे

४०. ,, नीला खेर : इंग्रजी काव्याचा आधुनिक
मराठी काव्यांवर झालेला
परिणाम—प्रा. रा. श्री. जोग

४१. ,, श्री. एस. के. भोसले : शि. म. परांजपे —,, रा. श्री. जोग

४२. श्रीमती कल्पिका देशपांडे : मराठी सामाजिक कादंबरी-
मधील विचारप्रवाह आणि
प्रेरणा —,, रा. श्री. जोग

३ नागपूर विद्यापीठ

(स्वीकारलेले प्रबंध)

1. Shri S. D. Pendse :—The Philosophy of Dnaneshwar—Shri G. K. Garde.

2. Shri M. G. Deshmukh :—An Investigation of the Principles of Poetics underlying the Works of the Chief Saint Poets in Maharashtra from Dnaneshwar to Ramdas—Shri S. N. Banhatti.

3. Shri N. G. Nandapurkar :—A Comparative Study of Mukteshwar and Moropant—Dr. S. D. Pendse.

4. Shri V. B. Kolte :—Mahanubhava Tatwadnyana, together with four publications.

5. Miss Tara G. Kelkar :—Women in Marathi Literature (from the Mahanubhavas to Ramdas)—Shri S. N. Banhatti.

6. Shri R. H. Attarde :—Historical Survey and Investigation into Marathi Prosody—Shri B. S. Pandit.

7. Shri D. H. Agnihotri :—Marathi Varnochchar Vikas.—Dr. V. B. Kolte.

8. Shri A. N. Despande :—आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग १ व २.

(लिहिले जात असलेले प्रबंध)

1. Shri D. B. Pandit :—मराठी वाङ्मयांतील हास्यरसाचा विकास—Shri S. L. Pandhripande.

2. Shrimati Indumati Deshmukh :—Critical Investigation of the movement of Social reform as reflected in Marathi Literature during the period from 1818 to 1918—Shri S. N. Banhatti.

3. Shri J. H. Chinchalkar :—मद्रास प्रांतांतील सौराष्ट्री भाषा व तिचा मराठीशीं संबंध—Shri S. L. Pandhripande.

4. Shri V. P. Mohogaonkar :—An investigation into the origin and development of Marathi Drama with Special reference to Tragedies.

5. Shri S. M. Kulkarni :—Moulding of Hindu Culture and Civilization by the great Marathi writers (from 12th to 16th Century).—Shri S. L. Pandhripande.

6. Shri T. G. Deshmukh :—The Principles of Aesthetics and Poetics underlying the Chief Marathi Poets in Maharashtra from Keshavasuta to Mardhekar.—Prof. S. N. Banhatti.

7. Kumari Kusum S. Nande :—समर्थ रामदास आणि त्यांचें तत्त्वज्ञान—Dr. S. D. Pendse.

8. Shri R. N. Ghatoley :—संत नामदेव यांचें वाङ्मय व कार्य आणि त्यांचा महाराष्ट्रीय व महाराष्ट्रीयेतर समाजावर झालेला धार्मिक, नैतिक व सामाजिक परिणाम—Dr. V. B. Kolte.

9. Shri R. B. Madhekar :—मराठी लघुकथा (तंत्र व विकास)—Shri S. L. Pandhripande.

10. Shri K. V. Peshkar :—An enquiry into the meanings of Tatsama (तत्सम) and neo-Tadbhava words incorporated into the Marathi Language—Prof. S. N. Banhatti.

11. Shri S. C. Sinha :—An investigation and examination into Dr. Ketkar's thoughts on Indian Sociology as reflected in his literature, with special reference to the Social Problems discussed in his Novels.—Dr. M. P. Buradkar.

12. Shri M. B. Dokey :—मराठी विनोदी वाङ्मयांतील अंतःप्रवृत्ति—Dr. M. G. Deshmukh.

13. Shri G. M. Dholke :—Philological Study of Halbi—Dr. V. B. Kolte.

14. Shri V. K. Wardhankar :—A Study of Bahmini—Marathi Language with Special reference to Eknath — V. B. Kolte.

15. Shri M. N. Kaned:—अर्वाचीन मराठी काव्यांतील प्रेममीमांसा —Shri B. S. Pandit.

16. Shri B. P. Moharil :—वऱ्हाडी बोलीचें भाषाशास्त्रीय स्वरूप. (Philological aspect of Berari Dialect.)—Shri B. S. Pandit.

17. Shri M. R. Karandikar :—Shreepad Krishna Kolhatkar (साहित्य आणि संप्रदाय) — Dr. V. B. Kolte.

18. Shri R. P. Panjankar :—गडकऱ्यांच्या नाटकांतील स्त्रीसृष्टि— Shri B. S. Pandit.

19. Shri M. N. Lohi :—A close critical study of the contemporary Marathi short story of the last decade (1945–1955) — Shri B. S. Pandit.

20. Shri R. B. Shewalkar :—Aesthetics and Modern Marathi Poetry. — Shri B. S. Pandit.

21. Shri M. S. Wabgaonkar :—The Impact of Gandhian Thought on Modern Marathi Literature.— Dr. V. B. Kolte.

22. Shri S. K. Kalnawat :—वेरुरकरांच्या नायिका — Dr. V. B. Kolte.

23. Shri B. M. Mandaokar :—मराठी संत आणि चातुर्वर्ण्य— Dr. V. B. Kolte.

24. Shri. S. P. Mankikar :—वि. दा. सावरकरांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा मराठी वाङ्मयावर पडलेला प्रभाव— Dr. M. G. Deshmukh.

25. Shri P. D. Kolte :—प्रमुख मराठी गीताभाष्यें : तौलनिक अभ्यास — Shri S. L. Pandhripande.

26. Shri B. R. Jahagirdar :—नवकाव्य–एक उत्क्रांति — Dr. V. B. Kolte.

27. Kumari Vimal Chorghade :—विदर्भातील लोकगीतांच्या तौलनिक व सूक्ष्म अभ्यास—Dr V. B. Kolte.

28. Shri P. G. Sahasrabuddhe :—तत्त्वज्ञान, काव्य आणि भाषा —Dr. V. B. Kolte.

29. Shri M. G. Karkare :—मोरोपंतांच्या महाभारतांतील कांहीं प्रमुख व्यक्तिरेखांचें मानसशास्त्रीय विवेचन—D. V. B. Kolte.

30. Shri R. S. Kulkarni :—श्री. विष्णु सखाराम खांडेकर यांच्या वाङ्मयांतील जीवन आणि कला—Dr. V. B. Kolte.

31. Shrimati Indumati Sheorey :—A critical study of the origin & development of Marathi short story through historical perspective. — Prof. B. S. Pandit.

32. Kumari Malti O. Kolte :— तुकारामाची प्रतिभासृष्टि व त्यांच्या काव्याचें मूल्यमापन. — Dr. V. B. Kolte.

33. Shri V. S. Bhagat :—Realism in Modern Marathi Literature. — Dr. V. B. Kolte.

34. Shri H. E. Chavan :—व्यक्तिस्वातंत्र्याच्या आधुनिक मराठी वाङ्मयाचा आविष्कार. —Dr. V. B. Kolte.

मुंबई नगरसंशोधन

मुंबई शहराच्या स्वरूपांत इतका झपाट्यानें बदल होत आहे कीं, जुन्याकाळीं कोठें काय होतें तें समजण्यास पुढें मार्ग राहाणार नाहीं. धोबीतलाव किंवा गोवालिया तलाव या ठिकाणीं पूर्वी तलाव होते, हें केवळ त्या भागाच्या नांवावरूनच आज कळून येतें. ही गोष्ट केवळ एक उदाहरण म्हणून सांगितली. मुंबई शहराची जुनी माहिती देणारीं अनेक पुस्तकें आहेत. डॉ. जर्सन द कुञ्ज यांचें 'धी ऑरिजिन ऑफ बॉम्बे,' जेम्स डग्लस्चें 'बॉम्बे अँड वेस्टर्न इंडिया,' वाच्छा यांचें मुंबईना बहार', गोविंद नारायण माडगांवकरांचें 'मुंबईचें वर्णन' अशीं अनेक निरनिराळ्या भाषांतींल पुस्तकें सांगतां येतील. यांमध्यें महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें माडगांवकराचें पुस्तकच फार उपयुक्त आहे. हें पुस्तक अत्यंत दुर्मिळ झालें होतें; परंतु मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयानें तें पुणर्मुद्रित करून सर्वांना उपलब्ध करून दिलें, ही समाधानाची गोष्ट होय. त्या काळच्या पद्धती-प्रमाणें हें पुस्तक अत्यंत रसभरित व माहितीपूर्ण आहे. परंतु टीपा वगैरे देऊन त्याला जास्त शास्त्रीय व पद्धतशीर स्वरूप देतां येणें शक्य आहे. माडगांवकरांनीं जी माहिती दिली आहे तिला आधार देऊन त्यांनीं जी माहिती दिलेली नाहीं तीही त्याला जोडावी. त्याला लागणारे छापील व हस्तलिखित कागदपत्र व ग्रंथ महाराष्ट्राच्या दप्तरखान्यामध्यें व मुंबईच्या इतर ग्रंथालयांमध्यें हवे तेवढे उपलब्ध आहेत . माडगांवकरांचें पुस्तक शंभर वर्षांपूर्वी म्हणजे १८६३ सालीं प्रसिद्ध झालें. या शंभर वर्षांत ज्या घडामोडी झाल्या त्यांचीही नोंद होणें अवश्य आहे. त्यावेळीं ज्या गोष्टी सुपरिचित म्हणून त्यांची नोंद करण्याची माडगांवकरांना आवश्यकता वाटली नाहीं, त्या आज संशोधनाच्या विषय होऊन राहिल्या आहेत.

जुन्याकाळीं मुंबईमध्यें जे थोर पुरुष होऊन गेले, व ज्यांनीं मुंबईच्या मोठेपणाचा पायां घातला त्यांची आजच्या लोकांना माहिती नाहीं. त्यांचे कागदपत्र किंवा त्यांच्या हातचा एक चिटोराही आज दृष्टीस पडत नाहीं. ते कोठें राहात होते त्या जागा आज माहीत नाहींत. बाळशास्त्री जांभेकर हे कोलभाट लेनमध्यें राहात असत, असें कळ-ल्यावरून त्यांच्या उद्योगी चरित्रकारांनीं तें ठिकाण शोधण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्यांना तें सांपडलें नाहीं. डॉ. बाबासाहेब जयकर ह्यांचा वाडा ठाकुरद्वारला कोठें होता हें आम्हीं पाहिलें आहे; पण, आणखी कांहीं वर्षांनीं त्यांच्या भावी चरित्रकाराला त्या ठिकाणाचा थांग लागणार नाहीं. मराठी भाषेचे पाणिनि म्हणून ज्ञात असलेले दादोबा पांडुरंग तर्खडकर ह्यांचें निवासस्थान ठाकुरद्वारच्या भीमराववाडींत मोतीवाले पेटे यांच्या दुकानाच्या शेजारीं रस्त्यावर होतें. त्या घराचा फोटो, त्यांच्या आत्मचरित्र-ग्रंथामध्यें पाहावयास मिळेल. अलीकडे तें घर पाडण्यांत येऊन त्या जागीं नवीन इमारत बांधण्यांत येत आहे. या ठिकाणीं, "या जागीं मराठी व्याकरणकार दादोबा

पांडुरंग राहात होते, "असा शिलालेख लावणें योग्य होईल. क्रिन्सरोडपासून भुलेश्वराकडे जाण्याऱ्या रस्त्यालाही दादोबांचें नांव देतां येण्यासारखें आहे. नाना शंकरशेटचा वाडा हें महाराष्ट्रीयांना अभिमान वाटण्यासारखें एक स्थळ होतें; परंतु तोही नुकताच पाडण्यांत आला आहे, हें पाहून कोणाही महाराष्ट्रीयाला अत्यंत दुःख झाल्याखेरीज राहाणार नाहीं. दोघां महाराष्ट्रीय संस्थानिकांच्या वाड्यांचीही अशीच स्थिति होणार असें नुकतेंच वाचल्याचें आठवतें. अशाप्रकारचे इतिहासप्रसिद्ध वाडे ज्यावेळीं पाडले जातात त्यावेळीं त्यांचे निरनिराळ्या बाजूंनीं फोटो घेऊन हे फोटो म्युझियममध्यें ठेवण्याची युरोपांत पद्धति आहे, असें कळतें. आमच्याकडे असें केलें जातें कीं काय, याबद्दल शंका आहे. मुंबई नगरपालिकेनें अशा ठिकाणीं पूर्वी तेथें काय होतें तें दर्शविणाऱ्या पाट्या लावण्याची व्यवस्था करणें अवश्य आहे.

मुंबई शहर, मराठी भाषा किंवा एकंदर महाराष्ट्र यांची सेवा ज्या पुरुषांनीं केली, मग ते देशी किंवा विदेशी असोत, त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण आम्हीं ठेवलें पाहिजे. अशा पुरुषांपैकीं कॅप्टन पी. टी. फ्रेंच यांचा निर्देश उदाहरणादाखल करतां येण्यासारखा आहे. मुंबई प्रांतांत ग्रंथालयांच्या चळवळीला सुरुवात याच गृहस्थांनीं प्रथम केली. १८४९ सालीं मुंबईत 'दक्षिणी भाषेंत पुस्तकें प्रसिद्ध करणारी मंडळी' जी स्थापन झाली तिचे आद्य प्रवर्तक कर्नल फ्रेंच हे होते. कांहीं काळ बडोद्याचे ते रेसिडेंट होते. गुजरात व्हर्न्याक्युलर सोसायटीचेही तेच संस्थापक होते. मुंबईतील इतर कितीतरी संस्थांना त्यांची मदत असे.

कॅप्टन फ्रेंच ज्यावेळीं हिंदुस्थान सोडून स्वदेशीं जावयास निघाले त्यावेळीं मुंबई बेटांतील नागरिकांतर्फे स्टुडंटस् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीनें त्यांना ता. २९ नवंबर १८५१ रोजीं मानपत्र दिलें; त्याला उत्तरादाखल केलेल्या भाषणांतील एक उतारा देतों म्हणजे देशी लोकांसंबंधीं त्यांना किती आस्था वाटत होती, त्याची कल्पना होईल. ते म्हणाले,

"Another point to which I would beg your attention is the great want of a Newspaper in English, to advocate the just rights of your country and its people. The Gentlemen conducting the English Press in Bombay, will, I am sure, allow that they frequently know little of the subject they write on, when discussing Indian topics. A few years ago, when the infamous Union Bank transactions became public, one of the leading members of the Parsee community said to me, that were Native the evil-doers, we should never hear the end of it, and very properly too; but that

Europeans being the criminals after a little the subject would be dropped. This is but **one** instance of what I mean. A paper conducted by a well-educated European Gentleman, supported by a strong staff of educated natives of Bombay and the interior, would, I am convinced, be of much use to the country at large and to Government, were its leading principle to seek justice for the native and his soil, no matter to what exposure it might lead. That you will ere long, have such a paper, I hope and believe. It is also, I conceive, necessary that some of you should become Members of the Legal Profession. Hitherto there have been difficulties, but your ever-watchful Professors, your sincere friends, will I have no doubt, in time remove them".

देशी भाषांमध्यें दोन 'लेक्चररशिप' फ्रामजी कावसजी इंस्टिट्यूटतर्फे ठेवण्याचा कॅप्टन फ्रेंच याचा प्रयत्न होता. त्यांना "फ्रेंच लेक्चररशिप" असें नांव देऊन त्यांचें स्मारक करावें असें पुढें ठरलें होतें. त्याचें नंतर काय झालें कळत नाहीं.

मुंबईत ज्या निरनिराळ्या संस्था जन्मास आल्या त्यांचा इतिहास जुने अहवाल व इतर दप्तरें मिळाल्यास मुंबई बेटाच्या व महाराष्ट्राच्या इतिहासाला त्यांचा फार उपयोग होईल. उदाहरणार्थ, कॅ. फ्रेंच वगैरे मंडळींनीं मुंबईत स्थापन केलेल्या उपरि-निर्दिष्ट डेक्कन व्हर्न्याक्युलर सोसायटीचें सगळें दप्तर जर उपलब्ध होईल तर मराठी वाङ्मयाच्या इतिहासावर पुष्कळच नवा प्रकाश पडण्यासारखा आहे. ही संस्था १८४९ मध्यें स्थापन झाली व या संस्थेनें त्यावेळीं सुमारें २५००० रुपये जमविले होते. पुढें कांहीं काळानें तिचें काम रेंगाळत पडल्यावर न्या. तेलंग, न्या. रानडे वगैरे मंडळीनीं तिचें पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला. १८९४ च्या आक्टोबरमध्यें न्या. रानडे वगैरे मंडळीनीं पुण्याला अशीच आणखी एक दुसरी संस्था उभारली. डॉ. भांडारकर यांच्या अध्यक्षतेखालीं तिचें काम चालू झालें. पुढें मुंबईच्या संस्थेचें सोयीकरितां पुण्याला स्थलांतर होऊन या दोनही संस्था एकत्र करण्यांत आल्या व अर्थातच मुंबईच्या संस्थेचा बँकेंत असलेला चार हजार रुपयांचा फंड या नव्या संस्थेकडे आला. या फंडाबरोबरच जुन्या मुंबईच्या संस्थेचें दप्तरही या नव्या संस्थेनें ताब्यांत घेऊन त्याचें संरक्षण केलें असतें तर फार चांगलें झालें असतें, परंतु जुन्या संस्थेचें दप्तर व तिचा ग्रंथसंग्रह पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजमध्यें धूळ खात पडला. त्यापैकीं कांहीं अत्यंत वाईट स्थितींत असलेल्या कागदपत्रांच्या उपलब्ध फाइल्स महाराष्ट्रसरकारच्या ऐतिहासिक

दप्तरखान्याचे डायरेक्टर डॉ. जोशी यांनीं मिळविल्याचें कळतें या केवळ एकदोन वर्षांच्याच आहेत. सगळ्या मिळाल्या तर फार चांगली गोष्ट झाली असती. अशाच मुंबईतील इतर संस्थांच्या उपलब्ध फाइल्स डॉ. जोशी यांनीं मिळवाव्या अशी त्यांना आमची विनंति आहे. बायबल सोसायटी, स्टुडंटस लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी, फ्रामजी कावसजी इंस्टिट्यूट, स्कॉटिश मिशनरी सोसायटी वगैरे संस्थांकडे इतिहासंजमा झालेले कागदपत्र असतील. येथील विल्सन कॉलेजांत डॉ. जॉन विल्सन यांचे सगळे ग्रंथ संगृहीत नाहींत हें पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. एकदा विल्सन कॉलेजचे प्रो. मॅक्क्रीन आमच्या घरीं आले असतां त्यांना माझ्या संग्रहांतील डॉ. विल्सनचे कांहीं ग्रंथ मीं दाखविले व सगळ्या मिशनरी वाङ्मयाची त्याच्या संस्थेनें संग्रह करण्याची आवश्यकता प्रतिपादिली. त्यांनीं मजकडचे ग्रंथ विकत घेण्याचीही इच्छा दर्शविली. "इतर मिशनरी ग्रंथ मिळविण्याचा आधीं प्रयत्न करा म्हणजे मजजवळचे ग्रंथ मी भेटीदाखलच देईन," असें मीं त्यांना सांगितलें.

मुंबई नगराच्या संशोधनाकरितां स्वतंत्र मुंबई नगरसंशोधनमंडळ केव्हां स्थापन होईल तेव्हां होवो. पण निरनिराळ्या संस्थांचीं दप्तरें आणि वैयक्तिक संग्रहांतील महत्त्वाचे कागदपत्र गोळा व रक्षण करण्याची शीघ्र व्यवस्था झाली पाहिजे. मुंबई विद्यापीठ, सरकारी दप्तरखाना, एशियाटिक सोसायटी या संस्थांना या बाबतींत कांहीतरी करतां येण्यासारखें आहे. कोणालाही आपल्या संग्रहांतील कागदपत्र किंवा महत्त्वाच्या वस्तु सुरक्षित राहाव्या असें वाटत असेल तर त्या ठेवण्याची मुंबईंत कांहींतरी व्यवस्था असावी, असें मला अनेक वर्षांपासून सारखें वाटत आहे. कलकत्त्याला तिकडील विद्यापीठाचा म्युझियम पाहिल्यावर असाच मुंबई विद्यापीठाचा एक म्युझियम असावा म्हणजे एखाद्याला आपली बहुमोल वस्तु सुरक्षित ठेवण्यास जागा होईल. असें मला वाटलें. मुंबईंत आल्यावरोबर मीं याबाबतींत मुंबई विद्यापीठाला पत्रद्वारें विनंती केली व ती मान्य होऊन त्याप्रमाणें अल्प प्रमाणावर म्युझियमला सुरुवातही झाली आहे. मात्र या मुंबई विद्यापीठाच्या म्युझियमला हवी तेवढी प्रसिद्धी मिळालेली दिसत नाहीं.

कांहीं दिवसांपूर्वी कै. मामा परमानंदांच्या चरित्रप्रकाशनाच्या वेळीं त्यांचा महत्त्वाचा पत्रव्यवहार मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला, (तो ठेवण्यास कपाटासह) देण्यांत आल्याचें त्यांच्या वंशजांनीं जाहीर केलें ही संतोषाची गोष्ट होय. त्यांचें अनुकरण इतरांनीं करण्यासारखें आहे. असें कागदपत्र कोठेंतरी सुरक्षित राहावे, नष्ट होऊं नये याबद्दल प्रत्येकानें काळजी घ्यावी.

अ. का. प्रियोळकर

कानारीं, कोंकणी : भाषावाचक शब्द

मराठी संशोधनमंडळाचे एक माजी विद्यार्थी डॉ. वि. वा. प्रभुदेसाई यांच्या, मुंबई विद्यापीठामार्फत नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'गोमंतकी बोली' या प्रबंधावर सुप्रसिद्ध संशोधक प्रा. पांडुरंग पिसुर्लेकर यांनीं 'मांडवी' मासिकाच्या गेल्या जानेवारीच्या अंकांत एक प्रशंसापर लेख लिहिलेला आहे. त्यांत तपशिलाच्या बाबतींत आपले कांहीं मतभेदही त्यांनीं व्यक्त केले आहेत. प्रा. पिसुर्लेकर यांनीं नव्यानेंच हीं मतें मांडलीं आहेत असें नाहीं. पूर्वी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या मतांशीं डॉ. प्रभुदेसाई सहमत होऊं शकले नाहींत, म्हणून आपले विचार त्यांनीं जास्त विस्तारानें पुनः मांडले आहेत. डॉ. प्रभुदेसाई यांनीं त्यांचा अवश्य विचार करावा.

या वादंगांत माझेंही अंग असल्याचा निर्देश प्रा. पिसुर्लेकर यांच्या उपरिनिर्दिष्ट लेखांत असल्यामुळें, केवळ खुलाशासाठीं मीं यासंबंधीं दोन शब्द लिहिणें मला अवश्य वाटतें. प्रा. पिसुर्लेकरांना हें उत्तर नाहीं, किंवा त्यांनीं आपलीं मतें बदलावीं असाही हेतु नाहीं.

१. 'कानारीं' शब्दाचा उगम

प्रा. पिसुर्लेकर लिहितात, "प्रा. अ. का. प्रियोळकर म्हणतात कीं, 'कानारीं' हा शब्द 'किनार' किंवा 'कनार' वरून आला. त्यांचे शिष्य डॉ. प्रभुदेसाई तसेंच लिहितात... 'किनार' किंवा 'कनार' ह्या फारशी शब्दापासून 'कानारीं' असा शब्द पोर्तुगीजमध्यें होणार नाहीं."

डॉ. प्रभुदेसाई यांनीं माझें काय म्हणणें आहे, तें 'धि प्रिंटिंग प्रेस इन इंडिया', या माझ्या ग्रंथावरून उद्धृत केलें आहे. तें असें:—

"It **appears** that the term Canarim (Persian word for 'coaster') was first given by the Arab traders to the people on the Malabar Coast which was subsequently adopted by the Portuguese and applied to the native Christians of Goa".[1]

वरील उताऱ्यांत पोर्तुगीजांनीं 'कनारा'चें 'कानारीं' रूप करण्याचा प्रश्न येतोच कोठें ? प्रा. पिसुर्लेकरांनीं आपला गैरसमज करून घेतलेला दिसतो. 'कनारी' हा फारशी

1 A. K. Priolkar, *The Printing Press in India*, Bombay 1958, p. 152.

शब्दच त्यांनीं मुसलमानांकडून उचलला असावा. फार तर त्यांनीं नेहमीच्या पद्धतीप्रमाणें 'क' चा 'का' करून शेवटच्या 'री' वर अनुस्वार दिला असेल.

–'चा','वाला', किंवा-'कर' अशीं अक्षरें संबंध दाखविण्याकरितां ज्याप्रमाणें आम्हीं नामाच्या शेवटीं जोडतों, त्याप्रमाणें फारशी 'य' (ज्याचा शब्दाच्या शेवटीं 'ई' असा उच्चार होतो) असें अक्षर जोडतात. यासंबंधीं ईस्ट इंडिया कंपनीच्या हैलबरी कॉलेजांतील फारसी (पर्सियन) भाषेचे प्रोफेसर मिरझा महमद इब्राहिम लिहितात,

"Another use of this य (पर्सियन टाईप प्रेसमध्यें नसतील व वाचकांना ते वाचतां येणार नाहींत म्हणून त्यांच्या जागीं देवनागरी अक्षरें येथें व पुढें दिलीं आहेत) at the end of a Noun, is to denote connection of relation; as हाफेजे सिराझी Haufez (the Poet) of Shiraz; जनाने बगदादी "The women of Bagdad." In this case the accent is placed on the last syllable,"[२] ('य' चा 'ई' होतो हें वर सांगितलेंच आहे.)

आणखी आधार देतों : पेसतनजी कावसजी कांगा हे पर्सियन भाषेचे शिक्षक लिहितात :—

"When य (=ई) is added to nouns, it has the following significations:- निसबत (संबंध) –It is added to names of countries to show relation as, पारस–पारसी, बगदाद–बगदादी, मिसर–मिसरी."[३]

पुनः आणखी एक पुरावाः—

सुप्रसिद्ध मराठी व्याकरणकार मोरो केशव दामले, मराठींत फारसी प्रत्ययघटित साधित शब्द कसे होतात, याचें विवेचन करतांना लिहितात,

नामांस " ई जोडल्यानें नानार्थक विशेषणें होतात. जसेंः—ईरान–ईरानी (मराठी इराणी), शहरी, जंगली, हिंदी. "[४]

---

2. Meerza Mahammad Ibraheem, *A Grammar of the Persian Language*, London 1841, p. 33.
3. Pestonjee K. Kanga & G. B. Kanga, *Hints on the Study of Persian*, Bombay 1938, p. 158.
४. मो. के. दामले, **शास्त्रीय मराठी व्याकरण**, मुंबई १९११, पृ. ५८३.

मराठीमध्यें कारवारपासून 'कारवारी,' मलबारपासून 'मलबारी' असे साधित शब्द बनतात, त्याचा उगम फारसी आहे, हें यावरून कळून येईल.

विजापुरच्या युसुफ आदिलशहाला 'सवाई' असें म्हणत तें 'सवाई माधवराव' प्रमाणें असावें, अशी माझी कल्पना होती. परंतु जुजे निकलाव फोंसेक हा इतिहासकार लिहितो, "Yusuf was surnamed **Savai**, or Sabaio according to Portuguese chroniclers, from the town of Sava."[5]

म्हणजे 'सवा' शहराच्या नांवाला 'ई' प्रत्यय जोडून 'सवाई' शब्द बनला. ('कनार'ला 'ई' जोडून 'कानारी' शब्द झाला तसा). मला वाटतें इतके पुरावे पुरे आहेत.

वरील उदाहरणांवरून 'कनार' चा 'कानारी' होऊं शकतो, हें कळून येईल.

ज्यावरून 'कनार' हा शब्द पर्शियन आहे त्यावरून तो अरबांनीं दिला नसून फारसी भाषा असलेल्या मुसलमानांनीं पुढें दिला असला पाहिजे. ही गोष्ट माझ्या लक्षांत मागेंच आली होती; परंतु ती नमूद करण्याची संधि मिळाली नव्हती, ती आज प्राप्त झाली.

"हिंदुस्थानच्या एखाद्या प्राचीन नकाशांत किंवा पोर्तुगीजांच्या पूर्वेकडील 'Roteiros' नांवाच्या ग्रंथांत कनार किंवा किनार ह्या शब्दार्शी साम्य दर्शविणारें देशाचें नांव दिसत नाहीं," असाही प्रा. पिसुर्लेकरांचा एक आक्षेप आहे.

'कनार' हें देशवाचक नांव होतें, असें आमचें मुळीं म्हणणेंच नाहीं. तो संकुचित Coast (किनारा) या अर्थीं स्थलवाचक शब्द होता. त्याचा निर्देश एकाद्या ग्रंथांत किंवा नकाशांत असण्याचें कारण नाहीं.

किनारा हा फारशी शब्द आपल्यामध्यें आज इतका रूढ झाला आहे कीं तो मूळ फारशी आहे, हें केवळ संशोधक दृष्टीच्या लोकांस तेवढें माहीत आहे. त्यामुळें कनारा या स्वरूपांत तो शब्द जुन्या काळीं प्रचलित असणें संभवनीय दिसतें. त्याशिवाय तो आपल्या भाषेमध्यें इतका एकजीव होणें शक्य नाहीं. मराठीचा उल्लेख जुन्याकाळीं 'हिंदुस्तानी' असाही केलेला पाहिलेला आठवतो. त्याप्रमाणें गोमंतकीचा 'कानारीं' (कानडी या अर्थानें) असा उल्लेख एकाद्यादुसऱ्यानें चुकीनें केला असणें अशक्य नाहीं. 'सेनापति' या संस्कृत शब्दाचें अपभ्रष्ट रूप 'शेणवई' किंवा 'शेणवी' असें होतें. यावरून 'शेणवी' या शब्दाचा उगम 'सेनापति' आहे, असें म्हणतां येणार नाहीं. तसेंच 'कानारा' वरून 'कानारीं' असें रूप होणें शक्य असलें तरी देशी

5. Jose Nicolau da Fonseca, *An Historical and Archaeological Sketch of the city of Goa*, Bombay 1878, p. 130.

भाषांचा अभ्यास केलेले जेजुईत लोक अशी चूक करतील, हें संभवनीय दिसत नाहीं. "खरें पाहिलें असतां 'कानारी' म्हणजे कानाराचा रहिवाशी; परंतु मुळापासून हें अभिधान पोर्तुगीज लोक चुकीनें गोव्याच्या लोकांना लावीत आले," (Em rigor, canarim e' o habitante do Canara. Mas os portuguezes desde principio applicaram erroneamente a denominacao ao povo de Goa) असें पाद्री दालगाद यांनींही म्हटल्याचें मीं वाचलें आहे; परंतु देशी भाषांचें ज्ञान असलेले जेजुईत पाद्री यांनीं गोव्यांतील लोकांना 'कानारींस्' व कर्नाटकांतील लोकांना 'कानारास्' असेंच सर्वत्र म्हटलेलें आढळतें. कर्नाटकी लोकांचा निर्देश 'कानारीं' असा त्यांनीं केलेला मला तरी अद्यापि कोठेंच आढळला नाहीं. घाटावरच्या लोकांचा उल्लेख त्यांनीं 'देकानिस' (decanis) असा केलेला आहे. म्हणजे 'देकांव' व 'कोकण' या महाराष्ट्राच्या दोन भागांचीं नांवें परक्या लोकांत त्याकाळीं विशेष प्रचारांत होतीं. महाराष्ट्र हें नांव तसें प्रसिद्ध नव्हतें असें दिसतें.

रोम येथील जेजुईत पाद्री विकी यांनीं जेजुइतांच्या पत्रव्यवहाराचे सात खंड प्रसिद्ध केले आहेत. त्यांची एकंदर पृष्ठसंख्या सुमारें सहा हजार असावी. Documenta Indica असें या ग्रंथाचें नांव आहे. त्यांत गोवेकर (canarins) व कर्नाटकी (canaras) यांचे पुढीलप्रमाणें वेगवेगळे निर्देश आढळतातः—

खं. १ Canaris, Canaras.[६]

खं. १ Canaryns, Canaraas.[७]
(ता. २७ जून १५४६)

खं. ४ Canarins, Canaras.[८]
(ता. १५–१२–१५६४)

खं. ६ Canarins, Canaras, Decanins.[९]
(ता. १७–१२–१५६३)

---

6. J. Wicki, *Documenta Indica I*, Rome 1948, p. 120.
7. *Ibid.*, p. 120.
8. Wicki, *Documenta Indica IV*, Rome 1956, p. 838.
9. Wicki, *Documenta Indica VI*, Rome 1960, p. 103.

खं. ६ Canaras, Decanis,.Canarim.[10]
(ता. ८–११–१५६४)

यावरून गोवेकर हे कानडी असा जर जेजुइतांचा (चुकीचा का असेना) समज असता तर Canarins (गोवेकर) व Canaras (कानडी) असा त्यांनीं फरक केलाच नसता, हें उघड दिसून येणारें आहे

तोमॅ पीरिस किंवा दुवार्ति बार्बोझ यांनीं अनुक्रमें केलेले "Terra canarim" व "Cidade de biznagua chamao Canarim" हे उल्लेख कानडीचे असतील, परंतु आल्बुकेर्कच्या पत्रांतील "Canarins de Goa" व दुसरा "Canarim de Canara" हे, प्रा. पिसुर्लेकर यांनीं पुढें केलेल्या वाक्यांतील 'कानारी' शब्दां मध्यें कानडीच लोक अभिप्रेत आहेत असें खात्रीपूर्वक म्हणतां येईल असें वाटत नाहीं. गोव्यांतील Coasters म्हणजे रहिवाशी (Natives) किंवा कर्नाटकांतील रहिवाशी, असा त्यांचा अर्थ असणें जास्त शक्य आहे. इंग्लंडांतील इंग्लिश, पोर्तुगालांतील पोर्तुगीज किंवा हिंदुस्थानांतील हिंदुस्थानी असें आम्ही म्हणत नाहीं. इंग्लंडांतील रहिवासी असें म्हणतों. दों. जुवांव द कास्त्रु यांचा जो उतारा प्रा. पिसुर्लेकर यांनीं पुढें केला आहे ("घाट व समुद्र यांच्यामध्यें असलेल्या प्रदेशास कोंकण, व तेथील रहिवाशांस कोंकणी असें म्हणतात. तथापि पोर्तुगींज लोक त्या शब्दाचा अपभ्रंश करुन 'कानारी' असें त्यांना संबोधतात")-त्यावरून कानारी शब्दाचा समुद्रकांठ (Coast) असा अर्थ असावा या कल्पनेला पुष्टि मिळते. 'कानारी' हा 'कोंकणी' या शब्दाचा अपभ्रंश हें कास्त्रूचें व्युत्पत्तिशास्त्र प्रा. पिसुर्लेकरांना मान्य असेल असें वाटत नाहीं.

सुप्रसिद्ध पोर्तुगीज इतिहासकार लॉपिस द कास्ताञ्जेद यानें आपल्या १५५२ च्या सुमारास प्रथम प्रसिद्ध झालेल्या एका ग्रंथांत कर्नाटकाच्या भाषेचा उल्लेख जेजुइतांप्रमाणें 'कानारा' असाच केलेला आहे. पहाः—

"A terceyra (prouincia) se chama **Canara**" (Livro ii, Cap. XVI).[11]

---

10. *Ibid.*, p. 252.
11. Lopes de Castanheda, ***Historia de Descobrimentos e Conquista da India pelos Portuguezes***, (Editor-Pedro de Azevedo) Coimbra 1924, p. 242.

"A lingoa dos gentios he **Canara**" (Livro ii, Cap. XXII).[१२]

पोर्तुगीज लोक जर गोवा हा कर्नाटकाचा भाग समजत होते, तर जेजुइतांनीं किंवा कास्ताञ्जेद सारख्या इतिहासकारानें गोवेंकर यांना 'कानारींस्' व कानडी लोकांना 'कानारास्' किंवा त्यांच्या भाषेला 'कानारा' अशीं भिन्न नांवें कां दिलीं ? दोघांनाही 'कानारींस्' किंवा 'कानारास्' असें कां म्हटलें नाहीं, याचा खुलासा प्रा. पिसुर्लेकरांनीं केलेला आमच्या नजरेस आला नाहीं.

'कानारीं' म्हणजे कानडी असा जर अर्थ अभिप्रेत असता तर 'कानारा' असा निराळा शब्द देशी भाषांचा परिचय असलेल्या जेजुईत लोकांनीं कानडी लोकांना उद्देशून योजलाच नसता, आणि आपल्या ग्रंथांच्या भाषेला तर तो मुळींच लावला नसता. म्हणून 'कानारी' शब्दाचा अन्य कांहीं तरी उगम असावा, असें वाटूं लागलें. तो फारसी 'कनार' असें सांगतांना, २ + २ = ४ अशा निश्चयात्मक भाषेंत आमचें मत आम्हीं मुळींच मांडलेलें नाहीं. "असें वाटतें" (It appears) अशी निराग्रही शब्दांचीं रचना आम्हीं केली आहे, याकडे वाचकांचें मुद्दाम लक्ष वेधतों. यापेक्षां दुसरी एकादी जास्त सयुक्तिक कल्पना कोणी मांडल्यास तिचा आम्हीं अवश्य स्वीकार करूं. इतकेंच नव्हे तर दुसरी अशी एक कल्पना स्वतंत्र लेखांत पुढेंमागें आम्हींच मांडूंही.

हा वाद केवळ तपशिलाचा किंवा academic स्वरूपाचा आहे. स्वतः प्रा. पिसुर्लेकर किंवा पाद्री दालगाद हे, कानडीवरून 'कानारी' बोली झाली किंवा कानारी (कोंकणी) ही कानडीची बोली आहे, असें मुळींच म्हणत नाहींत. गोमंतकी बोलीला चुकीनें पोर्तुगीजांनीं 'कानडी' संबोधिलें, एवढेंच त्यांचें मत आहे. "कानारी हें नांव 'कानडी' वरून पडलें असें होण्यास मुख्य कारण म्हणजे सोळाव्या व सतराव्या शतकांतील कित्येक पोर्तुगीज इतिहासकारांच्या मतें गोवें हा कर्नाटकाचा भाग होय," असें प्रा. पिसुर्लेकर लिहितात; परंतु असा गैरसमज त्यांचा कां व्हावा, याचें कारण ते देत नाहींत. स्वतः प्रा. पिसुर्लेकरच तर, फेब्रुवारीच्या "मांडवी" च्या अंकांत लिहितात, "स. १५१० त फिरंग्यांनीं गोवें घेतलें तेव्हां 'गोवें राज्य' हें कर्नाटकाच्या राज्याहून वेगळें होतें. युसुफ आदिलशहाच्या कालप्रमाणेंच बहामनीच्या अमलाखालींही गोवें कर्नाटकांतून निराळें होतें. विजयनगरच्या अमलाखालींही गोवें असतांना सुद्धां गोव्यांत मराठी भाषेचा प्रभाव केवढा होता हें त्याकाळचा वेळूस (१४०२) व बांदोडें (स. १४१३) येथील शिलालेखांवरून उघड दिसतें."

12. *Ibid.*, p. 261.

प्रा. पिसुर्लेकर यांची स्वतःचीच ही साक्ष कानडीपासून 'कानारीं' शब्द झाला, या त्यांच्या मताच्या विरुद्ध जाणारी दिसते.

"गोव्यापासून वसईपर्यंत 'कानारीं' भाषेचा वापर होतो," या पाद्री आंतोनियु-द-क्वाद्रुश् यांच्या २०-११-१९५६ च्या पत्रांतील[13] डॉ. प्रभुदेसाई यांनीं पुढें आणलेल्या विधानाचा अर्थ, गोव्याप्रमाणें वसईपर्यंत प्रांतही पोर्तुगीज लोक कर्नाटकाचा भाग मानीत होते, असा करावा लागेल.

"A lingoa canarim, que serve por Goa ate Bacaim," यांत 'कानारीं' म्हणजे केवळ एतदेशीयांची भाषा असा अर्थ दिसतो.

Amerigo Vespucci या आद्य संशोधकाच्या नांवावरून ज्याला पुढें अमेरिका असें नांव प्राप्त झालें, त्या खंडाला 'इंडिया' व तेथील लोकांना 'इंडियन' असें ज्या युरोपियनांनीं प्रथम नांव दिलें ते, गोमंतकाला 'कानारा' कल्पून तेथील रहिवाश्यांना किंवा भाषेला 'कानारीं' म्हणतील ही गोष्ट अशक्य मुळींच नाहीं; परंतु फारशी 'कनारा' वरून 'कानारी' गोमंतकीवाचक शब्द बनला असणें जास्त संभवनीय वाटतें, एवढेंच आमचें म्हणणें आहे.

२. 'कोंकणी' भाषावाचक शब्दाचा जुना निर्देश

'कोंकणी' असा भाषावाचक शब्द केव्हांपासून अस्तित्वांत आला, हाही एक प्रश्न आहे. कारण, गोमंतकी बोलींत जेजुईत लोकांनींच प्रथम ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केली. त्यांनीं आपल्या ग्रंथांच्या भाषेला 'कोंकणी' असें कधींच म्हटलेलें नाहीं. तर 'देशाची चालू (corrente) भाषा,' 'ब्राह्मणांची बोली भाषा,' (lingoa Bramana vulgar) किंवा 'देशी बोली' (lingoa da terra vulgar") किंवा 'ब्राह्मणी कानारी भाषा' (lingoa Bramana canarim) असे भाषिक निर्देश केलेले आहेत. डॉ. प्रभुदेसायांनीं ते सर्व आपल्या पुस्तकांत दाखविले आहेत. (पृ० २८२-३) "Lingoa vulgar" याचा अर्थ, "lingua fallada, por oppos. a lingua escrita ou erudita", म्हणजे बोलण्याची भाषा, लिहिण्याची किंवा विद्वत्तेची जी भाषा तिच्यापासून भिन्न, असा Jayme de Seguier हा आपल्या कोशांत देतो.[14]

यावरून 'कोंकणी' असा भाषावाचक शब्द सतराव्या शतकांत प्रथम रूढ झाला नव्हता व १६५८ सालीं लिहिलेल्या 'जार्दिं दुश पास्तोरिश' या ग्रंथांत तो प्रथमच

13. Wicki, *op.* cit., vol. VI, p. 501.
14. Jayme de Seguier, *Diccionario Pratico Illustrado* (3rd Edition), Porto 1931.

सांपडतो असें डॉ. प्रभुदेसाई म्हणतात. 'सूम ओरिएंताल' या ग्रंथांत 'कोंकोंनीं' (Conconjm) असा उल्लेख आहे, असें प्रा. पिसुर्लेकर यांनीं दाखविलें होतें. हा ग्रंथ मलायामध्यें तोमॅ पीरिश यानें प्रथम लिहिण्यास सुरवात केली व १५१५ च्या सुमारास कोचीन येथें पुरा केला. डॉ. प्रभुदेसाई यांचें म्हणणें असें आहे कीं, गोमंतकांतून जे लोक कोचीनमध्यें गेले, त्यांना तिकडील लोक 'कोकणे' म्हणत, तेव्हां त्यांच्या भाषेलाही 'कोकणी' असें नांव तेथें मिळणें स्वाभाविक होतें. पण तें खुद्द गोमंतकांत रूढ झालें नव्हतें. म्हणून जेजुइतांनीं त्याचा निर्देश केला नाहीं. प्रा. पिसुर्लेकर म्हणतात कीं, "हा केवळ तर्क आहे." पण तर्क असला तरी तो सयुक्तिक व प्रत्ययोपादक वाटतो. तर्काच्या मदतीशिवाय संशोधन होणें शक्य नसतें.

चित्पावन लोक घाटावर गेल्यावर त्यांना 'कोकणस्थ' हें नांव मिळालें. ('देशस्थ ब्राह्मण' ही संज्ञादेखील 'कोकणस्थ' देशावर गेल्यावर अस्तित्वांत आलेली दिसते). कोंकणांत तें रूढ असणें शक्य नव्हतें. कारण कोंकणांत 'सारस्वत', 'कऱ्हाडे' असे अन्य ब्राह्मण असतांना एकट्या चित्पावनांलाच 'कोकणस्थ' हें अभिधान प्राप्त होणें अशक्य आहे. देशावर चित्पावनांना 'कोकणस्थ ब्राह्मण' हें नांव रूढ झाल्यावर कोंकणांतही तें प्रचारांत आल्यास ती गोष्ट वेगळी.

कोंकणांत जातिपरत्वें व स्थलपरत्वें अनेक बोली आहेत. चित्पावनी, कऱ्हाडी, कुडाळी, वगैरे वगैरे. मग एका गोमंतकी किंवा सारस्वती भाषेलाच खुद्द कोंकणांत किंवा गोमंतकांत 'कोंकणी' असें नांव मिळणें असंभवनीय दिसतें.

फादर स्टिफन्सनें ज्यावेळीं आपला 'दौत्रिन क्रिस्ता'[१५] हा गोमंतकी बोलींत ग्रंथ लिहिला, त्यावेळीं त्यानें तिचा 'कोंकणी' असा नामनिर्देश केला नाहीं. गोमंतकांत अनेक बोली प्रकार आहेत. स्टिफन्सनें (सासष्टीच्या) ब्राह्मणांची बोली आपल्या ग्रंथाकरितां निवडली म्हणून आपल्या ग्रंथाच्या भाषेचा 'ब्रामान कानारीं' (Bramana canarim) असा निर्देश केला आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी होय.

'ज्यादा-दुश्-पास्तोरिश्' या १६५८ सालच्या ग्रंथांतील "कोंकणें" (उतर) हें

15. Thomas Estevao, *Doutrina Christam*, Rachol (Goa) 1622. (हें पुस्तक आधीं लिहिलें तरी लेखकाच्या मरणोत्तर प्रसिद्ध झालें. त्याची यथामूल आवृत्ति डॉ. मारियानु साल्दाञ्ञ यानीं संपादिलेली १९४५ सालीं पोर्तुगाल सरकारनें प्रसिद्ध केली आहे).

भाषाविषयक अभिधान, "कोकणी ही कोंकण्यांची म्हणजे हिंदूंची भाषा ह्या कल्पनेंत असणें शक्य आहे," असें प्रा. पिसुर्लेकरांनाही वाटतें ही समाधानाची गोष्ट होय. 'कोंकणें (उतर) बरोबर 'फिरेंग' (उतर) असा त्यानें निर्देश केला आहे, त्यावरून हा वर्गविषयक (class) उल्लेख स्पष्ट दिसतो. स्थलविषयक (regional) निर्देश असता तर 'कोकणें' बरोबर 'पोर्तुगेज' (उतर) असा उल्लेख असता. कोकणी भाषा म्हणजे 'कोंकण्यांची' (हिंदूंची) भाषा असा अर्थ असल्यामुळें जेजुईत मिशनरींनीं आपल्या ग्रंथांच्या भाषेचा 'कोंकणी' असा निर्देश केला नसावा.

हिंदूंची भाषा अशा अर्थानें कां असेना, 'कोकणी' हा भाषावाचक शब्द १६५८ सालीं प्रथमच सांपडतो, हें डॉ. प्रभुदेसायांचें (व माझेंही) विधान खोटें आहे, हें दाखविण्याकरितां प्रा. पिसुर्लेकर यांनीं १६२६ चा म्हणून प्रसिद्ध असलेल्या पाद्री रिबैरूच्या कोशांतील 'कोकणी' अशा भाषाविषयक उल्लेखाकडे बोट दाखविलें आहे. एक गोष्ट प्रांजलपणें कबूल केली पाहिजे ती ही कीं, डॉ. प्रभुदेसायांनीं हा उल्लेख पाहिला नाहीं व मींही त्यावेळीं तो पाहिला नव्हता. गेल्या मे, जून महिन्यांत गोमंतकांत गेल्यावेळीं मीं तो संबंध कोश वाचून काढला आणि त्यावेळीं हा निर्देश माझ्या प्रथम नजरेस आला. 'मॉड' याचा tormento (वादळ) असा अर्थ देऊन पुढें आणखी अर्थ देतांना, "कोकणिये भासेक मोडि भौ," हें वाक्य उदाहरणादाखल दिलें आहे. त्यामुळें हा निर्देश डॉ. प्रभुदेसायांच्या लक्षांत आला नाहीं. संबंध कोश वाचल्याशिवाय तो सहसा ध्यानांत येणें शक्य नव्हतें; परंतु प्रा. पिसुर्लेकर समजतात त्याप्रमाणें रिबैरूचा कोश १६२६ चा नाहीं, ही गोष्ट डॉ. प्रभुदेसायांच्या ग्रंथाला मीं लिहिलेल्या प्रस्तावनेंत व त्याच्याही आधीं प्रसिद्ध झालेल्या 'सांतु आंतोनीचीं अश्चर्यां' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत कारणें देऊन मांडली आहे; तिच्याकडे प्रा. पिसुर्लेकर यांनीं लक्ष दिलेलें दिसत नाहीं. रिबैरूचा कोश हा 'सांतु आंतोनीचीं अश्चर्यां' हें पुस्तक (१६५५) तयार झाल्यावर त्या पुस्तकाचे कर्ते आंतोनियु द सालदाञ्ज यानें वाढविलेला असावा, असें मत मीं प्रदर्शित केलें आहे. पाद्री सालदाञ्ज १६६३ सालीं वारला. १६६३ च्या आधीं च 'अश्चर्यां' चें पुस्तक तयार झाल्यानंतर केव्हांतरी हा कोश आजच्या स्वरूपांत तयार झाला असावा; कारण सालदाञ्जांच्या पुस्तकांतील बहुतेक सर्व दुर्बोध शब्द या कोशांत मला सांपडले. इतकेंच नव्हे तर कांहीं उदाहरणेंही या ग्रंथांतील आहेत. म्हणजे ज्यांदीं दुस्-पास्तोरिस् मधील कोकणी भाषावाचक शब्द डॉ. प्रभुदेसाई म्हणतात त्याप्रमाणें पहिलाच असणें असंभवनीय नाहीं. रिबैरूच्या नांवावर असलेल्या

कोशाच्या हस्तलिखितावर १६२६ हा कालनिर्देश कोठून आला, हेंही सांगतां येण्यासारखें आहे.

कांहीं संवत्सरांचीं अशुद्ध नांवें देऊन त्यावेळीं इसवीसन कोणता येतो, हें या कोशांत दाखवितांना, क्रोधी = १६०४, पराभव = १६०६, किलक १६०८, परिधावी = १६१२ आणि "Khere" (खर कीं क्षय) १६२६ अशीं वर्षें त्यांत दिलीं आहेत. शेवटचें वर्ष १६२६ असल्यामुळें कोणीतरी संशोधक वृत्तीच्या माणसानें तो काल हस्तलिखितावर मागाहून घातलेला दिसतो. मी हा कोश घाईतच वाचला होता. प्रा. पिसुर्लेकर यांनीं याची जास्त खात्री करून घ्यावी.

प्रा. पिसुर्लेकर यांच्यासारख्या चोखंदळ संशोधकांनीं, "खुद्द नामदेवांनीं कोकणी मराठी भाषेमध्यें वेगळेपणा दर्शविला," यावर विश्वास ठेवलेला पाहून आश्चर्य वाटलें. कोणीतरी हें कवन अलीकडे रचलेलें दिसतें. तें 'खुद्द' नामदेवांनीं रचिलेलें नाहीं, हें त्याच्या स्वरूपावरूनही सहज कळून येईल. हें कवन असें आहे :

गौळणी ठकविल्या एक एक संगतीनें । मराठी कानडीया । एक मुसलमानी । कोंकणी गुजरणी । अशा पांचीजणी गौळणी ठकविल्या ॥ ध्रु० ॥ गौळणी सुंदरी । गेल्या यमुनेतीरीं । वस्त्रें फेडुनियां स्नान करिती नारी । गोविंदानें वस्त्रें । नेलीं कळंबावरी । स्नान करोनियां । त्या आल्या बाहेरी ॥ १ ॥ लडोबा गोविंदा । निरवाणी आज । आडचाल्लो पडचाल्लो । शीर फोड्या न कोडो । मारी कन्हय्या । पानी खेळ्या न खेळो ॥ २ ॥ देख रे कन्हय्या मै । इज्यतकी बढी । कदम पकडुंगी । मैयां कटोजुडा । मेरी चुनरी दे । मेरी ले दुल्लडी ॥ ३ ॥ देवकीनंदना । तूं ऐक श्रीपती । उगडी हिवांची तुज विनवूं किती । पायां पडतें बा । मी येत्यें काकुळती । माझी साडी दे । घे नाकाचें मोतीं ॥ ४ ॥ **पाव गा दाताला । तूं नंदाचा (चो) झिलो । माकां फडको दी । मी हिंवान मेलों । घे माझे (झो) कोयतो । देवा पाया पडलों** ॥५॥ ज्यो रे माधवजी । मे शरण थई । तनका काकैरी । बाप दयाळू तूंही । मारी साडी अपो । हातणी ले कंकणी ॥६॥ इतुकें ऐकुनीं । देव बोले हांसोनी । सूर्या दंडवत करा कर जोडोनी । नामा विनवितों । म्हणे सारंगपाणी । गौळ्या ऐक तूं धन्य तुझी करणी ॥ ७ ॥[१६]

वाचकांना स्वतःच ठरवितां यावें म्हणून हें संबंध कवन मुद्दाम येथें दिलें आहे. 'कोकणी' गवळणीचे उद्गार जाड टाइपांत आहेत. ही गवळणी गोवेंवाली नाहीं, कुडाळी दिसते.

१६. **नामदेवाची गाथा**, चित्रशाळा प्रेस, पुणें १९३१, अभंग ३२०, पृ. १६७.

हें कवन कोणीतरी मागाहून रचून 'नामाच्या' नांवावर घातलें असावें किंवा 'नामा' असें नांव धारण करणाऱ्या अलीकडच्या एकाद्या कवीचें तरी असावें. नामदेवाच्या नांवावर सुमारें अडीच हजार अभंग सध्या उपलब्ध आहेत, त्यांपैकीं चारपांचशें देखील 'खुद्द' (आद्य) नामदेवाचे असतील कीं काय, याबद्दल मला शंका आहे. आजगावकरांसारखे सनातनी संशोधक नामदेवाचे प्रसिद्ध असलेले तीर्थावळीचे अभंग-देखील त्यांचे स्वतःचे मानावयाला तयार नाहींत.[१७]

ज्ञानदेवाच्या नांवावर शंकास्पद वाङ्मय आम्हीं मराठी संशोधनपत्रिकेंत प्रसिद्ध केलें आहे. गोमंतकांत तर ज्ञानदेवाच्या नांवावर काव्यें रचण्याचा एक कारखानाच चालू होता, असें 'द्रुणपुराण' व 'योगवासिष्ठ' या काव्यांवरून वाटतें. एकनाथाची भागवताच्या एकादशस्कंधावरील टीका प्रसिद्ध आहे. परंतु त्याच्या नांवावर असलेली दशमस्कंधावरील टीका मीं बीड येथील पाटांगण मठांत पाहिली. ती एकादशस्कंधावर टीका करणाऱ्या एकनाथाची नाहीं, हें मीं विस्तारानें दाखविलें आहे.[१८] रा. शं. रा. बडवे या पंढरपूर संशोधनमंडळाच्या कार्यवाहांकडून नुकतेंच माझ्याकडे निवृत्तिनाथ व मुक्ताबाई यांच्या २५१ अभंगांचें एक बाड आलें. हे अभंग प्रसिद्ध गाथ्यांत नव्हते, म्हणून मीं ते उत्सुकतेनें वाचले, आणि ते अलीकडे बनविलेले वाटले; कारण त्यांत 'बाजार', 'दरवेश', 'गुलाब', 'शाई', 'कागद' असे फारसी शब्द सांपडले. हे फारसी शब्द निवृत्तिनाथ मुक्ताबाईच्या काळांत मराठी भाषेंत रूढ झाले होते, असें वाटत नाहीं.

वरील विवेचनावरून उपरिनिर्दिष्ट कवन 'खुद्द' नामदेवाचें आहे असें मानणें अगदींच भोळेपणाचें ठरेल. शिवाय त्यांतील मराठी, कोकणी, मुसलमानी, कानडी व गुजरणी हे शब्द भाषिक कीं स्थलविषयक वा जातिविषयक उल्लेख म्हणावेत हाही प्रश्नच आहे.

'कोकणी' असा स्थळविषयक निर्देश जुन्या काळीं होता, असें दाखवून, "'कोकणी' लोकांनीं आपल्या बोलींत साहित्य निर्माण केलें असतें तर ह्या बोलींचें 'कोकणी' हें नांव ह्या साहित्यामध्यें कदाचित आढळलेंही असतें," असें प्रा. पिसुर्लेकर लिहितात. हा तर्क अगदींच अप्रस्तुत आहे. जुन्या काळीं 'कोकणी' असा भाषा-

१७. ज. र. आजगांवकर, **नामदेवचरित्र**, मुंबई १९२७, पृ. २.

१८. **मराठी संशोधनपत्रिका**, मुंबई जाने० १९६१.

वाचक शब्द गोव्यांत प्रत्यक्ष अस्तित्वांत होता कीं काय, हाच केवळ आमच्यापुढें प्रश्न आहे. स्वतः प्रा. पिसुर्लेकर यांनीं लिस्बन विद्यापीठापुढें ता. २२ मे १९६० रोजीं वाचलेल्या 'पोर्तुगीजपूर्व गोवा' या माहितीपूर्ण निबंधांत, पोर्तुगीज गोव्यांत येण्यापूर्वीचे कोकणी वाङ्मयाचा कोणताही अवशेष आढळत नाहीं, फक्त मराठी व संस्कृत वाङ्मयाचा आढळतो, असें सिद्ध केलें आहे. ("A verdade e' que nao existe qualquer vestigio da existencia da literatura concani anterior a' conquista de Goa pelos Portuguezes. Existiu a literatura em Goa, sim, mas escrita em Marata ou em sanscrito."[१९]) अशा स्थितींत कोकणींत वाङ्मय लिहिलें असतें तर त्याला कोकणी असें नांव मिळालें असतें, या म्हणण्यांत अर्थ दिसत नाहीं.

३. कानारी व मराठी यांचे वेगळे नामनिर्देश

जेजुईतांच्या जुन्या पत्रव्यवहारांत 'लिंग्व मारास्त' (मराठी) व 'लिंग्व कानारिन' (गोमंतकी) असे वेगळे निर्देश केलेले आढळले म्हणून त्या दोन अगदीं स्वतंत्र भाषा म्हणतां येणार नाहींत. 'मारास्त' हा ग्रांथिक भाषेचा व 'कानारिन' हा स्थानिक बोलीचा संकेत आहे. आजही आपण मराठी, कोकणी, चित्पावनी, परभी, वऱ्हाडी असे भाषिक निर्देश करतों. आणखी एक उदाहरण देऊन हा मुद्दा जास्त स्पष्ट करतां येईल. गोमंतकांत, ब्रामण, भट असे वेगळे निर्देश द्रविड ब्राह्मण देखील करतात. म्हणजे 'भट' हे ब्राह्मणेतर आहेत, असें त्याचें म्हणणें असतें काय? किंवा गोमंतकाबाहेर ब्राह्मण, सारस्वत असें निर्देश केलेले आढळतात. म्हणून सारस्वत हे ब्राह्मण नाहींत असें ठरेल काय? पुनः एक उदाहरण पहा :—'मांडवी'च्या जानेवारीच्या अंकांत (पृ.१०) "भारतांतून गोव्यांत नवीनच गेलेल्या माणसाला तिथलीं मद्यपानगृहें पाहून जरा चमत्कारिक वाटतें," असें एका सरकारी अधिकाऱ्यानें विधान केलें आहे. गोवा हा भारताचा भाग नाहीं (व "पोर्तुगालचा तुकडा" आहे) हें सिद्ध करावयाला याचा उपयोग होईल, असें वाटत नाहीं.

---

19. Panduranga Pissurlencar, *Goa Pre-Portuguesa atraves dos Escritores Lusitanos dos seculos IXV e XVII*, Goa 1962, p. 52.

देशी भाषांच्या ज्ञानाचा गंध नसलेले जुने पोर्तुगीज सोडा, परंतु डॉ. कुन्ज रिव्हार यांच्या सारख्या गोव्याच्या भाषेवर ऐतिहासिक निबंध लिहिण्यास सज्ज झालेल्या संशोधकानें फादर स्टिफन्सच्या क्रिस्तपुराणासारख्या मराठी ग्रंथाला कोकणी पुराण असें मानावें व कोकणी व मराठी स्वतंत्र वेगवेगळ्या भाषा म्हणावें, यावरून या लोकांच्या मताला काय किंमत द्यावी, हें कळून येईल. कुन्ज रिव्हाराच्या या अज्ञानाला जबाबदार सूर्याजी आनंदराव देशपांडे हे होते, अशी माझी समजूत आहे. त्यांनीं स्टिफन्सच्या प्रस्तावनेंतील 'हें सर्व मराठिये भासेन लिहिलें आहे,' ही ग्रंथकाराची स्वतःची कबुली व त्यानें मराठी भाषेची केलेली प्रशस्ति जर कुन्ज रिव्हाराच्या वेळींच नजेरस आणण्याचें धैर्य दाखविलें असतें, तर त्यानें आपल्या ग्रंथांत केलीं तशीं हास्यास्पद विधानें मुळींच केलीं नसतीं; परंतु आपल्या साहेबांच्या लहरी-विरुद्ध देशपांड्यांना जावयाचें नव्हतें, असें दिसतें.

सूर्याजी देशपांडे हे पोर्तुगीज सरकारचे मराठी दुभाषी व सरकारी पाठशाळेचे मराठीचे अध्यापक होते. त्यांनीं मराठी भाषेचें व्याकरण[२०] पोर्तुगीज भाषेंतून लिहिलें असून एक मराठी-पोर्तुगीज कोशही त्यांनीं तयार केला होता, त्याचा पहिला भाग (अ-थ) छापून प्रसिद्ध झाला आहे.[२१] व्याकरणाच्या प्रस्तावनेंत पोर्तुगीज ही गोव्याची मुख्य भाषा असली तरी तिच्यानंतर मराठी ही अर्ध्या हिंदु जनतेची राजभाषा आहे, (a maratha e' a lingua oficial da metade da populacao) असें त्यांनीं नमूद केलें असून गोव्याचे रहिवाशी जी कोकणी वापरतात ती म्हणजे अपभ्रष्ट किंवा अशुद्ध मराठी होय (lingua concanim usada pelos habitantes de Goa e' um maratha corrumpido ou pouco puro) असें त्यांनीं म्हटलें आहे. इतकेंच नव्हे तर गोवें व मध्य मराठी देश (paiz maratha central) यामधील लोकांना एकमेकांनीं बोललेलें पूर्णपणें समजतें, अशी त्यांनीं साक्ष दिली आहे.

आपल्या कोशाच्या प्रस्तावनेंतही त्यांनीं मराठी ही हिंदूंच्या बाबतींत सरकारी भाषा (a lingua maratha que em Goa e' lingua official do

20. Suriagy Anand Rao, *Gramatica da Lingua Maratha*, Nova Goa 1876 (5?).

२१. सुर्याजी आनंदराव राजादिक्ष दळवी देशपांडे, **महाराष्ट्र-पोर्तुगेज कोश**, गोवें १८७९.

Governo) असें म्हटलेलें आढळतें. इतकेंच नव्हे तर तोमस स्टिफन्स याच्या मदतीला दोन तीन गोव्यांतील व दक्षिणेंतील (Decao) पंडित देऊन मराठी-पोर्तुगीज कोश तयार व्हावयाला पाहिजे होता; कारण मराठी भाषेचा जो त्यांनीं आपल्या क्रिस्तपुराणाकरितां व्यासंग केलेला दिसून येतो, त्यावरून हें कार्य त्यांना सहज साध्य झालें असतें, अशा अर्थाचा मजकूर या प्रस्तावनेंत आहे; परंतु वर सांगितल्याप्रमाणें आपल्या 'हितचिंतका' च्या मताविरुद्ध जाणें त्यांना कठीण झालें ! व्यवहारापुढें शास्त्र कसें लंगडें पडतें त्याचा अनुभव अलीकडेही येऊं लागला आहे.

केवळ पोर्तुगीजांनीं मराठीसंबंधीं आपल्या अज्ञानाचें प्रदर्शन केलें आहे असें नव्हे, तर आरंभींच्या इंग्रजांनींही तें केलें आहे. मुंबईच्या हैंद शाळा पुस्तक मंडळीचे सेक्रेतार क. जॉज जार्विस यानें सरकारला केलेला ता. १३ सप्टेंबर १८२३ चा रिपोर्ट मुंबई सरकारच्या दप्तरखान्यांत उपलब्ध आहे. त्यांत तो म्हणतो कीं, मराठी व गुजराती भाषा या सदाच केवळ संभाषणाच्या व व्यापारव्यवहाराच्या उपयोगाच्या होत्या आणि त्यांत अगदीं कमी दर्जाचेंदेखील वाङ्मय निर्माण झालें नाहीं. (" The Maratha and Goojrathi languages have always been restricted to the purposes of conversation and business and have never been applied to the cultivation and extension of literature even in its humblest form.")[२२]

या सद्गृहस्थानें पुढें मराठींत अनेक ग्रंथ लिहिले. पण हें विधान करतांना तो मराठी शिकला नव्हता असें मानूं; पण कर्नल व्हॅस केनेडी आपल्या इंग्रजी-मराठी व मराठी-इंग्रजी कोशाच्या प्रस्तावनेंत म्हणतो कीं, मराठी ही केवळ बोली भाषा असून तिच्यामध्यें ग्रंथकारांनीं कधीं गद्य व पद्य निर्मिती केलीच नाहीं. ("It must be observed that the Marathi is merely a spoken language and that it has never been cultivated or refined by authors either in prose or verse."[२३])

22. *The Bombay Secretariat,* G. D. Vol. 8–63 of 1824, p. 100.
23. Vans Kennedy, *A Dictionary of the Mahratha Language,* Bombay 1824.

ज्ञानेश्वरापासून मोरोपंतापर्यंत जे मराठी कवीश्वर व बखरकारादि गद्य लेखक होऊन गेले त्यांची या इंग्रजांना दादच नसावी ! किंवा ग्रांथिक मराठी व 'कानारी' (कोंकणी) बोली ही जसे पोर्तुगीज वेगळे मानीत त्याप्रमाणें आरंभींचे इंग्रज, ग्रांथिक मराठी व बोली मराठी वेगळी मानीत असावेत. ज्ञानेश्वरादि ग्रंथकारांच्या भाषेला ते प्राकृत असें नांव देत, ही गोष्ट डॉक्टर स्टिव्हन्सन यानें रॉयल एशियाटिक सोसायटीच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्याच अंकामध्यें 'मराठी लोकांची भाषा' या विषयावर जो निबंध लिहिला आहे, त्यावरून स्पष्ट होते. महाराष्ट्रीयांचें प्राकृत नांवाचें जें स्वतःचें असें वाङ्मय आहे, त्याची भाषा म्हणजे मुसलमानांनीं भर न घातलेली अशी सध्यांची बोलण्याची भाषाच जुन्या पेहरावांत होय, असें तो म्हणतो. ("The Marathas have, besides, a literature of their own written in a dialect called the Pracrit. This Pracrit, is nothing but the present spoken language in an antique dress, and without any of the modern additions to the language introduced by the Mahomedans."[२४])

"त्यांनीं कोंकणी व मराठी यामध्यें वेगळेपणा दर्शविला तरी भाषाशास्त्रदृष्ट्या त्याला कांहीं महत्त्व नाहीं. याविषयीं बोलावयाचें काम भाषाशास्त्रज्ञाचें आहे," हें प्रा. पिसुर्लेकराचें म्हणणें कोणालाही मान्य होण्यासारखें आहे.

प्रा. पिसुर्लेकर यांच्या लेखांतील तीन मुख्य मुद्द्यांचा खुलासा केला. आणखी एक दोन किरकोळ गोष्टीसंबंधींही दोन शब्द लिहितों.

पॅरिसच्या नॅशनल लायब्ररींतील 'कानारी' भाषेंतील कानडी लिपीच्या हस्तलिखिताचा डॉ. प्रभु देसाई यांना पत्ता नव्हता; कारण डॉ. पिसुर्लेकराप्रमाणें त्यांना पॅरिसला जाऊन तें पाहाण्याची संधि मिळाली नाहीं. लिस्बन विश्वविद्यालयाचे माजी प्रोफेसर डॉ. मारियानु साल्दान्ज यांनीं फान्समधील एक कानडी लिपींतील कोंकणी हस्तलिखिताच्या चारपांच पानांचे फोटो मजकडे, ते पोर्तुगालांत असतांना, पाठविले होते. ते याच ग्रंथाचे दिसतात ते मीं कांहीं कानडी विद्वानांकडे पाठविले, पण त्यांना ते वाचतां

24 John Stevenson, 'An Essay on the Vernacular Literature of the Marathas', *Journal of the Bombay Branch Royal Asiatic Society*, Vol. 1, No. 1, July 1841, pp. 1–2.

आले नाहींत ते जर त्यांना वाचतां आले असते तर त्या मूळ हस्तलिखिताचे फोटो पॅरीसहून मीं आणविले असते. कारण आमच्या विद्यार्थ्यांना जगांतील कोणत्याही भागांतील साधनें उपलब्ध करून देण्याचा आमचा नेहमींच प्रयत्न असतो. ब्राग येथील हस्तलिखितांच्या मायक्रोफिल्म डॉ. सालदाञ्ञ यांच्या मार्फत मीं तिकडून आणविल्या; परंतु त्या मायक्रोफिल्म 'रीडर'वर वाचतां न आल्यामुळें त्यांचाही डॉ. प्रभुदेसायांना उपयोग करतां आला नाहीं.

प्रा. पिसुर्लेकर यांनीं घेतलेले आक्षेप डॉ. प्रभुदेसायांच्या पुस्तकावर आहेत. त्यांचा समाचार त्यांनींच घेणें योग्य झालें असतें व तसा घेण्यास ते समर्थही आहेत. परंतु डॉ. प्रभुदेसायांबरोबर जोडीनें माझाही प्रा. पिसुर्लेकरांनीं निर्देश केल्यामुळें माझी काय बाजू आहे त्याचा खुलासा करणें मला प्राप्त झालें. डॉ. प्रभुदेसाई यांना पाठीशीं घालण्याचा हा प्रयत्न नाहीं. डॉ. प्रभुदेसाई हे तीनचार वर्षांचे माझे विद्यार्थी असले तरी, प्रा. पिसुर्लेकर गेल्या तीसचाळीस वर्षांचे माझे प्रिय मित्र आहेत.

अ. का. प्रियोळकर.

पीएच्. डी. चें मराठी संशोधन

ऑक्स्फर्ड विद्यापीठ

Mr. Alfred Master : *Development of the Marathi Language upto A. D. 1300* (1961–62).

मि. आल्फ्रेड मास्टर हे सुमारें ऐशीं वर्षांचे सेवानिवृत्त आय्. सी. एस्. असून, "मराठी भाषेची इ. स. १३०० पर्यंतची उत्क्रांति" या विषयावर प्रबंध लिहून त्यांनीं पीएच्. डी. ही ऑक्स्फर्ड विद्यापीठाची पदवी अलीकडे मिळविली. मि. लेवोनार्ड सेजविक या आय. सी. एस्. इंग्रजाप्रमाणें मि. मास्टर हेही मराठीचे एक भक्त व अभ्यासक इंग्रज आहेत. 'अजरामरवत्' अर्थ साधणारे पुष्कळ 'प्राज्ञ' असतात; परंतु विद्या साधणारे क्वचित्. अशांपैकीं मि. मास्टर एक असल्यामुळें त्यांचें विशेष कौतुक वाटतें. मि. मास्टर हे C. I., E. M. A. आहेत.

राघवाचें 'संदेहहरण'

'संदेहहरण' नांवाच्या शके १६११ सालच्या ग्रंथांचीं दोन हस्तलिखितें अलीकडे उपलब्ध झाल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. (लोकसत्ता, मुंबई ११–७–६४) हा ग्रंथ अगदीं अज्ञात आहे असें नाहीं. कै. विनायक लक्ष्मण भावे यांनीं आपल्या 'महाराष्ट्र सारस्वतां'त त्याचा निर्देश केलेला आहे. 'देवदास, शिवराम वगैरे कवी' या प्रकरणांत "संदेहहरणग्रंथाचा कर्ता राघव (१६११)" असा उल्लेख करून "यासच राघवदास असेंही म्हणतात. शके सोळाशें अकरावरी। प्रबोधनाम संवत्सरीं। अश्विन शुक्ल गुरुवारीं। विजयादशमी सुदीन॥ ते दिवशीं 'संदेहहरण' ग्रंथ पुरा झाला. या शिवाय यांचें 'अध्यात्मरामायण'ही आहे," अशी ते तळटीप देतात. आणि पुढें 'महीपती व इतर चरित्रकार' या प्रकरणांत ते आणखी माहिती देतात ती अशी,

"उद्धवचिद्घनाचा गुरुबंधु राघवस्वामी यानें शके १६११ मध्यें 'संदेहहरण' नांवाचा एक ओवीबद्ध ग्रंथ केला आहे; व या ग्रंथसमाप्तीनंतर उद्धवास चिद्घनाचा अनुग्रह झाला, असें याच परंपरेंतल्या माधवदास कवीनें आपल्या 'अलक्षनिधान' या ग्रंथांत सांगितलें आहे."

'लोकसत्ते'त जी बातमी प्रसिद्ध झाली आहे, त्यांत 'संदेहहरण' ग्रंथाचा कर्ता 'संतकवि राघव' असें नमूद करून "धाराशिवचे देवधरबुवा" अशी त्यासंबंधीं विशेष माहिती दिली आहे. ती कोणत्या आधारावर दिली आहे तें कळत नाहीं. 'संदेहहरणा'-च्या कर्त्याचें नांव 'राघव', 'राघवदास' व 'राघवस्वामी', असें भाव्यांच्या माहितीवरून कळतें. परंतु त्याहीखेरीज 'राघवचिद्घन', 'राघवरंक' असाही या ग्रंथकाराचा नामनिर्देश आढळतो. श्रीरामदासी संशोधन या नांवानें प्रसिद्ध असलेल्या धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील हस्तलिखिताच्या यादींत बाड क्रमांक १०४६ संबंधीं शंकरराव देव लिहितात, "राघवरंककृत संदेहहरण—दोन प्रती. दोन्ही अपूर्ण, एका प्रतीचीं सुमारें ३०० अस्ताव्यस्त पत्रें व दुसरीचीं अवघीं दहा. या ग्रंथाची दुसरी एक पूर्ण प्रत केच येथें पाहाण्यांत आली." या केच येथील मठांतील प्रतीसंबंधीं ते लिहितात, "बाळाजी मठांत शक १६११ त राघवांनीं लिहिलेला संदेहहरण नांवाचा ४१४८ ओव्यांचा ग्रंथ नक्कल करून घेण्यापुरता मिळाला."

केच येथील बाळाजी मठांत हें मूळ हस्तलिखित आज आहे किंवा नाहीं कळत नाहीं. तिकडे नसल्यास त्याची नक्कल करून घेतलेली प्रत श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत बाड क्रमांक १८३४ मध्यें नक्की सांपडेल.

वर सांगितलेल्या क्रमांक १०४६ बाडांतील संदेहहरणाच्या ज्या दोन त्रुटित प्रती त्यांचा कर्ता राघवरंक हें कशाच्या आधारावर देवांनीं लिहिलें कळत नाहीं. उपलब्ध

असलेल्या सदर काव्याच्या प्रतींत त्यांना तसा नामोल्लेख आढळला असणें संभवनीय आहे. एकाद्या संशोधकास त्याची शहानिशा धुळ्याला जाऊन करतां येईल. तसा जर उल्लेख खरोखरीच असेल तर या राघवरंकाचा आणखी एक ग्रंथ उपलब्ध आहे. श्रीसमर्थ-वाग्देवतामंदिरांतील क्रमांक ७१० बाडामध्यें मजकूर सांपडतो तो असा :—" राघवरंक कृत ६४ ओव्यांचें एक सुंदर प्रकरण, एक भवरोगी सद्गुरु वैद्याकडे गेला आहे व वैद्य रोग्याची परीक्षा करून त्यास काय होत आहे तें सांगत आहेत. व त्याच्या कल्याणार्थ अनुपानासह औषध घेण्याचा त्यास आग्रह करीत आहे, अशी कल्पना आहे. प्रकाशित नाही असें वाटतें. प्रकाशनास योग्य आहे."

हा राघवरंक दृष्टीपुढें असल्यामुळें 'संदेहहरण' काव्याचा कर्ता राघव व राघव-रंक एकच असावेत, अशी त्यांची समजूत होणें अगदींच अशक्य आहे, असें नाहीं.

गोविंद काशिनाथ चांदोरकर यांनीं आपल्या 'महाराष्ट्रीय संतकविकाव्य-सूचीमध्यें 'संदेहहरण' कर्त्याची नोंद 'राघवचिद्घन' अशी केली आहे. उद्धव-चिद्घनाचा तो गुरुबंधु असल्याचें जें भावे लिहितात त्याला हें नांव दुजोरा देणारें आहे. हें हस्तलिखित देवांकडे असल्याचा निर्देश चांदोरकर करतात; परंतु देवांच्या श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील संग्रहांत राघवचिद्घन या नांवाखालीं 'संदेहहरण' हें काव्य असलेलें दिसत नाहीं.

राघवालाच राघवदास असेंही म्हणतात, हें विधान भावे कोणत्या आधारावर करतात कळत नाहीं; परंतु त्यांच्या म्हणण्याला अन्यत्र आधार आढळला. पांच वर्षांमागें मी त्रिवेंद्रमला गेलों असतां तेथील केरळ युनिव्हर्सिटीच्या हस्तलिखितसंग्रहांत 'संदेहहरण' हें काव्य मला आढळलें. त्याच्यावर कर्ता म्हणून 'राघवदास' असा उल्लेख होता.

आतांपर्यंत पुढें असलेल्या माहितीवरून संदेहहरणाच्या कर्त्याचीं नांवें राघव, राघवदास, राघवरंक, राघवस्वामी, राघवचिद्घन अशीं नोंदलेलीं दिसून येतात. तसेंच या काव्याच्या चार पूर्ण व दोन त्रुटित प्रती उपलब्ध असलेल्या दिसतात. आणखीही शोधांतीं मिळण्याचा संभव आहे.

'संदेहहरण'कर्त्यासंबंधींचें संदेहहरण करावयाचें झालें तर, त्याच्या इतर काव्यांचा शोध झाला पाहिजे. याच कर्त्याचें 'अध्यात्मरामायण' नांवाचें दुसरें एक काव्य असल्याचें भावे व चांदोरकर लिहितात; परंतु त्याचें अस्तित्व मला कोठेंही आढळलें नाहीं.

या कवीची व्यक्ति व वाङ्मय यांचा शोध करावयाचा झाला तर वर सांगितेल्या निरनिराळ्या नांवांखालीं जीं काव्यें आढळतात त्या सर्वांचा अभ्यास करून त्यांपैकीं 'संदेहहरण' कर्त्याचीं कोणतीं हें अन्तर्गत पुराव्यावरून निश्चित केलें पाहिजे.

राघव या नांवाचे अनेक कवि होऊन गेले असावेत. धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवता-मंदिरांतील बाड क्रमांक १३७ मध्यें राघव या नांवाखालीं पांच पदें आहेत. त्यांतील,

स्वामी सज्जनपर्वतनिवासी ।
तारक ब्रह्म अव्यय सुखरासी ॥
सद्गुरुरूपें नमूं दत्तात्रयासी ।
स्मरणमात्रें तारिलें राघवासी ॥

या उल्लेखावरून "हे राघव म्हणजे कल्याणाचे बंधु, शिरगांव मठपति दत्तात्रय, त्यांचे पुत्र होत," असा शंकरराव देवांचा कयास आहे. या केशव दत्तात्रयाचीं पदें बाड क्रमांक २६१ मध्येंही आहेत.

राघव या नांवाच्या कवींचीं अनेक पदपदांतरें व लघुकाव्यें आढळतात. त्यापैकीं लघु काव्यें पुढीलप्रमाणें :—(आंकडे श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील बाडांचे)

१. कबीर आख्यान (५५४, ५६०),
२. गणपति आख्यान (२५०),
३. गरुडाख्यान (५५६),
४. गौरक्षनाथचरित्र (५५४),
५. जालंदराख्यान (१७३),
६. दग्धबीजारोपण आख्यान (२५०),
७. दत्तात्रय जन्मकथा (५६०),
८. ध्रुवचरित्र (१५६),
९. पांडुरंगाची आरती (५५६),
१०. बोढना रजपुत चरित्र (९४),
११. भवानीची आरती (२७०),
१२. महारुद्रस्वामीची आरती (९२),
१३. मारुतीअर्जुनसंवाद (११६५),
१४. रामजन्म (५५६),
१५. संदेहहरण (१८३४),
१६. सुदामचरित्र (५५६).

ही सगळी रचना एकाच राघवाची आहे काय किंवा संदेहहरणकर्त्या राघवाचीं यापैकीं काव्यें कोणतीं हें अन्तर्गत पुराव्यावरून कदाचित् शोधून काढतां येईल.

राघवदास या नांवाखालीं अनेक पदें सांपडतात. राघवदासाचा 'वेदमनोगत' नांवाचा १७६१ सालीं रचलेला एक ग्रंथ आहे. परंतु 'संदेहरणा'चा रचनाकाल १६११ असल्यामुळें हे दोनही ग्रंथ एकाच कवीचे नाहींत, हें उघड दिसून येणारें आहे.

राघवचिद्घन या नांवाखालीं श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत आठ बाडांमध्यें पदें आहेत. भावे व चांदोरकर म्हणतात त्याप्रमाणें 'संदेहहरण'कर्ता राघव व राघव-चिद्घनच एकच असेल तर हीं पदें 'संदेहहरण' कर्त्याचींच असावीं, असें म्हणतां येईल.

तंजावरच्या सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालयांत 'राघव' या नांवाखालीं पुढील हस्तलिखितें आहेत :—

१. कूटस्थ दीपिका,
२. चित्रदीप,
३. तत्त्वविवेक,
४. द्वैतविवेक प्रकरण,
५. पंचभूतविवेक,
६. महावाक्यविवेक,
७. विद्यानंदप्रकरण.

श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत असलेलीं आख्यानें या संदेहहरणकर्त्या राघवाचीं नसावीं; परंतु ही सरस्वतीमंदिरांतील आख्यानें त्याचीं असण्याची शक्यता आहे. भाषेवरून हें ठरवावें लागेल.

'संदेहहरण' हा ग्रंथ स्वतः मीं वाचलेला नाहीं, परंतु शंकरराव देवांना या चार हजारवर ओव्यांच्या ग्रंथाची नक्कल करून ठेवाविशी वाटली व तशी करून घेतलीही, त्यावरून हा ग्रंथ वाङ्मयदृष्ट्या व आंतील मजकुराच्या दृष्टीनें प्रसिद्ध करण्यासारखा असावा, असें वाटतें. अलीकडे एकादा उपयुक्त जुना ग्रंथ प्रसिद्ध करावयाचा झाला तर त्याच्या प्रकाशनाला मदत मिळणें फारसें कठीण पडत नाहीं. महाराष्ट्र–सरकार व आपलीं विद्यापीठें अशा कामाला नेहमींच प्रोत्साहन देतात. ह्यामुळें ज्या संशोधकांना ह्या ग्रंथाच्या दोन हस्तलिखित प्रति उपलब्ध झाल्या, ते हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याच्या खटपटींत असतील. त्यांच्या मार्गदर्शनाकरितां प्रस्तुत दोन शब्द लिहीत आहें. इतर सार्वजनिक व खासगी संग्रहांतही या ग्रंथाच्या प्रती सांपडणें शक्य आहे. त्या शक्य तेवढ्या मिळवून हा ग्रंथ प्रसिद्ध करावयाचा झाल्यास पाठभेदांसह शुद्ध स्वरूपांत प्रसिद्ध व्हावा एवढीच इच्छा.

अ. का. प्रियोळकर

पारडा शिलालेख

ले.—डॉ. वि. भि. कोलते

उपलब्धी

लोणार (ता. मेहेकर, जिल्हा बुलडाणा; महाराष्ट्र) क्षेत्राच्या दक्षिणेस सुमारें सहा मैलावर असलेल्या पारडा गावातील शिवमंदिराच्या खांबाच्या तुटून पडलेल्या एका शिळेवर हा शिलालेख मिळाला. या शिलालेखाची माहिती लोणार येथील श्री. कृष्णराव काटे यांनी मला दिली. माझ्या विनंतीवरून नागपूर म्यूझियमचे क्यूरेटर श्री. रोडे यांनी त्याचे ठसे घेण्याची व्यवस्था करून ते माझ्या स्वाधीन केले. वरील दोन्ही सद्गृहस्थांचा मी फार आभारी आहे.

पारडा येथील शिवमंदिरात एकूण चार लेख आहेत. त्यांपैकी एक मुख्य दरवाजाच्या उंबरवठ्यावर कोरलेला असून तो बराच अर्वाचीन असावा. लेख २ फूट लांब व सहा इंच रुंद असून त्यावर तीन ओळी आहेत. लेख मराठीत आहे. पहिल्या ओळीत 'भावसर भीक (कु) सेटी ला तो महीन्या पे...' अशी अक्षरे असून दुसऱ्या ओळीच्या आरंभी 'बांधिले...' हा शब्द आहे. बाकीचा भाग अस्पष्ट व दुर्वाच्य आहे. दुसरा लेख याच मंदिराच्या दारात जमिनीवर असून त्यावर 'आ पा जा' अशी अक्षरे कोरलेली आहेत. हे दोन्ही लेख आधुनिक असून मुळीच महत्त्वाचे नाहीत. याच शिवमंदिराच्या बाहेरच्या खांबावर चौकोनी लेख आहे. पण तो दुर्वाच्य आहे. शेवटच्या ओळीत १ २ ४ ५ हा आकडा अस्पष्ट दिसतो. मंदिराच्या आतील खांबावर असलेला मराठी शिलालेख मात्र स्पष्ट आहे व तोच येथे संपादन करीत आहे.

वर्णन व लेखन

या शिलालेखाची लांबी एक फूट असून रुंदी साधारणपणे ६ इंच आहे. लेख चार ओळींचा आहे. पहिल्या तीन ओळीत प्रत्येकी सुमारे १२ अक्षरे असून चौथ्या ओळीत फक्त दोनच अक्षरे आहेत. अक्षरे ठसठशीत कोरली असून प्रत्येक अक्षराची उंची साधारणपणे १ ते १॥ इंच यांच्या दरम्यान आहे. बहुतेक अक्षरांवर शिरोरेषा आहेत. १ ल्या ओळीतील **वा** आणि दुसऱ्या ओळीतील **या** अक्षरांच्या कान्यावर, तसेच दुसऱ्या ओळीतील **वी** आणि तिसऱ्या ओळीतील **गा** या अक्षरांवर शिरोरेषा द्यायच्या चुकून राहिलेल्या दिसतात. अक्षरांचे वळण यादवकालीन दिसते.

लेखनकाल

प्रस्तुत शिलालेखात कालनिर्देश नाही. अक्षरांच्या वळणावरून तो १४ व्या शतकातील असावा असे वाटते. व्रीती, आसु, दंडी, वीजैया या शब्दांची रूपे यादवकालीन आहेत. यादव रामचंद्रदेव याच्या सावरगाव व कोपराड शिलालेखात **व्रीति** (**ती**) शब्द आलेला आहे. शके १३२० च्या मुसलमानकालीन काही शिलालेखात

तो 'त्रीती' असा आढळतो. 'आसु' या नाण्याचा प्रचार यादवकालात होता. त्यानंतर मुसलमानकाळात ते प्रचारातून गेले. प्रस्तुत लेखात गाढवावरून शिवी दिलेली आहे. असे 'गद्धेगाळी'चे लेख यादवकालात विशेष आढळतात. त्यानंतरही काही काळ गद्धेगाळी प्रचारात असली तरी अक्षरांचे वळण, मुसलमानी शब्दांचा अभाव, आसु या नाण्याचा उल्लेख, वीजैया हे रूप यांवरून हा शिलालेख यादवकालीन, फार तर उत्तर यादवकालीन असावा असे वाटते.

गद्धेगाळीचे शापवचन विशेषेकरून यादवांच्या आणि शिलाहारांच्या शिलालेखात आढळते. (प्रामकोले. प्रस्ता. पा. ५७) बहामनी सुलतान फेरोजशहा याच्या वेळच्या (शके १३२०) काही शिलालेखांतही ते आढळते.[1] या सर्व शिलालेखांतील ही गद्धेगाळीची वचने सूक्ष्मपणे पाहिली तर असे लक्ष्यात येते की, उत्तरकालीन शिलालेखांत ही गद्धेगाळ अपराध्याच्या आईवरून केलेली आहे. 'तेहाचीए माएसि गाढौ +वे' असा या शापवचनाचा प्रकार त्यात आढळतो. पण शके १०८६ च्या कदंब मरुडदेव याच्या सावरगाव येथील शिलालेखात मात्र आईचा उद्धार केलेला नाही. 'फेडी तो स्वान गाढवु' एवढीच शिवी अपराध्याला हासडली आहे. यावरून असे दिसते की, आरंभी आरंभी अशा प्रकारची शिवी केवळ अपराध्याला उद्देशून दिलेली असे, तर नंतरच्या काळात ती त्या अपराधी व्यक्तीच्या आईवरून देण्यात येऊ लागली. प्रस्तुत शिलालेखातील गद्धेगाळ आईवरून केलेली नसून अपराधी व्यक्तीला उद्देशून केलेली आहे हे लक्ष्यात घेण्यासारखे आहे. यावरून व यापूर्वी नमूद केलेल्या कारणांवरून हा शिलालेख यादवकालीन असावा असे म्हणता येते.

विषय

प्रस्तुत लेखाचा उद्देश पारडा येथील 'गाउदेवा'ला चाडुए गावीची वृत्ती दिल्याचा निर्देश करण्याचा, तसेच त्यासंबंधीचे काही आदेश निर्दिष्ट करण्याचा दिसतो. दर्शन घेताना देवासमोर ठेवलेल्या मुद्रा जो घेईल त्याला २० आसूंचा दंड सांगितलेला असून जो हा दंड देणार नाही त्याला गाढव लागेल असे शापवचन आहे. देवाचे, अर्थात, देवळातील देवतेचे जो पालन करील, (पालापाणी घालून पूजाअर्चा करील इत्यादि) तो विजयी होईल असा शेवटी आशीर्वादही दिलेला आहे. यावरून **घे** आणि **न दे** या क्रियापदांनी सूचित होणाऱ्या क्रिया देवळातील देवासंबंधी असल्या पाहिजेत हे स्पष्ट दिसते.

---

१. यादवोत्तर पण शिवपूर्वकाळातील काही मुसलमानशिलालेखात ही गद्धेगाळ आढळते. मूर्तजा निजामशहाच्या कारकीर्दीत (इ. स. १५६५ ते १५६८) बिस्मत खानाने अहमदनगर येथील मशिदीतील दिवाबत्तीसाठी दिलेल्या इनामासंबंधी एक शिलालेख आहे. (एपि. इंडो मोस्लेमिका १९३९-४०, पा. ३०) त्याच्या शेवटी 'जो कोण्ही मना करील त्याचे मापर गधव' अशी गद्धेगाळ आहे.



पारडा शिलालेख

स्थलनिश्चिती

शिलालेखात निर्देशिलेले 'चाटु' गाव कोणते हा प्रश्न आहे. 'सर्व्हे ऑफ इंडिया'च्या नकाशात या नावाचे गाव पारड्याच्या जवळपास असलेले आढळत नाही. तथापि, १९५१ च्या जनगणनेच्या वृत्तांतात पारड्याजवळ 'किनगाव चाथु' (Kingaon Chathu) नावाच्या गावाचा उल्लेख आहे. हेच गाव 'किनगाव **जट्टु**' म्हणून आज प्रसिद्ध आहे. 'चाटु' या शब्दाचे जट्टु असे उच्चारांतर झाले असणे अशक्य नाही. 'किनगाव जट्टु' या गावाचा 'किनगाव चाथु' असा उल्लेख ज्या अर्थी जनगणनावृत्तांतात आहे (Census of India, Madhya Pradesh, Buldana District, page 80) त्याअर्थी महसूल खात्याच्या दप्तरात 'चाट्ट (थु)' असे हे नाव परंपरेने नोंदले गेले असावे असे वाटते. पारडा येथील संबंधित देवळाला किनगाव चाटु (जट्टु) येथील वृत्ती मिळालेली असावी असा तर्क करण्यात हरकत नाही.

वाचन

१ **(श्री)[1] गाउदेवा चाट[2](ट्ट)ऐ गांवीची त्रीती द [शी][3]**

२ **न[4] [मु][5]द्राऐ[5] घे तेया वीस आसु दंडी**

३ **[न][6] दे तेयासी गाढौ देवाते पाली तो (वी)[7]**

४ **जैया**

---

१. ठशात हे अक्षर 'त्रा' किंवा 'द्रा' सारखे दिसते. ते 'श्री' असे वाचले पाहिजे. २. 'ट' च्या खाली दगड फुटलेला आहे. त्यामुळे वाचन दुर्बोध झाले आहे. फुटलेल्या ठिकाणी उकाराचे चिन्ह दिसते. ३. या ठिकाणची अक्षरे दगड फुटल्यामुळे अपूर्ण आहेत; तथापि **द** आणि **श** चा पूर्वभाग स्पष्ट आहे. ४. ठशावरून हे अक्षर 'न' असावे असे वाटते. ते 'ळ' असे वाचता येणेही संभवनीय आहे. ५. या शब्दाचे वाचन अनिश्चित आहे. 'द्रा' हे अक्षर स्पष्ट आहे. त्यापूर्वीचे अक्षर 'मु' असावे असे मला वाटते. 'दर्शनमुद्रा' या ऐवजी 'दळभद्रा' असे वाचन डॉ. मो. ग. दीक्षित सुचवितात; तर 'देउळस्था' असे डॉ. य. खु. देशपांडे सुचवितात. ती मला समाधानकारक वाटत नाहीत. ६. हे अक्षर ठशात स्पष्ट नाही. त्या जागी असलेल्या अस्पष्ट चिन्हावरून ते 'न' असावे असे वाटते. डॉ. य. खु. देशपांडे यांनी हे वाचन सुचविले आहे, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. ७. येथे दगडाचा भाग फुटलेला असल्यामुळे अक्षर अपूर्ण व अस्पष्ट आहे. 'व' स्पष्ट दिसतो. पुढील अक्षरांच्या संदर्भाने ते अक्षर 'वी' असे वाचले पाहिजे.

क्रिस्तपुराण आणि कै. वि. का. राजवाडे

अर्वाचीन महाराष्ट्रांत हाताच्या बोटावर मोजण्याजोगे जे गाढे विद्वान होऊन गेले, त्यांत कै. वि. का. राजवाडे यांची सहज गणना होईल. प्राच्यविद्येची जी जी म्हणून शाखा आहे, तिच्यावर त्यांनीं आपली लेखणी चालविली आणि त्यांनीं ज्या ज्या शाखेंत लेखणी चालविली तिच्यावर आगळा प्रकाश टाकून ती वादविषय बनवून ठेविली. सुप्रसिद्ध जेझुइट पुराणकार फा. स्टीफन्स याच्या 'क्रिस्तपुराणा'चेंहि त्यांनीं आपल्या सराईत संशोधकी प्रतिभेनें परीक्षण आणि निरीक्षण केलेलें होतें. एतद्विषयींचा त्यांचा लेख प्रथम 'विश्ववृत्तां'त[1] प्रसिद्ध झालेला असून तो 'राजवाडे लेखसंग्रह, भाग ३ रा, संकीर्ण निबंध'[2] या पुस्तकामध्यें संग्रहीत करण्यांत आलेला आहे. राजवाड्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्तानें त्यांच्या त्या क्रिस्तपुराणावरील लेखाची यथामति पाहाणी करणें, हें या लेखाचें उद्दिष्ट आहे.

१९०६ सालच्या ऑक्टोबरमध्यें मुंबईच्या एसियाटिक सोसायटीच्या शतसांवत्सरिक उत्सवप्रसंगीं श्री. जे. एल्. साल्डाणा यांनीं फा० स्टीफन्सच्या क्रिस्तपुराणाची ओळख करून दिली. तिच्या आधारें कै० राजारामशास्त्री भागवत यांनीं 'विविधज्ञानविस्तार' मासिकांतून या पुराणाचा परिचय मराठी वाचकांना करून दिला.[3] तदनंतर १९०७ सालीं साल्डाणांची क्रिस्तपुराणाची रोमन लिपींतील पाठशुद्ध प्रत प्रसिद्ध झाली.[4] राजारामशास्त्री भागवतांचा विस्तारांतील लेख आणि साल्डाणांची ही क्रिस्तपुराणाची आवृत्ति हीं डोळ्यांसमोर ठेवून राजवाड्यांनीं आपला प्रस्तुत 'स्टेफेन्सचें क्रिस्तपुराण' हा लेख लिहिलेला आहे.[5] राजवाड्यांच्या या लेखांत त्यांच्या सखोल विद्वत्तेबरोबरच त्यांच्या आग्रही वृत्तीचाहि प्रत्यय येतो आणि त्यांचीं कित्येक विधानें अरतींपरतीं करूनच स्वीकारावीं लागतात.

ग्रंथाचें भाषिक मोल

'स्टेफेन्सचें खिस्तपुराण' या लेखांतील एकंदर प्रतिपादनाचा आशय असा आहे :—(१) खिस्तपुराणाला महत्त्वदावर प्रस्थापित करण्याच्या हेतूनें राजारामशास्त्री

---

१. वि. का. राजवाडे, "स्टेफेन्सचें खिस्तपुराण," **विश्ववृत्त**, व. २, अं. ८ (फेब्रुवारी १९०८), कोल्हापूर, पृ. १–१९. २. वि. का. राजवाडे, **राजवाडे लेखसंग्रह, भा. ३ रा : संकीर्ण निबंध,** पुणें, शके १८५७, पृ. १४६–१५८ (संक्षेप : सं. नि.). ३. रा. रा. भागवत, "मराठीचा एक काथोलिक भक्त", **विविधज्ञानविस्तार,** पु. ३७, अं. १२ (डिसेंबर १९०६), मुंबई, पृ. ४५३–४६४. ४. जोसेफ एल्. साल्डाणा (संपा.), **दि क्रिश्चनपुराण,** मंगलोर, १९०७. (संक्षेप : साप्रत). ५. **सं. नि.,** पृ. १४६–१५८.

भागवत आणि जे. एल्. साल्डाणा यांनीं स्टीफन्सचे मूळचे गांवढळ उच्चार शिष्ट स्वरूपांत मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. (२) ग्राम्य भाषेस्तव व अपभ्रष्ट उच्चारास्तव स्टीफन्सला महाकवि म्हणतां येत नाहीं, इतकेंच नव्हे, तर सामान्य संभावित कवींतहि त्याची गणना करतां येणें मुष्कील आहे.

हीं विधानें करतांना त्यांनीं स्टीफन्सच्या भाषेसंबंधीं व उच्चारांसंबंधीं आपले आडाखे दिलेले आहेत. शिवाय या मुख्य विधानांच्या जोडीनें क्रिस्तपुराणाचें वृत्त 'ओवी' नसून 'अभंग' आहे आणि क्रिस्तपुराणाच्याच भाषेचें व्याकरण स्टीफन्सनें रचलें आहे, अशा प्रकारचीं उपविधानेंहि त्यांनीं केलीं आहेत.

राजवाड्यांना काव्यदृष्ट्या 'क्रिस्तपुराण' जरी टाकाऊ वाटत असलें, तरी त्याचें भाषिक मोल त्यांना मान्य आहे. त्याच्या भाषेची पाहाणी करून त्यांनीं म्हटलें आहे कीं, "शालिवाहनाच्या पंधराव्या शतकांतील मराठी भाषेंत जे सुस्निङ्क्त प्रत्यय प्रचलित होते, ते प्रस्तुत ग्रंथांत नामी सांपडतात."[६]

भागवत आणि राजवाडे

क्रिस्तपुराणाची भाषा मराठी पण लिपि रोमन आहे. भागवतांनीं स्टीफन्सच्या पुराणाची ओळख करून देतांना त्यांतील दोन उताऱ्यांचें लिप्यंतर करून ते नागरींत दिले आहेत. या उताऱ्यांतील शब्दरूपांबाबत भागवत कांटेकोरपणें जागरूक नसल्यामुळें राजवाड्यांनीं त्यांच्यावर कोरडे ओढले आहेत. राजवाडे म्हणतात, "जुने लेख किंवा ग्रंथ, त्यांचें खरें स्वरूप जाणावयाचें असल्यास, जसेच्या तसेच छापले पाहिजेत, असा नियम आहे."[७] राजवाड्यांच्या या विधानाबद्दल आतां दुमत होईल असें वाटत नाहीं. क्रिस्तपुराणांतील नमनाच्या पहिल्या सहा आणि मराठी भाषेच्या स्तुतीच्या चार ओव्या अशा भागवतांनीं उद्धृत केलेल्या दहा ओव्यांतील उच्चारांची छाननी राजवाड्यांनीं यानुसार केली आहे. या दहा ओव्यांतील रोमन-लिपिनिविष्ट अक्षरांचें देवनागरींत लिप्यंतर करतांना भागवतांनीं एकंदर ९८ स्थळीं सुधारणा कशा केल्या आहेत, हें त्यांनीं दाखवून दिलें आहे. या आधारावर भागवतांच्या विद्वत्तेचा कठोर अधिक्षेप करून राजवाड्यांनीं त्यांच्यावर हलगर्जीपणाचा, स्वजनजुगुप्सेचा आणि खोटेपणाचा आरोप केलेला आहे. राजवाड्यांनीं दाखविलेल्या सुधारणा आणि केलेली फोड बहुतांशीं बरोबर असली, तरी त्यांनीं केलेला भागवतांचा अतिरेकी अधिक्षेप आणि त्यांना चिकटविलेले हेतु अनैठायीं वाटतात, कारण परकीय मिशनऱ्यानें लिहिलेल्या आणि एकंदरींत फार काळ अलक्षित राहिलेल्या एका वैशिष्ट्यपूर्ण काव्यग्रंथाची ओळख मराठी

---

६. **तत्रैव**, पृ. १५८. ७. **तत्रैव**, पृ. १५०.

वाचकांना करून देणें, एवढाच भागवतांच्या लेखाचा माफक उद्देश दिसतो; त्या ग्रंथांतील भाषेचें नेमकें स्वरूप भाषाशास्त्रीय दृष्टिकोणांतून वाचकांसमोर मांडणें हा त्याचा खचितच हेतु नव्हता. या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत कांहीं सन्मान्य अपवादभूत संपादक वगळतां, इतरांनीं जुने ग्रंथ पुढें मांडतांना ते घांसून पुसून शुद्ध करूनच पुढें मांडलेले आढळून येतात. 'नवनीतां'तील उतारे शुद्ध करून मांडले गेले असावे असें मत मांडण्यांत आलेलें आहेच. पाठशुद्ध राजवाडीप्रत प्रथम लोकांना रुचली नाहीं, त्यामागील एक कारण म्हणजे तीमधील रूपें फार अपरिचित वाटत होतीं. पाठशुद्ध आवृत्त्या काढण्याची प्रथा अलिकडची आहे. नेमक्या ऐवजीं नेटकें आणि 'खऱ्या' ऐवजीं 'बरें' छापण्याची प्रथा तेव्हां जारी होती. भागवत, आपल्या लेखांतील फुटकळ उतारे देतांना या प्रथेला बळी पडले, असें फार तर म्हणतां येईल. राजवाड्यांनींच अन्यत्र दिलेला दाखला योजून बोलायचें, तर सगळेच आंधळे, तिथें एकालाच फांशीं देण्यांत काय अर्थ ?

फा. स्टीफन्सनें क्रिस्तपुराणाला जी चारपांच पृष्ठांची गद्य प्रस्तावना लिहिली आहे, तिला 'अत्यंत जुनें गद्य' म्हणून भागवतांनीं संबोधिलें होतें. याबाबत भागवतांना 'निर्लज्ज', 'अज्ञ' यांसारखीं शेलकीं विशेषणें लावून 'महाराष्ट्र कवि' नामक मासिकांतील 'पंचतंत्र' आणि त्यांनीं स्वतः 'ग्रंथमाला' मासिकांत तेराव्याचौदाव्या शतकांतील जें जुनें मराठी गद्य छापलें होतें, त्याचा उल्लेख करून राजवाड्यांनीं म्हटलें आहे, "पण वितंडवाद करण्यांत काळ खर्चणाऱ्या शास्त्र्यांस त्याचें परिशीलन व मनन करण्यास वेळ कोठचा ? एकाद्या किरिस्तावानें किंवा गौरकायानें इंग्रजींत कोठें टूं केलें कीं ह्यांनीं कान टवकारलेच."[८] स्टीफन्सच्या गद्यप्रस्तावनेला 'अत्यंत जुनें गद्य' म्हणतां आलें नाहीं, तरी 'कालोल्लेखित जुनें गद्य' असें खचित म्हणतां येईल. ही प्रस्तावना मराठी जुन्या गद्याचा दुर्मिळ नमुना आहे. तेव्हां भावार्थानें भागवतांच्या म्हणण्यांतहि अगदींच तथ्य नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं.

साल्डाणांवरील आक्षेप

भागवतांच्या लेखाचा माफक हेतु ध्यानांत घेतल्यास राजवाड्यांनीं त्यांना जें धारेवर धरलें आहे, तें अस्थानीं वाटलें, तरी जुन्या मराठी भाषेचें यथार्थ ज्ञान नसल्याचा क्रिस्तपुराणाचे संपादक साल्डाणा यांच्यावर त्यांनीं केलेला आरोप अवास्तव म्हणतां यावयाचा नाहीं. आपल्या पाठशुद्ध आवृत्तीच्या प्रस्तावनेंत मूळ रोमन लिपींतील काव्याचें नागरी लिप्यंतर करण्याचे नियम देतांना साल्डाणांनीं बराच प्रपंच केलेला आहे. या प्रपंचावरून साल्डाणांचा जुन्या मराठी लेखनाशीं यथावत् परिचय नसावा, हेंच दिसून येतें. फा. स्टीफन्सचा ग्रंथ स. १६१४ मध्यें रचिला गेलेला आहे. सोळाव्या शतकाच्या अखेरीस आणि सतराव्या शतकाच्या प्रारंभीं मराठीच्या नामविभक्ति आणि

८. तत्रैव, पृ. १५७.

आख्यातविभक्ति कोणत्या स्वरूपाच्या असत, शब्दरूपें कशीं असत, याचें नेमकें ज्ञान संपादक साल्डाणांपाशीं असणें अवश्य होतें. पण तसें तें नसल्यामुळें स्वरोच्चारांसंबंधीं त्यांनीं नाना प्रकारचे विकल्प सुचविले आहेत. साल्डाणांना भागवतादि मंडळींचा संगतिदोष सडकून बाधल्याचें सांगून राजवाड्यांनीं त्यांचे प्रमाद उदाहरणांसह उघड केलेले आहेत. एक दोन बाबींसंबंधीं खुद्द राजवाड्यांचाच घोटाळा झालेला असला, तरी एकंदरींत त्यांची भाषिक पाहाणी पुष्कळशी अचूक आहे, हें निःसंकोचपणें मान्य करणें भाग आहे.

साल्डाणांचा समाचार घेतांना उपस्थित झालेल्या उच्चारविषयक मुद्द्यांचा येथें क्रमशः विचार करूं :—

(अ) **रोमन 'e' चा उच्चार :** साल्डाणांनीं 'ई' चे शब्दारंभींची, शब्दामधील व शब्दांतींची असे तीन प्रकार कल्पून वरेंच विवेचन केलें आहे.[९] आज आपण ज्या उच्चारांना शुद्ध मानतों त्यांच्याशीं मिळतेंजुळतें घेण्याचाच प्रयत्न त्यांत दिसतो. साल्डाणांच्या मतें 'ई' च्या 'ए' या नेहमींच्या उच्चाराबरोबर 'अ' आणि 'य्' असे आणखी दोन उच्चार स्टीफन्सला अभिप्रेत होते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें :—

(i) carye, surye, caye (कार्ये, सुर्ये, काये) या शब्दांतील अंत्य 'e' चा तसेंच *c*araueya, pra*gh*ataueya यांतील मध्य 'e' चा उच्चार 'अ' करावा.

(ii) s*a*te, sune (सते, सुने) यांसारख्या शब्दांतील अंत्य 'e' चा तसेंच *a*tent*a* (अतेंत) सारख्या शब्दांतील मध्य 'e' चा उच्चार 'य्' करावा.

हें म्हणणें मराठी शब्दरूपांच्या शुद्धतेविषयींच्या आधुनिक कल्पना समोर ठवून मांडलेलें आहे, हें उघड दिसतें. साल्डाणांचें यासंबंधींचें सर्व विवेचन कसें चुकीच्या मार्गानें गेलेलें आहे, हें दाखवितांना राजवाड्यांनीं म्हटलें आहे, "क्रिस्तपुराणांतून येथून तेथून कोठेंहि 'e' चा उच्चार शब्दाच्या आदि, मध्यें, अंतीं एकच म्हणजे 'ए' असा आहे. s*a*te, *a*tent*a*, sune वगैरे शब्दांतील 'e' चा उच्चार 'य' आहे असें संपादक म्हणतात, तें चुकीचें आहे. पंधराव्या शतकांत अपभ्रष्ट मराठींत हे शब्द सते, अतेंत, सुने असे उच्चारीत असत. सत्य, अत्यंत, शून्य असे उच्चारीत नसत."[१०] पुढें राजवाड्यांनीं s*a*te या शब्दांचीं पुराणांतील उदाहरणें देऊन त्यांतील अंत्य e चा उच्चार 'य' कसा होणार नाहीं, हें सप्रमाण दाखवून दिलें आहे. स्टीफन्सला जेव्हां 'सत्य' हा उच्चार अभिप्रेत असतो, तेव्हां त्याचें रोमनीकरण तो s*a*ti*a* असें करतो, ही गोष्ट त्यांनीं ओवी उद्धृत करून

---

९. **साप्रत**, "प्रस्तावना", पृ. ५१–५३. १०. **सं. नि**, पृ. १५०.

निदर्शनास आणली आहे. सते आणि सत्य हे दोन्ही उच्चार स्टीफन्सला अभिप्रेत असले पाहिजेत, हें दर्शविणारें त्यांनीं दिलेलें त्रिनतोड प्रमाण म्हणजे यमकापेक्षा त्यांनीं २–१८–५७ ही ओवी देऊन तिच्या पहिल्या तीन चरणांचें अंत्य यमक 'प्रोफेतें–होंतें–सते' असें साधावें लागतें, तर २–२३–६४ या ओवींत तें 'सत्य–नव्हत–जिवित्व' असें साधावें लागतें, हें दाखवून पहिलींत Sate तर दुसरीं Satia असें रोमनीकरण करण्यांत आल्याचेंहि दाखवून दिलें आहे.[११] यमकापेक्षेनें चरणांतीं Sate चें नागरीकरण 'सते' केलें जावें अशा आणखीहि कित्येक ओव्या क्रिस्तपुराणांतून काढून दाखवितां येतात. (उदा. :—१–१–४२, १–९–३४, १–२१–८१, १–२७–४२, १–३४–९७, २–१३–८१, २–१६–९६, २–३१–२७, २·३३·७८, २·४६·१८१, २·५२·४३ इ.) तीच यमकापेक्षा nite निते या शब्दाबाबतहि दिसते (उदा० २·२४·२, २·२८·११, २·२९·१३ इ.). जुन्या मराठींत त्य, ज्य, द्य, ग्य, न्य, स्म इत्यादींचें उच्चारांतर अनुक्रमें ते, जे, दे, गे, ने, से, असें होई, ही गोष्ट साल्डाणांना ज्ञात नसावी. तुकारामाच्या जगनाडी गाथ्यांत अशीं रूपें विपुल प्रमाणांत दिसून येतात. उदा० :—सते (सत्य) ११३६, १२२२, १२२४, १२५५; वैरागे (वैराग्य) ९९४; बाहे (बाह्य) ११२०; भोगे (भोग्य) २२०; गदेंपद्यें (गद्यपद्यें) २९५; राजे (राज्य) १२१५; सुनें (शून्य) १३४; दासे (दास्य) ६७८; मनुसे (मनुष्य) १५२. विष्णुदासनाम्याच्या हरिश्चंद्रपुराणाचें हस्तलिखित पाहण्यांत आलें होतें, त्यांतहि राजे (राज्य) १·१८, सिशे (शिष्य) १·६७, द्रवे (द्रव्य) ४·१७७ अशीं रूपें आढळून आलीं. योगराजटिळकांत साधे (साध्य) ८४, लीळाचरित्र भाग २, पूर्वार्ध, पृ० ६३ वर असाहे (असह्य), शिशुपालवधांत धाने (धान्य) १९४ अशीं रूपें येतात. राजवाडेसंपादित ज्ञानेश्वरींत पाये ११·५३१, सोये १६·३५५ अशीं रूपें येतात. हें पाहिलें कीं, अंतींच्या 'e' चा उच्चार 'अ' ठरविण्याची मुळींच आवश्यकता नाहीं, हें स्पष्ट होईल. caraueya सारख्या धातुसाधितांतील मध्य 'e' चा उच्चार 'ए' च होतो. राजवाडेसंपादित ज्ञानेश्वरींत जालेया १·२४, करावेया २·१६३, निस्तरावेया, १८·१६३९ विसावावेया १८·१६४८ अशीं 'एयां'त रूपें मिळतात. atenta अतेंत सारखीं रूपेंहि जुन्या मराठींत अनेक दिसून येतात. उदा० :—अनेथा (अन्यथा), जगनाडी गाथा ५८८, अनेत्र (अन्यत्र), दासबोध ३·२·४४, अंतेज (अंत्यज), ऋद्धिपुरवर्णन २९७, अवेंग (अव्यंग), राजवाडी ज्ञानेश्वरी १५·४१४, कितेक (कित्येक) विष्णुदासनामा हस्तलिखित आदिपर्व ४८·११४. वेथा, वेसन, वेवस्था, वेव्हार, वेर्थ यांसारखीं रूपें क्रिस्तपुराणांतल्याप्रमाणें ज्ञानेश्वरी, दासबोध, मुक्तेश्वरी भारत यामध्यें आढळून येतात. तेव्हां आद्याक्षरांतील 'e' चा उच्चार 'ए' च करणें प्रशस्त ठरतें. सारांश आदि, मध्यें, अंतीं

११. तत्रैव, पृ. १५१.

येणाऱ्या 'e' चा उच्चार 'ए'च होतो हें राजवाड्यांचें मत मान्यच करावयास हवें. या प्रकारच्या उच्चारांतरांमुळें अपभ्रष्टतेचा आणि, गांवढळपणाचा जो आरोप राजवाडे करतात; तो मात्र मान्य होण्यासारखा नाहीं. भाषेच्या स्वरूपासंबंधींचें राजवाड्यांचें एतद्विषयक विवेचन मात्र अवश्य ध्यानांत घ्यावयास पाहिजे. परंतु क्रिस्तपुराणाची जी नागरी आवृत्ति अलिकडे काढण्यांत आली आहे[१२], तींत याबाबत विचार केलेला दिसून येत नाहीं.

(आ) **'थें' हा चतुर्थीचा प्रत्यय :** त्यातें, मातें, स्त्रियेतें यांच्यासारख्या रूपांत 'तें' ऐवजीं क्रिस्तपुराणांत 'थें' हा प्रत्यय येतो. क्रिस्तपुराणांतील त्याचें रोमनीकरण thê असें आहे. साल्डाणांनीं 'तें' हा विभक्तिप्रत्यय 'थें' होण्याचें कारण इंग्रजांच्या महाप्राण उच्चार करण्याच्या लकबीमध्यें शोधलें आहे. यासंबंधीं राजवाडे म्हणतात, "मूळ संस्कृत शब्द अर्थें, त्याचें प्राकृत महाराष्ट्री रूप अत्थे, त्याचें शक ५०० पासून शक १२०० पर्यंतचें मराठी आर्थें किंवा आर्तें. त्याचें वर्तमानकालीन 'तें'. 'तें' हा सध्यां मराठींत चतुर्थीचा प्रत्यय समजतात. शालिवाहनाच्या पंधराव्या शतकांतील एक गुरुचरित्र मजजवळ आहे, त्यांत 'तें' च्या ऐवजीं 'थें' हा चतुर्थीचा प्रत्यय नियमानें लिहिलेला आढळतो."[१३] राजवाड्यांचें हें मत तसेंच सबंध पुराणांत चतुर्थीचा 'ला' प्रत्यय अजिबात नाहीं, हें त्याचें विधानहि अचूक आहे.

(इ) **ai चा उच्चार :** साल्डाणांनीं zanni*zaila*, mh*annaila* यांचें नागरी लिप्यंतर 'जाणिजेल', 'म्हणेल' असें करावें, असें म्हटलें आहे.[१४] त्यांच्या मतें 'e' बरोबरच '*ai*' चाहि उच्चार कधीं कधीं 'ए' असा करावा. यावर राजवाडे म्हणतात, "जाणिजैल, म्हणैल, सांघैन, बोलैन वगैरे एल, एन प्रत्ययान्त रूपें पंधराव्या शतकांतील मराठींत होतीं, तींच स्टेफेन्स यानें योजिलीं आहेत."[१५] राजवाडेसंपादित ज्ञानेश्वरींत देखैल ११–१२२, जोडैल १७–१८६, पडैल १३–२५६ यांसारखीं रूपें विपुल प्रमाणावर आढळतात. तेव्हां *ai* या स्वरयुग्माच्या उच्चाराबाबतहि राजवाड्यांचें मतच ग्राह्य ठरतें.

(ई) **श्, ष्, स् यांचें रोमनीकरण :** क्रिस्तपुराणांतील ऊष्म्यांचें रोमनीकरण हा वादग्रस्त प्रश्न ठरलेला आहे. साल्डाणांनीं 'ꝭ'चे श्, ष् आणि स् असे तीन, 'x'चे श् आणि स् असे दोन आणि 'ss'चा 'स्' असे नागरी उच्चार

---

१२. शांताराम बंडेल (संपा.), **फादर स्टीफन्सकृत क्रिस्तपुराण**, पुणें, १९५६. (संक्षेप : बंप्रत) १३. **सं. नि.**, पृ. १५२. १४. **साप्रत**, "प्रस्तावना", पृ. ४९. १५. **सं. नि.**, पृ. १५२.

करावे, असें म्हटलें आहे.[१६] जुन्या शब्दरूपांची यथातथ्य माहिती नसल्यामुळें 's' आणि 'x' च्या उच्चारासंबंधीं साल्डाणांनीं अतिव्याप्तीचा प्रमाद केलेला आहे. साल्डाणांवर आक्षेप घेतांना राजवाड्यांनीं म्हटलें आहे, "स्टेफेन्स 'श' चें स्पेल रोमन x नें करतो. 'स' स्पेल s नें करतों व 'श'चें ssनें करतो. ह्याला सगळ्या पुराणांत एकहि अपवाद नाहीं. असें असूनहि पुराणांतील उच्चारांना व तद्द्वारा भाषेला वर्तमानपणा आणण्याकरतां s चा उच्चार स, श, ष ह्यांपैकीं वाटेल तो होतो व ss चा उच्चारहि कधीं कधीं स होतो, असें विचित्र प्रतिपादन साल्ढाणा करतात. मराठी भाषेच्या पूर्वचरित्रासंबंधानें अज्ञान व पुराणासंबंधानें खोटा अभिमान यांनीं प्रेरित होऊन संपादकानें हे असले गचाळ नियम प्रस्तावनेंत घातले आहेत, हें उघड आहे."[१७] या विवेचनावरून आणि भागवतांच्या लिप्यंतरांत दुरुस्त्या सुचवितांना दिलेल्या शब्दांच्या रूपांवरून क्रिस्तपुराणांत 'ष' कार नाहीं, ही गोष्ट राजवाड्यांना अभिप्रेत दिसते. जुन्या हस्तलिखितांत किंवा ग्रंथांत 'ख्>ष्' या प्रक्रियेतून आलेला 'ष्' वगळला, तर मूळ 'ष्' बद्दल कित्येकदां 'स', 'श' किंवा 'ख' झालेला दिसतो. ना. गो. कालेलकरांच्या मतें 'ष्' चा उच्चार मराठींत 'श्' असाच होतो.[१८] तेव्हां फा. स्टीफन्ससारख्या परभाषकानें 'ष' आणि 'श' यांतील भेद ध्यानांत घेतला नसल्यास त्यांत नवल नाहीं. राजवाड्यांना क्रिस्तपुराणांत 'श्' आणि 'स्' हे दोनच उष्मे अभिप्रेत दिसतात आणि तें चूक नाहीं. मात्र फा० स्टीफन्सचें लिप्यंतर पोर्तुगीज भाषेतील उच्चारपद्धतीच्या धर्तीवर आहे, याची राजवाड्यांना कल्पना दिसत नाहीं. ss चें लिप्यंतर 'श्' होतें, हें त्यांचें विधान प्रमादयुक्त ठरतें. प्रा० अ. का. प्रियोळकर यांनीं आपल्या एका पुस्तिकेंत हा प्रमाद दाखवून दिलेला आहे. ते म्हणतात, "ss चा उच्चार 'स्' नसून 'श्' च आहे, असा जो राजवाड्यांचा आग्रह तो चुकीचा आहे. वस्तुस्थिति म्हणजे पोर्तुगीजलेखनपद्धतीप्रमाणें दोन स्वरांमध्यें जर s येईल तर त्यावेळीं s चा उच्चार 'स्' न होता 'झ्' होतो. तो 'स्' राहावयाचा असेल तर ss लिहावा लागतो, तसा स्टीफन्सनें लिहिला आहे."[१९] प्रा० बंडेलू यांनीं आपल्या नागरी आवृत्तींत 'x'चा उच्चार कधीं 'ष्' तर कधीं 'श्' दिला आहे आणि s चा उच्चार 'स्' तर कधीं 'श्' दिला आहे.[२०] असो. ssच्या उच्चारांतील प्रमाद वगळल्यास उष्म्यांसंबंधीं राजवाडेच बरोबर आहेत, असें म्हणावें लागेल.

---

१६. **साप्रत**, "प्रस्तावना", पृ. ५७–५८. १७. **सं. नि.**, पृ. १५३. १८. ना. गो. कालेलकर, **ध्वनिविचार**, पुणें, १९५५, पृ. ४५. १९. अ. का. प्रियोळकर, **पिताजी तोमास स्टीफन्स याचें क्रिस्तपुराण, आरंभीं थोडेसें**, वसई. १९४९, पृ. ७९. २०. **बंप्रत** "प्रस्तावना", पृ. ५७.

क्रिस्तपुराणाचा छंद कोणता?

क्रिस्तपुराणाचा छंद कोणता, ओवी कीं अभंग, या प्रश्नासंबंधीं राजवाड्यांचें विवेचन पुष्कळसें सदोष आणि दुराग्रही वाटतें. राजवाडे म्हणतात, "ह्या पद्याचा छंद कोणता? अभंग कीं ओवी? प्रो. भागवत अभंग म्हणतात व डॉ. कीर्तिकर downright ओवी म्हणतात. पैकीं खरा कोण? गेल्या वर्षीं मराठी छंदावर मीं एक छोटासा निबंध सरस्वतीमंदिर नामक द्वैमासिक पुस्तकांत लिहिला आहे, त्याजकडे प्रो० भागवताप्रमाणें विद्वान् डॉ. कीर्तिकर नजर फेंकतील तर त्यांच्या मतांत तेव्हांच फरक पडेल व स्टेफेन्स स्वतः म्हणतो त्याप्रमाणें डॉ. कीर्तिकरहि त्याच्या पद्याला अभंग म्हणूं लागतील. स्वतः कवि आपल्या एक नाहीं, दोन नाहीं, दहा हजार पद्यांना अभंग म्हणतो आणि डॉ. कीर्तिकर त्यांना downright ओवीच्या सदरांत काढतात, तेव्हां ह्या झिंगट जुलुमाला काय म्हणावें !!!"[२१] राजवाडे 'स्वतः कवि म्हणतो' असें म्हणतात त्याचें कारण प्रत्यक्ष क्रिस्तपुराणांत व क्रिस्तपुराणाच्या गद्यप्रस्तावनेंत त्यानें या शब्दाचा, तत्सूचक वाटावा असा उपयोग केलेला आहे. उदा० :—

(१) दाहा सिविळांची कथा व पैलेआ पुराणाचा अभंगु (१·३६· शीर्षक).

(२) तो संखु चालते वरुसीं। वसंतकाळीं वैसाखमासीं। देवग्रंथु मराठियेसि। अभंगु केला (२·५९·१२०)

(३) दों पुराणांचे अभंग केले...(गद्य प्रस्तावना). यांतील तिसरा उल्लेख राजवाड्यांच्या विधानाला पोषक ठरावा असाच वाटतो. परंतु 'अभंग' शब्दाचा अर्थ त्या काळीं जो रूढ होता, तो ध्यानीं घेतला, तर हें वाटणें बरोबर नाहीं, हें स्पष्ट होईल. गोव्याच्या दप्तरखान्यांत सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धांतील एक कोंकणीचा कोश प्रस्तुत लेखकास पाहावयास सांपडला. त्या कोशांत अभंग शब्दाचा पोर्तुगीज अर्थ 'a fim da escritura' असा दिलेला असून 'कथेचा अभंगु केलो' असा तेथें उपयोगहि दिलेला आहे. प्रा. अ. का. प्रियोळकर यांनीं वर उल्लेखिलेल्या पुस्तिकेंत 'अभंग' चा अर्थ 'ग्रंथाचा शेवट' असा दिला असून राजवाड्यांचें एतद्विषयक मत खोडून काढलें आहे.[२२] १९३३–३४ सालीं 'प्रतिभा' पाक्षिकांत प्रा. प्रियोळकर आणि कै. पु. मं. लाड यांच्यामध्यें याच शब्दाच्या अर्थाविषयीं वाद उत्पन्न झाला होता. त्यावेळीं 'ओवी' या अर्थीं 'अभंग' शब्दाचाहि निर्देश होतो, असा मुद्दा श्री. वा. ना. देशपांडे यांनीं पुढें मांडला होता.[२३] खुद्द राजवाडे आपल्या 'मराठी छंद' या निबंधांत म्हणतात, "ओवी बंध दोन प्रकारचाः

---

२१. **सं. नि.**, पृ. १५६. २२. अ. का. प्रियोळकर, **उ. नि.**, पृ० १९.
२३. वा. ना. देशपांडे यांचें पत्र, **प्रतिभा**, व. २ अं ४, (१६ फेब्रुवारी १९३४), पृ० ३१–३२.

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. संग्रहांक
क्रमांक ७५८६६ दिः ...
क्रिस्तपुराण आणि राजवाडे ... २१२९ ... नोंदः दिः २२।३।८७

ओवी व अभंग. प्रायः प्रत्येक समाक्षरी व किंचित विषमाक्षरी ओवी अभंग होऊं शकते व अभंगासारखी म्हणतां येते. पण प्रत्येक अभंग ओवी होऊं शकत नाहीं; कारण ओवीचे तिन्ही चरण सयमक असावे लागतात. अभंगाला हा निर्बंध नाहीं. कित्येक अभंगांचे दुसरा व तिसरा असे दोनच चरण सयमक असतात. त्यामुळें सयमक चरणत्रयात्मक जो अभंग तेवढाच काय तो ओवी होऊं शकतो."[२४] मा. त्रिं. पटवर्धनांनींहि अभंगाचा एक विशिष्ट प्रकार ओवीसारखा असल्याचें नमूद केलेलें आहे.[२५] राजवाडेप्रभृतींचें हें म्हणणें मान्य केलें, तर अभंगाच्या पोटीं ओवी येते, असें म्हणावें लागेल व फा. स्टीफन्सच्या पद्याला, त्या व्यापक अर्थानें 'अभंग' म्हणावें लागेल; परंतु स्टीफन्सचें झाडून सारें दहा हजार पद्य सयमक चरणत्रयात्मक असल्यामुळें तिला 'ओवी' हें अभिधान राजवाड्यांच्या लक्षणानुसारच लागू पडतें, त्याचें काय ? तेव्हां अगदीं राजवाडीय विवेचनांतूनच हें सिद्ध होतें कीं, स्टीफन्सच्या काव्याच्या छंदाचें नेमकें नांव 'ओवी' च होय. कीर्तिकरांनीं यांत 'झिंगट जुलूम' कसलाच केलेला नाहीं. राजवाडेसंपादित ज्ञानेश्वरींतील ओवी आणि स्टीफन्सची ओवी साडेतीन चरणी आणि सयमक चरणत्रयात्मक आहे. ज्ञानेश्वरीच्या पद्याला, कोणी कशाला खुद्द राजवाडेहि 'अभंग' म्हणत नाहींत. 'ओवी'चीं रूढ लक्षणें ध्यानांत घेतलीं तर 'अभंग' या अतिव्याप्त नांवापेक्षां 'ओवी' हेंच चपखल वृत्तनाम येथें योग्य ठरतें. अशा प्रकारच्या पद्यरचनेला 'ओवी' हाच शब्द सार्वत्रिक रीत्या लावण्यांत येत होता आणि लावण्यांत येतो. स्टीफन्सला हा शब्द ज्ञात नव्हता, असें नाहीं. उदा०

मोइजेसि न माये हरिकु। उछ्यावो करिती प्रजालोकु
म्हणती गितीं गाऊं स्वामि येकु। **वोवियां** मंगळें (१·१७·४९)

'अभंग' शब्द 'ग्रंथाचा शेवट' या अर्थीं उपयोजिला जात असे, याची साक्ष महानुभाव वाङ्मयांत मिळते. नरेंद्रकवीसंबंधींची आठवण देतांना स्मृतिस्थळांत म्हटलें आहे; "या ग्रंथाचा **अभंगु** मज द्यावाः मी जेतुकिया **वोवीया** तेतुके सोनटके आणि चौथरीया आसु वोवाळणि घालीन."[२६] 'ग्रंथाचा अभंगु' आपणांस द्यावा म्हणजे ग्रंथांतीं आपलें नांव गोंवावें, अशी मागणी रामदेवरायानें नरेंद्रकवीस केली होती; पण आपल्या कविकुळाला बट्टा लागेल, म्हणून त्यानें ती नाकारली, या संदर्भात प्रस्तुत वाक्य आलेलें आहे. येथें वोविया हा शब्दहि आलेला आहे. तेव्हां 'अभंगु' आणि 'वोविया' ह्या शब्दांचे येथील अर्थ अगदीं

मराठी ग्रंथ संग्रहालय, पुणे. संग्रहांक १५१५७

२४. वि. का. राजवाडे, **मराठी छंद**, पुणें, शके १८४८, पृ. ३५.
२५. मा. त्रिं. पटवर्धन, **छंदोरचना**, मुंबई, १९३७, पृ. ५१६.
२६. वा. ना. देशपांडे (संपा.), **स्मृतिस्थळ**, यवतमाळ, १९३९, स्मृ. ३७.

भिन्न प्रकारचे आहेत, हेंहि स्पष्ट होतें. मात्र या स्थलीं टीप देतांना या ग्रंथाचे संपादक वा. ना. देशपांडे यांनीं म्हटलें आहे, "प्राचीन ग्रंथांत ओवीला अभंग व अभंगाला ओवी म्हटल्याचीं उदाहरणें आढळतात. तेव्हां येथें हा शब्द मुळांत वृत्त—(metre) पर आहे, हें उघड आहे. A part for the whole या न्यायानें अभंग वा ओवी म्हणजेच ग्रंथ."[२७] पण हें म्हणणें चूक आहे, हें आतां वेगळें सांगावयास नको. याच स्मृतीसंबंधीं लिहितांना महानुभावीय वाङ्मयाचे संशोधक ह. ना. नेने यांनीं म्हटलें आहे, "अभंग हा शब्द येथें तरी वृत्तार्थीं निःसंशय नाहीं. पोथी समाप्त होत असतां नांवाचा उल्लेख करणें, असा अर्थ येथें अभिप्रेत आहे, असें वाटतें."[२८] नेने यांचे लेखसंग्रह अलिकडे प्रसिद्ध झाले आहेत, त्यांतील पहिल्या भागांत कृष्णमुनीचा 'अन्वयस्थळ' हा छोटा पद्यग्रंथ छापण्यांत आला आहे.[२९] त्यांत दामोदर पंडिताविषयीं म्हटलें आहे :—

यानंतरें ग्रंथ : वछाहरण केलें : अभंगीं घातलें : केशवातें ॥ सौजन्य करूनी : केशवराजमुनी : अभंगी घालुनी : ग्रंथ केला ॥ आंतींच्या अभंगीं : दामोदर जाणा : पातली नमना : पंडिताही. (७२–७४)

दामोदरपंडितानें 'वछाहरणां'त 'म्हणे मुनी केशवराजु' असें नांव प्रसंग-समाप्तींत गोंविलें आहे, त्याला अनुलक्षून हा उल्लेख आहे. या ठिकाणींसुद्धां 'अभंग' याचा वृत्तार्थीं उपयोग नाहीं, हें उघड आहे. सारांश राजवाड्यांनीं 'अभंग' शब्दाचा वृत्तार्थीं घेतलेला अर्थ आणि स्टीफन्सच्या पद्याला लावलेलें 'अभंग' हें अभिधान बरोबर नाहीं. क्रिस्तपुराणाचा छंद अभंग नसून ओवीच आहे.

व्याकरण कोणत्या भाषेचें ?

क्रिस्तपुराणाची भाषिक पाहाणी करतां करतां राजवाड्यांनीं आणखीहि एक प्रमादयुक्त मत मांडलें आहे. तें असें :—"ज्या भाषेंत पुराण लिहिलें त्या भाषेचें स्टेफेन्सनें व्याकरण लिहिलें व त्या व्याकरणाला Arte da Lingua canarin असें नांव दिलें. Arte da Lingua canarin म्हणजे कानडी भाषेचें व्याकरण. कानडें म्हणजे बोबडें, हलकें, अपभ्रष्ट. त्याचें स्त्रीलिंग कानडी. कानडें जें मराठी त्याचें व्याकरण. कानडें मराठी म्हणजे महाराष्ट्रांतील अत्यंत खालच्या प्रतीच्या लोकांत बोललें जाणारें मराठी. कानडी ह्या शब्दाचें रोमन स्पेल canarin. ड् बद्दल r चा उपयोग केला आहे."[३०]

---

२७. **तत्रैव**, टीपा, पृ. १२८. २८. ह. ना. नेने, **संशोधन लेखसंग्रह**, भाग १, नागपूर, १९५७, पृ. १५७. २९. **तत्रैव**, पृ. ८३. ३०. **सं. नि.**, पृ. १५६.

राजवाड्यांची ही अनुमानपरंपरा पायाशुद्ध नाहीं. 'कानारी' ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधीं वाद असला[३१], तरी त्याच्या अर्थाविषयीं वाद नाहीं. त्याचा अर्थ 'कोंकणी' किंवा 'मराठीची गोमंतकी बोली' हाच आहे. राजवाड्यांनीं स्टीफन्सचें व्याकरण पाहिलेलें नसावें. नाहींतर ज्या भाषेंत पुराण आहे, त्याच भाषेचें व्याकरण आहे, अशा आशयाचें विधान ते करतेना. शिवाय ह्या भाषेला मिशनरी लोक Lingua Bramana म्हणजे 'ब्राह्मणांची बोली' म्हणत असत. ही बोली सासष्टींतील सारस्वत ब्राह्मणांची बोली होती. खालच्या प्रतीच्या लोकांची नव्हती. गोव्यांतील मराठीच्या या बोलीला मिशनरी आणि पोर्तुगीज लोक 'कानारी' म्हणत असत. स्टीफन्सचें पुराण कोंकणींतील लकबींनीं युक्त असलें, तरी तें प्रमाण-मराठींत आहे. त्याचें व्याकरण पोर्तुगीज भाषेंत लिहिलेलें असून तें मराठीच्या कोंकणी बोलीचें आहे.

बोली आणि अर्थव्यंजकता

राजवाड्यांनीं स्टीफन्सच्या पुराणांत 'अपभाषित्व, म्लेंच्छत्व व अशिष्टोच्चारित्व' आहे व त्यामुळें हें पुराण महाकाव्य नसून तें एक 'अधम' काव्य आहे, असें या लेखांत ठायीं ठायीं म्हटलें आहे.

शुद्ध, संस्कृतनिष्ठ ग्रांथिक भाषा 'मध्यम' लोकांना कळत नाहीं म्हणून आपण 'ब्राह्मणांचे भासेचीं उतरें ठाईं ठाईं मिस्रित करुनु कवित्व सोंपें केलें,' असें स्टीफन्सनेंच म्हटलें आहे.[३२] तसेंच हें आपण कांहीं नव्यानें करीत नसून 'सांपुचेआ कवेस्वरांच्या रितुप्रमाणें' (सांप्रतच्या कवीश्वरांच्या पद्धतीप्रमाणें) करीत आहोंत, असाहि निर्वाळा त्यानें दिलेला आहे. याचा अर्थ असा कीं, तत्कालीन कवींच्या रीती-प्रमाणें बोलींतील लकबी योजून स्टीफन्सनें आपल्या काव्याचा अवघडपणा कमी करण्याचा प्रयत्न केला आहे.

तात्त्विक दृष्ट्या पाहिलें तर कवित्व 'सोपें' केलें, म्हणून तें श्रेष्ठ ठरणार नाहीं किंवा कनिष्ठहि ठरणार नाहीं. जीं सोपीं 'उत्तरें' किंवा कोंकणीच्या लकबी कवीनें योजल्या असतील, त्या जर जिथल्या तिथें असतील, काव्याच्या ओघांत एकरसी बनल्या असतील, त्यांच्यामुळें काव्याचा पोत विरळ वा भरड झालेला नसेल, तर त्यावर आक्षेप घेण्यासारखें कांहींच नाहीं. उलट बोलींतील नवे शब्द टांकसाळींतून आलेल्या नव्या नाण्यासारखे करकरीत असतात, ते प्रमाणभाषेंतील शब्दांप्रमाणें अति वापरानें गुळगुळीत बनलेले नसतात; त्यामुळें पुष्कळदां अशा शब्दांच्या उपयोगानें

---

३१. **मांडवी** (गोवा) या मासिकाचे जानेवारी, मार्च, एप्रिल व जुलै १९६४ चे अंक पाहा. ३२. **साप्रत**, "प्रस्तावना", पृ. ९३.

काव्याला अधिक गोचरता, सूचकता, अर्थव्यंजकता आणि जिवंतपणा येण्याचाहि संभव असतो. बहिणाई चौधरी, बा. भ. बोरकर किंवा व्यंकटेश माडगूळकर यांच्या भाषेतील प्रादेशिक वैशिष्ट्यांच त्यांच्या लेखनाला वेगळी खुमारी आणतात, यांत शंका नाहीं. तेव्हां राजवाड्यांची या बाबतींतली अवहेलनात्मक दृष्टि बरोबर नाहीं. आधुनिक मतानुसार बोली या प्रमाणभाषेला पोषक आणि पूरक जीवनरस मिळवून देणाऱ्या उपनद्या असतात. राजवाड्यांची दृष्टि या आधुनिक मतांशीं जुळणारी नाहीं. अपभ्रष्टतेचा आक्षेप घेऊन लेखणीच्या फटकाऱ्यासरशीं क्रिस्तपुराणाला 'ग्रंथाधम'म्हणून ते मोकळे झालेले आहेत. राजवाड्यांनींच चोंभा कवीचें 'उषाहरण' प्रसिद्ध केलें आहे. त्यांतलीं शब्दरूपें स्टीफन्सच्या काव्यांतील भाषेशीं जुळणारीं आहेत. राजवाड्यांनीं त्या काव्याला शिष्टमान्यतेची कसोटी लावून 'ग्रंथाधम' वगैरे कांहीं म्हटलेलें नाहीं. रामदासांच्या उच्चारानुसारी लेखनाच्या लपेटीमुळें दासबोधांत अपभ्रष्ट रूपें इतस्ततः दिसून येतात; पण राजवाडे रामदासांचें स्तुतिगायनच करतात.[३३] तेव्हां या सर्व विवेचनाचा मथितार्थ हा कीं, भाषेच्या प्रमाणस्वरूप पाहून वेगळीं रूपें काव्यांत आढळलीं, तर तेवढ्यानें तें काव्य 'अधम' प्रतीचें ठरणार नाहीं.

रसविघ्नस्वरूप अपभ्रष्टता

तरीसुद्धां काव्याच्या एकंदर सरणींत खटकतील, भाषेची समता बिघडवतील अशीं शब्दरूपें काव्याच्या भाषेंत येतील, तर त्यानें रसभंग झाल्याशिवाय राहाणार नाहीं. क्रिस्तपुराणाच्या भाषेंत असे जाचक विशेष आहेत यांत शंका नाहीं. मात्र राजवाडे म्हणतात, त्या प्रमाणांत या पुराणाची भाषा गांवढळ नाहीं. तरीपण काव्याच्या आस्वादाच्या दृष्टीनें या तुरळक येणाऱ्या लकबींमुळें काय घडतें, हें पाहणें चूक ठरणार नाहीं. प्रत्येक ललितकृतीचा विचार सौंदर्यनिर्मिति करण्यांत कलावंत कितपत यशस्वी झालेला आहे, यावर अवलंबून असतो. काव्यांतील सौंदर्य हें कांहीं अंशीं भाषेच्या समतेवर अवलंबून असतेंच. ज्ञानेश्वर-मुक्तेश्वरांच्या ओवीची उत्स्फूर्तताच नव्हे, तर एकनाथी ओवीची सहजप्रसन्नताहि क्रिस्त-पुराणांत कमी जाणवते, यांचें एक कारण भाषेंतील खटकणारीं रूपें हें असूं शकेल. भाषेची समता ढळविणारे क्रिस्तपुराणांतील पुढील शब्दप्रयोग आणि शब्दरूपें पाहा :- कंति (कांति) १·६·१९, कौसाल्य (कौशल्य) १·४·१२२, येरांड (एरंड) १·३३·१७, त्रळ्या (तृषा) २·१५·५८, पुस्टी (पाठ) २·४१·२० झालोरी (झालर) २·१०·७, मातोंग (मातंग) १·४·५६, ता (तो) १·१·२०, मया (माया) १·४·१, क्रडा (क्रीडा) २·६·१४, अनुविश्वासु (अविश्वासु) २·४५·१२९, घोंटेर (कोटर) २·४५·२३१, प्रति (प्रीति) १·१·१६६,

---

३३. वि. का. राजवाडे, **रामदास**. सातारा, शके १८४८, पृ. ११–१२.

स्स्टाये (शिष्टाई) २·४२·४१, उतपना (उत्पन्न) १·१२·६८, वहनि (वह्नि) २·४६.७२, तुंटणें (तुटणें) २·१७·९, भिंती (भितात) १·१५·१५१, फुंका (फुका) २·२०·१०१, मालंती (मालती) १·३०·३९, वैंकुंठ (वैकुंठ) १·८·१५१, खंचित (खचित) १·३३·५१, संपुर्न (संपूर्ण) २·२८·५३, ग्राहाण (ग्रहण) २·४८·८८, प्रस्ट्नु (प्रश्न) १·१·१२९, उस्ट्न (उष्ण) १·३·७, विहावो (विवाह) १·७·३७, अविस्ट (नवलाची), २·३१·२९, दुतरा (धोतरा), १·३३·१७, वचनां (वचनें), १·२३·५३ आदिमुळां (आदिमुळें) १·१·१५८, नखेत्रां (नक्षत्रें) २·२६·४२, तेग (तिघे) १·१·२२, इकुणास्तर (एकुणसत्तर) १·७·१५, करोनिति (करोत) १·२४·७५, पडलेंव (पडलों आहों) १·६·९, आलेंव (आलों आहों) २·१०·१०, होंशाल (व्हाल) १·४·१२२, जांशाल (जाल) १·२२·९३, करिशाल (कराल) १·११·२५, होमु साक्रिफिस्यु १·१९·२५.

अशा प्रकारचे शब्दप्रयोग अभिमत प्रमाणग्रंथांत क्वचित् आढळून येतातहि; पण त्यांचें प्रमाण क्रिस्तपुराणांतील अशा शब्दांच्या मानानें कमी असतें. एकसंध रीतीनें परिणाम साधल्याशिवाय कलाकृतींतील सौंदर्याचा साक्षात्कार होणें अशक्य असतें. विचित्र वाक्प्रयोगांच्या उपस्थितीमुळें दुधांत मिठाचा खडा पडावा, तसें वर्ण्य-विषयाभोवतींचें वातावरण नासून जातें. बोलींतल्या लकबींनीं ज्याप्रमाणें काठिण्य किंवा अपरिचितार्थ उत्पन्न होऊन चालणार नाहीं, तद्वतच त्यामुळें विचित्रपणाचा धक्का बसून भाषेच्या समतागुणाला अडथळा होतां कामा नये. सर्वसामान्य रसिकाच्या बाबतींत क्रिस्तपुराणांतील पोर्तुगीज शब्द आणि कोंकणी लकबी कित्येकदां काव्यरसास्वादांत विक्षेप निर्माण करतात. रसविघ्नाच्या सदरांतच त्यांना टाकावें लागेल. क्रिस्तपुराणाची ग्राम्यता या अर्थानें आक्षेपार्ह आहे. राजवाडे याचें म्हणणें तेवढ्या मर्यादेपुरतेंच ग्राह्य मानतां येईल.

पुराण कोणासाठीं लिहिलें?

क्रिस्तपुराणकारानें आपलें पुराण कोणासाठीं रचलें, हा मुद्दा या संदर्भात ध्यानांत घेतला, तर क्रिस्तपुराणाच्या भाषेंतील विषमतेची संगति लागूं शकेल. प्रा. बंडेलू यांनीं आपल्या नागरी आवृत्तीच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे, "स्वतःभोवतीं क्रिस्ती व क्रिस्तीतर असा संमिश्र श्रोतृवृंद जमलेला असून त्यांना आपण कथा निवेदन करीत आहोंत अशी कल्पना त्यांनीं (कवीनें) केलेली आहे."[३४] क्रिस्तपुराणकारानें आपल्या पुराणांत पृच्छक श्रोत्याला उद्देशून 'ब्राम्हणु' 'विप्रु' असे शब्द 'क्रिस्तांव' शब्दाच्या जोडीनें उपयोजिले आहेत. वास्तविक हा

---

३४. **बंप्रत**, "प्रस्तावना", पृ. ६९.

'ब्राम्हणु' म्हणजे क्रिस्ती ब्राम्हण आहे. 'ब्रम्हकुळीं क्रिस्तांव भारु' (१·१·१७८) त्याच्या पुराणश्रवणास येत होता. दुसऱ्या पुराणाच्या चौदाव्या अवस्वराची शेवटची ओवी आणि पंधराव्याची पहिली ओवी यांचा एकत्र विचार केल्यास कथानिवेदकानें एकाच व्यक्तीस 'क्रिस्तांव' व 'ब्राम्हण' हे दोन्ही शब्द लावलेले आहेत, हें स्पष्ट होतें. एकदां हा 'ब्राम्हण' श्रोता या बेटाचें त्वरित क्रिस्तीकरण न झाल्याबद्दल हळहळहि व्यक्त करतो (२·४१·१३९). अशा स्थितींत तो हिंदु असण्याऐवजीं 'क्रिश्चन' असण्याची शक्यताच बलवत्तर आहे. तेव्हां क्रिस्ती आणि क्रिस्तीतर असा संमिश्र समाज निवेदकासमोर होता हें बंप्रतीच्या संपादकाचें म्हणणें वास्तविक ठरत नाहीं. क्रिस्तपुराणाचा वाचकवर्ग प्रामुख्यानें नवक्रिश्चनांचा होता. त्यांच्या मागणीवरूनच मराठी पुराणांना प्रतिपुस्तक म्हणून हें पुराण रचण्यांत आलेलें आहे. (१·१·१४२–१४३). तेव्हां स्टीफन्सनें क्रिस्तपुराणांत उपयोजिलेले आपोस्तोल, इग्रेज, क्रेद, कोंन्फेसोर, मार्तिर यांसारखे धर्मकारणांतील पोर्तुगीज शब्द 'दौत्रिनीं' सारख्या पाठ्यपुस्तकांमुळें नवक्रिस्ती लोकांत आधींच रुळलेले असणार. तसेंच कोंकणीं बोलीच्या लकबींशीं परिचित असलेल्या त्याच्या वाचकाला त्याच्या भाषेंतलीं इतरांना विचित्र भासणारीं रूपें, तशीं वाटणारहि नाहींत. देशावरील मराठी वाचकाला किंवा प्रमाण मराठी भाषेंतील ग्रंथवाचन अंगवळणीं पडलेल्या सर्वसाधारण मराठी वाचकाला क्रिस्तपुराणांतील मराठी भाषा, कानाला वेगळ्या वाटाव्या अशा लकबींनीं युक्त आहे.

फा. स्टीफन्सच्या क्रिस्तपुराणासंबंधीं राजवाड्यांनीं लिहिलेल्या लेखांतील विधानांची येथवर चर्चा केली; कारण राजवाड्यांच्या विवेचनांतच विचारांना खाद्य पुरविण्याचें सामर्थ्य होतें. 'क्रिस्तपुराण' हा कांहीं राजवाड्यांचा खास अभ्यासविषय नव्हता. तरीसुद्धां रामदासांप्रमाणेंच जुन्या मराठी भाषेचे राजवाडे हे उस्ताद होते. त्यांनीं क्रिस्तपुराणाचें भाषिक महत्त्व ओळखलें होतें. एतद्विषयीं त्यांनीं जी गति आणि मति दाखविली आहे, तिची तऱ्हा 'सो सोनरकी, एक लोहारकी' अशा स्वरूपाची आहे. 'नास्ति कश्चिद् अविषयो नाम' हें वचन यथार्थतेनें लागू पडणारे राजवाड्यांसारखे विद्वान् विरळाच.

तुकारामबावाच्या अभंगांची गाथा

(पत्रव्यवहार)

इ. स. १९५० सालीं तुकारामाच्या निर्याणाला तीनशें वर्षे पुरीं झालीं. या प्रसंगानिमित्त 'शंकरपांडुरंगी' किंवा 'पंडितांचा' म्हणून प्रसिद्ध असलेल्या आणि इंदुप्रकाश प्रेसमध्यें छापून सरकारच्या आश्रयानें दोन भागांत (पहिला १८६९, दुसरा १८७३) प्रसिद्ध झालेल्या "तुकारामबावाच्या अभंगांची गाथा" या ग्रंथाचें पुनर्मुद्रण करण्याचें सरकारनें ठरविलें. त्यावेळीं या अभंगांच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशना-संबंधीं मुंबई सरकारच्या दप्तर खात्यांत कांहीं कागदपत्र असल्यास त्यांचा शोध करावा अशी या नवीन आवृत्तीचे संपादक कै. पुरुषोत्तम मंगेश लाड यांनीं मला विनंति केली. मीं पुष्कळ शोध केला, परंतु तुकारामाच्या अभंगांसंबंधींचे कागद नष्ट (destroyed) केल्याच्या शेऱ्यांशिवाय मला विशेष कांहीं सांपडलें नाहीं.

अलीकडे महाराष्ट्रसरकारच्या दप्तरखात्याचे प्रमुख डॉ. पु. म. जोशी यांनीं दक्षिणा प्राइझ कमिटीच्या जुन्या कांहीं फाइल्स मिळविल्या आहेत. त्या अगदीं जीर्णावस्थेंत आहेत. त्या सहज चाळतांना तुकारामाच्या अभंगांच्या जुन्या प्रकाशनासंबंधींचा कांहीं अस्सल पत्रव्यवहार माझ्या नजरेस आला. तुकारामाच्या अभंगांच्या गाथेचें संपादनाचें काम सरकारच्या हुकुमावरून शंकर पांडुरंग पंडित यांच्या देखरेखीखालीं चाललें होतें, आणि तेच दक्षिणा प्राइझ कमिटीचे सेक्रेटरी होते. त्यामुळें हा पत्रव्यवहार या संस्थेच्या दप्तरीं जमा झाला. ह्या पत्रव्यवहाराचें कागद नष्ट होण्याच्या मार्गाला लागले आहेत. तो जशाचा तसा मूळ इंग्रजींत प्रसिद्ध केल्यास त्याचें रक्षण होईल आणि या गाथेच्या नवीन आवृत्तीच्या संपादकांस तो उपयोगी पडेल असें मला वाटतें. या गाथ्याची तिसरी आवृत्ती केव्हांच संपलेली आहे. जुन्या मराठी काव्याच्या संपादनाचा आरंभींचा इतिहास समजून घेणाऱ्यांनाही त्या काळच्या पाठचिकित्सेच्या धोरणा-संबंधींची या पत्रव्यवहारावरून बरीच कल्पना येईल. — **संपादक**

No. 657 of 1867/68
Poona Office of the Director of Puplic Instruction.
15th June 1867.

To

Shankar P. Pandit Esquire,
Secretary Dakshina Prize Commitee, Poona.

Sir,

In forwarding to you copies of correspondence as per margin* I have the honour to call your attention to para 7 of my letter No. 2245 dated April 19/66, and to request that you will put yourself in communication with the Proprietor of the Indu Prakash, and do all in your power to carry out the wishes of Government.

*Director of P. Instruction's letter No. 2245 Dated April 19/1866.
Government Resolution No. 258 dated 27th April 1866.
Letter from the Proprietor Indu Prakash No. 28 of 8th June 1867.

I have the honour to be,
Sir,
Your most obedient servant,
A. GRANT,
Director of Public Instruction.

No. 2245 of 1865 /66.
Mahableshwar Office of the
Director of Public Instruction.
19th April 1866.

To

C. Gonne Esquire,
Secretary to Government
Education Department.

Sir,

In reference to your letter No. 182 dated 23rd ultimo, I have the honour to report as follows on the application of the Proprietors of the Indu Prakash for patronage to their proposed edition of Tukaram's Abhangs.

2. The projected work is doubtless one of national interest to the maratha people and I think that when completed, it will, under certain conditions, be worthy of liberal patronage from His Excellency the Governor in Council.

3. The conditions I mean are these, first that adequate care be taken in obtaining an accurate reproduction of the best existing Manuscripts, and secondly that the best form of printing be adopted for the convenience of readers.

4. I am informed that the Manuscript to be edited was copied by Mr. Gopal Hari Deshmookh from Tukaram's own Manuscript. I think it would be very desirable that Mr. Gopal Hari's copy should be collated with the original Manuscript before it is printed off. I would suggest that Mr. Parashram Pant Godbole (Pandit to the Marathi Tra-

nslator, Educational Department) be directed to carry out this collation on the part of Government. It is well known that accuracy in transcription has always been deficient in India, transcribers generally allowing themselves the licence of making conjectural emendations on the texts to be copied. This kind of inaccuracy is to be avoided in an edition of a National poet brought under the direct patronage of Government.

5. Besides the text accurately printed from a collated copy of Tukaram's manuscript, I think that the editors should be instructed to furnish in their preface an account of the Manuscript itself, and also footnotes containing variations of reading, when any such occur.

6. In order to secure accuracy of editing, it is not necessary that the manuscript should be reproduced in facsimile-that is, with the words undivided, as I see done in the specimen form. This mode of printing is uncivilized and greatly increases the difficulty of reading. I would suggest that in printing off the manuscript the separate words should be carefully divided from one another.

7. In order to obtain proper supervision of this part of the work, I would recommend that Mr. Shankar Pandoorang Pandit B. A. Secretary and Revisor to the Dakshina Prize Committee, be instructed by Government to look over and revise each final proof-sheet before it is struck off, and generally to give advice and assistance to the Editors.

8. If the above conditions be accepted and fulfilled, I think that His Excellency in Council might do well to subscribe for (2000) two thoursand copies of the proposed edition.

I have the honour &c.
(Signed) A. Grant,
Director of P. Instruction.

No. 258 of 1866.

From

C. Gonne, Esquire,
Secretary to Government,
Bombay.

To

The Director of Public Instruction,
Poona.

Dated 27th April 1866.

Educational Department.

Sir,

I am directed to acknowledge the receipt of your report No. 2245, dated 19th instant, on the proposed edition of Tukarm's " Abhangs".

2. In reply, I am desired to inform you that the Honorable the Governor in Council approves of the conditions under which you propose that Government should extend their patronage to the work, and to request that you will be good enough to inform the proprietors of the "Indu Prakash" accordingly.

I have the honour &c.
(Signed) C. Gonne.
Secretary to Government.

Bombay Castle
27th April 1866.

No. 28 of 1867.
Indu Prakash Office
Bombay 8th June 1867.

To,

Sir A. Grant, Bart,
Director of P. Instruction,
Poona.

Sir,

I have the honour to inform you that everything is now ready for commencing the printing of Tukaram's Abhangs.

As you have proposed in your letter to Government No. 2245, dated 19th April 1866 that Mr. Shankar Pandurang

Pandit should look over and revise the final proof sheets before they are struck off, I beg to request you to instruct him officially on the subject.

I feel extremely happy to inform you that I succeeded, though with considerable trouble and expense, in obtaining the Kasar's manuscript at Tullegaum which is justly reputed to be the best collection of Tukaram and also the very manuscripts at Dehu which are in Tukaram's eldest son's hand & which continue as family inheritance in the eldest branch of Tukaram's descendant's. Every line will be collated with these manuscripts and variations in reading given in footnotes. I also propose to add a general alphabetical index to the Abhangs at the end and also a glossary of difficult words if possible.

I have the honour &c.
(Signed) Janardan Sakharam Gadgil
Proprietor Indu Prakash Press.

No. 36 of 1867
Indu Prakash Office
Bombay, 3rd July 1867.

To

Shankar Pandurung Pandit Esq.
Secretary to the Dukshana Prize Committee.

Sir,

Adverting to your letter No. 19 of the 21st ultimo, and the Director of Public Instruction's memo No. 658 of the 15th idem, I have the honour to forward by today's post the first two forms of my edition of Tukaram for final correction and supervision.

After mature consideration and careful enquiry at Dehu, the following plan has been fixed upon and will be strictly followed in editing the work.

The order of the Pundherpoor manuscript is retained, as it was found upon comparison that it was the best.

2. Every abhang is collated with the Dehu and Tullegaum and other manuscripts (one from Kadoos, in the hand-writing of one of Tukaram's Talkarees is hourly expected). The reading in the majority of the manuscripts is preferred and retained in the text, while the rejected readings are given in footnotes. In a few rare cases the reading of the minority is retained when its superiority is marked. The other readings then are given in footnotes.

3. Words are separated.

4. Orthography :—It was ascertained at Dehu after careful enquiry that there was no need of enlongating or shortening syllables for the purposes of rhythm as the recognized form of reading Abhangs is the one in which they are read as Sanhita (सहिता). This form is the one in which prose is read and Tukaram used to read in this form. Such being the case the ordinary rules of orthography can be strictly followed, retaining ofcourse Tukaram's peculiar forms and formations of words. The rules followed by us are—

(a) To write all words purely Sanscrit, as in Sanscrit.

(b) In corruptions or modifications of Sanscrit words, the forms then prevalent are preferred; in their absence the forms now prevalent are adopted.

I have the honour to be,
Sir,
Your most obedient servant,
Janardan S. Gadgil
Proprietor, Indu P. P.

Indu Prakash Office,
Bombay 2nd August 1867.

To

Shankar Pandurang Pandit Esquire
Secretary to the Dakshana Prize Committee.

Sir,

With reference to your letter No. 23, dated the 8th July last, I have the honour to inform you that with a view

to give thorough consideration to your suggestions contained in the letter under reply, the Pundherpoor, Dehu and Tullegaum MSS. were gone through & completely compared with one another, the result of which is the following :

Although the Pundherpoor MS. has superiority in arrangement in some places over the other two manuscripts, yet in some places the other two are decidedly superior. The plan of adopting the Pundherpoor MS. as the basis, is therefore given up. The order of the Dehu and Tullegaum MSS. in the same, the differences between the two MSS. consisting in four particulars.

1st. Some Abhangs which appeared at a particular plan in the Tullegaum MS. appear at a different one in the Dehu, but in most cases a mark seems to be placed in the latter at such places, indicating that the Abhangs should be transferrd to where they appear in the Tullegaum MS. 2nd, Some abhangs in the Dehu MS. are not so marked, yet their position in the Tullegaum MS. seems so appropriate as to leave no room to doubt that they were not marked for transfer through oversight. 3rd., Abhangs on the same subject appear dispersed in the Dehu MS. whereas in the Tullegaum they are all put together. For instance there are 28 abhangs bearing the heading धूर्वके, out of which 15 are in one place, 2 in another, 6 in a third and so on, the heading धूवक being repeated at all places; in the Tullegaum MS. all are put together. 4th., In the Dehu MS. too many abhangs are repeated, although some of them have been marked as दुबार, many more are left to stand without such remark. From these particulars it will be perceived that the Tullegaum MS. is a copy, with the indicated and necessary improvements, of the Dehu MS. and the fact is confirmed by the Index, which was found at the Kasar's house at Tullegaum when we visited the place, and which was supposed by us to be that of the Tullegaum MS. being now discovered to be that of the Dehu one! In adopting

the Tullegaum MS. therefore we adopt the Dehu one with corrections. Indeed, the Tullegaum MS. is unequalled by any MS. either in point of accuracy or of order.

When the Tullegaum order is adopted, the question is the position of बालक्रीडा. In the Pundherpoor MS. it stands for it, whereas in the Tullegaum it stands in a post-script after all the abhangs. In the Dehu one, the subject seems to have been left out altogether by the original writer, and is put down by another hand on the blank pages in the 2nd volume. The latter seems to account why in the Tullegaum MS. it stands in the postscript. I request you to give your opinion as to where it should stand in our edition.

In the notification that has been issued regarding our intended edition, a MS. from Kadoos has been mentioned. This was done, because a friend of ours whom we had requested for the MS. informed us that he had already obtained the possession of the MS. for us, but nothing has been subsequently heard from him though three letters have been addressed and we despair to get the MS.

With regard to orthography, I continue of the same opinion as before, further research only confirming my first opinion. I transcribe on the sheet marked A one Abhang as it is written in the four MSS. and leave you to judge whether it is advisable to follow the orthography of any one of these, and whether it is not reasonable to adopt the modern system of orthography which does not materially differ from that of the Dehu MS. You will perceive that the first two transcriptions are from the two Dehu MS. One from the little MS. at Dehu which is worshipped and is supposed to be in Tukaram's own hand and the other from the MS. with us, which is believed to be in Tukaram's eldest son's hand. Even these two do not agree in orthography and therefore it cannot be supposed that even in Tukaram's family one system of orthography was recognized. Other arguments on

this point I have stated in my demi-official to you, some time ago.

It is not our intention to meddle with the order of the basic manuscript, but there is one spot where we have a doubt whether the general rule should not be departed from. Abhangs 1592–1615 are headed स्वामीनी काया ब्रह्म केली ते अभंग and relate to Tukaram's final disappearance. The date of Tukaram's disappearance follows this in prose. The question is whether they should not come at the end of the work. Even Tullegaum's manuscript cannot lay claim to a systematic arrangement of Tukaram's productions and a future editor may perhaps be able to arrange the whole in a better way. I request to be furnished with your opinion on the point.

I have the honour to be,
Sir,
Your most obedient servant,
JANARDAN S. GADGIL
Proprietor Indu P. Press.

A

Extract from a copy at Dehu supposed to be in Tukaram's own hand.

भुतीं भगवंत : हा तों जाणोतों संकेत : ॥ १ ॥ धृ ॥
भारीं मोकळीतों बाणं : ज्याच्या त्यासी कळु गुणं ॥
॥ छ ॥ करावा उदेस नीवडुनी तरी दोश : ॥ २ ॥
तुका म्हणे वाटे : चुकतां अडराणें कांटे ॥ ३ ॥

From MS. in Tukaram's eldest son's hand.

भुतिं भगवंत हा तों जाणतों संकेत ॥ १ ॥
भारि मोकलितों बाण ज्याचा त्यासि कळे गुण छ
करावा उपदेश ॥ निवडुनि तरि दोष ॥ २ ॥
तुका म्हणे वाटे । चुकतां आड राणें कांटे ॥ ३ ॥

Tullegaum MS.

भुतिं भगवंत ॥ हा तों जाणतो संकेत ॥ धृ ॥
भारी मोकलीतो बाण : ज्याचा त्यासी कळे गुण ॥१॥
करावा उपदेश ॥ नीवडोणी तरी दोष ॥ २ ॥
तुका म्हणे वाटें : चुकतां आड राणे कांटे ॥ ३ ॥

Pandherpoor MS.

भुतिभगवंत ॥ तो जाणतो संकेत ॥ १ ॥ भारीमोकलीतो बाण ॥ ज्याचा त्यासी कळे गुण ॥ धृ ॥ २ ॥ करावा उपदेश ॥ नीवडुनी तरी दोष ॥ ३ ॥ तुका म्हणे वाटे ॥ चुकता आडराने कोटे ॥ ४ ॥

No. 44 of 1987

Indu Prakash Office
Bombay 16th August 1867.

To

Shankar Pandurang, Esquire,
Secretary Dakshana Prize Committee.

Sir,

In reply to your letter No. 34 dated the 13th instant, I beg to observe that there seems to be some misunderstanding when we say that rules of modern orthography should be followed, and that perhaps there is not so much difference in your views and ours as might at first appear. I will therefore shortly explain our views and the kind of corrections we wish to make in orthography.

The rules of modern orthography which we have principally in view regard to three points :-(1) the putting of Anuswars such as in the 7th case and in such words as नाहीं, काहीं &ca; (2) the Rhaswa and Dirgha letters in words, when the rhyme does not require exceptions to be allowed and other similar points; and (3) the putting of Anuswars on the final letters of verbs when their relation to the subject or object requires it. With regard to the first, the transcripts that accompanied my last letter must have shown you that there is rather redundance

than want of Anuswars in the Dehu MS. The question now only is, if in one place you find काहीं, in another कांहीं, in a third कांहिं, in a fourth कांहि, (which is actually the case) you are to write the word in four different ways or adopt one form कांहीं according to modern orthography. With regard to the second point you find in some places ठाकुणि in others ठाकोणी and in a third ठाकोनी; in some पासिं, in others पासीं; in some जेना, in others जना; in some चरित्र, others चेरित्र; in some ठांइ, in others ठाईं; in some येक, in others एक; in some कामीनि, in others कामिनी; and the question is whether you should not adopt the system of modern orthography and uniformly prefer ठाकोनी (or ठाकूनी which also I think should be allowed to stand, both being indifferently used by writers) पासीं, जना, चरित्र, ठाईं (or rather ठायीं) एक, and कामिनी. We are decidedly of opinion that it should be done and I hope you are of the same opinion. With regard to the third point you find for instance (तूं) येईं पांडुरंगे and नेईं सांभाळूनी or (मी) पाहें वाट and निरंजनीं पडिलो and the question is whether you should not, according to modern orthography, write नेईं and पीडला throughout.

It is not that any of the MSS. has a systematic orthography differing from the modern one, in which case it may have a claim for preference, but the fact simply is that each manuscript is inconsistent with itself, writing words in some places according to modern orthography and in others differently, without any reason whatever. The word ऐका is written in the same MS. as ऐका, आयका, आइका, आईका, and अइका ! ! The reason of it is plain, namely that the writers were illiterate men who never pretended to consistency in orthography. But to allow such inconsistencies to remain in an edition that pretends to accuracy seems to me quite impardonable and is enough, in my opinion, to condemn the edition and the Editors.

It is not at all our intention to alter any of the forms **peculiar** either to Tukaram or to Prakrit poets in general,

for instance, we have allowed the form ह्यून (for ह्याणून which latter has been actually inserted in the Pandherpoor MS.) to stand, as the metre requires it. So also we have retained the following :—बैसोनिया, संबंधु, कळों (आलें), जाला (for झाला), मोहो (for मोह), माव (for माया), उपाव (for उपाय).

I hope it will be clear from the above that we do not intend to meddle with the orthography of the MSS. more than what is absolutely necessary, and that to the extent above indicated you will agree with us that the corrections are absolutely required.

I have the honour to be,
Sir
Your most obedient Servant
Janardan Sakharam Gadgil
Proprietor Indu Prakash Press.

No. 34 of 1867-68.
Poona Office of Secretary to
Dakshina Prize Committee.
13th August 1867.

To
Janardan S. Gadgil Esquire,
Proprietor Indu Prakash Press, Bombay.

Sir,

In reply to your letter, without number, dated 2nd instant, I have the honour to inform you that I completely sympathize with your judgment in rejecting the Pandharpur MS. as the basis of your edition. And as there seems to be no essential difference between the Dehu and Talegam MSS. and moreover as the latter is superior in some respects to the former, I see no objection to your making as you propose, the Talegam MS. the basis of the intended edition.

2. Taking then the Talegam compilation for our guide, I beg to suggest that you will prepare as the press will

require it from time to time a printer's copy from the basis as collated with the other MSS. at hand. This I beg also you will forward to me every time along with your final proofsheets.

3. With regard to the position of the **Bala Krida**, I see no reason why we should not follow our best MSS. in this respect also and put it at the end of the whole book. Nor indeed does it seem at all likely that a highly devotional poet like Tukārām should have first composed a dry and flaccid piece like the **Bala Krida**. I am of opinion, therefore, that it should stand at the end, and not at the beginning of our edition as the Pandharpur MS. has it.

4. I have never advocated the adoption of the orthography of one of the best MSS. because they are systematic in their way of spelling the words, but simply for the purpose of producing as faithful a copy of Tukārām's poems as possible. The transcripts appended to your letter under reply only confirm what I myself have already said in my letter No. 23, dated 8th prox. **viz.** that very probably there was not a completely systematic method of orthography followed by Tukārām himself. But if there is no uniformity in Tukārām's way of writing or that of his followers, it is useless and injurious to saddle up on him rules of our own. If the orthography of the Dehu MS. does not materially differ from our own rules, I fail to see why we should not reproduce the former if we can do so with the advantage of getting a correct and faithful reprint of Tukārām's works as they have been handed down by his immediate or nearly immediate followers, and at the same time without the disadvantages of publishing the works of a poet in a totally vulgar and absurd way. I beg therefore that you will reconsider the subject minutely, and inform me on two points particularly, before you print off your sheets; let the advantages of applying our modern rules of uniform orthography to Tukārām's

works, and 2ndly the disadvantages of following the best MS. or MSS. of his poems, with slight variations here and there in order to avoid what is decidedly incorrect.

5. Abhangs 1592–1615 and the prose that follows may safely, as you propose, be transferred to the end. I do not know whether the prose passage is found in all the MSS. If not a critical note may be added as to the genuineness of the passage.

6. I trust, in conclusion, that you will now lose no time in setting about the work at once.

I have the honour to be
Sir,
Your most obedient servt.
S. P. Pandit.
Secretary to the D. P. C.

No. 50 of 1867–68.
Poona, Office of Secretary to
Dakshina Prize Committee
23rd August 1867.

To
Janardan S. Gadgil Esquire
Proprietor, Indu-Prakash Press
Bombay.

Sir,

In reply to your letter No. 44, dated 16th instant, I have the honour to inform you that I pretty nearly agree with you as to the nature of the corrections you wish to make in your Edition of Tukārām. But on a comparison between your views in your letter No.36, dated 3rd July and those conveyed in your letter under reply, will show that the changes you at first wanted to introduce in the ortho-graphy of the MSS. were less allowable than those you propose in your last letter.

2. It is true that in preparing a good edition from MSS. widely varying in their orthography for a public the form of whose language is not yet thoroughly settled, and in

whose grammar there are still a great many points that cannot be settled by reference to any authority, it will be necessary for the Editors to use their discretion to a great degree, and to have recourse sometimes to an arbitrary settlemnt. But on all such occasions, whatever little liberty we assume, we must show our reasons to the Public for our doing so, and care must be taken lest we should metamorphose old things into modern shadows.

3. With reference to para 4 of your letter No. 36, dated 3rd July, I beg to observe that the soundness of the answers returned to your enquiries at Dehu, whether the abhangs of Tukārām should be read like prose or verse, may fairly be doubted. All that the Dehu people meant seems to have been that it is not necessary, in their opinion, to write short syllables long in metre, for that, however, short a vowel may be in a word, they could lengthen it to any extent in chanting the verse. I cannot understand how an **abhang verse** can be read simply like prose. I have no doubt, however, that you are no longer of that opinion, and that you will give a fair consideration to the requirements of metre in your edition.

4. I beg further to observe that in all the liberties you wish to assume in your edition you will do a service to the author and to the public, to be so cautious as always to aim at giving Tukārām's text in as nearly its original form as possible; assuming such liberties only with the original as are demanded by the **absolute** requirement of grammar; without in the least degree interfering with the archaisms and solecisms peculiar to the author.

5. I request, in conclusion, that you will act up to all sound principles of philology, and that you will at once set about the work.

I have the honor to be
Sir,
Your most obedient servant.
SHANKAR P. PANDIT
Secretary to the D. P. C.

जनीजनार्दनांचें काव्य

ले.:—श्री. ज. शा. देशपांडे

नाथपंचायतनातले एक कवि जनीजनार्दन यांचें आडनांव गोसावी व पाटांगणकर त्यांचे वंशज होते, इत्यादि माहिती ग्रंथमालेंत इतिहासाचार्य राजवाडे यांनीं दिली आहे. तथापि त्यांत जनार्दन या कविनांवानें आढळणारें काव्य जनीजनार्दनांचें कां मानलें याचीं कारणें दिलेलीं नाहींत. इ. स. १९१४ मध्यें भारतइतिहाससंशोधकमंडळानें जनीजनार्दनांचा 'निर्विकल्प' (अथवा उद्धवबोध) हा ग्रंथ छापला (महाराष्ट्र सारस्वत, ग्रंथ-क्रमांक ३) त्यांत शेवटीं "जनीजनार्दन म्हणे। हें श्रीकृष्णाचें बोलणें। तें परिसावें संतजनें। निर्मळचित्तेंकरोनियां॥" (१५।३१) या ओवींत 'जनीजनार्दन' असें कविनाम येतें. तसेंच नुकतेंच मला शेवटीं 'जनीजनार्दन' कविनाम असलेले अभंगहि आढळले. त्याशिवाय धुळें येथील श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत 'बाळक्रीडा' अथवा 'चौरीक लीला' या नांवाचें काव्य उपलब्ध आहे. त्यांतहि 'जनीजनार्दन' असेंच कवीचें नांव आहे. ग्रंथमालेंत व इतरत्र आढळणारे जनार्दनकृत अभंग व जनीजनार्दनकृत अभंग यांच्या भाषेंत फरक वाटतो.

फेब्रुवारी १९६१ पासून धुळें येथील राजवाडे संशोधनमंडळाच्या त्रैमासिकांत 'रामकथा' अथवा जानकीसैंवर छापलें गेलें. ग्रंथाच्या आरंभीं 'श्रीमज्जानार्दनगुरुभ्यो नमः' असें लिहिलें असून शेवटीं नकल करणारा राघव स्वतः जनार्दनचरणानुरज म्हणतो. या कथेचे कवि जनार्दन श्रीगुरूची आरंभीं आळवणी करतात व "यैसे परिसोनियां विनवणें। जनार्दना स्वामी म्हणे॥" (१–१६) अशी ओवी येते. यावरून जनार्दन कवि हे जनीजनार्दन होत व त्यांनीं जनार्दनगुरूची आळवणी केली असें मानलें आहे, परंतु हें प्रमाण सबळ वाटत नाहीं. जनार्दनगुरूंना नमस्कार करणारा हा कवि नसून ग्रंथाची नकल करणारा व खुद्द जनार्दनांचाच शिष्य असण्याचा संभव जास्त आहे. दुसरी गोष्ट म्हणजे तोच कवि एकदा स्वतःला जनार्दन व एकदा जनीजनार्दन म्हणवून घेईल, हें शक्य दिसत नाहीं. तिसरी गोष्ट अशी कीं, गुरूचें नांव धारण करण्याचा उद्योग कोणी कवि करणें अशक्य वाटतें. चवथी गोष्ट म्हणजे जसा 'जनार्दनांचे' अभंग व 'जनीजनार्दनांचे' अभंग यांत फरक वाटतो तसाच फरक 'बाळक्रीडा' व 'रामकथा' यांचे भाषेंत दिसतो. या सर्व मुद्द्यांचा विचार करतां 'जनार्दन' या नांवानें आढळणारें काव्य व अभंग जनार्दनस्वामींचे होत, असेंच मानणें जास्त सयुक्तिक होईल.

प्रस्तुत काव्य बाडांक १५४२ मध्यें 'बाळक्रीडा' या नांवानें आढळतें. (ओव्या ४ ते ५९) व बाडांक १५१० मध्यें 'चौरीक लीला' या नांवानें मिळतें. खालीं

बाडांक १५१० मधलें काव्य दिलें आहे. फुल्या मारलेल्या ९, १८, १९, ३५, ३६, ४५, ४६, ५१, ६३–७२ व ७७–७९ या ओव्या प्रथम बाडांत नाहींत. ५८, ५९, व ७५–७६ ऐवजीं एकेक ओवी येते व ४७ नंतर प्रथम बाडांत एक जादा ओवी आहे. टीपेंत प्रथम बाडांत आढळलेले उपयुक्त फेरफार दिले आहेत. प्रथम बाडाचा उपयोग करून कांहीं फार अशुद्ध पाठ दुरुस्त केले आहेतः—

चौरीक लीलाः ॥ जनी जनार्दनकृत ॥

जो साक्षात्कारें परब्रह्म : धरोनी बाळलीला संभ्रम : करो नीघाला चौरीकर्म : आवडी गहन नवनीता ॥ १ ॥ सवें घेतले सवंगडे : पशुपाळ वेडे बागडे : सुदामा बोले बोबडें : तें आवडे गोवींदा ॥ २ ॥ टोंगळा अत्यंत वाकोडा : तो तव नीजाचा नीजगडा : गुज सांगे श्रीक्रुष्णापुढा : होय गाठा चोर ब्रीती ॥ ३ ॥ घ्या रे सामुग्री चोखटः खडे सराटे काढी नीट : माज बांधारे बळकट : शब्द कटकटा न करावी ॥ ४ ॥ वस्त्र गाळीव मुल्यका : घेवोनी प्रवेशा शंकु नोका : सकळ गृहीच्या आवांका : तो[1] मज ठाउका समाचार ॥ ५ ॥ गोपाळ म्हणती चक्रपाणी : चोरी बहुती ऐकीली श्रवणीं : सराटे काटीया घेवोनी : नीघाले कोन्ही न देखो ॥ ६ ॥ क्रुष्ण म्हणे ऐका नीवाडे : रचीत पात्रांची उतरडे : पाहाता न दीसे द्रीस्टीपुढें : अंधार पडे रजनीचा ॥ ७ ॥ भीतरी प्रवेशोनी येकीकडे : अवसे टाकावे खडे : पात्रें उमटती कडाडे : घेवोनी रोकडे आणावें ॥ ८ ॥ सींके लांबले अंसळी : तराळी काटी टोचोनीया पाडे डुळी : धार लागली मोकळी : मग तळीं राहोनीया सकळी प्राशन करावे ॥ ९+ ॥ चाहाळ ऐकोनी गवळनी : तवे[3] कवाडें उघडीती धावोनी : मग सराटे पसरोनी आंगनीं : पाई चुबकोनी गुंतती ॥ १० ॥ तेही चुकोनी येती बाळा : तरीं मुत्तीका टाकावी त्याचे डोळां : मग[2] चोळीती तव[3] तुम्ही पळा : नवलकळा सांगीतली ॥ ११ ॥ हासें आलें क्रुष्णउत्तरीं : मग प्रवेशले घरोघरीं : कवाडे उघडोनी भीतरी : नवलचोरी आरंभीली ॥ १२ ॥ हळुहळु घालीती पाउलें : तवे गर्जती चरणीचे वाळे : ऐकता जानोनी गोपाळें : नीजकर्णीं आंगोळीया घातल्या ॥ १३ ॥

---

१ मुळांत 'मज तुका समचोरा.' २ नेत्र (पाठ). ३ 'तव' बद्दल 'तवे' हि वापरलें आहे.

क्रुष्ण नाईके तरी जग बधीर : क्रुष्ण न देखे तरी अंध जगत्र : क्रुष्ण न चाले तरी पांगुळ सर्वत्र : च्याळक स्वतंत्र श्रीक्रुष्ण ॥ १४ ॥ सांचलें दधी काहाडीती : थीजलें तूप करीं घेती : काही भक्षीती काही सांडीती : तोंडें माखिती निजल्यांची ॥ १५ ॥ एकमेकांतें झोंबती : एकमेकाचे उडोनी खाती : येक येका खुणावीती : वाटाची[४] म्हणोनिया ॥ १६ ॥ देखोनी नवनीताचीं भांडीं : पेंद्या नाचतसे दुपांडी : उगा पोरा म्हणोनी धरीली[५] सेंडी : गोळा तोंडीं लाविला ॥ १७ ॥ सींकें उंच न पावे कर : काटी टोचोनी पाडीलें छीद्र : क्रुष्ण नीजमुखीं प्राशी धार : वोघळ कोपरीं श्रवताती ॥ १८+ ॥ सुदांमा म्हणे क्रुष्णासी : जाय रे सकळ दुग्ध तुची खासी : येरु म्हणे लागा कोपरासी : घ्या रे सावकाशीं दही दुध ॥ १९+ ॥ तेव्हां वाकोड्यानें केली टवाळी : टीरी चीमटोनी पोरें उटवीलीं : ते मातेते बोभावीली : वर्छे सोडीलीं वेंडेंज्यानें ॥ २० ॥ वछ करीती स्तनपान : बाळकें करीती रुदन : सुना उठती धावोन : तव नवनीतानें वदन माखीलें ॥ २१ ॥ व्रध्धा सांडोनी सेजेसी : उटता देखती सुनांसी : सासु देखता सुन तोंड पुसी : येरी जावोनी केसीं धरीयेली ॥ २२ ॥ म्हणे कां गे भक्षीलें नवनीत : येरी म्हणे मी क्रीया करीन नीश्चीत : अैश्या सासु सुना भांडत : तवे पुढे देखीली तडाफोडी ॥ २३ ॥ आपण तेथोनी पळाले सकळ : आनीका[६] गृहीं प्रवेशले गोपाळ : तव नीद्रेनें व्यापीले सकळ : टवाळी नवल आरंभीली ॥ २४ ॥ कोठे उतरड्या न कळती : घरांत चाहाळे खडे टाकीती : खडे टाकीताची शब्द उठती : घेवोनी येती चक्रपाणी ॥ २५ ॥ सींकें लांबवीलें दुरी : न ये प्रयत्नें घेतां करीं : मग चढोनी येकमेका खांदीयावरी : पयपात्रें उतरीती ॥ २६ ॥ सुखसेजे गोपीबाळी : असता जाणोनी अंबरावेगळी : नवनीत[७] ठेवोनी व्याळ मुळी : वीडाळा कळी लावीली ॥ २७ ॥ गजबजोनी उठे सुंदर : येके करीं सावरी चीर : बांधोनी धरीलें मुक्तद्वार : सकळ चोर कोंडीले ॥ २८ ॥ पुढें देखीला वनमाळी : बरी रे टोंगळ्या फावली रळी : धरूं धावे वेल्हाळी : तवे नयनीं गुरोळी

---

४ 'वाटा मागती चीमटोनी.' ५ मुळांत 'घरी घडी.' ६ मुळांत 'आणी'. ७ "नवनीत गोळा ठेवोनीया मुळी। वीडाळी कळी लावीली".

टाकीली ॥ २९ ॥ नेत्र चोळी वज्रकामीनी : आपण हातीचा पळे नीस्टोनी : गोपाळ खुणावीले मुखपवनीं : मग तेथोनी पळाले ॥ ३० ॥ येक झगटीली गोपीका : तीचे नयनीं टाकीली मुत्तीका : नेत्र चोळीत अधोमुखा : देखोनी दुरी पाहातसे ॥ ३१ ॥ येरी धरूं धावे चटचटे : तवे चरणीं चुबुकती सराटे : वामकरें वीखरोनी बोराटे : बैसे अवचटे धरनीयेवरी ॥ ३२ ॥ ऐसीं चोरीकर्म सारोनी : मग प्रवेशले आपुलीया सदनीं : प्रातःकाळ जालीया गवळनी : गाव्हानी घेउनी आलीया ॥ ३३ ॥ येशोदेसी म्हणती सकळा : तुझीया पुत्राची नवलकळा : नाईकवे ना देखवे डोळां : सुना सकळ नासील्या ॥ ३४ ॥ येकी म्हणे वो सुंदरे : तुझे गावींची वस्ती पुरे : नीजलीं उठवीलीं पोरें : फेडी चीरें नग्न करी ॥ ३५+ ॥ अधरीं ठेवोनी नवनीत : आपण देखोनी गदगदा हासत : नानापरी वीटंबीत : मांजराकरवीं चाटवी ॥ ३६+ ॥ येकी म्हणे वो गवळनी : माझें भक्षीलें क्षीर लोणी : उचीस्ट मुलीचें तोंड पुसोनी : आपण तेथोनी पळाले ॥ ३७ ॥ माझीं सोडीलीं वासुरें : नीजलीं उठवीलीं पोरें : सींकीं तोडीलीं येकसरें : फोडील्या करें माथन्या ॥ ३८ ॥ ऐकोनी बुझावी शुद्धमती : म्हणे नीर्गुणा गुण लावीती : जें जें भक्षीलें श्रीपतीं : सांग निगुतीं देईन मी तुम्हा ॥ ३९ ॥ कीती भक्षीलें रे गोविंदा : तवे क्रुष्णें पुढे देखीली राधा : स्तन धरोनी हासे खदखदा : म्हणे येव्हडा मुदा होता ईचा ॥ ४० ॥ हासें आलें राधीकेसी : गवळनी गेल्या प्रेमहर्शी : येशोदा म्हणे क्रुष्णासी : सोडी वेगेंसी गोधनें ॥ ४१ ॥ जो वेदासी अगोचरु : श्रुतीसी न कळे ज्याचा पारु : वर्णीता श्रमला फणीवरु : तो गुणगंभीरु श्रीक्रुष्ण ॥ ४२ ॥ माथा मुगुट तेजःपुंज : लल्हाटीं तीलक कस्तुरी वोज : नयनीं नयना सांगती गुज : तळपे तेज कुंडलांचें ॥ ४३ ॥ वैजयंती वनमाळा : सुरंग गुंज्याहार गळां : तुळसी पुर्स्पे सुपरीमळा : कटीं मखळा शोभतसे ॥ ४४ ॥ मुगुट सुमने वेस्टीली : वेणु वेताटी करीं घेतली जाळी टाकीली प्रस्टीवरी ॥ ४५+ ॥ काळी घोंगडी खांदीयावरी : काखेंत घातली श्रुंग मोहरी : जाला नंदाचा खीलारी : हाकी भारी गोधनें ॥ ४६+ ॥ बळीराम राजीवनयन : अलंकारमंडीत शुद्धतनु जाण : चालीले गोपवेश घेउन : दोघे नंदन नंदाचे ॥ ४७८ ॥ गाई हाकील्या सैरावरा : सुखें

८ या नंतर–" सवे नवलक्षे सवंगडे । पशुपाळ वेडे वाकोडे । गोरस उधळीती चौहुकडे । पावले थडी यमुनेच्या."

भ्रमती करीती चारा : वडज्या म्हणे पेंध्या पोरा : पाळती करा गवळनीची ॥ ४८ ॥ मथुरेच्या मीसें करोनी : हाटा चालील्या अनंत गवळनी : मागा दधी दुध तुप लोणी : मुख्य नाईकीनी राधीका ॥ ४९ ॥ गजरें गर्जती वाकी वाळे : घनदाट चालीती उतावेळे : मनीं इछीती श्रीकुरुण खेळे : तव देखील्या वाकुड्यानें ॥५०॥ टाळी पीटोनी नाचे भोजे : म्हणे कुरुणा थोर आलें खाजें : मग वळोनी गोपीफौजे : सांडी लज्या या इकडे ॥ ५१+ ॥ तवें त्या येकेसरी करीती झगडा : येके थोबाडीला वाकोडा : चीर फाडी पात्र फोडी कडकडा : घेवोनी रोकड्या आणिल्या ॥ ५२ ॥ कुरुणें राधा धरीयेली करीं : येके करीं लोणी चोरी : येके करीं नीर फेडी : येके करीं कंचुकीं ॥ ५३ ॥ हासें आलें राधीकेसी : सांडी गोवळा सलगी कायसी : भुलली रूपा जाहाली पीसी : लोणी पुसे कुरुणमुखा ॥ ५४ ॥ अैश्या वीचीत्र वीनोदील्या : दान घेवोनी गवळीनी सोडील्या : पेंधा म्हणे वरते चला : परम क्षुधा लागली सुदामा ॥ ५५ ॥ पाहोनी कल्पतरुची छाया : घोंगडी घालीती बैसावया : बैसा म्हणे यदुराया : कौतुक करा कळयाचें ॥ ५६ ॥ वडज्या सोडी मोरजाळी : पेंधा पसरी पत्रावळी : वाकुडा बैसवी गोपाळ वळी : सुदामा जवळीं पत्रशाखा ॥ ५७ ॥ नानापरीचीं पक्कान्नें : शहुरस युक्त जाणे : गोडी सांगता अनन्ये : पसरीती वदनें ब्रह्मादीक ॥ ५८[९] ॥ सकळासी वाढलीया संपूर्ण : पेंधा म्हणे ब्रह्मार्पण : हे सकळासी कळली खुण : कवळ घालिती कुरुणमुखा ॥ ५९[९] ॥ तेव्हां वाकुडीयानें केली टवाळी : कुरुणाजवळी होती गुळपोळी : तेची उचलोनी पत्रावळी : न राहे जवळी पळे पेंद्या ॥ ६० ॥ वाकुल्या दावी कुरुणाकडे : तव नयनीं खुणावी वाकुडे : येरें बडवीला शेवडे : धावोनी रोकडे आणीला ॥ ६१ ॥ धरीली वाकुड्याची सेंडी : पेंधा नाचतसे दुपांडी : त्याचे उचीस्ट भरलें तोंडीं : घोंगडा गडी सापडला ॥ ६२ ॥ सरीलें पुढीलें पक्कान्न : कुरुणें आणीलें दध्योदन : उभा राहोनी आपणः वाढीतसे गोपाळा ॥ ६३+ ॥ मध्यें उभा राहोनीया श्रीहरी : काखे घातली श्रृंग मोहरी : वेणु वेताटी खोवीली जठरीं : कळा करी स्वानंदें ॥ ६४+ ॥ ऐसा खेळ करीती जाणोनी : तवें देव बोलीती विमानीं : म्हणती वंचलो वंचलो अभीमानी : झनी कुरुण सेश न मीळेची ॥ ६५+ ॥ न होयेची कुरुणसेशप्राप्ती : मग एकमेकातें बोलती : गोपाळ

९ या दोन ओव्याऐवजी–"नानापरीची अंने । सेडरशे पकवाने । पेंधा म्हणे ब्रह्मापूर्ण सकळासी मानिले."

यमुनेप्रती येती : चला नीश्चीती जाऊं तेथें ॥ ६६+ ॥ वीमान खचोनी अंतराळीं : आपण देव उतरले भूमंडळीं : .....जळीं घेतलीं भछरूपें ॥ ६७+ ॥ ब्रह्मा इंद्र जाला वीरोळा : जाणोनी आपण घननीळा : भयें गोवीले गोपाळा : झणी आतळा जळासी ॥ ६८+ ॥ सहज अकर्माकार गोवळे सर्वदा पानीयाचे वीटाळे : हातें माखीली कांबळे : कवळ टीरीये पुसती ॥ ६९+ ॥ धरोनी उचीस्टाची आस : ब्रम्हा घेतसे गोपवेश : अंतरीं राहोनी जगदीश : वेदपुरुश वोळखीला ॥ ७०+ ॥ तयासी दावोनी आंगोळी : आणी काखीं घाली सगळी : क्रुस्ण सेशा लागली तळमळी : जळीं घेतलीं जळरुपें ॥ ७१+ ॥ घोंगडी झाडीती उठोनी : खेळत आले व्रंदावनीं : तुळसीप्रदक्षणा करोनी : कानीं खोवील्या मंजुरीका ॥ ७२+ ॥ ईतुकीयांत जाला माध्यान्न : तवें होउ आला अस्तमान : श्रीक्रुस्ण बोले वचन : चला जाउं व्रज्याप्रती ॥ ७३ ॥ देहुडा उभा राहोनी : गाई खुणाविल्या वेणुध्वनीं : टवकारीत आल्या मुखीं चारा सांडोनी : आल्या सुरडोनी हुंबरीत ॥७४॥ कळप लावीले मोहरीं : गोपाळ घालीती हुंबरी : कंदुका झेलीती अंबरीं : पावे मोहरी वाजवीती ॥ ७५[१०] ॥ सुदामा जाला येंत्रधारी कोणकोणा व्यापारा लावीले परी : सवें चालती उपरी : पेंधा धरी कल्पतरुछाया ॥ ७६[१०] ॥ चवरे घेवोनी अशोकडाळी : वाकुडा कौतुकें फोडी आरोळी : तवे ग्रामाजवळीं : पातले वनमाळी सवेगें ॥ ७७+ ॥ आला क्रुस्ण साईंकाळीं : उतावेळे अंगना सकळी :...घालीती रांगोळी मोतीयांच्या ॥७८+॥ लक्षानुलक्ष आरत्या करी : उभ्या राहील्या नगरनारी : भावें वोवाळीती श्रीहरी : नींबलोन उतरी येशोदा ॥ ७९+ ॥ गाई निघाल्या गोठणीं : गोपाळ गेले आज्ञा घेउनी : मग आपण प्रवेशला नीजभुवनीं : स्वस्छानी बैसले ॥ ८० ॥ ऐसा बाळक्रीडेचा सोहळा : जनीजनार्दनीं खेळवीला : श्रीक्रुस्ण परब्रह्मपुतळा : बाळलीला अपूर्व ॥ ८१[११] ॥ इती श्रीभागवते माहापुराणे : दशमस्कंदे बाळक्रीडा सपूंर्णमस्तु ॥ ८२ ॥

श्रीशुभमस्तु ॥ श्री क्रुस्णार्पणमस्तु ॥ छ ॥ छ ॥ छ ॥

---

१०. या दोन ओवी ऐवजीं – "कळप लाविले हारोहारी । गोपाळ घालीती हुंबली । येके चालती तळउपरी । पेंधा छत्र धरी कल्पतरुची"

११. "ऐसा बाळक्रीडेचा सोहळा । जनीजनार्दन खेळे अवलीला । येकनाथ उधव माळा । बाळक्रीडा माहाराजा"

मोरोपंतांच्या केकावलींतील "जळमळें"

मोरोपंतांच्या केकावलींतील १०९ व्या श्लोकांत गंगावर्णन आहे; त्याचे दोन चरण असे आहेत :—

जगद्गुरुमहेश्वरप्रमुशिरीं जिचें नांदणें ।
जिच्या **जळमळें** तुळे न शरदिंदुचें चांदणें ॥

यांतील 'जळमळें' याचा अर्थ देतांना आपल्या 'यशोदापांडुरंगी' (१८६९) या 'केकावली'वरील टीकेमध्यें दादोबा पांडुरंग यांनीं, "शरत्कालचें स्वच्छ चांदणेंही ज्या गंगेच्या उदकाच्या मळाशीं बरोबरी करावयास समर्थ नाहीं," अशी शब्दयोजना केली आहे. जळाचा 'मळ' म्हणजे काय हें त्यांनीं सांगितलेलें नाहीं.

बाळकृष्ण अनंत भिडे यांनीं आपल्या 'मोरोपंती सुबोध केकावलि' या पुस्तकांत, "जिच्या जळांतील चिखलाचीही सर शारदीय चंद्राच्या स्वच्छ चांदण्याला येत नाहीं," असा अर्थ देऊन 'मळ' म्हणजे 'चिखल' असें स्पष्ट म्हटलें आहे.

'केकार्थचर्चा' म्हणून एक पुस्तक पुणें येथील मयूरमंडळानें प्रसिद्ध केलें आहे (१९४०). या मंडळांतील चर्चा अनेक विद्वानांच्या उपस्थितींत होत असे. त्या पुस्तकांतही, "जिच्या पाण्यांतील चिखलाचीही सर कार्तिकांतील चंद्राच्या चांदण्याला यावयाची नाहीं," असा अर्थ दिलेला आहे.

परशुरामतात्या गोडबोले आपल्या 'केकादर्श' मध्यें (१८६७), 'जळमळें' याचा अर्थ पुढीलप्रमाणें देतात : "जिच्या जळाच्या मळाशी ह्न० वरच्या फेंसाशीं शरद्ऋतूंतल्या चंद्राचें चांदणें तुळत नाहीं."

'जळमळ' म्ह० गंगेच्या पाण्यावरील फेंस असा अर्थ घेतल्यानें तो शरद्ऋतूंतील चंद्राच्या चांदण्यापेक्षांही जास्त शुभ्र होता हें जें कवीला सांगावयाचें आहे तें बरोबर जुळतें. 'मळ' याचा चिखल असा अर्थ केल्यास त्याचा नीट बोध होत नाहीं. दादोबा पांडुरंग यांनीं अर्थ करतांना 'मळ' असाच शब्द कायम ठेवला आहे; मळ म्हणजे काय तें सांगितलें नाहीं. परशुरामतात्यांचा 'केकादर्श' दादोबाच्या 'यशोदापांडुरंगी' नंतर निघाला. त्यांत मात्र 'मळ' म्हणजे काय हें स्पष्ट केलें आहे.

श्रीधर विष्णु परांजपे, रामचंद्र भिकाजी जोशी, नारायण केशव बेहरे व श्री. ना. बनहट्टी या विद्वानांनीं 'मळ' याचा 'फेंस' असाच (परशुरामतात्यांचा) अर्थ दिलेला आहे.

श्री. ना. बनहट्टी यांनीं 'केकावली' च्या आपल्या आवृत्तींत (१९५७) 'फेंस' हा केकादर्शांतील अर्थ स्वीकारतांना उद्गार काढले आहेत ते असेः--

"'जळमळ' याचा पाण्यावरील फेंस असाच अर्थ असला तरी, जळमळ ह्म० फेंस हा अर्थ संस्कृत अगर मराठी कोशांत सांपडत नाहीं. केकादर्शामध्यें दिला आहे म्हणून प्रस्तुत आवृत्तींत स्वीकारला आहे."

मयूरमंडळाच्या सभासदांनीं किंवा बाळकृष्ण अनंत भिड्यांनीं 'मळ' याचा 'चिखल' असा अर्थ घ्यावा, इतकेंच नव्हे तर 'फेंस' या अर्थाचा उल्लेखही करूं नये, याचें आश्चर्य वाटतें. चालू सालीं प्रसिद्ध झालेल्या मोरोपंती स्फुट काव्यांच्या तिसऱ्या भागांत या श्लोकावरील टिपणींत दादोबांचें अनुकरण करण्यांत आलें आहे. म्हणजे 'मळ' शब्दच कायम ठेवण्यांत आला आहे.

परशुरामतात्यांनीं कसातरी अर्थ जुळविण्याकरितां ओढूनताणून 'फेंस' हा अर्थ दिला आहे, असा या टीकाकारांचा समज दिसतो; परंतु या अर्थाला श्रीमद्भागवताच्या सहाव्या स्कंधाच्या नवव्या अध्यायांतील कथेंत आधार सांपडतो. तें कथानक जिज्ञासूंनीं मूळांत सविस्तर पहावें. येथें त्याचा आवश्यक तेवढा भाग उद्धृत करतों. एकदां इंद्राच्या हातून ब्रह्महत्येचें पातक घडलें; तें त्यानें चार भागांत चार ठिकाणीं सारखें वांटून दिलें. पैकीं एक चतुर्थांश पाप जळानें (म्हणजे पाण्यानें) घेतलें. त्याचा मोबदला म्हणून जळानें इंद्राकडून एक वर मिळवला. "द्रुग्धादि पातळ पदार्थांत आपलें मिश्रण केलें असतां त्या पदार्थांची वृद्धि व्हावी," असा हा वर होय. हा वर घेऊन इंद्राचा 'मल' म्हणजे पाप (ब्रह्महत्येचा चतुर्थ भाग) जलानें स्वीकारलें. याचें वर्णन भागवतांत पुढील श्लोकांत सांपडतें :-

द्रव्यभूयोवरेण **आपस्तुरीयं** जगृहुर्**मलम्**।
तासु बुद्बुद**फेना**भ्यां दृष्टं तद् (हरति क्षिपन्)॥
—भागवत ६-९-१०,११.

('द्रव पदार्थांची वृद्धि व्हावी' अशा वरानें **पाण्यानें** त्या **मला**चा चतुर्थ भाग घेतला; तो बुडबुडे व **फेंस** या रूपानें दिसतो.)

भागवत हा मोरोपंतांच्या नित्यपारायणांतील पूर्ण परिचित ग्रंथ. भागवतावर त्यांनीं रचनाही केली आहे. तेव्हां त्यांनीं 'जळ-मळ' शब्द वापरावा हें साहजिक आहे. परशुरामतात्या गोडबोले यांनींही हा भागवतां-

तील संदर्भ पाहिलेला असावा, त्यामुळें त्यांना मळाचा खरा अर्थ देतां आला. इतकेंच नव्हे, तर त्यांनीं (नुकत्याच मराठी संशोधनपत्रिकेंत प्रसिद्ध झालेल्या) 'श्रीगंगामाहात्म्य' या आपल्या काव्यामध्यें स्वतः हाच शब्दप्रयोग केला आहे. पहा:—

बघोनी त्वत्फेना गगनिं उडुपंक्तीहि वितुळे ।
शरच्चंद्रज्योत्स्ना तव **जळमळा**शींहि न तुळे ॥
सुधासिंधू लाजे तव विमल पूरास बघुनी ।
जया पावे ऐसा तव धवलिमा हे सुरधुनी ॥

वर दिलेल्या भागवतांतील श्लोकाचा आधार मयूरभक्तांस समाधानकारक व निर्णायक स्वरूपाचा वाटावा.

४ पीएच्. डी. चें मराठी संशोधन

(पीएच्. डी. या पदवीकरितां, निरनिराळ्या विद्यापीठांमध्यें काय संशोधन झालें किंवा होत आहे, हें कळण्यासाठीं उपलब्ध झालेली माहिती, "मराठी संशोधनपत्रिका," वर्ष ११, अंक २ रा, मध्यें दिली होती. अधिक माहिती खालीं देण्यांत येत आहे.)

एस्. एन्. डी. टी. महिला-विद्यापीठ

(लिहिले जात असलेले प्रबंध)

1. Smt. Kanchanmala Harmalkar :—Hymus in Marathi Literature. — Prof. G. B. Sardar
2. Smt. Neela Kelovkar :—Women Characters in Marathi (Social) Drama. — Prof. G. B. Sardar
3. Smt. Lalita Bapat :—Impact of two world wars and struggle for independence on creative literature in Marathi (1914–1950). — Prof. G. B. Sardar
4. Smt. Vimal Vaidya :—The outlook towards Women as reflected in the literature of Marathi Saints. — Prof. G. B. Sardar
5. Smt. Nirmala Mone :—A critical study of 'Balbodh.' — Prof. G. B. Sardar
6. Smt. Padma Gole :—Emotional bonds between man and woman in modern Marathi Poetry. — Prof. G. B. Sardar

7. Smt. Vasanti Khanolkar :—Marathi Literature in 1600–1700 (Social content and literary trend).
— Prof. G. B. Sardar
8. Smt. Sanjiwani Marathe :—Nature in Modern Marathi Poetry. —Prof. G. B. Sardar

५ मराठवाडा विद्यापीठ

(लिहिले जात असलेले प्रबंध)

1. Shri. S. N. Rasal —Imagery in Modern Poetry.
— Prof. W. L. Kulkarni
2. Shri. R. K. Panse :—Comparative Study of Poetry and Bhaktiyogas of Kabir and Tukaram.
— Dr. M. G. Deshmukh
3. Shri. V. R. Borgaonkar :—A critical study of the biographical and autobiographical writings in Marathi up to the end of the 19th Century. — Prof. W. L. Kulkarni
4. Shri. P. B. Mande :—A critical study of the Folk Literature in Kannad Taluka. — Prof. W. L. Kulkarni
5. Shri. B. D. Phadke :—Marathi short stories.
— Prof. W. L. Kulkarni
6. Shri. S. A. Gaulkar :—A critical study of the evolution of ancient Marathi Nairative (आख्यानक) Poetry.
— Prof. W. L. Kulkarni
7. Shri. G. M. Gangathade:—A critical study of the works of Prof. N. S. Phadke. — Prof W. L. Kulkarni
8. Shri. S. V. Ahankari :—Dasopant (A critical study).
— Dr. Y. M. Pathan
9. Shri. G. N. Mali :—A study of Folk Literature in the region surrounding the Ajintha ranges, i.e. the talukas Soegaon, Bhusawal, Buldhana and Sillod.
— Prof. W. L. Kulkarni
10. Shri. S. R. Gadgil :—A comparative and critical study of (i) the Bhawarth—Deepika : Dnaneshwar (ii) Gitarnawa of Dasopant and (iii) Yatharth Deepica : Waman.
— Independently.
11. Smt. Tara Paranjape :—Socio Literary study of the Folk Literature of some of the Marathi regions bordering Telangana. — Prof. W. L. Kulkarni
12. Shri. M.R.Karad :—Bharud literature —Dr. Y. M. Pathan

श्रीगंगानदीवरील आणखी एक काव्य

गेल्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या परशुरामपंत गोडबोले यांच्या 'श्रीगंगामाहात्म्य' या काव्याच्या प्रस्तावनेंत, दक्षिणा प्राइझ कमिटीनें १८७० च्या सुमारास श्रीगंगेवर काव्य लिहिण्यास बक्षिसें लाविलीं होतीं, त्यापैकीं चिंतामणि पेठकरांचें 'गंगावर्णना', गणपतराव पटवर्धनांचें 'गंगावर्णन' व परशुरामतात्यांचें 'श्रीगंगामाहात्म्य' अशीं तीन काव्यें या बक्षिसाकरितां सादर करण्यांत आलीं, असा निर्देश आहे. याशिवाय बाळकृष्ण मल्हार हंस बीडकर यांनींही 'भागीरथी' नांवाचें एक काव्य या सुमारास प्रसिद्ध केलें होतें, याकडे नागपूर विद्यापीठाचे प्रा. भवानीशंकर पंडित यांनीं आमचें लक्ष वेधलें. हें काव्य १८७३ सालीं प्रसिद्ध झाले व त्याची प्रत नागपूर विद्यालयाच्या ग्रंथालयामध्यें उपलब्ध आहे. दक्षिणा प्राइझ कमिटीनें तिघांजणांना बक्षिसें दिल्याचा मुंबई शिक्षणखात्याच्या रिपोर्टांत निर्देश सांपडतो. तेव्हां हें तिसरें बक्षीस परशुरामतात्यांच्या श्रीगंगा-माहात्म्याला मिळालें असावें, असा आम्हीं तर्क व्यक्त केला होता. कदाचित हें तिसरें बक्षीस हंसांच्या 'भागीरथी' काव्याला मिळालें असेल काय, या जिज्ञासेनें आम्हीं हें पुस्तक नागपूर विद्यालयाच्या ग्रंथसंग्रहालयांत जाऊन पाहिलें. चिंतामणि पेठकर व पटवर्धन यांचीं काव्यें १८७४ सालीं प्रसिद्ध झालीं तर हंसांचें हें काव्य त्याच्याही आधीं म्हणजे १८७३ सालीं ठाण्याच्या 'अरुणोदय' छापखान्यांत छापून श्रीमंत तुकोजीराव होळकरांना नजर करण्यांत आलें आहे. याच्या आरंभीं ग्रंथकर्त्यानें लहानशी प्रस्तावना जोडलेली आहे. ती अशी :—

"हें लहानसें काव्य महाराष्ट्र भाषेंत जगदात्म्याच्या सेवेकरितां यथामतीनें रचिलें आहे. ह्यांतील गुणलेश ग्रहण करून दोष असतील ते पुनरावृत्तींत दुरुस्ती करण्याकरितां कळविण्याची मेहेरबानी करावी, अशी विद्वज्जनांस प्रार्थना आहे. (धुळें, ता. १८ एप्रिल १८७३)"

या काव्याला जर दक्षिणा प्राइझ कमिटीचें बक्षीस मिळालें असतें, तर त्याचा निर्देश या प्रस्तावनेंत केल्याशिवाय ग्रंथकार राहिला नसता. दक्षिणा प्राइझ कमिटीच्या बक्षिसाकरितां म्हणून हें काव्य लिहिलें असावें, असें वाटतें.

'सूचिकार' शंकर गणेश दाते

'सूचिकार' म्हणून प्रसिद्ध असलेले पुण्याचे रा. शंकर गणेश दाते यांचें ता. १० डिसेंबर १९६४ रोजीं निधन झालें, हें कळून मराठी वाङ्मयाच्या संशोधनाची आस्था असलेल्या प्रत्येक माणसास दुःख झाल्याखेरीज राहिलें नसेल. शंकररावांचा जन्म ता. १७ आगष्ट १९०५ रोजीं रत्नागिरी येथें झाला. बी. ए. पर्यंत त्यांचें शिक्षण झालें; परंतु ते पदवीपर्यंत गेले नाहींत. जें कार्य बी. ए., एम्. ए., पीएच्. डी. किंवा डी. लिट्. अशा पदव्यांचें लटांबर बाळगणारे लोक करीत नाहींत तें त्यांनीं केलें. पदवी त्यांना मिळाली नाहीं हें एकाअर्थीं बरें झालें. पदवीधरांना पदवीच्या नांवावर मिरवितां येतें, आणि प्रत्यक्ष कार्य करण्याची गरजच वाटत नाहीं! 'बरें झालें कुणवी केलों, नाहींतर दंभेंचि असतों मेलों,' असे जे तुकारामबुवांनीं उद्गार काढले ते याकरितांच होत. जें कार्य एकाद्या संस्थेच्या हातून होणार नाहीं, तें कार्य दात्यांनीं केलें असे उद्गार रा. रंगनाथन् यांनीं काढलेले मीं ऐकले आहेत. दाते जर एकाद्या संस्थेमध्यें असते तर त्यांच्या हातून जसें काम झालें तसें झालें नसतें, अशी माझी समजूत आहे. संस्था पाठीशीं असली म्हणजे कांहीं फायदा असतो खरा; पण तितकाच किंवा त्याहीपेक्षां ज्यास्त तोटा असतो. संस्थेंत स्वतः मनासारखें काम करतां न येतां पुष्कळदां इतरांचीं मनें राखण्यांतच वेळ जातो. दात्यांचें काम पाहून त्यांना आर्थिक स्वास्थ्य लाभावें आणि त्यांच्या कार्यांतही त्यांना मदत व्हावी, म्हणून कै. बाळासाहेब खेरांनीं त्यांची पुण्याच्या प्रादेशिक ग्रंथसंग्रहालयाचे ग्रंथपाल म्हणून नेमणूक केली; परंतु तिकडील झळ सहन करतां न आल्यामुळें ते राजिनामा देऊन तिकडून मोकळे झाले. या बाबतींत आपला प्रयत्न फसला म्हणून खेरांनीं माझ्याकडे खेदोद्गार काढले होते.

लोककथांचे दोन भाग वगैरे त्यांचे फुटकळ ग्रंथ सोडले तर 'मराठी ग्रंथसूची–' चे दोन भाग हेंच त्यांचें मुख्य कार्य होय. १९५० पर्यंत त्यांनीं हें काम आणलें होतें. या कालांतील ज्या ग्रंथांची नोंद त्यांच्या पुस्तकांत करावयाची राहिली आहे, त्यांची एक 'पुरवणी सूची' ते प्रसिद्ध करणार होते. शिवाय १९५० पर्यंतच्या मराठी मासिकांच्या सूचीचा पहिला भाग त्यांचा बहुतेक तयार झाला होता. पहिल्या भागांत सुमारें एक हजार मराठी नियतकालिकांची (वृत्तपत्रें वगळून) वर्णनात्मक नोंद यावयाची होती. दुसऱ्या भागांत त्यांतील लेखांची सूचि ते देणार होते. हा पहिला भाग प्रथम मुद्रित करून दुसरा भाग पुढें सावकाश प्रसिद्ध करावा, अशी त्यांना कांहीं मित्रांची सूचना होती. तसें केलें असतें तर बरें झालें असतें, असे उद्गार गेल्या आक्टोबरांत पुण्याला गेल्यावेळीं, त्यांनीं मजजवळ काढले, आणि जरा बरें वाटतांच प्रथम पहिल्या भागाच्या मुद्रणाचें काम आपण हातीं घेऊं, असें ते म्हणाले. त्यांच्या मासिकांच्या नोंदींत कांहीं पोकळ्या (lacunae) आहेत. त्या त्यांना भरावयाच्या

होत्या. त्याकरितां जरा बरें वाटतांच आपण आधीं गोव्याला जाईन, असें ते म्हणाले. त्यांच्या व्याधीची खरी कल्पना शेवटपर्यंत त्यांना करून देण्यांत आली नव्हती. मला ती ठाऊक असल्यामुळें, "तुम्हीं बरे झाल्यावर तुम्हांला प्रवासाची दगदग मुळींच सोसणार नाहीं. तुम्हांला पाहिजे असलेली माहिती मी तुम्हांला मिळवून देतों," असें त्यांना मीं सांगितलें आणि ती माहिती एका मित्राकडून मागविलेली अलिकडेच त्यांच्या निधनानंतर माझ्या हातीं आली आहे! मासिकांच्या सूचीची मुद्रणप्रत तयार आहे. फार काय, पृष्ठाच्या मुद्रित मांडणीचा नमुना (layout), तसेंच पुस्तकाला कोणत्या दर्शिका (Indices) असाव्या हें सर्व त्यांनीं लिहून ठेवलेलें आहे. अशाप्रकारें पहिल्या भागाच्या प्रसिद्धीचें काम सोपें आहे. तरीपण तें काम करण्यास कोणीतरी तसाच निष्ठावंत माणूस लाभला पाहिजे. कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयांत असलेले रा. श्रीकृष्ण जोशी हें काम समाधानकारक रीतीनें पार पाडतील असें मला वाटतें. स्वतः दात्यांचीही तशी भावना होती, असें कळतें. हें काम पुणें विद्यापीठानें, केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्या मदतीनें हातीं घ्यावें. दात्यांचे कित्येक वर्षांचे परिश्रम या कामीं खर्ची पडले आहेत. त्यामुळें आपल्या मागें कुटुंबाच्या चरितार्थाची सोय त्यांना करून ठेवणें शक्य झालें नाहीं. ही गोष्ट लक्षांत ठेवून एकदम कांहींतरी योग्य रक्कम देऊन किंवा त्यांच्या पत्नीच्या हयातींत ठराविक मासिक रक्कम तिला मिळावी अशी व्यवस्था करून हें झालेलें काम पुणें विद्यापीठानें ताब्यांत घ्यावें व पुढील कार्यास लागावें. दुसऱ्या भागाचें कार्य त्यांनीं कितपर्यंत केलें आहे, त्याची मला कल्पना नाहीं. त्यांनीं लेखांचीं कार्डें करून ठेवलेलीं आहेत. तीं काळजीपूर्वक पाहून कोणत्या मासिकांचें काम पुरें झालें आहे, आणि कोणत्या मासिकांचें करावयाचें बाकी राहिलें आहे, तें पाहावें लागेल. सूचि करतांना त्यांनीं कोणतें धोरण स्वीकारलें होतें तेंही पाहावें लागेल. एकूण एक कविता, गोष्टी, किंवा किरकोळ लेख यांची नोंद त्यांनीं केली असेल असें, त्यांच्याशीं जी मधूनमधून चर्चा झाली तीवरून, दिसत नाहीं. तारतम्यानें त्यांनीं निवड केली असेल. 'विविधज्ञानविस्तार,' 'मनोरंजन', 'रत्नाकर' अशा कांहीं मासिकांचीं कार्डें मूळाशीं ताडून हें त्यांचें धोरण समजून घेतां येणें शक्य आहे. तें एकदां समजल्यावर त्याच पद्धतीनें पुढील काम चालू केलें पाहिजे. हें काम हातीं घेण्यास योग्य लायक माणूस पुढें येईल कीं काय, याबद्दल शंका आहे. पगार देऊन अशाप्रकारचें काम होत नाहीं. काम करणाऱ्याला पगार मिळाला पाहिजे. नाहींतर 'मोलें घातलें रडाया', अशी स्थिति होईल. ब्रिटिश म्युझियम-मधील दोलामुद्रितांची यादी प्रॉक्टर यांनीं हातीं घेतली; पण त्यांच्या आकस्मिक निधनामुळें तें काम बंद पडलें नाहीं. पोलार्ड यांनें तें पुढें चालू ठेवून तडीस नेलें. एकादा कार्यकर्ता मरण पावला म्हणून त्याच्या कार्यांत पश्चिमेकडे खंड पडत नाहीं. तें चालू करणारीं निष्ठावंत माणसें पुढें येतात. दात्यांना जर हजार दीडहजार रुपये दरमहा पगार असता, तर त्यांची जागा भरून काढण्यास विद्वानांची नुसती रांग

लागली असती ! ज्या परिस्थितींत दात्यांनीं हें काम चालविलें त्या स्थितींत हें काम करण्यास कोणी पुढें येईल, असें वाटत नाहीं. मला तर केव्हां केव्हां असें वाटतें कीं, स्वतः दात्यांनाच पुनः जन्म घेऊन मासिकांतील लेखांच्या सूचीचें हें काम पुरें करावें लागणार !

दात्यांपुढें दुसरें एक महत्त्वाचें काम होतें. तें म्हणजे १८०१ पासून १९५० पर्यंत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची त्यांनीं जी सूची दोन खंडांत मुद्रित केली, तीमध्यें अंतर्भूत न झालेल्या ग्रंथांची पुरवणी–सूची तयार करणें हें होय. अशीं कांहीं पुस्तकें कोठेंही आढळलीं म्हणजे ते त्यांची लागलीच नोंद करून घेत. त्यांचे एक स्नेही अशीं नोंद न झालेलीं पुस्तकें दिसलीं म्हणजे तीं विकत घेऊन त्यांच्याकडे पाठवीत, हें मला माहीत आहे. गेल्या आक्टोबरांत पुण्यांत गेल्यावेळीं माझ्या संग्रहीं असलेलीं अशीं कांहीं पुस्तकें त्यांना माहीत होतीं, तीं आपणाकडे पाठवा म्हणजे त्याची नोंद करून घेईन, असें ते मला म्हणाले होते; त्यावरून अशा पुरवणी–सूचीकरितां कार्डेंही त्यांनीं बरींच तयार करून ठेविलीं असावीं, असें वाटतें. हेंही काम कोणीतरी हातीं घेऊन तडीस नेलें पाहिजे.

तिसरें एक काम त्यांच्या दृष्टीपुढें होतें. तें केवळ मराठी भाषेचें नाहीं. भारता-संबंधींच्या निरनिराळ्या विषयांवरील अनेक भाषांतील ग्रंथांची एक संदर्भसूचि त्यांना तयार करावयाची होती. या बाबतींत पोर्तुगीज व फ्रेंच भाषां-तील संदर्भग्रंथांची यादी आपणास पुरविण्याची मदत करण्याबद्दल त्यांनीं मला विनंती केली होती. मासिकांच्या सूचीचें आणि मराठी ग्रंथसूचीच्या पुरवणीचें काम हातावेगळें झाल्यावर ते या संदर्भसूचीचें काम प्रत्यक्ष सुरू करणार होते. आणि या दृष्टीनें त्यांची पाहाणी चालू होती. हें काम जर त्यांच्या हातून पार पडलें असतें, तर त्यांना आंतरप्रांतीय किंवा आंतर–राष्ट्रीय कीर्ति लाभली असती. मराठी ग्रंथसूचीचें काम १९५० पर्यंत त्यांनीं आणलें होतें. पुढील वर्षांचें काम स्वतः करण्याचा त्यांचा हेतु नव्हता. तें काम कोणीतरी नव्या पिढींतील माणसानें दहा दहा वर्षांचे खंड प्रसिद्ध करून चालवावें, असें ते एकदा माझ्याकडे बोलल्याचें आठवतें. अलिकडे ग्रंथालयशास्त्राचा अभ्यास निरनिराळ्या विद्यापीठांमध्यें सुरू झाला आहे. मुंबई व पुणें विद्यापीठांनीं या शास्त्राची पदवी देण्याची व्यवस्था केली आहे. तरी या कामीं लायक माणसांची उणीव पडूं नये; परंतु अशीं कामें केवळ कागदी पदवीधर विद्वानांच्या हातून होत नसून ज्यांना कामाची खरी तळमळ व आंच आहे, अशाच माणसांच्या हातून पार पडूं शकतात. मग त्यांना पदवीचा विटाळ मुळींच झाला नसला तरी चालेल. याचें प्रत्यक्ष उदाहरण स्वतः शंकरराव दाते हेच होत.

दा. क. १५१५७

दात्यांच्या कांहींशा एककल्ली व तऱ्हेवाईक स्वभावाबद्दल नाकें मुरडणारे कांहीं मित्र भेटतात. त्यांचा हा स्वभाव अजत नसून सहानुभूतीचा ओलावा त्यांना न लाभल्यामुळें बनला असणें शक्य आहे. ता. १०-१-१९४७ रोजीं त्यांनीं मला लिहिलेलें एक पत्र परवां सहज जुनीं पत्रें चाळतांना पुनः हातीं आलें. त्यांतील दोनतीन ओळी येथें उद्धृत करतों. ते लिहितात, "आतांपर्यंत मला जे जे लहानमोठे लोक भेटले त्यांपैकीं बहुतेकांजवळ असूया, असहिष्णुता, गर्व, अभिमान, लहानाबद्दल तुच्छता इत्यादि बहुमोल गुणच वैशिष्ट्यानें दिसून आले. मग मार्गदर्शनाची किंवा साहाय्याची अपेक्षा करण्याचें नांव कशाला घ्यावें?"

दात्यांनीं केलेल्या कार्याचें महत्त्व आजच्या बऱ्याच विद्वानांनीं जरी कदाचित मान्य केलें नाहीं, तरी आणखी शंभरदीडशें वर्षांनीं त्यांची खरी योग्यता त्या काळच्या पिढीला कळून येईल.

१९३८-३९ च्या सुमारास एक तरुण माझ्या घरीं आला आणि, "तुमचा ग्रंथसंग्रह मला पहावयाचा आहे; दाखवाल काय?" असें म्हणाला. ग्रंथ पाहून झाल्यावर कांहीं ग्रंथांची त्यानें नोंद करून घेतली. हा तरुण म्हणजे शंकरराव दाते होत. पुढें जेव्हां जेव्हां ते मुंबईला येत त्यावेळीं मला भेटल्याखेरीज राहत नसत. त्यांनीं चांगला ग्रंथसंग्रह जमा केला आहे आणि एकाद्या पुस्तकाच्या एकापेक्षां जास्त प्रती असल्यास कोणास हव्या असल्यास ते विकत देतात, असें त्यांच्या बोलण्यावरून कळलें. मी ज्या ज्या वेळीं पुण्यास जाई, त्या त्या वेळीं त्यांची भेट घेऊन मला उपयोगी पडण्यासारखीं पुस्तकें असल्यास तीं त्यांच्याकडून विकत घेत असें. मराठी ग्रंथसूचीकरितां हे ग्रंथ ते गोळा करीत असत. त्यांनीं जमविलेला ग्रंथसंग्रह जर तसाच एकत्र राहिला असता तर एक उत्कृष्ट लायब्ररी आज निर्माण झाली असती, परंतु आर्थिक ओढाताणीमुळें त्यांना आपलीं जमविलेलीं पुस्तकें मधूनमधून मिळेल त्या किंमतीला विकून टाकावीं लागत. प्रादेशिक महाराष्ट्र ग्रंथालयाला दिलेल्या ग्रंथांची जरी त्यांना अपेक्षेप्रमाणें किंमत मिळाली नाहीं, तरी तो ग्रंथसंग्रह एकत्र तरी राहिला. पुस्तकविक्रेत्यांना गरजेच्या वेळीं त्यांनीं जीं पुस्तकें कशींतरी फुंकून टाकिलीं, तीं पुन्हां जिकडेतिकडे विखुरलीं गेलीं. त्यांना आर्थिक स्वास्थ्य लाभलें असतें तर उत्कृष्ट ग्रंथसंग्राहक म्हणूनही त्यांची कीर्ति मागें राहिली असती. एका ग्रंथविक्रेत्याला त्यांच्याकडून घेतलेल्या पुस्तकावर एवढा नफा झाला कीं, शंभरदीडशें (नक्की आंकडा आठवत नाहीं) रुपये त्यांनीं दात्यांना नंतर बक्षीस म्हणून नेऊन दिले. ही गोष्ट स्वतः त्या ग्रंथविक्रेत्याकडून मला कळली. माणसाची खरी किंमत त्याच्या हयातींत होत नाहीं.

मृताच्या आत्म्यास शांति लाभो.

अ. का. प्रियोळकर

राज्य ग्रंथालय, ठाणे. स्वाधीन
क्रमांक ७५८६६... विषय ...निबंध...

REFBK-0015157